भा ५१

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे

(जिल्हा वाचनालय)

मासिकाचे नांव — व्यापारी महाराष्ट्र

संपादक —

मासिक क्रमांक — सन — १९८८

अंक — ६·७·८ ९ १०·११·१२ = १९८८

(महिने) १·२·३ ४·५ = १९८९

ठाणे

काशी·२८/१२

D. M. Patwardhan B.A.
Deputy Collector.

# ऐतिहासिक-लेख-संग्रह.

## मासिक पुस्तक.

जून. १८९८ इ०.

**अंक १३**

वासुदेव वामन शास्त्री खरे
मिरज हायस्कुलांतील संस्कृत शिक्षक.

यांनीं

कुरुंदवाड येथें
" भाऊनाना " छापखान्यांत छापविलें.

वर्षाची आगाऊ वर्गणी टपाल हांशीलसह तीन रुपये.

फुटकळ अंकास पांच आणे.

# ऐतिहासिक-लेख-संग्रह.

## अंक तेरावा


विषयांचा अनुक्रम. पृष्ठ

( मागील अंकावरून पुढें चालू )

मोंगल स्वदेशाकडे परत जातो. ४६७


---

## अगत्याची सूचना.

ऐ० ले० संग्रहाच्या दुसऱ्या वर्षास सुरुवात झाली. वर्गणी पाठविण्या विषयीं आश्रयदात्यानीं त्वरा करावी. आमच्या पुस्तकाची वर्गणी आगाऊ आहे हें त्यांस माहीत आहे.

ऐ० ले० संग्रह कर्ते.


### थोरले मल्हारराव होळकर. यांचें चरित्र.

आह्मीं तयार केलेलें हें पुस्तक शाळाखात्यानें लायब्ऱ्यां करितां पसंत केलें असून द० प्रा० कमिटीनें याबद्दल आह्मांस इनाम दिलें आहे. किंमत १। रुपया. ट० ख० एक आणा. पुस्तकें खालील पत्त्यावर आह्मांकडे मनिआर्डर पाठवून मागवावीं. व्हीं० पे० मागविल्यास ही पाठविण्यांत येतील.

मुरलीधर मल्हार अत्रे
महाराष्ट्र बुक डीपोचे म्यानेजर.
बुधवार पेठ. पुणें.

# द्वितीय वर्षारंभ.

जगदीशकृपेनें ' ऐतिहासिक–लेख–संग्रहाचें ' पहिल्या वर्षाचें कामें निर्विघ्नपणें पार पडलें. आतां दुसऱ्या वर्षाच्या उद्योगास आह्मी लागणार.

गेल्या जून महिन्यांत पुस्तकाचा पहिला अंक प्रसिद्ध झाला तेव्हां दुष्काळाची ऐन अमदानी व प्लेगची भयंकर धामधूम जोरीनें सुरू होती. लोकांची मनें भीतीनें गांगरून गेलीं होतीं. दुसरें अरिष्ट अद्यापि महाराष्ट्रांतील शहरें व गांव उद्ध्वस्त करीतच आहे. कधीं परमेश्वरास करुणा येईल ती येवो !

अशा प्रकारें पुस्तकाच्या सुरुवातीस प्रतिकूल काल असतां ही सर्व अडचणी क्रमाक्रमानें दूर होत गेल्या व आह्मांस थोडथोडा लोकाश्रय मिळत गेल्यामुळें स्वकर्तव्य बजावितां आलें.

गेल्या सालीं सुरू असलेलें प्रकरण " मोंगलाशीं लढाई " हें या सालीं ही चालू राहून सोळाव्या अंकांत संपेल. त्या नंतर " हैदरअल्लीवर पहिली स्वारी " हें प्रकरण सुरू होऊन साल अखेरीस संपेल.

---

आश्रयदात्यानीं वर्गणी लवकर पाठवावी. आम्हीं किती झटून व नियमितपणानें त्यांची सेवा करीत आहों हें त्यानीं ध्यानांत आणावें. याविषयीं ' अगत्याची सूचना ' ही निराळी दिली आहेच.

मागील सालाचें मुखपृष्ठ या अंका सोबत सुटें पाठविलें आहे. आतां मागील अंकांचें पुस्तक बांधण्यास हरकत नाहीं.

ऐ० ले० संग्रह कर्ते

ना.भा-२६/२



## श. १६८५ मोंगल स्वदेशाकडे परत जातो इ.स. १७६३

नं० २७७

[ १७ मे. ]

श्रीगणपतिर्जयति.

आशीर्वाद उपरी. येथील कुशल तागायत अधिक शुद्ध चतुर्थी बुधवार तृतीय प्रहर. यथास्थित असे विशेष. सोमवारचें पत्र जासुदाबरोबर पाठविलें तें शुक्रवारीं प्रहर दिवसास प्रातःकाळीं पावलें. त्या पत्रावरून चित्ताची स्वस्थता नाहीं. परंतु मंगळवारचीं पत्रें बाळाजी नरसिंह याजबरोबर पाठविलीं तीं गुरुवारीं सायंकाळीं पावलीं होतीं त्या पत्रांत फारसा पहिल्या पत्रा प्रमाणें मजकूर नव्हता, त्या मुळें चित्त स्वस्थ राहिलें. मुख्य साऱ्या गोष्टी ऋणानुबंधावरी आहेत. जी स्वप्नीं कल्पना[2] होईना ऐसा प्रसंग प्रत्यक्ष घडोन आला! बहुत दिवस सेवा केली. लेंकरा प्रमाणें ज्याणीं प्रतिपाळ केला त्याच धण्यांनीं बाहेर घातलें! तिलमात्र चित्तांत विचार न आणिला! आम्ही विचार करावा तो चालेना. प्रवाहीं पडले ते वाहत गेले तद्वत् वाहत नबाबाच्या आश्रयास लागलों. पुढें आपला होणार काल उत्तम आहे तरी नबाब ही कृपा करील. तुम्हीं ही सेवा कराल. नाहीं तेव्हां बहुता दिवसांचें पलार्ध व्यर्थ झालें तेथें याची कथा काय? श्रीभगवान् समर्थ असतां चिंता कोठिवरी करावी! नळदुर्गीच्यांनीं[3] पूर्वीं येथें यावें ह्मणून लिहिलें होतें, त्या उपरी 'तूर्त न आणावे, नाईकें[4] यांची फौज दरम्यान आली आहे. हे एकीकडे झालियावरी मग आणावयाचा विचार,' ह्मणून लिहिलें, त्यास उभयतां वडिलांनीं याच प्रकारें प्रत्योत्तर लिहिलें आहे. 'नाईक जातात, श्रीमंत ही एखाद्या ठिकाणास पोंहचतील, पुढें तुमच्या विचारें यावेसें झालें तरी येऊं;' (असें त्यानीं लिहिलें आहे.) रामचंद्र

---

१ पत्र गोविंद हरीचें गोपाळरावास. २ पेशव्यांचा आमचा द्वेष पडून लढाई होईल ही कल्पना. ३ नळदुर्गास वडील बंधु कृष्णंभट व त्रिंबक हरि आहेत त्याणीं. ४ मंगळवेढें व नळदुर्ग यांच्या मध्यें बाबूजी नाईक बारामतीकर यांची फौज आली आहे.

गणेश मोहळेंत आला होता. शुक्रवारीं शनिवारीं माघारा गेला. तो सीनातीरीं तीरेसिगोली ( ? ) वरी चार पांच मुक्काम करून आहे. घासदाणियाचा तह झाला असतां [ त्यानें ] एक- दोन खेर्डी मारिलीं. बाबूजी नाईकाशीं[1] करार तहाचा करीत असतां आग्रह करोन चालोन आले. निंबाळकराकडील लोकांनीं दहा पांच तट्टें कहीचीं पाडून घेतलीं. खेड्याखेडियानीं जमा आहेत. सीनेस पाणी, यास्तव ते ही दम धरून राहिले आहेत. मागती त्यांजकडूनच सूत्र लागलें कीं, 'तहा प्रमाणें निर्वाह[2] करा.' हे[3] ह्मणतात, खेर्डी मारिलीं. मागती कसें होईल पहावें! कुरकुंबेत बहिरोपंतीं[4] हिम्मत बरीच धरिली. फार करून गडबड झाली होती, परंतु मोहळेहून चार कोस माघारे सरले यामुळें अवसान बसलें आहे. श्रीमंतांचें लष्कर काडलूर संगमाकडे[5] गेलें. परंतु फलाणे ठिकाणीं आलें असें ठीक[6] नाहीं. आम्हीं बातमीचे खबरदारीस चुकलों नाहीं. दोन तीन जोड्या पाठविल्या आहेत. तुम्हीं चिरंजीव दाजीस लिहिलें होतें त्या अन्वयें चिरंजीवानीं उभयतांस सूचना लिहिली आहे. जवळील प्रकार नव्हे. दूर आहेत. समीप पसंत पडलिया जाबसाल पुढील भवितव्यानुसार होईल. मर्दनगडास[7] फिरंग्यांनीं वेढा घातला होता. परवां आजऱ्यांकडून माणूस आला त्यानें खबर सांगितली कीं, फिरंग्यांनीं मर्दनगड घेतला. परंतु कोणाचें लिहिलें नाहीं. खडकताहून कूच होऊन तुमचें पत्र गुरुवारचें बहिरोपंताच्या जासुदा बरोबर आलें त्यांत लिहिलें कीं, 'उदईक ( नबाबाची ) आज्ञा घेऊन चिरंजीव नीलकंठरायांची रवानगी हवी, घोडियांनिशीं करितों ' ह्मणून

१ बाबूजी नाईकाकडून. २ शर्ती अमलांत आणा. ३ निंबाळकर ह्मणतात कीं, तुह्मीं आमची खेर्डी मारिलींत. आतां कसचा तह ? ४ पेशव्यांचे लोक. रामचंद्र गणेश याच्या हाता खालचे. ५ काडलूर संगम कृष्णा व भीमा यांचा, रायचूरचे उत्तरेस आठ कोसांवर. ६ पक्कें वर्तमान. ७ मर्दनगड किंवा मदनगड ( फोंडा ) हा किल्ला गोंव्याच्या सरहद्दीवर सोंधें संस्थाना पैकीं असून तो यावेळीं पेशव्यांच्या ताब्यांत होता. तो घेण्याचा हा फिरंग्याचा दुसरा प्रयत्न. पहिल्या प्रयत्नाविषयीं पहिल्या अंकांतील आठवे पृष्ठावरील सहावी टीप पहा.

लिहिलें; त्यावरून करमाळ्याकडे आले असतील ह्मणोन आम्हीं माणसें त्याच्या नांवें पत्र लिहून पाठविलीं आहेत. आश्चा मालवर गुंता असतां त्वरेनें येणें घडणार नाहीं. गोटाखिडीकर एक मुसलमान बारगीर जमखिंडीच्या झुंजांतून गेला तो काल अवलख घोडी घेऊन येथें आला. इतके दिवस आपणास बरें वाटत नव्हतें ह्मणतो. लोकांच्या चिठ्या येऊं लागल्या. ' चिठ्या ध्या, आमच्या पदरीं पैका घाला, ' म्हणतात. आम्हीं " महिन्या दोन महिन्यांची मुदत द्यावी. विचारें विचारें करून वाटून देऊं. आम्हांपाशीं चिरंजीवानीं ऐवज कांहीं दिला नाहीं. परंतु लिहिलें आहे जे ' चिठ्या न फिरविणें. आम्हीं आलियावरी ऐवज देऊं. ' त्यास आजीच मामाल तर नाहीं. फुरसतीनें देऊं, " ( असें सांगतों ) कोणी बरें म्हणतो. कोणी नाहीं म्हणतो. चिठी आम्हीं यादीवर बार करून त्यांच्या समाधानास त्यां जवळी देतों. " फलाणे मुदतीची चिठ्ठी घेऊन येणें. रुपये घेणें. " [ अशी मुदत सांगतों ] एकच मुदत सांगत नाहीं. माणूस पाहून सांगतों. वरकड कुंदवाडाकडील यथास्थित आहे. पुण्याकडे घर[1] होतें ह्मणोन मागें आठ पंधरा दिसां माणूस पाठवीत होतों. आतां तो प्रकार नाहीं. रामाजीपंत[2] ही [ तेथें ] नाहीं या मुळें पत्र पाठविलें नाहीं. नरगुंदाकडून नरसिंहभाऊ पागे आले कृष्णातीरास. पुढें श्रीसत्ता प्रमाण ! कोणे विशीं चिंता न करणें. होणार प्रारब्धगतीनें होईल. मार्ग पाहून चालत असतों. ठेंच लागली तरी ईश्वर इच्छा प्रमाणें ह्मणावें ! वरकड भयकृत् भयनाशन श्रीपंढरीनाथ समर्थ आहे. सुखाअंतीं दुःख, दुःखाअंतीं सुख लागलेंच आहे. श्री कल्याणच करील. कांहीं चिंता नाहीं. ते[3] महापुरुष [ परलोकास ] गेल्यां उपरी एका आम्हांसच संकट प्राप्त झालें असें नाहीं. त्यांचे पदरीं बहुत होते ते व प्रजा सर्व दुःख पावली. त्यांच्या

---

१ तर मग पुणें मोंगलानें जाळिलें तेव्हां तेथें पटवर्धनांचा वाडा होता तो ही जाळिला गेला कीं काय ? असें तर होऊं नये ! २ हा रामाजी नारायण गोखले गोविंद हरीचा पुण्यांतील कारकून. ३ नानासाहेब व भाऊसाहेब पेशवे.

घरचीं माणसें देखील पावलीं. सरकारची नुकसानी ही फार झाली. श्रीमंतांस हें कांहीं श्रुत नाहीं. तेथें उपाय काय! बहुत काय लिहिणें हे आशीर्वाद.

नं० २७८

[ १६ मे. ]

श्रीगणपतिर्जयति.

आशीर्वाद उपरी येथील कुशल तागायत (अधिक) ज्येष्ठ शुद्ध तृतीया रविवार तीन प्रहर. यथास्थित जाणून स्वकीय लिहिणें विशेष. तुम्हीं वद्य त्रयोदशी भौमवारचीं पत्रें पाठविलीं तीं काली मंदवारीं पावलीं. लिहिलें वर्तमान विस्तारें कळलें. ' राजे बहादर सासवडास आले. आपण समागमें आलों. पुढें पुरंदराहून कारकून आला. बोली चाली ठराव करून दिला. ' ह्मणोन लिहिलें तें विस्तारें कळलें. उत्तम गोष्ट केली. आपण कोणाचें तरी साहित्य करावें. दुसरियाचें अनिष्ट सांगोन सहसा करूं नये. केलें (हें) उत्तम केलें. मीर आबस यास पत्र व दालई्त पाठविले ते येथून बरोबर माणसें देऊन रवाना केले. पुढें फलदाता ईश्वर. मीरआबस याणें जाऊन तिकोटें लुटिलें ह्मणोन वर्तमान आहे. पुण्याचा मजकूर लिहिला तो कळला. दर कसे दहा वीस अलीकडे पलीकडे करून तेथील वेध तुटे तें करावें. नवाबाचें कूच होऊन जात तें करावें. [ हें ] परम श्रेयस्कर. यांतच कल्याण समजावें. श्रीमोरेश्वर जेजुरीचें वर्तमान लिहिलें तें कळलें. अशा स्थलांचींच रक्षणें व्हावीं त्या प्रमाणें त्याणीं केलें. गमाजी बावानीं जाते समयीं शिवापुर आदिकरून शिरवळ रोहिड्यापावेतों मुलूख लुटिला. खांबटकीचा घांट चढोन गेले, उत्तम गोष्ट केली!

---

१ गोपिकाबाई, पार्वतीबाई वगैरे. २ माधवराव पेशव्यांस. ३ पत्र गोविंद हरीचें गोपाळरावास. ४ तिकोटें जिल्हा विजापुर हें कुरुंदवाडकरांच्या जहागिरींत आहे. ५ खंडणीच्या रकमेंत दहा वीस हजार कमी जास्ती करून. ६ राजे विठ्ठल सुंदर याणें.

दोषांची [ त्यांस ] कळिजी[1] नाहीं. स्फीतीची[2] मात्र आस्था कीं, फलाणे याणीं जाऊन महत्कार्य सिद्धीस नेलें ! ज्याची जशी रीत तशी ते करितात. सातारियाकडे जाऊन कर्तव्य काय ? किल्ला श्रीमंतांकडे. यांच्या हातीं कांहीं नाहीं. वांई देशांतून नवाब गेले तरी जातां जातां दोन रुपये मातबर गांवानीं खंडण्या होतील. पुढें आपणास मार्गानें जाणेंच आहे. कृष्णेपलीकडे दैबा[3] दिला तरी करवीरवासी दोन तीन चार ( लाख ) कांहीं तरी देतील. स्वारी व्यर्थ होणार नाहीं. श्रीमंतांचा संदर्भ तहाचा तूर्त दिसत नाहीं. पुणें व सारा प्रांत विल्हेस लागलियावरी तह करतील तर न कळे ! चिरंजीव दाजी चतुर्दशीस श्रीक्षेत्रास आले. काली द्वितीया मंदवारीं अस्तमानीं येथें सुखरूप आले. अमावास्या व भावईची[4] कर म्हणोन दोन तीन रोज तेथें होते. प्रस्तुत त्यांचे शरीरीं व्यथा निःशेष जाहली असा प्रकार नाहीं. खंदकाचें काम चालत आहे. उत्तरेकडील दोन दिवसांत तयार होईल. पश्चिम दक्षिण दोहींकडील खंदक करावा कीं काय तें लिहिणें. सखारामाचे मतें सर्व श्रीमंतांचें राज्य लयास न्यावें, दौलत बुडवावी, तदनुसार तो मनसबा करितो. परंतु धणी सावधच होईनात यास उपाय काय ! तस्मात् श्रीमंत दादासाहेब यांच्या योगेंकडून राज्य बुडावें त्या सारखी त्यांस बुद्धि निर्माण ! बाबूजी नाईक त्याशीं[5] खट्ट[6] किंवा स्नेही हें कांहींच त्यांचें लक्षण कळत नाहीं. एकाशीं एक स्नेही स्वल्पांतच होतात, बिघडतात, मागती एक होतात, हेंच अपूर्व ! विश्वास धरितात ! त्यांची लीळा ते जाणोत ! लोकांच्या कपाळास प्रांताच्या साऱ्या लागलें तेव्हां सखारामानें बुडविलें असें ध्यानास आलें. पुढें. होणार तें श्री सत्ता प्रमाण ! बहुत काय लिहिणें हे आशीर्वाद.

---

१ लोक आपणास काय ह्मणतील याची गमाजीस फिकीर नाहीं. २ प्रख्यातीची. ३ धमकी. ४ वैशाखी अमावास्या भावुका. ५ सखारामबापूशीं. ६ रुसलेले, वांकडे.

नं० २७९

( १७ मे. )

श्रीगणपतिर्जयति.

आशीर्वाद उपरी. येथील कुशल तागायत ( अधिक ) ज्येष्ठ शुद्ध पंचमी भौमवासर तृतीय प्रहर यथास्थित असे. विशेष. काली आपाजी कांडेकर याज बरोबर पत्रें पाठविलीं आहेत त्यावरून कळेल. लग्नाचे दोन मुहूर्त वद्य अष्टमी मंदवार एक. व दशमी सोमवार एक. दोन मुहूर्त आहेत. त्यांत एक साधेल तो करावा. तुम्हांस निघावया मुहूर्त शुद्ध एकादशीस एक किंवा वद्य प्रतिपदेस एक. दोन मुहूर्त आहेत. त्यांत फावेल त्या मुहूर्तें निघावें. अगोदर फलाण्या मुहूर्तें निघोन येतों ह्मणोन लिहावें. नलदुर्गाकडील सुखें आहेत. श्रीमंत कोण्हे ठिकाणीं आहेत हें वर्तमान कांहीं [ कळलें ] नाहीं. भागानगरानजीक गेले. फिरते समयीं कोणत्या मार्गें होतील पहावें. लक्ष्मेश्वराकडील वर्तमान परवां चिरंजीवांचें पत्र आलें तेंच काली पाठविलें आहे. त्यांत फारच अवसान सोडून लिहिलें आहे. कालपरत्वें सर्व ही गोष्टींचा योग घडोन आला. सखारामानें कोठें ही स्वस्थ आमच्यानीं रहावें असा प्रकार केला नाहीं. बर्वे कांहीं परकी नव्हेत, तसेच लक्ष्मण कोन्हेर ही नव्हेत; परंतु तेच आम्हांस शत्रु झाले ! वांईकडील वर्तमान न कळे. गाडगीळांची गति काय झाली ? तुम्हीं समाचारास माणूस पाठविलें कीं नाहीं ? निष्ठुरत्व धरिलें ह्मणतील. त्यांचा परामर्ष करावा. प्रस्तुत नवाब कोणे ठिकाणीं, राजे बहादर कोणे ठिकाणीं, तुम्हीं कोठें, कांहींच कळेना ! सातारियाकडून नवाब गेले तरी दहा लक्ष रुपये कनिष्ट पक्षीं प्राप्त होतील ते कोठें वीस, कोठें तीस, चाळीस, पन्नास, च्यार, पांच, पन्हाळा प्रांत, कऱ्हाड, शिरोळ, चिकोडी प्रांत, जमखंडी, तेरदाळ, गोकाक, व कृष्णेपलीकडील संस्थानें, कोठें कांहीं, या

---

१ पत्र गोविंद हरीचें गोपाळरावास. २ मेघश्यामरावबापूचें. ३. वांईवर गमाजी बावानें स्वारी केली होती. तेथें राहणाऱ्या गाडगिळांविषयीं ही गोविंद हरीची विचारपूस.

प्रमाणें मिळेल. तुम्हांस स्थल प्राप्त झालें तरी रहावयास स्थल होईल एवढी मात्र आस्था. तो[1] आंतील जकेरीयाचें सामान क्रय करूं लागला ह्मणोन वर्तमान आहे. नबाबाची छावणी कोठें होणार हें ही तुम्हांस ठाऊक नाहीं. कोणीकडे जाणार हें ही ठाऊक नाहीं! मसलत कळोंच देऊं नये, हा त्यांचा दंडक.[2] त्या[3] मार्गे गेले तरी प्रांताचा सत्यानाश होईल पण आपलें कार्य.[4] वांई देशीं[5] देखील वांई ( मुकामीं ) दोन तीनें मिळतील. परंतु अद्याप [ नबाब ] पुणें प्रांतींच राहिले हें अपूर्व! त्या[6] प्रांतीं फिरोन वस्ती होणें दुर्घट आहे. सखारामाचा मतलब पुणें यांणीं[7] जाळून भस्म करावें. ज्ञातीचे[8] लोक एकत्र बहुत मिळाले आहेत याणीं देशधडी व्हावें; ह्मणजे आपला संकल्प सिद्धीस गेला! त्यास पुण्याचे रखवालीचा यत्न तुम्हीं केला त्याचा प्रकार कसा झाला हें लिहिणें. सुपें देशाकडून नबाब जळगांवावरी कऱ्हातीरीं येणार ह्मणोन लिहिलें त्यावरून सालप्याचा रोख चुकला नाहीं. तो एक किंवा बारामती वरून नीरेचा, तेथून भिवरेचा रोख झाला. कोणीकडे होतील नकळे!. अद्याप लोक सचिंत आहेत. दोन्ही लष्करें फिरते समयीं काय करितील न कळे! फलटण ही मध्यें आहे. लाख पन्नास तेथें प्राप्त होतील. कळलें पाहिजे. चिरंजीव दाजीस कांहीं उतार आहे. येऊन आजी चौथा रोज. खंदकाचें काम चालत आहे. पूर्व उत्तर दोन बाजू करितों. पश्चिम दक्षिण करीत नाहीं. कळलें पाहिजे. कुरुंदवाडाकडून आलें पत्र तें पाठविलें आहे. मोंगल त्या प्रांतीं येतो हे आवई तिकडे ही आहे. ढालाईत मीर आबस याजकडे रवाना केला. तो मातागमनी ऐकेलसा भरंवसा नाहीं. होनवाड वागमोऱ्यानें ( ? ) घेतलें होतें, ( तें त्यानें ) त्याचे धास्तीनेंच दिलें.

---

१ मिरजेचा किल्लेदार लक्ष्मण कोन्हेर हा किल्ल्याचें जकिऱ्याचें ह्मणजे दारू गोळी, धान्य व इतर सामान विकीत होता त्या विषयीं हें लिहिलें. २ 'हा त्याचा दंडक' = हा नबाबाचा शिरस्ता. ३ साताऱ्याच्या वाटेनें. ४ मिरज पुनः आपल्या ताब्यांत करून घेण्याचें. ५ दोन तीन लाख. ६ पुणें प्रांतीं. ७ नबाबानें. ८ कोकणस्थ जातीचे.

त्याचें ठाणें बसलें. तिकोटें यांत बसलें. तेलसंगकर॰ पांच हजार रुपये देत होते, [ पण ] 'ठाणें घेणार, रुपये घेत नाहीं.' ह्मणून बोलिला. त्याची धास्त बरीच बसली आहे. कळलें पाहिजे. बहुत काय लिहिणें हे आशीर्वाद.

पै॥ छ० ११ जिल्काद.

नं० २८०

[ १९ मे. ]

श्रीगणराज.

श्रियासह चिरंजीव राजश्री भास्करपंत व समस्त[1] चिरंजीव मंडळी यांसी प्रती सौभाग्यवती सत्यभामाबाई आशीर्वाद उपरि येथील क्षेम तागायत

---

1 गोविंद हरीची स्त्री व गोपाळरावाची आई. हिला कुटुंबांत 'ताई' ह्मणत असत. तिनें हें गोपाळरावास पत्र लिहिलेलें आहे पण तें त्याच्या नांवें न लिहितां धाकटा दीर व समस्त चिरंजीव मंडळीच्या नांवें लिहिलें आहे! गोपाळरावानें नवरी नापसंत केली याबद्दल त्याची फजिती करण्यांत त्याच्या आईनें या पत्रांत कांहीं बाकी ठेविली नाहीं! गोपाळरावाच्या या दुसऱ्या लग्न संबंधानें आजपर्यंत जे उल्लेख आले आहेत ते पहातां त्याची वागणूक या कामीं निर्दोष होती असें ह्मणवत नाहीं. पहिली बायको वारल्याचें वर्तमान त्यास फाल्गुनमासीं कळलें. त्या नंतर त्यानें गोविंद हरीस सांगितलें कीं, कोंकणांत राजापुर प्रांतीं आमचे मामा पाटणकर आहेत. त्यांस नवरी मुलीचा शोध करून तिला इकडे घेऊन येण्याविषयीं पत्र ल्याहावें. त्या प्रमाणें गोविंद हरीनें पत्र लिहिलें व पाटणकरानें सदाशिवभट भिडे ह्मणून कोणी मनुष्य होता त्याची मुलगी आठ नऊ वर्षांची चांगली होती ती पसंत केली व गोविंद हरीस पत्र लिहिलें. त्यावरून गोविंद हरीनें कोकणांतून नवरी व तिचा बाप वगैरे माणसें आणण्या करितां पालख्या घोडीं वगैरे लवाजमा पाठविला व गोपाळरावास लिहून पाठविलें कीं, वैशाख शुद्ध पक्षीं लग्नाचे मुहूर्त आहेत या करितां तुह्मीं चार दिवसांची सवडींत सवड करून लष्करांतून घरीं निघून या व लग्न उरकून घेऊन परत जा. कोंकणांतून पाटणकर मामा वऱ्हाड घेऊन आले. पण गोपाळरावास नवरी न आवडल्यामुळें त्यानें लग्नास घरीं येण्याची चुकवाचुकव चालविली. नवरी मुलीचा बाप प्रतिष्ठित मनुष्य होता. त्याची एक पुतणी पुण्यांतील खासगीवाल्यांकडे व दुसरी बाबूजी नाइकास दिलेली होती. तो गृहस्थ व लग्न जुळविणारा पाटणकर मामा व गोविंद हरि व त्याची बायको ताई हीं

( अधिक ) ज्येष्ठ शुद्ध सप्तमी गुरुवार मुक्काम मंगळवेढें येथें सुखरूप असों. विशेष. आतां चिरंजीवाचें पत्र चिरंजीव पांडूस आलें कीं ' नवरी वाईट आम्हांस परिछिन्न करणें नाहीं. ' ह्मणून पत्र आलें, त्यावरून अपूर्व वाटलें ! महिना एक जाहला. आतां जर त्या ब्राह्मणास ' जा ' ह्मणून सांगितलें तर तूर्त आम्हांवर ब्रह्मद्वेष येणार. तशांत ही ' पाटणकर मामानीं नवरी वाईट आणिली ' ह्मणोन लिहिलें, ( तर तशी ) त्यांस आणावयास गरज काय ? कांहीं पैसा तुमचे लग्नांत पाटणकर मिळवीत नाहींत ! इतकें ही असून वाईट असती तर आह्मी काय सर्व वेडीं होतों कीं काय ? आणि तुम्हीं मात्र शहाणपणें लिहितां ! दहा पांच मुलींत नवरी चांगली आहे. दहा पांच हजारांत चांगली ती तुम्हीं करणार, तशी कोण मिळणार ? एक पुण्यांत मिळणार, तें पुंणें दारोदार (भटकावयास) लागलें आणि तुम्हीं ही तसेच! तर अतःपर ऐशा गोष्टी लिहिलियानें परिणाम नाहीं. नाहक आम्हांवर ब्रह्मद्वेष पाडाल. आम्हीं पहिलीं माणसें. दहा पांच हजारांत चांगली ( नवरी निवडून ) आणावी इतकी परिक्षा आम्हांस नाहीं ! तुम्हांपाशीं कोण परिक्षवंत असेल त्यास सत्वर पाठवून देणें. अधिकोत्तर काय लिहावें ? बहुत काय लिहिणें लोभ कीजे. हे आशीर्वाद.

---

सारींच आतां तोंडघशीं पडल्या सारखीं झालीं. गोपाळराव जों जों नवरी नको ह्मणे तों तों ती त्याच्या गळ्यांत बांधण्या विषयीं त्याच्या आईबापांचा अधिक अधिकच आग्रह सुरू झाला. नवरी जर त्यास प्रथमच नापसंत होती तर अलीकडे मंगळवेढ्यास आल्यावर तिला देवी आल्यामुळें ती अधिकच नापसंत झाली असावी ! शेवटीं या प्रकरणीं आईबापांचा हट्ट तडीस गेला, व या नाहीं तरी पुढल्या वर्षी त्यानीं त्याच मुलीशीं लग्न करावयास गोपाळरावास लाविलें ही गोष्ट त्यास भूषणावह आहे ! आतांच्या काळांत गोपाळरावासारख्या योग्यतेच्या पुत्रावर ह्मातान्या आईबापांचा असल्या कामांत इतका अंमल चाललेलसें वाटत नाहीं !

१ गोपाळरावाचें. २ कोकणांतून वऱ्हाड येऊन एक महिना झाला. ३ पत्र लिहिणारी ' आह्मी ' या शब्दांत आपला व नवऱ्याचा समावेश करीत आहे. ४ पुण्याचे लोक.

नं० २८१

( १९ मे. )

श्रीगणपतिर्जयति.

आशीर्वाद उपरी. येथील कुशल तागायत [ अधिक ] ज्येष्ठ शुद्ध सप्तमी गुरुवार यथास्थित जाणून स्वकीय लिहिणें. विशेष. तुम्हीं तृतीया रविवारचीं पत्रें पाठविलीं, पांच सात बंद पाहून विस्तारें कळलें. मुख्य गोष्टी नबाब छावणी कोठें करणार हें कळत नाहीं. रहावयाच्या स्थलाची तरतूद नाहीं एवढी मात्र चिंता होती तें कळलें. मोंगल परिछिन्न औरंगाबादेस छावणीस जातो. भलते जागां छावणी करून खर्चा खालीं यावया कारण काय ? खजानपुर ( ? ) नाहीं. [ नबाब ] शहरास गेले ह्मणजे शिबंदी कार्या कारण ठेऊन बरकड दूर करतील. पुढें प्रसंग पडेल तेव्हां ठेवितील. आमची काळजी आम्हांस ! एवढा देश खराब होऊन दौलत बुडाली, नक्ष गेला, ते काळजी सखारामास नाहीं ! परंतु आम्हांस सर्वस्व बुडवावें हें त्यांचें मानस नाभिकमळा पासून आहे. तो प्रयत्नांत आहे. नबाब शहरास गेले तरी तो इकडे येऊन आमचा घोंटाळा करील. हे स्थल कांहीं आठ चार दिवस दम धरील असा अर्थ नाहीं. आठ दिवस झुजोन तरी परिणाम काय ? जें होणार प्रारब्धगतीनें तें होईल. एक श्री पंढरीनाथावरी आम्हीं सारें सोंपून देतों. दिलेंच आहे. ऋणानुबंधें घडेल. तें प्रमाण ! बहुत दिवस त्यांचें अन्न भक्षिलें, त्यांचेच हातें सार्थक झालें ह्मणजे बहुत उत्तम. परंतु असें जन्मांतर शुद्ध कैचें जे अशी गोष्ट होईल ! असें झाल्यानें इह पर दोन्ही साधलीं. बरें ! इतक्याची ही चिंता करीत नाहीं. तुम्हांस बरावरी जावें लागेल. खर्चाची गत काय होईल हे काळजी मातबर पडली. श्रीपंढरीनाथें नेमिलें असेल तसें होईल ! श्रीमंत मिरजेकडे येणार, नबाब शहरास जाणार ! एकाचा मार्ग एक पाहतो. घडेल तें खरें. नारो आपाजी प्रामाणिक मनुष्य आहे. जामिनगत अंगावर घाडणार

१ त्या विषयां. २ औरंगाबादेस. ३ लौकिक. ४ मंगळवेढ्याकडे, ५ पुणें

नाहीं. बहुत काय लिहिणें हे आशीर्वाद.

पै॥ छ० ११ जिल्काद.

नं० २८२

[ अधिकज्येष्ठ शुद्ध नवमी
२१ मे. ]

श्रीगणपतिर्जयति.

आशीर्वाद उपरी. तुम्हीं पंचमी भौमवारचीं पत्रें पाठविलीं तीं कालि अष्टमी भृगुवारीं चतुर्थ प्रहरीं प्रविष्ट होऊन विस्तारें वर्तमान कळलें. पुण्याचा[१] करार झाला असतां हे गति झाली, तस्मात् राजेबहादर यांस हे मसलत[३] कळली होती; यास्तव ( त्यानीं ) तुम्हांस आपणाकडे आणविलें! होणार भावी तें घडलें. त्याची क्षिति मानून होणार काय! होणारच तसें! आभाळास ठिगळ कोठवर लावणार! एवढें[४] राज्य श्रीमंतांचें—त्या पैकीं जुन्नर, पुणें, लोहगड, सिंहगड, पुरंदर, राजमाची, इतक्यावरी सेना समुद्र लोटला! [५]महिना अर्वेग्र लुटितात्, जाळितात. त्यांणीं दक्षिण समुद्रापासून दिल्ली अटकेपर्यंत कीर्ति जाय ऐसी केली! मागें तमाशकुली[६] आला होता त्याणें दिल्लीची गति काय केली हें ठाऊक आहे कीं नाहीं? आपणावरी ओढून घेऊन आपण नाहक श्रमांत पडोन—सारे समागमें[७]

---

वांचविल्या बद्दल नारो आपाजी तुळसीबागवाले यानें मोंगलास खंडणी देण्याचा करार केला होता त्यांत गोपाळरावानें मोंगलाजवळ जामिनगत पत्करिली होती त्या संबंधें हें लिहिणें.

१ पत्र गोविंद हरीचें गोपाळरावास. २ खंडणी घेऊन पुण्यास उपसर्ग न देण्याचा करार मोंगलानें केला असतां. ३ पुणें जाळण्याची मोंगलाची मसलत विठ्ठल सुंदर राजे बहादर यास कळली होती. तुह्मीं मोंगलास अडथळा कराल ह्मणून त्यानें तुम्हांस पुण्याहून जेजुरीस आपणाजवळ बोलावून नेलें. ४ एकंदर. ५ निजामअलीनें. ६ नादिरशहा. ७ भोंसले, प्रतिनिधी वगैरे मराठे सरदार मोंगला बराबर आहेतच. तुह्मीं एकटेच आहां असें नाहीं. मग पुण्याचा नाश होण्याविषयीं आपण निमित्त झालों असा तुह्मीं एकट्यानेंच कां खेद करावा?

असतां—आपण श्रम मानावयास कारण काय? यजमानानीं [ तुम्हांस ] राज्यांतून बाहेर घालविलें, उभें रहावया स्थल नाहीं, फौजेवर छापा घालून सत्यानाश केला, निदान झालें तेव्हां जीव वांचवावे या अर्थें ( नबाबाकडे गेलां ) नबाब थोर होते. त्यानीं आपले स्वरूपानुसार बहुमान केला. पुढें आपले प्राक्तनीं असेल तसें घडेल! चिंता कोठवरी करणार! नबाब या उपरी माघारे जातीलसें दिसतें. त्याणीं संतोषें आज्ञा दिली तरी यावें. परंतु रहावें कोठें? येथें श्रीमंत माघारे फिरतील तेव्हां भय आहे. तें भय आम्हीं जाणून येथील वस्ती कबूल केली आहे. परिणाम येथेंच लागला तरी उत्तमच झालें. चिरंजीव दाजी अद्याप खोलींतच आहेत. बाहेर फिरावयाची शक्ति नाहीं. चिरंजीव मेघश्यामरायाकडील मजकूर लिहिला तो कळला. त्याणें आमचे कोठें न रहावे असेंच जाणून अश्वत्थाम्यासारखें शस्त्र सोडिलें आहे! त्यांत चिंता कोठवरी करावी? मुख्य सर्वांचें रक्षण करणार ईश्वर तो आम्हांकडे. जीव वांचलियावरी सर्व ही मिळेल. ( नबाबानें ) पुणें शहर जाळिलें, लुटिलें. मागती करारा प्रमाणें रुपये मागतील, यास्तव, ( तुम्हीं नबाबाजवळ ) चिठी मागितली, बरें केलें. परंतु ते " राहिल्या हवेल्या साऱ्या जाळून मग चिठी देऊं ह्मणूं लागले, " तरी काय करावें? राजे विनायकदास सिंहगडाहून माघारे आले नाहींत. ते तेथें काय काय करितात न कळे. श्रीमंतांच्या दौलतीचा विनाशकाल आला, त्यास तुम्हीं चिंता करून काय होणें? ज्याची त्याणीं आस्था सोडून गोरगरीबें लुटीत देश जाळीत भागानगर प्रांतें फिरतात. हे त्यांचा देश जाळितात. दे वाण घे वाण आहे. सारांश हे छावणीस राहून नाहक खर्चा खालें येत नाहींत हा पक्का मनसबा आहे. वरकडांस ज्यांची त्यांस स्थलें आहेत. एक तुम्हीं निराश्रयी व सदाशिव रामचंद्र.

---

१ पेशव्यानीं. २ पटवर्धनांची जहागीर कर्नाटकांत होती तिचें संरक्षण करण्यांत मेघश्यामराव गुंतला असतां सखारामबापूनें तिकडे त्याजवर काय काय अरिष्टें आणिलीं हें गोपाळरावानें गोविंद हरीस लिहून पाठविलें होतें त्या संबंधें उद्गार पुढील पत्रांत आहे. ३ सखारामबापूनें. ४ मोंगल. मागील वाक्य पेशव्यांस उद्देशून आहे.

तुम्हीं औरंगाबादेसच जीऊन रहावें परंतु शहरचा वस्ती, खर्च भारी पडेल, पैशास संबंध नाहीं, परंतु उपाय काय! जालनापुराकडे पागा लाऊन देऊन जातीनिशीं एखादे हवेलींत रहावें. श्रीमंत इकडे आम्हांवरी येतील. लक्ष प्रकारें आह्मां साठींच अवर्जून येतीलसा भरंवसा नाहीं. स्वभाविकपणें येतील तर येऊत! आल्या उपरी तो प्रयत्न करील. आमच्या भविष्यानुसार जें घडणार तें घडेल. वरकड पुढें श्रीमंत माघारे फिरल्यानंतर कोणीकडे जातात त्या सुमारा सारिखें मुलांबाळांची सोय धरून येणारांनीं यावें. बुद्धिदुर्गी चौं कुटुंबांचा वास आहे. जसा प्रसंग पडेल तसें करावया येईल. गमाजी बावाचे किल्ले प्रांत आहे. त्यांस तूर्त चिंता नाहीं. सारा मनसवा खर्चाचा भारी. या उपरी कर्ज मिळावयाचें संकट. निस्तेज लोक झाले. कोणी कर्ज देणार नाहीं. तुम्हीं निवोन येथें आलां तरी ते ही या मार्गें आले तरी येतील. तुमची मंडळी सारी आल्यावरी खामखां झुजोन थंडे करूं. परंतु बुद्धीशीं वैर करूं नये. नबाब व राजे बहादर यांस माघारे फिरल्यावरी अर्जी इलतमास ( ? ) लिहावी कीं, "आजी सा महिने तुमचे सोबतीस राहिलों. आम्हीं आपल्या संतोषें आलों. आम्हीं कांहीं चाकरी केली नाहीं. पुढें घडणार तेंव्हां घडेल. परंतु पुढें आम्हीं कोणे रीतीनें वर्तणूक करावी? खर्चास नाहीं. गांठचे पुरे [ सें ] नाहीं. यास आम्हांस हुकूम काय? जैसें फर्मावाल तदनुसार वर्तणूक करूं," ह्मणावें. तिलमात्र व्यंग खट्टपण दाखवूं नये. आपले प्राक्तनीं असेल तर देतील. हे[10] लोक कोणाचा बेटुवा घ्यावयाचे नव्हेत. आपले सोबतीस आले त्यांचें कल्याणच व्हावें हे त्यांची इच्छा. कितेक नाना प्रकारचीं खेकटीं कुचेष्टा करितात परंतु ते[12] चालवून नेतात. आपण त्याणीं कोणाचें वाईट केलें नाहीं. ( तुम्हीं ) तलखी सोडून शांतता धरून वर्तावें. बहुत

---

१ तुम्हांस पैका मिळण्याचा संभव नाहीं. २ स्वतः ३ मुद्दाम. ४ सखारामबापू आमचा नाश करण्याचा प्रयत्न करील. ५ लक्ष्यांत धरून. ६ अक्कलकोटास. ७ पेशवे. ८ जवळ द्रव्य आहे तें पुरणार नाहीं. ९ रुसवा. १० नबाबासारखे थोर लोक. ११ शाप. १२ नबाब.

काय लिहिणें हे आशीर्वाद.

नं० २८३

( अधिकज्येष्ठ शुद्ध दशमी
२२ मे. )

श्री.

राजश्री नाना व राजश्री नारोपंत नाना स्वामीचे सेवेशीं.[1]

विनंती उपरी येथील कुशल तागायत चंद्र ८ जिल्काद मंदवार तृतीय प्रहर मुक्काम लोणी[2] यथास्थित जाणून स्वकीय कुशल लेखन करावें. विशेष. आपण पत्रें पाठविलीं तीं आतांच येथील मुक्कामीं पावलीं. सविस्तर वृत्त कळलें. " पुण्याचा नास फारच झाला. सरकार वाडा व कांहीं वाडे राहिले त्यांचे रक्षणानिमित्य कांहीं बोलोन[3] विल्हे लावावें, त्यास आपण लांब पडलां. राजश्री विनायकदास यांजकडून राजश्री रामचंद्र[4] कृष्ण आले त्यांचे विद्यमानें पंचाण्णव हजार रुपये दरबार खर्च सुद्धां कबूल करून विल्हे लाविलें. इकडून विल्हे लागलें ह्मणोन विषाद येऊं न द्यावा, " ह्मणोन लिहिलें, त्यास आम्हीं लांब पडलों होतों ह्मणोन चिरंजीव उभयतांस[5] पाठविलें होतें. त्यास ते पोंचत तों अगोदर विल्हे लागलें. उत्तमच झालें. आमचे चित्तीं कोणीकडून तरी रक्षण व्हावें हेंच मानस होतें. त्यास तिकडून उरकलें, फार संतोष झाला. आमचेच हातें व्हावें, दुसरीकडून न व्हावें, हें चित्तांत नाहीं. पुण्यास अगदीं हात न लागावा, आब राहोन रक्षण व्हावें, यास्तव खटपट फारच केली; त्यास होणार त्या सारखें झालें! आम्हीं तिकडे[6] गेलों. निरुपाय झाला. सारेंच रक्षण होतें ह्मणजे फारच संतोष होता. परंतु भवितव्यास उपाय नाहीं. आज प्रा-

---

१ नाना फडणीस व नारो आपाजी तुळशीबागवाले यांस लिहिलेल्या पत्राचा हा मसुदा गोपाळरावाचेच हातचा आहे. २ पुण्याजवळचें लोणीहडपसर. ३ खंडणी देण्याची बोली करून. ४ मोंगलाकडे पटवर्धनां प्रमाणेंच जे मराठे सरदार रुसून गेले होते त्यां पैकीं हा एक. ५ बहुधा नारायणराव व नीलकंठराव यांस. ६ जेजुरीस.

तःकाळींच राजश्री नरसिंगराव धायगुडे यांस व गंगाधरपंतास प्रातःकाळीं पत्र सांडणीस्वारांबरोबर पाठविलें कीं, आज मंदवारचा दिवस रखवाली राहिल्या वाड्यांची खामखा[1] करावी. त्याजवरून ते राहिले. वाड्यांचें रक्षण केलें. वाड्यांतील प्यादे आहेत तसे असों द्यावे ह्मणोन लिहिलें होतें. रविवारीं नबाबाचें कूच करवितों. ह्मणून ही त्यांस लिहिलें होतें. तों आपलें ही पत्र करार. झाल्याचें आलें. उत्तमच झालें. आतां ही त्यांजकडे[2] करार मदार झाल्याचीं पत्रें पाठविलींच आहेत. रखवालीस अंतराय[3] करणार नाहींत. नबाबाचें रविवारीं कूच करवावेंसा राजेबहादर यांजजवळ करार केला आहे. राजश्री विनायकदास यांचें आज मंदवारीं कूच तथून झालेंच असेल. लिहावें.

नं० २८४

( अजमासें अधिकज्येष्ठ शुद्ध
मेचा दु० पंधरवडा. )

गोपाळरावाचें गोविंद हरीस पत्र—[4]

" कारभारी[5] यानीं तमाम सरदार[6] जमा केले आणि थोरल्या यजमानाजवळ बोलों लागले. तेव्हां ते परिछिन्न[7] मान्य करीतना. " सर्वांचीं ज्ञानें हिम्मतमर्दानपणा मजला ठाऊक आहे. पानपतावर भाऊस टाकून आलेत ! " या प्रमाणें दमाजी गायकवाड यांची हुबरू[8] निर्भर्त्सना केली. अजापालकास[8] कनातेच्या आडून ऐसेंच भाषण केलें. तेव्हां तमाम सरदार उठोन गेले. बसालतजंग[9] यजमानानीं आपल्या डेन्यास आणिले होते,

---

१ खचित, हटकून. २ धायगुडे यांजकडे. ३ विघ्न. ४ या पत्राचा मधला एकच बंद मिळाला. बाकीचे बंद सांपडले नाहींत. ५ सखारामबापू. ६ दमाजी गायकवाड, मल्हारराव होळकर वगैरे. ७ समक्ष. ८ होळकरास. ९ निजामअल्लीचा भाऊ व अदवानीचा नबाब बसालतजंग याची व दादासाहेबांची भेट पंचमहालांत झाली. बसालतजंगानें आपल्या भावाचा पक्ष सोडून देऊन पेशव्यांस येऊन मिळावें या साठीं होळकरानें आपला दिवाण त्याजकडे पाठवून त्यास दादासाहेब व पेशवे यांच्या भेटी

त्यास मुदबखीची राहुटी होती तेथें खलबत केलें कीं, ' कारभारी द्रव्यवान् याज करितां पळावयाची मसलत देतात. सरदार ही ( त्यांनीं ) अनुकूल करून घेतले. त्यास माझा निश्चय परिछिन्न झुजावें, व मरावें अथवा जय मिळवावा. अपेश घेऊन वांचणें नाहीं. तुम्हीं आम्हीं एक हत्तीवर बसून झुझावें. ' हा ठराव केला. त्यास भोजनास घालून निरोप दिला. मागती आपण व देव्यानें बसोन खलबत केलें तेव्हां देव्यानें सांगितलें जे, ' परिछिन्न झुजावें. ' हेच हिम्मत देऊन ( त्यानें ) कारभारी यांस मुरदाड केलें ! सरदार खट्ट झाले. कारभारी यांशीं यजमानानीं बहुत गालिप्रदानें केलीं. कांहीं यजमाना पुढें उपाय न चाले. तेव्हां शेवटीं कारभारी यानीं शागिर्दाचें आर्जव करून ' हा मनसबा या समयीं करूं नये असें यजमानांस सांगोन हा मनसबा फिरवणें. ' या प्रमाणें त्याचें आर्जव केलें. तेव्हां त्यानें मागती यजमानांस ताळ्यावर आणिलें. काल नववा दिवस याज करितां या तळावर मुक्काम केला. आज कूच करून निघून जावेसा सिद्धांत जाहला. निंबाळकरांच्या मुलखांतून जावेसा सिद्धांत जाहला.

## नं० २८५

[ १६ मे.

श्रीगणपतिर्जयति.

आशीर्वाद उपरी. येथील कुशल तागायत अधिक ज्येष्ठ शुद्ध एकादशी

---

करितां आणविलें होतें. त्या प्रसंगाची हकिगत पटवर्धनांचा कारकून पेशव्यांच्या लष्करांत होता त्यानें मोंगलाच्या लष्करांत गोपाळरावाकडे लिहून पाठविली तीच त्यानें गोविंद हरीस लिहून कळविली आहे.

१ पेशव्यांच्या स्वयंपाकाच्या राहुटींत मुसलमान येऊन बसतो इतकेंच नाहीं, तर तेथें त्याचें जेवण ही होतें; हें चमत्कारिक नव्हे काय ? २ सखारामबापू. ३ हा दादासाहेबांचा एक आवडता शागिर्द. ४ रुसले. ५ नवव्या दिवशीं तळ हालविणें हें अशुभ समजण्याची चाल होती. ६ चिंतापुर येथील मुक्कामींच्या. ७ करमाळें, माढें, मोहोळ हा सोलापुर जिल्ह्यापैकीं भाग मोंगलाकडील सरदार निंबाळकर यांस जहागीर दिलेला होता.

सोमवार पावेतों यथास्थित जाणून स्वकीय लिहिणें. विशेष. अकलकोटाहून पत्र आलें. चिरंजीव सौभाग्यवती राधाबाई प्रसूत झाली. पुत्र झाला. आजी आठ रोज झाले. संतोषाचें वर्तमान कळावें. श्रीमंत भागानगर प्रांतें आहेत. फिरल्याचें वर्तमान आहे. कळल्या उपरी लिहून पाठऊं. येथील देशपांडियांचें वतन अमानत करावें ह्मणोन तुम्हीं पत्र कलढोणकरांस दिल्हें व राजे बहादर यांचें पत्र त्याणीं पाठविलें; ऐशास मागें श्रीमंत राऊप्रतिनिधि व यमाजीपंत अण्णा यां पाशीं कलढोणकरांनीं फार रदबदली केली होती. परंतु त्याणीं मिथ्या दुसऱ्याच्या वतनास कलंक लाऊं नये ह्मणोन मान्य केलें नाहीं. हल्लींच्या प्रसंगीं याणीं मागती उपद्व्याप केला आहे, त्यास त्यांजबरोबर हे कांहीं वेव्हारास जात नाहींत. गांव

---

१ परशुरामभाऊची बायको. हिला पहिला पुत्र रामचंद्रपंत आपा झाला त्या विषयीं हा उल्लेख. २ प्रसीद्ध योद्धा व मुत्सद्दी श्रीपतराव परशुराम प्रतिनिधि. [ पहिले बाजीरावाचा प्रतिस्पर्धी. ] त्याचा मुतालीक यमाजी शिवदेव उर्फ यमाजीपंत अण्णा हा ही मोठा शूर व कर्ता पुरुष होता. शिवाय तो विद्वान व कर्मठ शास्त्री होता असें ही आह्मीं एकें ठिकाणीं वाचिलें आहे. पत्रांतील मजकुरावरून हें उघड होत आहे कीं, मंगळवेढें पेशव्यांच्या [ व त्यांच्या द्वारें पटवर्धनांच्या ] हातीं येण्या पूर्वीं तें प्रतिनिधीकडे होतें. वरील पत्रांत देशपांडेपणाच्या वतनाच्या तंट्या विषयीं उल्लेख आला आहे त्याचा मजकूर असा दिसतो—मंगळवेढ्यांच्या देशपांडेगिरीचें वतन तेथील देशपांडे उपभोगीत असतां त्या वतना विषयीं त्यांचा व कलढोणकरांचा तंटा सुरू झाला त्या काळांत जो अधिक उणा दरबार खर्च करील त्याचे सारखें काम होण्याचा संभव अधिक. कलढोणकरानीं या रीतीची खटपट श्रीपतराव प्रतिनिधी व यमाजी शिवदेव यां जवळ करून देशपांडेपणाचें वतन आपणास देण्या विषयीं त्यांस भीड घातली. पण ती त्यानीं ऐकिली नाहीं. हल्लीं कलढोणकरानीं गोपाळराव पटवर्धनाकडे वशिला बांधून त्याजकडून आपलें इतकें काम करून घेतलें कीं, तंट्याचा निकाल होई तों वतन सरकारांत अमानत रहावें! ३ कलढोणकरानीं. ४ मंगळवेढेकर देशपांडे. ५ सरकारांत न्याय मागण्यास.

सोडून जातील. ढालाईत अगर तलब मसाला कलढोणकर आणितील त्यास तुम्हांस कळोन आणिला तरी आधीं सूचना करणें. यांस लाऊन देऊं. तुम्हांस न कळत आणिला तरी कजिया पडेल, यास्तव सूचना लिहिली आहे. तूर्त पर्जन्य कालचे दिवस, ह्मणोन गांवांत आहेत. वतन अमानत केलें तरी ते इनसाफास कोठें येत नाहींत! कळलें पाहिजे. पुढें तुमचें वर्तमान काय, कोणीकडे जातां, किंवा पुण्या जवळीच राहणार, हें लिहिणें. श्रीमंत कोणत्या मार्गें होतात हें न कळे. नबाब लक्ष प्रकारें शहरास जातीलसें दिसतें. नळदुर्गीचें पत्र आहे त्यावरून कळेल. कुरुंदवाडाकडील पत्र आजी चार पांच सा रोज आलें नाहीं. आम्हीं समाचारास पाठविलें आहे बहुत काय लिहिणें हे आशीर्वाद. काली आदितवारीं सायंकाळीं दोन घटका पर्जन्य वृष्टि झाली. हेच पत्रीं चिरंजीव समस्त मंडळीस आशीर्वाद. चिरंजीव भाऊस पुत्र झाला संतोषाचें वर्तमान कळावें बहुत काय लिहिणें हे आशीर्वाद. खंदकाचें काम उत्तरेकडील झालें धोंडे यांनीं बांधावें ह्मणून लिहिलें त्यास धोंडे पुष्कळ खणीतांतच सांपडले आहेत. कसे बांधावें हें कांहीं योजत नाहीं. चिरंजीव नारायणराऊ श्रीकृपेनें

---

१ ढालाईत ह्मणजे ढाल तरवार बाळगणारे शिपाई. असले हे ढालाईत सरकारांत व प्रत्येक सरदाराजवळ नेहमी नोकरीस ठेविलेले शेंकडों असत. यांचें काम लढाईस जाण्याचें नसे. यानीं नेहमीं हुजूर रहावयाचें. कांहीं एखादा सक्तीचा किंवा धोक्याचा हुकूम एखाद्या मोठ्या मनुष्यावर बजावावयाचा असला ह्मणजे सरकारांतून त्या कामावर ढालाइतांची नेमणूक होई. हे जातीचे रोहिले, पठाण वगैरे अन्यदेशीय मुसलमान असत. मनुष्य केवढा मोठा असला तरी सरकारचे ढालाईत आले ह्मणजे त्याचें कांहीं चालत नसे. कारण वेळ पडली तर हे मुसक्या बांधून त्यास सरकारांत नेऊन गुदरण्यास कमी करावयाचे नव्हत. २ तलब किंवा तलवाना ह्मणजे रोजिना वेतनाचा नक्त पैसा. ३ मसाला=ढालईत वगैरे ताकीददारांस लागणारी रोजची अन्न सामग्री गहूं, तांदूळ, तूप, साखर, तंबाकू, गांजा व हर कांहीं लागेल ती वस्तु ताकीददार सांगतील तसली व तितकी पुरविणें. या आडदांड लोकांच्या मागण्या नेहमीं अद्वातद्वा असावयाच्या हें सांगवयास नकोच! बरें, त्या न पुरवाव्या तर साऱ्या कुटुंबानें उपाशीं राहण्याचा किंबहुना डोक्यावर धोंडा घेऊन उन्हांत उभें राहण्याचा प्रसंग यावयाचा!

येतील तेव्हां त्यांच्या विचारें कर्तव्य तें करावें लागेल, हे आशीर्वाद.

पै॥ छ० १३ जिल्काद.

नं० २८६.

( २३ मे. )

श्रीगणपतिर्जयति.

आशीर्वाद उपरी. येथील कुशल तागायत अधिक शुद्ध एकादशी भौमवासर यथास्थित जाणून स्वकीय लिहिणें. विशेष. तुमचें पत्र लिंगनुरानजीक मुक्कामचें भौमवारचें आलें तें गुरुवारीं तिसरे दिवशीं पावलें. वर्तमान कळलें. त्या अलीकडे पत्र येत नाहीं. रामचंद्र गणेश निघोन गेले. नाईक ही गेले. प्रस्तुत माशोल नजीक आहेत. रास्ते, विठ्ठल शिवदेव, एकांडे बाबूराऊ, तात्या घोरपडे, विसाजी नारायण, हे अवजलपुरा नजीक आहेत. हे पंचमहालांत होते. बसालतजंगाची फौज घेऊन श्रीमंत माघारे कलबुर्गे याच्या सुमारें आले आहेत. पुढें कोणत्या सुमारें येतात न कळे. लष्कर फार खराब झालें. मुख्य श्रीमंत बसालतजंगांच्या भेटीस गेले. तेथें फारच महागाई होती ह्मणोन ऐकतों. तुम्हांस ही खबर कळतच असेल. ' चिरंजीव नीलकंठराऊ येणार होते, परंतु राहिले; ' ह्मणोन लिहिलें, उत्तम. हत्ती करमाळ्यांत आहेत. एक खानगौडा हत्ती मेला ह्मणोन ऐकिलें. ' धारुरास गेल्या उपरी निरोप द्यावासा करार आहे ' ह्मणोन लिहिलें, बहुत उत्तम. त्यांची मर्जी रक्षून यावें. श्रीमंतांचें लष्कर ही इतक्यांत कोणीकडे जातें हें ही कळतें. तदनुसार विचार करावयास येईल. राजश्री विसाजीपंत यांचें पत्र मंदवारचें कालीं तिसरे दिवशीं आलें. राजश्री बाबूजी नाइकाच्या मतें मनूर माशाळानजीक भीमा पार व्हावें

१ पत्र गोविंद हरीचें गोपाळरावास. २ बाबूजी नाईक बारामतीकर. ३ मनूर व माशाळ हीं स्थळें मोंगलाईच्या व अकलकोटकरांच्या सरहद्दीवर असावींसें वाटतें. ४ हे कोण? श्रीमंत? ५ लष्कर श्रीमंतांचें. ६ दादासाहेब. ७ हें हत्तीचें नांव. ८ मोंगल धारुरास गेल्यावर तुह्मांस घरीं यावया साठीं निरोप होणार इ. इ. धारूर शहर मोंगलाईंत आहे. ९ हे तात्या घोरपडे इचलकरंजीकर यांचे कारभारी.

असें आहे. करकंबेकडील अरिष्ट टळलेसें झालें. प्रस्तुत थोरलें[1] अरिष्ट आलें हें करकंबेकडे येणार नाहीं. कोणत्या सुमारें होईल पहावें. भोंसले यांच्या मनसब्याचा[2] मनोदय लिहिला तो कळला. मातबर मनसबा आहे. उभयतां[3] संतोषें राहिले ह्मणजे पुढें कार्याची गोष्ट आहे. वरकड सदैव काळजी तुम्हांकडील. भेटी होईल तो सुदिन. 'मर्जी रक्षोन त्यांच्या[4] संतोषें निरोप घेऊन येतों' ह्मणोन लिहिलें, हे लक्ष गोष्टींची गोष्ट. या प्रमाणें करावें. मर्दनगड[5] फिरंग्यांनीं घेतला, लोक कौल घेऊन उतरले, या प्रमाणें लिहिलें आलें. हैदरनाइकाकडील मीरफैजुल्ला पांच हजार गाडदी व पांच हजार फौज घेऊन सावनूरवालियाच्या तालुक्यांत आला. रटेहळ्ळी व मासनूर दोन्हीं ठाणीं घेतलीं. सावनूरकर ही दोन अडीच हजार जमा झाले आहेत. पुढें कार्य होईल पहावें. हरिपंत[6] धारवाडीं आहेत. त्यांच्या मतें शिंदे, नरगुंदकर व दौलतराऊ[7] घोरपडे हे जमा करून सावनूरवाल्याची मदत करून त्यास नतिजा द्यावासें आहे. वर्वे[8] ही माघारे घेऊन जावे अशी मसलत आहे. घडेल तें खरें. राजश्री गमाजीबावा सातारियाहून निघाले. भीमातीरास आले असतील. मीरआबस याजकडे पत्रें पाठविलीं होतीं. त्याणीं टाळाटाळ करून जाब दिले आहेत. बजिन्नस पत्र पाठविलें आहे त्यावरून कळेल. नारोपंत राजवाडे कारागृहीं गुंतले आहेत. श्रीमंतांची[9] तहाची बोली लागली हे विसाजीपंतास ठाऊक नाहीं. आम्हीं

---

१ थोरले अरिष्ट श्रीमंतांच्या लष्कराचें. २ हा गोविंद हरीच्या पसंतीस आलेला असा जानोजी भोंसल्याचा कोणचा मनसबा? या वेळीं जानोजी व त्याचा भाऊ मुधोजी भोंसले सेनाधुरंधर यां मध्यें पेशव्यांनीं कलह लावून दिला होता व जानोजीचें पद तुला मिळवून देतों असें मुधोजीस त्यांनीं आमिष ही दाखविलें होतें. हा तंटा आपआपसांत मिटविण्या विषयीं जानोजीनें केलेल्या निश्चयास अनुलक्षून हें गोविंद हरीचें लिहिणें असावें. ३ जानोजी व मुधोजी भोंसले. ४ नवाबाच्या. ५ मर्दनगड उर्फ फोंडा किल्ला गोव्यांच्या हद्दीवर. ६ हरीपंत पोंभुर्लेकर हा इचलकरंजीकरांचा कारभारी. ७ नीलकंठराव शिंदे मनोळीकर, भास्करराव नरगुंदकर व दौलतराव घोरपडे गजेंद्रगडकर. ८ लक्ष्मणपंत व कृष्णराव वर्वे कर्नाटक सोडून मिरजेकडे आले होते ते. ९ पेशवे व मोंगल यांचें तहाचें बोलणें सुरू झाल्याचें गोविंद हरि लिहितो,

परस्परें ऐकतों. मीरअबस याच्या लष्करांत बोलत होते ( असें ) ऐकिलें ( तें ) लिहिलें आहे. तेथें[1] असेल तें खरें! तीर्थरूप[2] नलदुर्गी सुखी आहेत. कुरुंदवाडाकडील यथास्थित आहे. अलीकडे आठ दिवस पत्र नाहीं. कळलें पाहिजे. बहुत काय लिहिणें. श्रीमंत कोणत्या सुमारें येतील पहावें. आम्हीं येथें[3] आहों. लज्जारक्षक श्रीभगवान् समर्थ आहे. बहुत काय लिहिणें हे आशीर्वाद.

समस्त चिरंजीव मंडळीस आशीर्वाद. लिहिलें परिसिजे. बहुत काय लिहिणें हे आशीर्वाद.

रै॥ छ० १५ जिल्हेज सोमवार चतुर्थ प्रहरीं शिदोजी सभागमें पत्रें आलीं.

नं० २८७

[ २६ मे. ]

श्रीगणपतिर्जयति.

आशीर्वाद उपरी. येथील कुशल तागायत अधिक शुद्ध त्रयोदशी गुरुवार यथास्थित असे. विशेष. तुम्हीं पोरनादूर [ ? ] च्या मुक्कामींहून मंदवारीं पत्रें रवाना केलीं तीं मंगळवारीं अस्तमानीं पावलीं. लिहिलें वर्तमान विस्तारें कळलें. राजे बहादर यांचें वर्तमान लिहिलें, त्यास मोठें आदानें चुकाविलें. श्रीनें खैर केली. पुढें उपेक्षा न करावी. औषधी उपाय करावे. श्रीमंत आहेत, त्यास काय चिंता! हजार वोखदें मिळतील. वरकड कितेक वर्तमान कळलें तितकें प्रमाण. फारचें लष्कर श्रीमंतांचें हैराण जरी करून तहाचा प्रकार असेल तरीच ठरतील. नाहीं तरी भीमा दक्षिणतीरें

---

पण शर्ती काय होत्या हें कळत नाहीं. मागें ही असाच एक समेटाचा प्रयत्न झाल्याचा उल्लेख आला आहे. ( पहा अंक ११ पृष्ठ ३९४ )

१ तुम्हीं नबाबाच्या लष्करांत आहां तेथें. २ पत्र लिहिणाराचे दोघे वडील बंधु. ३ मंगळवेढ्यांस. ४ पत्र गोविंद हरीचें गोपाळरावास. ५ संकट. यावरून या वेळीं विठ्ठल सुंदरावर कांहीं मोठेंच जिवावरचें दुखणें येऊन गेलें होतेंसें दिसतें.

होतील. नदीस पाणी ही नाहीं. असा प्रकार दिसतो. परवां शिदोजीबरो-बर लिहिलेंच आहे. वारंवार कोणता मजकूर लिहावा ! आम्हीं येथें पंगुवत् आहों. दुसरे कोठें जावयास स्थल नाहीं. झुंजावयाची कुवत ह्मणावी तर[1] स्थल मजबूत नाहीं. एक साहाकारी श्रीपंढरीनाथ समर्थ. त्याचे इच्छेनें होणें तें होईल ! दुसरा आधार नाहीं. तुम्हीं ' मर्जी माफक राहोन संतोषें निरोप घेऊन येतों ' ह्मणोन लिहिलें, ( ? ) लक्ष गोष्टींची गोष्ट. तीर्थरूप आपोस हिंवज्वर येत असतो ह्मणोन अंताजी सखदेव याणीं अक्कलकोटाहून लिहिलें होतें. उभयतां तीर्थरूप व कुटुंबें फारच श्रमी झालीं. ना इलाज ! काय करावें ! हे[3] दिवस आले तरी कोठें थांग नाहीं. अरिष्ट[4] एखादीकडे जातें ह्मणजे तें स्थल सोडून यावयास येतें. आम्हांवरी चिठ्या केल्या त्याचा मजकूर—आम्हीं समाधानेंच वरातदार लाविले. बोभाटा एकाएकीं तुम्हांकडे येणार नाहीं. खंदकाचा मजकूर लिहिला, त्यास दोनकिडील [ खंदक ] झालें. दुसरे खणवावे तरी खावें काय ! वड्ड [ र ] आधीं पैका मागतात. येथें पैशास संबंध नाहीं ! मोरोबापूजीनें—आजी आठ दहा रोज झाले—त्या मध्यें तीन स्वाऱ्या केल्या. तमाम पांच सात गांवचीं गुरें वळून नेलीं. खेडीं ओस पडत चाललीं. त्याजवरी चालोन जावें तरी समय नव्हे. चौ जागांचे चार राऊत मिळवितो, गुरें घेऊन जातो, चौघे चहूंकडे जातात ! त्याणें नाकांत काड्या घालावया प्रारंभ केला आहे ! चिरंजीवानें परवां त्रिंबकजीपंतास पत्र लिहिलें आहे याचें उत्तर आल्यानंतर तदनुसार विचार करणें तो करूं. हत्ती करमाळियास आहेत. आठ दिवसां आणवूं. वरकड ' आपणांवरी दौलत बुडाल्याचें अपेश आलें ह्मणोन श्रीमंतानीं आक्रोश केला ' ह्मणोन लिहिलें, त्यास इतकें ज्ञान असतें तरी या थरास कां येतें ? तुम्हीं कशावरून लिहिलें न कळे. असो. कालच विषम ! ब्राह्मणी राज्य बुडवावें असें बहुतांचें मत होतें. परंतु सत्यसंकल्प

---

१ मंगळवेढ्यांचें ठाणें. २ त्रिंबक हरीस. ३ पावसाळा समीप आला तरी. ४ पेशव्यांच्या लष्कराचें अरिष्ट. ५ नळदुर्ग. ६ पाठवून दिले. ७ हा पेशव्यांचा एक लहानसा सरदार मंगळवेढ्याजवळच एका ठाण्यांत होता. ८ बहुधा पुरषोत्तमरावानें.

सखाराम [ बापू ] झाला ! त्याचे मनोरथ सर्व सिद्धीस गेले ! पुणे जाळिलें. ( राज्या ) बाहेर सरदार घालविले. राज्य क्षयास नेलें. फौज समागमें होती तिची गति या प्रकारची केली. आतां देशास जाऊन परशुरामें क्षेत्रांतील घालमेली करून तीं स्थलें गमाविलीं ह्मणजे सुटला ! मर्दनगड जनार्दन गणेश काळे थास संनद देऊन गमाविला तसेंच करील. पुढें आपण किल्ल्यावरी जाऊन बसेल. मुख्य त्याचे दारोदार फिरतील. मग हा त्यांचा अनादर करील. त्याचे संग्रहीं द्रव्य आहे. कर्तेपण. सारा राजमंडळचा कार्यभाग स्वाधीन आहे. सर्व आपलेंच करील. त्याची तपश्चर्या भारी. या प्रमाणें कोणाचे ही संकल्प सिद्धीस जाणार नाहींत ! त्यानें भाऊसाहेबा सारखे मोंहरे प्रवळ्या सल्तनतेनिशीं हिंदुस्थानीं बुडविले ! येथीलि प्रकार चित्तानुरूप केला ! आमचा कैवारी श्रीपंढरीनाथ समर्थ आहे. आम्हीं त्या पाजीची काळजी वागवीत नाहीं ! होणार भावी कदापि चुकणार नाहीं. तदनुसार आम्हीं येथें राहिलोंच आहों. श्री समर्थ. आमची काळजी न करणें. बहुत काय, लिहिणें. लोभ असों दीजे. हे आशीर्वाद.

नं० २८८

[ २७ मे. ]

श्रीगणपतिर्जयति.

आशीर्वाद उपरी येथील कुशल तागायत [ अधिक ] ज्येष्ठ शुद्ध पौर्णिमा गुरुवार दोन प्रहर यथास्थित जाणून स्वकीय लिहिणें. विशेष. मंगळवारचीं पत्रें तुमचीं आलीं त्यास आजी दहा रोज झाले. दुसरें मागती पत्र रवाना केलें असतें तरी पावलें असतें. दहा माणूस आमचे तुम्हांजवळी

१ कोंकणांतील. २ हा जनार्दन गणेश कोण ? ३ माधवराव पेशवे. ४ सातारकर महाराज स्वाधीन असल्यामुळें सखारामबापू आपल्याच पक्षाच्या लोकांस ' पंतप्रधान, ' ' पंतप्रतिनिधि ' वगैरे बनवील. ५ पानपतच्या स्वारीस गेलेल्या फौजेनिशीं. ६ पुण्याच्या दरबारीं. ७ पत्र गोविंद हरीचें गोपाळरावास.

आहे. लिहिण्याचा मात्र आलस! असो. तुमची इच्छा प्रमाण! वधू मुलीस फोड्या अतिशय आल्या. पाणियानें भरों लागल्या. परिणाम लागेल तो खरा! लग्न राहिलें. राजश्री त्रिंबकराऊ मामाकडील मजकूर नवरीचा केला असता तरी कार्यावरी पडतें. पूर्व सूचना नव्हती. असो. ईश्वरी सूत्र प्रमाण. राजश्री भास्करराऊ याजकडील पत्र आलें तेंच बजिन्नस पाठविलें आहे त्याजवरून कळेल. रेवतगांवकराचा कजिया—ढालाईतास तो[1] ऐकत नाहीं. सांडणीस्वार अगर नवाबाचा परवाना अगर मोंगलअलीचा परवाना आला तरी ऐकेल. श्रीमंतांच्या लष्करास जोडी बातमीस गेली होती त्या पैकीं एक खडेविसादच्या [ ? ] मुकामीहून बाबूजी नाइकाच्या लष्करांतून आली. श्रीमंतांस व त्यांस दहा गांवचें[2] अंतर आहे. हे अगोदर कोडलवाडीकडे गेले होते. श्रीमंतानीं मेदेकाकडून[3], वलकोंडें, निर्मल उजवी टाकून नांदेड नाखाडाकडून नीट वऱ्हाडचा रोख धरिला आहे. अलीकडे आले ह्मणजे लोक देशाकडे जाऊं लागतील, म्हणून झाडींतून परभारेंच नागपुरच्या रोखें जाणार, ह्मणोन बोली आहे. वऱ्हाडांत जरूर जातील. न कळे कालाची गति. नवाबाचा मुकाम कोणे ठिकाणीं आहे, पुण्याकडून[4] फिरले कीं नाहीं, राजे विनायकदास आले कीं नाहींत, पुण्याची गति काय, कांहीं राहिलें कीं नाहीं, हें विस्तारें लिहिणें. बहुत काय लिहिणें लोभ असों दीजे हे आशीर्वाद.

चिरंजीव समस्त मंडळीस आशीर्वाद. लोभ असों दीजे हे आशीर्वाद.

राजश्री विष्णुपंत स्वामीस नमस्कार हे विनंती.

चिरंजीव भास्करपंत[5] व तात्यास आशीर्वाद.

---

१ रेवतगांवकरांपैकीं कित्येकांस मोंगलअलीचा बक्षी मीरआब्बस यानें कैदेंत ठेविलें होतें त्यांस सोडून देण्या विषयीं खुद्द निजामअलीची ताकीद घेऊन आलेल्या ढालाइतांस तो जुमानीत नाहीं. २ गांव ह्मणजे चार कोस. ३ मेदक वगैरे हीं सर्व स्थळें मोंगलाईंत आहेत. ४ पेशवाईच्या सरहद्दीकडे. ५ भास्करपंत हा पत्र लिहिणाराचा धाकटा बंधु तात्या ह्मणजे अंताजी विठ्ठल यादवाडकर पटवर्धन.

नं० २८९

( अनमासें अधिकज्येष्ठ शुद्ध
मेचा दु० पंधरवडा. )

श्रीगणपतिर्जयति.

आशीर्वाद[1] उपरी. गकार[2] नामकाच्या पत्राच्या नकला व तुम्हीं उत्तरें पाठविलीं त्यांच्या नकला व उभयतां गृहस्थांच्या पत्राची नक्कल पावली. वर्तमान कळलें. गकार नामकानें तुम्हांस लिहिलें त्याच प्रतीनें आम्हांस लिहिलें. आम्हीं उत्तरें देऊन आजी माणूस रवाना केले. तुम्हीं लिहिल्या प्रमाणेंच लिहिलें आहे., धरसोड दोन्ही नाहींत. त्याचें पत्र तुम्हांस होतें तें बजिन्नस लाखोटाच पाठविला आहे. खंदकाचा मजकूर---पैसा नाहीं. वडरांस काय द्यावें ? पुढें प्रसंगानुसार करावयास येईल. कर्ज पैसा मिळेना. देणारानें द्यावें कोण्या आधारें हें कळतच आहे. गमाजीबावा सातारियाहून विमणगांवास आले. पानगांऊकराची फौज लष्करास दाखल झाली असेल. मिरजेस नरसिंगराऊ रुद्धव व बर्वे यांची फौज व नारो शंकराकडील आले होते. ते जमा दोन अडीच[3] पावेतों होऊन सातारियाकडे जातात. कुंडलेपाशीं उतरले होते. पुढें गेलियाचें वर्तमान नाहीं. झुजावयाच्या[4] दिवशीं श्रीमंतानीं 'गच्छ' केलें: आतां या दिवशीं झुजावयाची कस्त धरिली आहे ! कसें काय आहे कळत नाहीं. मोरोबापूजीनें दोन तीन स्वाऱ्या करून सात आठ गांवचीं गुरें नेलीं. बैल खेपेस गेले

---

१ पत्र गोविंद हरीचें गोपाळरावास. २ हा 'गकार नामक' गंगाधर यशवंत चंद्रचूड होय व 'उभयतां गृहस्थ' विंचूरकर व नारो शंकर हे होत. पेशव्यांचा व पटवर्धनांचा समेट करून देण्याच्या कामीं या तिघांचा गोपाळराव व गोविंद हरि यांशीं पत्रव्यवहार सुरू होता. ३ दोन अडीच हजार. ४ ज्यावेळीं मोंगलाशीं युद्ध करण्याची उत्तम संधि होती त्या वेळीं श्रीमंत पळत सुटले व आतां पावसाळा जवळ आल्यामुळें फौजेंतील लोक घरोघर जावयास निघाले असल्यामुळें मोंगलाशीं झुजण्याची ही वेळ नव्हे, हें ठाऊक असतां ही त्यांनीं आतां युद्धच करण्याचा निश्चय केला आहे.

ते लुटून माल सुद्धां नेले. प्रस्तुत श्रीमंत जवळी[1] आले आहेत. प्रतिकार करतां नये. त्याचें काय करावें! एक खेडें. तेवढें भारी सामानानें जाऊन घ्यावें तेव्हां गुरें लुटून आणावीं तर तो प्रकार नाहीं. क्षुल्लक करणें. उचित नाहीं. गकारनामकाच्या लिहिण्यांत[2] जीव आहे. परंतु मात्रागमनी काय करतील हा भरंवसा पुरता नाहीं. तिकडे लिहितील तेव्हां घर बुडेल. बरें. श्रीपंढरीनाथ समर्थ आहे.[3] तुम्हीं मर्जी रक्षोन निरोप घेऊन येणें. आमची काळजी न करणें. प्रवाहीं आहों. आमचा रक्षक समर्थ आहे. अहोरात्र काळजी तुम्हांकडील. ( तुम्हाजवळ ) खर्चास नाहीं. समागमें आहेत त्यांस दिल्या वांचून राहणार नाहींत.[4] तुम्हांस आजन्मप्रभृति ठाऊक नव्हतें. सर्व यंदाच कळलें! बरें! असेच दिवस राहणार नाहींत. श्रीकृपा करील. कांहीं चिंता न करणें. सावध बहुत राहणें. थोडे आहां, याल तेव्हां वाटेचे सावधगिरीचें येणें. श्रीमंत एकीकडे जातात. तुम्हांस ही निरोप होणार नाहींसें दिसतें. श्रीसचा प्रमाण! ते गेल्या उपरीच निरोप घ्यावा. उतावळी न करावी. बहुत काय लिहिणें. त्यां लष्करास[5] राजश्री विसाजीपंताकडे पत्रें लिहून आजी जोडी रवाना केली. कळलें पाहिजे. दोन तीन जोड्या आमाच्या गेल्या आहेत. अक्कलकोटाहून प्रत्यहीं माणूस येतें. तीर्थरूपांस ज्वर येत होता तो उपशम आहे. चिंता न करणें. बहुत काय लिहिणें हे आशीर्वाद. चिरंजीव दाजींनीं लिहिलें आहे त्यावरून कळेल. हे आशीर्वाद.

चिरंजीव राजश्री नारायणरायास आशीर्वाद. घरें रहावयाचीं करावयाचा मजकूर लिहिला त्यास तूर्त श्रीमंतांचें अरिष्ट जातें.[6] मग आहे यांत

---

१ ही शिवी सखारामबापूस व तत्पक्षीय लोकांस. २ गोविंद हरीस मोठें भय होतें तें हें कीं, सखारामबापू आपणाकडे समेटाचें बोलणें लावील व तिकडे मोंगलास ही कळवील कीं, 'पहा, हे पटवर्धन तुह्मांस दगा देऊन आह्मांकडे येणार आहेत. यांचा काय बंदोबस्त करावयाचा असेल तो करा!' ३ ईश्वर. ४ तुह्मांजवळ फौज आहे तीस खर्चास न मिळाल्यास ती तुह्मांस सोडून जाईल. ५ पेशव्यांच्या लष्करास. ६ श्रीमंतांच्या लष्कराचें अरिष्ट मंगळवेढ्याकडे येत आहे तें दूर जाईल.

सारेंच समजोन घेऊं. त्या विशीं चिंता न करावी. बहुत काय लिहिणें हे आशीर्वाद.

नं० २९०

[ ३० मे ]

श्रीगणपतिर्जयति.

आशीर्वाद उपरी. येथील कुशल तागायत अधिक वद्य प्रतिपदा रविवार जाणून स्वकीय लिहिणें विशेष. तुम्हीं चंद्र नऊ जिल्हेजचें पत्र पाठविलें तें छ० १२ मिनहूस चौथे रोजीं पावलें. लिहिलें वर्तमान कळलें. 'राजे बहादर यांचा वाखा फार आहे, बसवत नाहीं,' म्हणोन लिहिलें; (त्यास) श्रीनें मोठी खैर केली. एकाएकीं बरे होणार नाहींत. आठ पंधरा दिसां हलकें वाटेल. तुमची 'बातमी श्रीमंतास नव्हती. या उपरीं बातमी गेल्या वरी भीमापार होतील' म्हणून लिहिलें, त्यास त्यांच्या मतें युद्ध करावें, तुम्हांवर चालोन यावें, असा मनसबा दिसतो. कोण्या विचारावरी युद्धाचा प्रसंग करणार न कळे! बसालतजंग मागून पंधरा विसा कोसांवरी आहेत. त्यांजवरोबर दहा हजार पाईचा माणूस आहे. या शिवाय तोफा वीस व मोंगल पठाण दोन चार हजार काय आहेत न कळे. 'उभयतां मिळोन नबाबावरी जातात' म्हणोन खबरी उठल्या आहेत. बाबूजी नाईक व विठ्ठल शिवदेव व रास्ते वगैरे तमाम अबजलपुर मनूरभाशाळा नजीक आले होते. तेथून माघारे बोलावून नेले. श्रीमंत कलबुर्ग्यास आले. मोर्चे लाविले. कांहीं लुटिलें. रांने व देशमुखाच्या हवेल्या राखोन लाख रुपये

१ पत्र गोविंद हरीचें गोपाळरावास. यांत तिथी संबंधानें काय घोंटाळा झाला आहे समजत नाहीं. पत्राची तिथी अधिक (ज्येष्ठ) वद्य प्रतिपदा आहे ती प्रोफेसर वा. प्र. मोडकांच्या जंत्रींत दिलेलीच नाहीं! मिती पुढेंच या पत्रांत वार रविवार दिला आहे त्या दिवशीं मोडकांच्या जंत्री प्रमाणें तृतीया असून इंग्रजी तारीख ३० मे ही दिलेली आहे. तीच खरी धरून आम्हीं ही पत्राच्या शिरोभागीं मांडिली आहे. २ मोंगलाचें लष्कर परत मोंगलाईकडे आल्याची. ३ कलबुर्ग्यास राजे बहादर विठ्ठल सुंदर याचा वाडा होता तो.

खंडणी केली. ब्राम्हणपुर कांहीं लुटिलें. कांहीं राखिलें. दोघा देशमुखांचे वाडे राखिले. ऐवजाचा वसूल होतो. मानूर माशाळ बाबूजीनाइकानें लुटून फस्त केलें. श्रीमंतांकडील वर्तमान तुम्हीं लिहिलें तें कळलें. 'पुणें जाळिलें या मुळें (श्रीमंत दादासाहेब) श्रमी आहेत, कार्यभागी यांवरी खेट्ट आहेत, ह्मणोन लिहिलें; असतील. त्यांस ते गोष्टीचें सुख दुःख काय! विवेकच नाहीं. आतां या दिवशीं नबाबांवरी जावें म्हणतात हे कोण अकल! तस्मात् मनस्वी! पुढें काय होणार न कळे. काली शनवारचेंच पत्र अक्कलकोटचें, आलें तेंच पाठविलें आहे त्यावरून कळेल. बातमीस माणसें आहेत. खबरदारी श्रीपंढरीनाथाची आहे. आम्हीं काय करावी! लोक प्यादे आहेत. वरातांचा मज़कूर आम्हीं समाधानेंच बोलून वाटे लाविले आहेत. दिगर जाबसाल केला नाहीं. पुण्याच्या हवेल्यांच्या वेढ्यांचे (?) निमित्यः त्या गृहस्थानें ऐवज न पाठविला हें अपूर्व आहे. वरकड लोकांचा मजकूर विस्तारें कळला. चिंता काय! पुरुषासच सर्व ही घडतें! तुम्हांस ही कळतें. कालगतीचा महिमा या रीतीचा आहे. श्रीमंत कोणीकडे जातात, काय करतात, हें कांहीं कळत नाहीं! अद्याप भिवरेस पाणी नाहीं. आलें होतें तें उतरलें. पाऊस इकडे नाहीं. कडबा महाग झाला. दाणा महाग झाला. भोई दोन तीन पालख्यांचे दूर केले. दोन पालख्या मात्र आहेत. खर्च सुटत नाहीं. खर्चाची ओढ भारी. पैसा नाहीं. आजी पंधरा दिवस झाले, शागीर्दपेशास रोजमरा नाहीं. लोकांस ही रोजमरा नाहीं. अशी अवस्था आहे. कोठवर लिहावी? तुमचें ऐकोनच श्रम होतात. वेंधू पावून भोई माणसें तट्टं आलीं. सुखरूप आपल्या ठिकाणास पावली. बहुत काय लिहिणें हे आशीर्वाद.

---

१ सखारामबापूंवर. २ क्रुद्ध आहेत. ३ आग्रही. ४ या वाक्याचा नीटसा बोध होत नाहीं. ५ जिचें पुढील वर्षी गोपाळरावाशीं लग्न झालें ती मुलगी. ६ कोंकणांत आपल्या गांवीं.

नं० २९१

[ अजमासें अधिकज्येष्ठ वद्य
जूनचा प०पंधरवडा. ]

श्रीगणपतिर्जयति.

आशीर्वाद[1] उपरी. राजश्री[redacted]गमाजीबावा कऱ्हाडीं आहेत. हजार दीड हजार फौज आहे. नरसिंगराऊ वगैरे कृष्णे अलीकडे तीन हजार पर्यंत जमा आहेत. टेकडीवरी तोफा ठेऊन पलीकडे मारगिरी[2] करितात, ह्मणोन वर्तमान आहे. श्रीमंतांस पैका प्राप्त नाहीं. परंतु नरसिंगरायास आंधळी ( ! ) हिवरें नक्षत्र ! रुपया पुष्कळ मिळविला. इसलामपुर——नऊ दहा हजार. वाळवें——दहा हजार. किरकोळ खेडीं——पांच, सात, चार, दोन घेतच गेले. कृष्णे पलीकडे अलीकडे घेतले. मोंगलअल्लीकडील मिरआबस ही जेथें जातो तें स्थल घेतो. खंडणी घेतो. त्या पुढें कोणी उभा रहात नाहीं ! रुपये मिळविले व स्थलें ही त्यानें घेतलीं. बुधेहाळास[3] लागला आहे. दोघांस द्रव्य लाभ किंवा हैदरनाइकास बिदनूर घेऊन पुष्कळ द्रव्य व स्थलें हस्तगत झालीं. त्याच्या प्रारब्धास उपाय नाहीं. त्याची फौज मीरफैजुल्ला[4] सावनूर प्रांतीं येऊन चार पांच स्थलें घेतलीं. पुढें घेतच आ' हे. काली वर्तमान उडतें आलें कीं त्याजवरी 'सावनूरकर नवाब चालोन गेला होता. युद्ध झालें. त्यास मोडून घातला'. कांहीं तोफा व घोडीं घे· तलीं. अशी खबर आली आहे. सत्य मिथ्या न कळे. किंवा यश लौकिक कीर्ति नवाब निजामअल्लीस. यास उपमा नाहीं. श्रीमंतांची हानी अपकीर्ति यांस जोडा नाहीं. पुढें होणार भावी असेल तसें घडेल ! बहुत काय लिहिणें हे आशीर्वाद. ' राजे बहाद्दर बरे झाले, पालखींत बसूं लागले,' ह्मणोन लिहिलें त्यावरून समाधान झालें मोठें आदानच ईश्वरें त्यांचें चु-

१ पत्र गोविंद हरीचें .गोपाळरावास. २ मारगिरी कोणत्या ठाण्यावर ? ३ बुधेहाळ कोणचें ? गोकाकेजवळ आहे तें ? तिकडे मीरआबस गेला असेलसें वाटत नाहीं. तो या वेळीं विजापूर प्रांतीं असावा. ४ मीरफैजुल्लास.

काविलें. प्रारब्धवान, कर्ता त्या राज्यांत तेवढाच ... जी आहे. त्याचें श्री कल्याण करू ! हे आशीर्वाद. नरसिंगराऊ श्रीमंतांकडून गेल्या पासून रुपये मिळवीत गेला आणि आला. आतां ही मिळविल. पुढें ही मिळवील. अपत्यें पुरुषोत्तमानें व पांडुनें व महादेवानें व बाळानें शिर साष्टांग नमस्कार. लोभ करणें हे विज्ञापना.

नं० २९२

( ३१ मे. )

श्रीगणपतिर्जयति.

आशीर्वाद उपरी. येथील कुशल तागायत आधिक धव द्वितीया सोमवार. यथास्थित असों. विशेष. परवां पत्र गोविंद शिवराम यांचें आलें त्याचा मजकूर कालीं लिहिलाच आहे. कालीं विसाजीपंताचें त्याच प्रमाणें लिहिलें आलें. " श्रीमंतांचा मनोदय रक्षावा. ओढ धरूं नये. तुम्हीं त्यांसें सां-

पत्र गोविंद हरीचें गोपाळरावास. या ही पत्रावरच्या मितींचा जंत्रीशी मेळ नाहीं. पुढें ही असेंच होत जाणार. पत्रावरची इंग्रजी तारीख आम्हीं सोमवारची घातली आहे. पुढें ही वाराच्याच अनुरोधानें घालीत जाऊं. २ गोविंद शिवराम खासगीवाले व पुढील वाक्यांत आलेला विसाजीपंत या दोघानीं पेशव्यांशीं समेट करून घेण्या विषयीं गोपाळराव व गोविंद हरी यांस पत्रें लिहिलीं होतीं त्याविषयीं या पत्रांत चर्चा केली आहे. विसाजीपंतानें गोविंद हरीस पाठविलेल्या पत्रांतील मजकूर एकंदरींत येणें प्रमाणें असावा. " मोंगलाचा पक्ष सोडून देऊन आम्हांकडे निघून या, या प्रमाणें गोपाळरावास श्रीमंतानीं पत्रें पाठविलीं आहेत व दादासाहेबांनीं आपले खिजमतगार हाच निरोप सांगून पाठविले आहेत. आतां तुम्हीं गोपाळरावास नीट समजून सांगून ते ताळ्यावर येतीलसें करावें. श्रीमंतांच्या मनाचा कल रक्षावा. विठ्ठल सुंदर आजारी पडला आहे. नबाबाची फौज फुटून घरोघर जाऊं लागली आहे. त्याचे सरदार ही त्यावर खुष नाहींत. गोपाळरावाच्या हातून कांहीं होणें नाहीं, कारण त्याजवळ सारे चार पांचशें लोक आहेत. इकडे श्रीमंतांची युद्ध करण्याची हिंमत मोठी. त्यांत त्यांस बसालतजंग मिळाला आहे. ही लढाई करण्याची उत्तम संधि आहे असें जाणून नवाब निजामअलीवर श्रीमंत व बसालतजंग चालून जात आहेत. " ३ गोपाळरावास.

गावें आणि उत्तर लिहून पाठवावें, " ह्मणून लिहिलें, व " आपाजीपंताचें पत्र सखारामपंतास गेलें कीं आपणांस आज्ञा झालिया येईन " ह्मणोन हें ही त्याणीं लिहिलें, " खिजमतगार मुख्योनीं पाठविले आहेत " ह्मणोन लिहिलें, " बसालतजंग व श्रीमंत एक होऊन नबाबावरी जाणार, त्याचे कार्यभागी यांस तूर्त बरें नाहीं. ( त्यांची ) फौज फुटली, सरदार दिलगीर, गोपाळराऊ फार पांचशें, ह्मणोन बातमी; यास्तव जावयांचा प्रकार केला, " ह्मणोन लिहिलें होतें. आम्हीं उत्तर लिहिलें जे, " नबाब निजामअली कोणाच्या भरंवशावर नाहींत. त्यांची फौज जे आहे ते तयार आहे. नवे किती आले गेले याचा ( त्यांस ) हिसाब नाहीं. तुम्हीं मनसबा केला हा फजीत पडावयाचा ! सलूख करून आपल्या स्थलास जावें. न पुरवे तरी उगेच नदीस पाणी नाहीं तों पार व्हावें. नबाबाशीं गांठ पडलिया किती फौज ( लढाईस उभी ) राहील तें कळेल ! " ह्मणून लिहिलें आहे. तुम्हांस कळावें. वरकड गोष्टी " चिरंजीव युद्ध प्रसंगीं शरीक नबाबाचे. किती तरी असोत. झुंज झालियावरी (नबाबाचा) निरोप घेऊन येतील. तवपर्यंत येत नाहींत. " असें साफ लिहिलें आहे. गंकार नामकाच्या पत्रीं जें लिहिणें तें लिहिलें आहे. " चिरंजीव येथें " येतील, त्यांची आमची भेट होईल, नबाबानीं कोणे प्रकारें [ त्यांची ] रवानगी केली हें कळेल, तदनुसार पुढें कर्तव्य तें करूं. तूर्त पत्राचें प्रयोजन नाहीं. " ह्मणोन लिहिलें आहे. तुम्हीं अगोदर सूचना राजे बहादर यांस करावी, " श्रीमंतांकडील पत्रें येतात जातात. कोणी तुम्हांस सांगेल अगर लिहील. तुमच्या चित्तांत विकल्प येईल. यास्तव सूचना केली. " सांगोन उतराई व्हावें. ते[१२] [ तुम्हीं ] उभय भ्रष्ट व्हावें ह्मणोन लटकीच

१ सखारामबापूस. पण या वाक्यांतील हा आपाजीपंत कोण ? २ दादासाहेबानीं. ३ मोगलाचा दिवाण यास. ४ मोंगलावर चालून जावयाचा. ५ लढाई करण्याचा मनसबा. ६ अर्थात् पुण्यास. ७ भीमानदीस. ८ सोबती. ९ गोपाळरावाजवळ किती थोडी फौज असली तरी तो मोंगलाच्या बाजूनेंच लढणार. १० गंगाधर यशवंतांच्या. ११ घरीं मंगळवेढ्यास. १२ सखारामबापू वगैरे तुमचे शत्रू.

दगाबाजीनें पत्रें पाठवितील. अंतर करणार नाहीत. परिछिन्न सांगावें. आम्हीं तिकडील पत्रें लष्करीं[1] लबाडीचीं येऊं लागलीं यास्तव सूचना केली आहे. आम्हीं चिंतार्णवीं आहों. बहुत सावधपणें असावें. आधीं वर्तमान नबाबास अगर राजे बहादरास श्रुत करावें. तीर्थरूप आपांस उतार आहे. बसालतजंग यादगिरीवर आले. हलक्या ... जली करीत आले. श्रीमंतांनीं कलबुर्ग्याहून कूच केलें. अळंदच्या सुमार चालिले ह्मणोन लिहिलें होतें. चतुर्दशी भृगुवारचें पत्र कलबर्ग्याच्या मुक्कामचें काली तिसरे दिवशीं आलें. कळलें पाहिजे. हे आशीर्वाद.

नं० २९३[L]

( अधिकज्येष्ठ वद्य तृतीया
२९ मे. )

श्री.

सेवेशीं सखाराम भगवंत[2]. कृतानेक साष्टांग नमस्कार. विनंती उपरी. येथील कुशल वर्तमान तागायत चंद्र १९ जिल्काद पावेतों आपले कृपेकरून यथास्थित असे. विशेष. आपण पत्र पाठविलें तें पाहोन बहुत संतोष झाला. सदैव कृपापत्रीं संतोषवीत असावें. इकडील वर्तमान तरी उभयतां श्रीमंत[3] खासा भागानगर प्रांतीं आहेत. कांहीं फौज गंगातीराकडे ही आहे. मोंगलानें आपल्या प्रांताचा विध्वंस केला यास्तव यांनीं ही इकडे त्या प्रमाणेंच अमलांत आणिलें. यंदाचा कलह झाला असा प्रकार याज मागें झाला नव्हता. * ते समयीं झालें होतें तेव्हां लोकांचीं घरेंदारें ही फारशीं नव्हतीं. एवंच घरांसाठीं लोक श्रमी असतील. असो. जें होणार तें कदापि सुटत नाहीं. येथील प्रकार तरी मल्हारबा आदी करून सर्व लहान मोठे एकादिल आहेत. सांप्रत बसालतजंग यास सामील

१ पेशव्यांच्या लष्करचीं. २ हें सखारामबापूचें गोपिकाबाईस पत्र. ३ रावसाहेब पेशवे व दादासाहेब. * पत्रांत कोरी जागा सोडिली आहे तेथें मूळपत्र फाटल्यामुळें अक्षरें नाहींशीं झालीं आहेत.

करावें हा विचार आहे. सर्वांचे मतें दौलत पेंचांत आली तरी सर्वांसच वाईट आहे; यास्तव जीवींदारभ्य श्रम करून एकवेळ मोंगलाचे दंत भग्न करावे असें आहे. त्या ही मध्यें ईश्वरी सत्ता ! जाहल्या गोष्टी स्वप्नीं ही नव्हत्या ! परंतु त्या ही घडोन ऐसे हे दिवस आले ! बरें ! जें होणार तें सुटत नाहीं. या उपरी एकनिष्ठेनें सर्वांनीं वर्तावें असेंच भाव आहेत. आणि ईश्वर कृपाच करील. आमचे विषयीं बहुतानीं ( आपल्या ) चित्तांत संशय आणिले होते, ऐशास आम्हीं एकनिष्ठेनें सेवा केली, अलीकडे हा प्रकार झाला ! असो. आमचे दैवानुरूप जें होणें तें झालें. या उपरी जे गोष्टींत उचित, दौलतेस उपयोगी, तेच वर्तणूक करीत आहोंत. फलदाता ईश्वर आहे. कांहीं संदेह आपल्यास असेल तो दर्शनांतीं निरसन होईल. सर्वदा पत्रीं सांभाळावें. कृपा केली पाहिजे. हे विज्ञापना.

हेच पत्रीं राजश्री रामचंद्रपंत स्वामीस. तुम्हीं प्रसंगीं आहां ते आमचे आहां. ( तुम्हीं ) कोणे विषयीं उणें पडूं देणार नाहीं हा भरंवसा आहे. बहुत काय लिहिणें हे विनंती.

पै।। छ० १० जिल्हेज.

नं० २९४

( ३० मे. )

श्रीगणपतिर्जयति.

आशीर्वाद उपरी. येथील कुशल तागायत ( अधिक ) ज्येष्ठ वद्य चतुर्थी सोमवार. यथास्थित असे विशेष. तुमचें पत्र आजी आठ दिवस सोमवारचें आलें, त्या अलीकडे पत्र आलें नाहीं. नबाबाचें लष्कर माघारें फिरलें म्हणतात. श्रीमंतांच्या लष्करची बातमी——भागानगर प्रांतीं आहेत. नबाबाचा रोंख कळला ह्मणजे आठवे मजलीस भीमातीरास येणार. बाबूजी नाईक व रामचंद्र गणेश व आबा पुरंदरे असे नांदेड व कोंडलवाडीकडे

१ जिवापाड. २ पत्र गोविंद हरीचें गोपाळरावास.

होते. नाईक पाथरी परभाणी पावेतों गंगापार गेले होते. माघारे येऊन खंदार मातें वण [ ? ] भरवीत[1] आहेत. श्रीमंत माघारे फिरले ह्मणजे ते पांचवे सहावे मजलीस भंडारकवठें[2] या जवळी येणार, ह्मणून त्यांच्या लष्कराची बातमी ( घेऊन ) कालींच अस्तमाचीं जोडी[3] आली. वधू मुलीच्या फोड्या उतारास लागल्या खपल्या पडों लागल्या. चिरंजीव सौभाग्यवती राधाबाई सहमूल सुखरूप आहेत. काली पत्र अक्कलकोटचें आलें. तुम्हांस कळावें. श्रीमंत इकडून[4] परिछिन्न येतात. इतके दिवस दडी मारून बसले होते जे मोंगलाचा रोख पाहून जावें, त्यास ( तो पुण्याहून ) माघारा फिरला. आतां बातमी पोंचतांच मजल दर मजल येतात. कळावें. आम्हीं तो बसलों आहों. श्रीपंढरीनाथाचे इच्छेनें होणें तें प्रारब्धानुसार होईल. त्याची चिंता कोठवरी करावी ! चिरंजीव दाजीस[5] ही कांहीं उतार आहे. नलदुर्गीं उभयतां वडील कुटुंब समेत सुखी आहेत. सौभाग्यवती आक्काबाई देखील बुद्धिदुर्गीं[6] आली ह्मणून वर्तमान आहे. तुम्हांकडील वर्तमान काय, तुम्हांस मोंगल या म्हणतात किंवा निरोप देतात, हें कांहींच कळलें नाहीं? वास्तव चिंतार्णवीं आहों लग्नाची संधि आणि लोकांची रवानगी यांचा अंडथळा भारी होता, तो लग्नाचा मजकूर राहिला. तुम्हीं यवन ठेविले आहेत त्यांचेंच भय फार आहे. हर कसें करून त्यांची रवानगी युक्तीनें विचारें रजावंदीनें संतोषें करावी ह्मणजे जीव स्वस्थ होईल.[7] आजी जोडी श्रीमंतांच्या लष्करास रवाना केली. चिरंजीव नारायणराऊ व आबा पर्वतास[8] गेले होते ते आले कीं नाहींत ( ? ) ते गेले ह्मणोन यव-

१ येथें ' वण भरवीत ' या ठिकाणीं मूळअक्षरें पहातां ' वणजारवावींत ' असें ही होईल. ' वणजारवावी ' हें गांवाचें नांव असूं शकेल. २ भंडारकवठें सोलापूर जिल्ह्यांत भीमातीरीं. ३ जोडी जासुदांची. ४ मंगळवेढ्याकडून. ५ ही त्रिंबक हरीची स्त्री. हिला ' तीर्थस्वरूप ' हें उपपद कसें जोडिलें नाहीं न कळे. ६ अक्कलकोटास. ७ पगाराचा पैसा वेळेवर पोंचला नाहीं तर मराठे स्वार एकवेळ गय करतील, परंतु तुह्मीं मोंगल व पठाण वगैरे जातीचे स्वार नवीन चाकरीस ठेविले आहेत ते अन्न घेतल्या शिवाय राहणार नाहींत. ८ पर्वतास कोठें ? पर्वत ह्मणजे किल्ला. तेव्हां यावरून नारायणराव व आबा हे पुरंदरास गोपिकाबाईकडे गेले होते असें घ्यावयाचें कीं काय ?

नाच्या अगर राजे बहादरांच्या चित्तांत विपर्यास होईल कीं काय न कळे! तुमचे लष्करांत श्रीमंतांची बातमी असेल. सावधपणें राहत जाणें. गमाजी बावानें स्वतंत्र जाऊन रुपया मिळविला. त्याचें द्रव्यादृष्टच विपरीत! तदनुसार मिळालें असेल. जे कालीं आपला लाभकाल असेल तदनुसार घडेल. तुम्हीं चित्तांत एकंदर श्रम न मानावे. शुभकाल श्रीकृपेनें दिवसें दिवस होत चालिला. नबाबावरी अगर राजे बहादर यांजवरी खट्टे[1] न रहावें. त्यांचा दरबार खोल. परंतु (जे) आपले पदरीं पडले त्यांचा अभिमान त्या लोकांस फार असतो. तहाचा प्रकार बनता तरी एव्हांच सरंजामाची वाट होती. त्या ही कृतघ्नानें[2] सर्व देशाचा नाश कबूल करून इरें करितां तह न केला. तह केला तरी प्रतिनिधि[3] परत द्यावी लागेल, तुमच्या कर्जाची वाट करावी लागेल, याच करितां त्याणें असें केलें! पुढें उभयपक्षीं तहाविणें चालणें संकटच आहे. ऋषीपर्वत गकारनामकाचे हातास लागला[4] तरी त्याचें पारडें भारी झालें असा ही प्रकार आहे. या उपरी गमाजीबावा आपले प्रांतीं राहतील किंवा [ मोंगलाच्या लष्करांत ] येतील हें लिहिणें. चिरंजीव नीलकंठरायाचे लाखोटे दोन पाठविले आहेत. बहुत काय लिहिणें. कुरुंदवाडाकडील पत्र अलीकडे आलें नाहीं. हे आशीर्वाद.

पै।। छ० २० जिल्काद.

नं० २९९.

[ ३१ मे. ]

त्रिंबक विश्वनाथ पेठे यांचें गोपाळरावास

अधिक ज्येष्ठ व।। ९ चें पत्र—

" पुणें व किंवळें येथील सर्व गुंता उरकला[5]. या उपर एक गंगा-

१ रुसलेले. २ सखारामबापूनें. ३ प्रतिनिधीचें पद नारो शंकराकडून काढून पुनः भवानरावास द्यावें लागेल. ४ साताराचा किल्ला गमाजी बावाचे हातीं गेला तर. ५ आमच्या जिनगीची नासधूस झाली.

तीरचे घराची आशा. ( आमची ) नाशिकीं हवेली व नाशकापासून पश्चिमेस आमचा इनाम गांव जगदीशपुर येथें दरोबस्त जिंदगी राहिली आहे. आम्हीं असें ऐकितों कीं, नबाबाकडून नाशिक प्रांतीं फौज जाणार. कोणी म्हणतात कीं, जानोजी भोंसले यां कडील करांडांच जाणार. तेव्हां अगोदरच ( त्यास ) संवय सर्व लुटण्याची ! या करितां 'त्या स्थलांचे संरक्षण वस्तवानी सुद्धां होय ऐसें अगत्य करावे,' ऐसें लिहिलें होतें; त्याचें उत्तर 'होईल तें करूं' असें उदासपणाचें आलें, त्यास आमचा ओळखी अथवा स्नेही दुसरा कोणी आहे कीं काय ? कोणी जाऊ परंतु विठ्ठल सुंदर यांस सांगोन जो जाईल त्यास अगत्य रक्षण करण्या विषयीं निरवणूक असावी."

नं० २९६

[ ४ जून. ]

श्रीगणपतिर्जयति.

आशीर्वाद उपरी. येथील कुशल तागायत अधिक वद्य सप्तमी मंदवासर यथास्थित जाणून स्वकीय लिहिणें. विशेष. तुम्हीं बुधवार चतुर्थीचीं पत्रें पाठविलीं तीं काली शुक्रवारीं षष्ठीस अस्तमानीं पावलीं. लिहिलें वर्तमान विदित झालें. गोविंद शिवराम यांचें पत्र आलें त्याचें वर्तमान व विसाजीपंताचें पत्र आलें त्याचें वर्तमान लिहिलेंच आहे. हल्लीं काली विसाजी पंताचें पत्र आलें तेंच पाठविलें आहे. त्याजकडे आजी प्रत्योत्तर रवाना केलें. त्यांत एकच मजकूर जे; "तुम्हां खेरीज नाहीं. अंतःकरणा पासून जें तुमचें मनोगत तेंच प्रमाण. परंतु तूर्त लढाईचा प्रसंग. श्रीमंत मोंगलावरी चालिले, आणि उठोन येणें युक्त नव्हे. निरोप मागून मर्जी रक्षून

१ रघोजी करांडा हा भोंसल्यांचा सरदार. २ पत्र गोविंद हरीचें गोपाळरावास. ३ आज पर्यंत आपण मोंगलाच्या आश्रयास राहिलों. त्यानें हीं आमच्या संकटकाळीं थोर मनानें आह्मांस पदरीं घेतलें. आतां त्याची व पेशव्यांची लढाई होणार. या वेळीं त्यांस सोडून पेशव्यांकडे यावें किंवा घरीं जाऊन बसावें हें वाईट.

येतील. " ( असें आम्हीं लिहिलें आहे. ) वरकड तुम्हीं कितेक पर्याय लिहिले त्या अन्वयें आम्हीं खोलून लिहिलें. संशय ठेविला नाहीं. " यावया मास पक्ष लागेल तर ये विशीं क्षमा करावी. अतःपर वारंवार यत्रें न पाठवावीं चतुष्टय ( ? ) न करावें " असें लिहिलें. पदरींचे लोक घरास गेले. चार आहेत त्यांस पोटास नाहीं. युद्धप्रसंगीं कर्ज ही मिळणार नाहीं. चार आहेत ते निघोन जातील. तेव्हां एकले न राहून परिणाम काय ? किरकोळ मंडळी सारी लावून द्यावी. राहणें तरी खासे दोघेजण रहावें. अगर सारेच निरोप झालिया यावें हें लक्ष, गोष्टींची गोष्ट. नबाब आजी सर्व प्रकारें बलिष्ट. त्याशीं झुजावयाचा प्रकार [ श्रीमंतानीं ] योजिला हा अनुचित. त्यींणीं[1] काय पाहिलें[2] न कळे ! किंवा होणार बलिवंत न कळे ! आम्हीं ही उमजेसें त्या गृहस्थांस लिहिलें. सांगोत वा[3] न सांगोत. तुम्हीं बहुत सावधपणें राहणें. इकडे पर्जन्य इतके दिवस नव्हता. सोमवारीं द्वितीयेस पर्जन्य प्रहरभर पडला. त्या उपरी बुधवारीं दोन घटका बराच पडला. नदीस[3] पाणी चार दिवस आलें होतें. मागती उतरलें. असा प्रकार आहे. मोरो बापूजीनें आठ दिवसांत पांच सहा स्वाऱ्या केल्या. दहा बारा गांवचीं गुरें नेलीं. बैल मार्गींचे नेले. मोठे [3]थोरले माणूस झाले ! काय करावें ! दीर्घ॰ दृष्टीनें पाहून उगेच आहों. गकार यास लिहिलें आहे. तुम्हीं बहुत सावधपणें असणें. अहोरात्र दुसरी चिंता नाहीं. चिरंजीव दाजीस पाठवीत नाहीं. समीप पंचक्रोशींत होणें तें होऊ. कळलें पाहिजे. आठ रोजां एक पत्र पाठवीत जाणें. ये विशीं आळस न करणें. आम्हीं काय लिहावें ! तेथें कळेल तसें करून वर्तावें. निरोप जाहला तर उत्तमच आहे. नाहीं तर खर्चाचें परम संकट आहे. काय कराल ! यंदांचा प्रसंग तुम्हांवरी भारीच पडला. बरें ! चिंता न करणें. श्री सर्व मनोरथ सिद्धीस नेईल. वारंवार काय लिहावें ! होईल वर्तमान तें लिहिणें. आम्हीं गुंता ठेऊन उत्तर लिहीत नाहीं. कळलें पाहिजे. हे

---

१ गोविंद शिवराम व विसाजीपंत यांस. २ अथवा. ३ ही उपहासोक्ति.

आशीर्वाद. गणबास खर्चास देतों. ठेऊन घेतला आहे. चासेचें पत्र मुजरद माणूस घेऊन आला होता. उत्तर देऊन लाऊन दिला. पत्र पाठविलें आहे. बहुत काय लिहिणें. शिदोजी जासुदानें लबाडी केली. त्याचें पारिपत्य करावयाचें होतें. येथें आला ह्मणजे आम्हीं करितों. विकारनामकाचें पत्र पाठविलें आहे त्यावरून कळेल. तुम्हीं निखालसता. समजोन लिहिलें त्यावरून आम्हीं ही निखालसपणें लिहून पाठविलें. 'त्या उभयतांस ही वर्तमान श्रुत करणें. तेच आमचे दरम्यान. दुसरे नलगेत.' ह्मणोन लिहिलें. कळलें पाहिजे. हे आशीर्वाद. पत्रें जतन ठेवावीं अगर फाडून टाकिली जावीं. गबाळपणें गमावतील. हे आशीर्वाद. लक्ष्मेश्वरचीं पत्रें पाठविलीं आहेत. हे आशीर्वाद.

चिरंजीव मंडळीस आशीर्वाद. पर्जन्य अतिशय ह्मणोन लिहिलें तें कळलें. अद्यापि तुम्हांस निरोप नव्हे. कसा भोग भोगावयाचा आहे तो न कळे! तीर्थरूपांस ज्वर येत होता. प्रस्तुत येत नाहीं. चिंता न करणें. कुरुंदवाडचें पत्र आलें. तिकडे पर्जन्य नाहीं. गमाजी बावा कऱ्हाडास गेला ह्मणोन वर्तमान आहे. कळलें पाहिजे. हे आशीर्वाद. बहुत सावधपणें राहणें. हे आशीर्वाद.

नं० २९७

[ अधिक ज्येष्ठ वद्य नवमी

९ जून. ]

श्री.

तीर्थस्वरूप मातुश्री बाई वडिलांचे सेवेशीं.

अपत्यें रघुनाथानें कृतानेक साष्टांग नमस्कार विनंती उपरी. येथील कुशल तागायत छ० २२ जिल्काद पावेतों यथास्थित असे. विशेष. यानंतर आपलेकडून आशीर्वाद पत्र येऊन वर्तमान कळत नाहीं, तरी

---

१ विसाजीपंताचें. २ विंचूरकर व नारो शंकर यांस. ३ होत नाहीं. ४ त्रिंबक हरीस. ५ पत्र रघुनाथराव दादासाहेबांचें गोपिकाबाईस.

सविस्तर लेहून पाठवावें. इकडील वर्तमान तरी भागानगराहून दरकूच कृष्णातीरास आलों. या उपरी येथून निजामअल्ली खानावरी चालोन जाऊन गांठ घालितों. वडिलांचे आशीर्वादें यवनाचें पारिपत्य यथास्थित होऊन येईल. वरकड वर्तमान नारो आपाजी यांस लिहिलें आहे त्यावरून कळेल. वडिलांचे आशीर्वादें करून व पुण्येंकरून यवनाचें शासन उत्तम करितों. यवनानें पुण्यास उपद्रव केला हें ऐकून बहुत क्रोध वाटला आहे. तो उपद्रव करणार नाहींसें वाटत होतें, यास्तव आम्हीं भागानगर न जाळिलें. आतां त्याणें तालुच टाकिला, देउळें जाळिलीं, हें ऐकून बहुत विषाद जाहला. आतां परमेश्वराचें स्मरण करून लढाई उत्तम करितों. वडिलांची दया कृपा मजवर पूर्ण असावी. बहुत काय लिहिणें हे विज्ञापना.

पै॥ छ० जिल्हेज.

नं० २९८

[ ७ जून ]

श्रीगणपतिर्जयति.

आशीर्वाद उपरी येथील वर्तमान तागायत ( अधिक ) ज्येष्ठ वद्य एकादशी भौमवार यथास्थित असे विशेष. राजापुराहून कूच झालें ते दिवशीं तुम्हीं पत्रें रवाना केलीं तीं काल दोन प्रहरां सोमवारीं, चौथे दिवशीं पावलीं. लिहिलें वर्तमान विस्तारें कळलें. श्रीमंत भागानगर प्रांतीं होते तिकडून पंचमहालाकडे झालें. घालगनुरापाशीं भीमापार होणार, ह्मणोन वर्तमान आहे. बाबूजी नाईक व रामचंद्र गणेश, हरी गोपाळ असे कोडलवाडीकडे होते ते पांच सात हजार फौजेसुद्धा तुळजापुराकडे आले आहेत. त्यांस

१ रायचूर दुआबाचे बाजूस. २ ज्यांकडे पुणें शहराचा बंदोबस्त राखण्याचें काम होतें ते नारो आपाजी तुळसीबागवाले. ३ पत्र गोविंद हरीचें गोपाळरावास. ४ राजापूर हें पुणें प्रांतीं घोडनदीतीरीं आहे. ५ पंचमहाल मोंगलाईंत गुलबर्गे जिल्ह्यांत.

आम्हीं खातरेस आणीत नाहीं. करकंबचे लोक लष्करांत आहेत त्यांणीं पत्रें पाठवून घाबरें केलें. आधींच रयत हरामजादी. त्यामध्यें निमित्य झालें. चौंकडे चौघे गेले. अगदीं वसुलाचें काम बंद झालें; ऐशास तुम्हीं निरोप घेतलाच असेल, तरी त्याच मार्गें यावें. तुम्हीं दोन हजार आलां तरी दहा पांच हजारांची आवई पडेल. दोन दिवस गुंता असेल तरी एखादा इभ्रतीचा माणूस कांहीं लोक देऊन करकंबेस पाठवणें. बहिरोपंतीं हिम्मत बरी धरिली आहे [ त्याजवळ ] प्यादे, लोक, सामान, आहे. बाबूजी नाईक वगैरे यांस तो खातरेस आणीत नाहीं. तथापि सूचना लिहिली आहे. त्वरेस मोल आहे. लष्कर अनिवार. निंबाळकरांच्या मुलुखांत आवडाव केली. ते ही जमा झाले आहेत. पाडागड करितात. नलदुर्गीहून वडिलांस आणावयाचा मजकूर लिहिला तो आमच्या ध्यानास आला. परंतु तूर्त नाईक समीप आले. त्याणीं कृष्ण केलें ह्मणजे आणवूं: श्रीमंत येतील तेव्हां सारे एक जागां झालों ह्मणजे चिंता नाहीं. जें भवितव्य असेल तदनुसार घडेल. करकंब फुटलियामुळें अवसान खचा. बहिरोपंताकडून खर्चास येत होतें तें बंद झालें. संकट प्राप्त झालें. श्रीभगवान् समर्थ. चिंता नाहीं. तुम्हीं काळजी आमची न करणें. रसायन राखोन निरोप घेऊन करकंबेसच येणें. येथेंच रहावयाचा डौल पाडावा, ह्मणजे लोक जमा होतील. मुख्य पोटास मिळालें पाहिजे. दिवस कठिण दिसतात. पुढें हेच दिवस राहतात असा अर्थ नाहीं. कुरुंदवाडकर लांब. तुम्हीं लिहिल्या प्रमाणें सूचना लिहिली. कळलें पाहिजे. बहुत काय लिहिणें. हे आशीर्वाद. वधू व पाटणकर (व) त्यांची मंडळी कोकणांत रविवारीं गेली.

---

१ बाबूजी नाइकाच्या लष्करांत करकंबचे लोक चाकरीस आहेत त्यांनीं घरीं पत्रें पाठवून धास्ती घातली कीं, हें लष्कर करकंबेकडे येत आहे. २ करकंबेवरून. ३ हा करकंबचा ठाणेदार. ४ निंबाळकरांच्या मुलखांत बाबूजी नाईक वगैरे सरदारानीं आवाडाव मांडिली या करितां त्यानीं ही फौज जमवून त्यांच्या लष्करच्या कहीचीं उंटें, तट्टें वगैरे हिरावून घेतलीं. ५ दोघा वडील बंधूंस. ६ करकंबचे लोक चहूंकडे पळून गेले यामुळें आमचा धीर खचला. ७ मोंगलाशीं प्रेम राखून.

# वर्गणीची पोंच.

## सन १८९७ । ९८

( ता. २० एप्रिल पासून २२ मे पर्यंत. )

| | रु० |
|---|---|
| रा. रा. माधवराव सदाशिव दिघे. वडोदें. | ३ |
| " " सदाशिव रामचंद्र ओझे. मु०पळस्पें. ता०पनवेल. | ३ |
| " " भगवानदास दामोदर शेट. हुबळी. | ३ |
| " " पुरुषोत्तम नारायण दातार. झांशी. | ३ |

## १८९८ । ९९ सालची.

| | |
|---|---|
| रा. रा. सदाशिव रामचंद्र ओझे. मु०पळस्पें. ता०पनवेल. | ३ |
| श्री. रा. अण्णासाहेब कुरुंदवाडकर. कुरुंदवाड. | ३ |
| रा. रा. विष्णुपंत पटवर्धन वैद्य. मिरज. | २८।० |

**ऐ०ले०संग्रह–कर्ते.**

---

## सूचना

आम्हीं केलेल्या पुस्तकां पैकीं:—

१ यशवंतराय महाकाव्य (सर्ग २४ श्लोक संख्या १७२५) किंमत १ रुपया.
२ फुटकळ चुटके. ( कविता ) किंमत ८४.
३ समुद्र काव्य किंमत ८३.
४ गुणोत्कर्ष नाटक. [ तिसरी आवृत्ति ] किंमत ८८.

ऐ० ले० संग्रहापैकीं निराळीं प्रकरणें *

**मिरज प्रकरण**–[ मिरजेच्या वेढा व तत्संबंधीं युद्ध ] या हकिगतीचीं पत्रें ऐ०ले०संग्रहाच्या पांच, सहा व सात या अंकांत आलीं आहेत त्यांचें हें निराळें पुस्तक. किंमत ८१२.

मोंगलाशीं लढाई. किंमत ८३.

किंमत रोख. ट०हां० माफ. व्ही. पी.नें मागविल्यास हीं पाठविण्यांत येतील.

**ऐ०ले०संग्रह–कर्ते.**

---

* ऐ०ले०संग्रहाच्या वर्गणीदारांस हीं पुस्तकें निम्मे किंमतीस मिळतील.

# ऐतिहासिक-लेख-संग्रह.

हें डेमी अष्टपत्री सांचाच्या चाळीस पृष्ठांचें मासिक पुस्तक दर महिन्यास मिरज येथें नियमानें प्रसिद्ध होत असतें. यांत पटवर्धन जहागीरदारांच्या जुन्या चिटणिशी दप्तरांतील ऐतिहासिक महत्वाचीं व प्रत्येक स्वारीतील भरपूर माहितीचीं पत्रें सालवारीच्या क्रमानें छापून प्रसिद्ध होत असतात. शिवाय अन्यत्र उपलब्ध झालेले कागदपत्र व बखरी वगैरेचा ही यांत समावेश होत असतो. या मासिक पुस्तकाची आगाऊ किंमत सालिना ट० हा० सुद्धां तीन रुपये आहे. ग्राहकानीं सालिना वर्गणीच्या किंमतीचें व्हा० पे० मागवावें अथवा तितक्या रकमेची मनीआर्डर पाठवावी. त्या शिवाय पुस्तक सुरू केलें जाणार नाहीं.

ऐ०ले०संग्रह कर्ते.

## आमचे पुणें व मुंबई येथील एजंट

रा.रा. मुरलीधर मल्हार अत्रे, महाराष्ट्र बुकडेपोचे म्यानेजर, बुधवार पेठ पुणें. रा.रा. विष्णु दासो वनहट्टी. कमिशन एजन्ट आणि जनरल मर्चंट. गिरगांव ट्रामवे टरमिनस् पेंडसे यांची नवी चाळ मुंबई.

सदरहू दोन असामींस आम्ही ऐ०ले०संग्रहाचे एजंट नेमिलें आहे. त्यांजकडे तेथील वर्गणीदारानीं वर्गणी द्यावी. आमचीं सर्व पुस्तकें एजंटांकडे विकत मिळतात.

ऐ०ले०संग्रह कर्ते.

## अमोलिक संधी !

### फोटोग्राफी शिकण्याची उत्तम सोय !!

**उक्ता ठराव सवाशें रुपये !!!**

सदरहू रक्कम घेऊन आम्हीं आपल्या स्वतःच्या सामानावर पुष्कळ फायदा होण्याचा हा स्वतंत्र धंदा एक महिन्यांत शिकवूं. विशेष खुलासा पत्रद्वारें अगर समक्ष भेटून करून घ्यावा.

पुरुषोत्तम कृष्ण खांबेटे,
फोटोग्राफर. मिरज.

Patwardhan B.A.
Deputy Collector
Thana.

# ऐतिहासिक-लेख-संग्रह.

## मासिक पुस्तक.

जुलई. १८९८ इ०:

अंक १४


वासुदेव वामन शास्त्री खरे

मिरज हायस्कुलांतील संस्कृत शिक्षक.


यांनीं


कुरुंदवाड येथें

" भाऊनाना " छापखान्यांत छापिलें.


वर्षाची आगाऊ वर्गणी टपाल हांशीलसह तीन रुपये.

फुटकळ अंकास पांच आणे.

# ऐतिहासिक-लेख-संग्रह.

## अंक चवदावा

विषयांचा अनुक्रम. पृष्ठ

( मागील अंकावरून पुढें चालू )


| | |
|---|---|
| मोंगल स्वदेशाकडे परत जातो. | ५०७ |
| मोंगल व पेशवे यांमध्यें लढाई होण्याचा रंग. | ५२१ |
| सावनूरकर व निजामअल्ली. | ५४१ |
| मोंगल व पेशवे यांमध्यें युद्ध होण्याचा रंग. रुसलेल्या सरदारांची समजूत. | ५४५ |


## अगत्याची सूचना.

ऐ०ले०संग्रहाच्या दुसऱ्या वर्षास सुरुवात झाली. वर्गणी पाठविण्या विषयीं आश्रयदात्यानीं त्वरा करावी. आमच्या पुस्तकाची वर्गणी आगाऊ आहे हें त्यांस माहीत आहेच.

ऐ०ले०संग्रह कर्ते.


## थोरले मल्हारराव होळकर यांचें चरित्र.

आह्मीं तयार केलेलें हें पुस्तक शाळाखात्यानें लायब्ऱ्यां करितां पसंत केलें असून द० प्रा० कमिटीनें याबद्दल आह्मांस इनाम दिलें आहे. किंमत १। रुपया. ट० ख०. एक आणा. पुस्तकें खालील पत्त्यावर आमच्याकडे मनिआर्डर पाठवून मागवावीं. व्हा०पे० मागविल्यास ही पाठविण्यांत येतील.

मुरलीधर मल्हार अत्रे.
महाराष्ट्र बुक डीपोचे म्यानेजर.
बुधवार पेठ. पुणें.

नं० २९९

[ ८ जून. ]

श्रीगणपतिर्जयति.

आशीर्वाद उपरी येथील कुशल तागायत [ आधिक ] ज्येष्ठ कृष्ण द्वादशी सौम्यवासर. यथास्थित जाणून स्वकीय लिहिणें. विशेष. तुम्हीं मंदवारचें पत्र पिशाच्या पिंपळगांवींहून कूच जालें ते दिवशीं रवाना केलें तें काली भौमवासरीं प्रविष्ट झालें. लोकांची रवानगी फार करून झाली. उत्तम जहालें. श्रीमंत पंचमहालीकडे गेले ह्मणोन इकडे आवई फार आहे. ' बाबूजी नाईक तुळजापुरा अलीकडे आले. कबूच्या डोहावरी मुक्काम ' ह्मणून बोली आहे. ' करकंबेकडे येतः ' ह्मणून बोली लष्करचे लोक आपलाल्या घरास लिहितात, त्यावरून खेर्डी तमाम वोस झालीं. तूर्त पैट्टी बंद झाली. सर्व ही प्रकार अशा प्रसंगींच अनकूल होतात! काय करावें! ' लोकांस निरोप कार्याकारण द्यावा ' ह्मणोन लिहिलें, त्यास श्रीमंत येथें येणार हे बोली असतां लोकांस निरोप दिल्यानें एक प्रकार दिसेल. श्रीमंत आम्हांवरच येतात असा अर्थ नाहीं. या प्रांतांत येतात. यास्तव आहे जेथ तो मोडतां नये. सर्व प्रकारें लज्जारक्षक श्रीभगवान् समर्थ आहे. तूर्त माध्यानकालाचें संकट. आजी पंधरा दिवस रोजमरा देऊन अद्याप दुसरे रोजमऱ्यास ठिकाण नाहीं, हे अवस्था आहे. नलदुर्गास पत्र लिहिलें आहे कीं, ' नाईक उजवे डावे झाले ह्मणजे आपण निघावयाचें करावें. राऊत पाठवितों. ' ह्मणून लिहिलें आहे. उत्तर आलें ह्मणजे स्वार पाठवूं. तुम्हां नवाबाचा निरोप घेऊन निघालां असाल अगर निघाल तेव्हां पुढें पत्र पाठवणें. आधीं करकंबेस यावें. सर्व प्रकारें श्री कल्याणच करील.

---

१ पत्र गोविंद हरीचें गोपाळरावास. २ मोंगलाचें कूच झालें त्या दिवशीं. ३ सरकारी देणें. ४ चमत्कारिक. ५ जमाव.

चिंता कोठवरी करावी! चिरंजीव मेघश्यामरायाकडील पत्रें पाठविलीं आहेत त्यावरून ( तिकडील हकिगत ) कळेल. बहुत काय लिहिलें. ' नबाबाचें पत्र व राजे बहादर यांचें राजवाडे[1] यां विशीं पाठविलें आहे ' ह्मणून तुम्हीं लिहिलें, परंतु ( तें ) तेथेंच राहिलें. रवाना झालें नाहीं. हे आशीर्वाद.

समस्त चिरंजीव मंडळीस आशीर्वाद. चिरंजीव भास्करपंत यांस आशीर्वाद.

नं० ३००

( ९ जून. )

श्रीगणपतिर्जयति.

आशीर्वाद उपरी. येथील कुशल तागायत अधिक वद्य द्वादशी, उपासाची एकादशी, गुरुवार, यथास्थित असे विशेष. तुम्हीं छ० २१ तेरखेचें पत्र दावलजी जासूद याजबरोबर पाठविलें तें काली बुधवारीं अस्तमानीं पावलें. विस्तारें लिहिलें तें कळलें.[2] नरोहर[3] नामक पोंक्षे तुम्हांजवळ पावले असतील. शिऊभट[4] पाठविले ह्मणोन लिहिलें, उत्तम केलें. पाठवावयाचें काम नव्हतें. बोभाट होणार. असो. आम्हीं वरचेवर पत्रें लिहीतच गेलों ( तीं तुम्हांस ) पावतच गेलीं. आपलीं ही पत्रें पावतच आहेत. श्रीमंतांचे लष्करचे हाल कागदीं लिहावेसे नाहीं. ते केंमेळ[5] घोड्यांस चारतात,

---

१ राजवाडे रेवतगांवकर जे मीर आवस यानें धरून नेले होते ते. २ पत्र गोविंद हरीचें गोपाळरावास. ३ नारोपंत पोंक्षे ( एक कारकून. ) ४ हे शिउभट ह्मणजे शिवाजी बावाजी म्हैसकर! ५ वैरण मिळेनाशी झाली ह्मणून श्रीमंतांच्या लष्करच्या घोड्यांस घरांवरील कुजक्या नासक्या पेंढ्यांवर व गवतावर गुदरान करावी लागली! म्हैसूरच्या स्वाऱ्यांतून याच रीतीनें घोड्यांची उपजीविका अनेक प्रसंगीं झाल्याचे उल्लेख आमच्या पुस्तकांत पुढें वारंवार येतील व त्या वरून मराठे स्वारांचीं

दाणा महाग, लोकांस रोजमरा नाहीं, ऐसें असोन नाहक खराब होत आहेत! नबाबाशीं झुजावयाचे दिवसच नव्हेत. कोण्या भरंवशावरी राहिले न कळे! बसालतजंग यास लाख [ रुपये श्रीमंतानीं ] देऊं केले त्याची गति कोणे प्रकारची आहे ती ऐकिलीच असेल! तुम्हीं लिहिलें कीं, ' आपण श्रीमंतांचा यांचा तह अगर मोकाबिला होऊन निकाल होय तो पर्यंत निरोप घेत नाहीं. श्रीमंत एकीकडे जातील, मग निरोप घेऊन येऊं. ' खर्चाची अडचण लिहिली ती कळली. काय करावें! आधींच [ आम्हीं ] कर्जदार. त्यामध्यें हा कसाला! नबाबाची सोबत. पैसा प्राप्त नाहीं. तरी तुम्हीं फारच केली. तैंवाई सोसून राहिलां. आजन्मांत लोकांचे दंगे तुम्हांस ठाऊक नाहींत ते पुर्ते अनुभवास आले! इतकें असोन पुढें ठावठिकाणी नाहीं. बरें! ते गोष्टीची फिकीर काय! धन्याची एकनिष्ठेनें सेवा केली आहे तरी श्रीभगवान् हर कोठें देईल. स्थल तिसरें ( ? ) नाहीं. श्रीमंत तह करिते तरी बरें होतें. न करीत तह तरी निघोन जावें ( ते ही जात नाहींत! ) सखारामपंताचा मनोरथ पुणें दग्ध होऊन तेथील गृहस्थ देशधडी व्हावे तो संकल्प सिद्धीस गेला. आतां तह करील! श्रीमंतांची दौलत लयास जावी तितका उपाय त्या गृहस्थानें केला. आम्हांस असें वाटत नव्हतें कीं श्रीमंतांचे चरणाचा वियोग होईल. तो ही त्याणें घडविला. त्याजवरी काय बोल! आपलेंच प्रारब्ध फिरलें! राजे बहादर यांस याच समयीं जीवावरील अपमृत्यु चुकला. शाबूत असते

---

हीं माणदेश, नीरथडी, भिवरथडी, वऱ्हाड या महाराष्ट्राच्या भागांत उत्पन्न झालेलीं घोडीं आपल्या मालकां प्रमाणेंच कशीं बेंळकट व हालकष्टांस न जुमानणारीं होतीं हें कळेल.

१ नबाबाचा. २ गांठ, लढाई. ३ कष्ट, संकट. ४ विपत्ति. ५ पगार न मिळाल्यामुळें फौजेंतील लोकानीं केलेले दंगे.

तरी मागेंच विल्हे लागलें असतें. चिरंजीवास पाठवावयाचा मजकूर तसाच जाहला तरी पाठवूं, नाहीं तर प्रयोजन नाहीं. तीर्थरूप व कुटुंबें नलदुर्गी श्रमी होतात. नबाब स्थल देतील ह्मणोन आस्था होती, त्यास तें ही प्राप्त नाहीं. त्याणीं तरी कोठून द्यावें? चारी स्थलें चौघांकडे गुंतलीं. श्रीपंढरीनाथ समर्थ ह्मणोन हे दिवस पाहिले. नाहीं तर उभें रहावया स्थल नव्हतें. पुढें ही तोच सर्व प्रकारें निभावणी करील. त्याच्या चरणारविंदीं निष्ठा असावी. गोवर्धनदास व विश्वंभर दीक्षित यांचा मजकूर कळलाच आहे. मुख्य ते शुभचिंतक आहेत, जे गोष्टीनें (आमचें) कल्याण तितका उपाय करितील. अंतर करणार नाहींत. 'गनीम एकीकडे गेले ह्मणजे नबाब आपल्या ठिकाणास जातील. भोसले ही जातील. वरकड सरदारांस ही निरोप देतील.' ह्मणोन लिहिलें, तें प्रमाणच आहे. कधीं चांडाळ जातील न कळे! जवळी श्रीक्षेत्र, परंतु श्रीचें दर्शन नाहीं! यात्रा ही समीप आली त्यांत ही जाणें होत नाहीं. यात्रा उलगडलियावरी मग जाऊन दर्शन घेऊं. येथील खर्चाची ओढी लिहावी तर तुमची ऐकोनच श्रम. ''बारगिरांनीं तकुबासाठीं अडविलें' ह्मणोन लिहिलें, तरी त्याणींच कां चुकावें! बाबूराव सलगर याणीं बापास लि-

---

१ लढाई किंवा तह याचा निकाल झाला असता. २ हे कोण? पेशव्यांच्या दरबारीं पटवर्धनांविषयीं रदबदली करणारे कोणी असावेसें वाटतें. ३ मराठ्यांस मोंगल 'गनीम' ह्मणत असत तें ठीकच, परंतु गोविंद हरि ही तसेंच ह्मणतो हें कास? ४ भागानगरास. ५ पंढरपुर. ६ यात्रा आषाढीची. ७ बारगीर काय शिलेदार काय, त्यांचें वेतन वार्षिक जें ठरलें असेल त्याचा तिसरा हिस्सा व पुष्कळ वेळां निम्मे रक्कम त्यांस आगाऊ देण्यांत येत असे. तिला नालबंदी ह्मणत. बाकीची रक्कम पावसाळा सुरू होण्याच्या सुमारास लष्करें आपल्या मुलखांत परत आलीं ह्मणजे ज्याची त्यास मिळत असे. हिलाच 'तकुबाचा ऐवज' असें नांव असे. 'तकुबाचा' ह्मणजे तहकूब केलेला, अडकवून ठेविलेला, असा अर्थ होय.

हिलें होतें कीं, " आपण कांहीं सेडगियाच्या कजियांत नव्हतों. त्याणीं बलाविलें तेव्हां गेलों. हत्तीस जमा न जाहला [ ? ] तिघा गृहस्थांनीं रायापाशीं सांगितलें कीं, ' या खेळांत बाबूराव होता. ' त्यांचीं नांवें लिहीत नाहीं. पुढें परिणामीं कळेल. आपण दरबारास जात नाहीं. प्रस्तुत मर्जी एक प्रैकारची आहे. वडील आज्ञा करतील त्या प्रमाणें वर्तू. " ह्मणोन लिहिलें होतें. नरसिंगॅरायानीं ही लिहिलें होतें कीं, " आपण येथें आहों. रायाची मर्जी एक प्रकारची. आपणावरी खेट्टे आहेत. परंतु तुम्हीं वडील बोल लावाल या करितां राहिलों. हे ठिकाणास आलिया उपरी मग जें सांगाल त्या प्रमाणें वर्तों. " अशीं पत्रें देहुरास ( ? ) आलीं तीं माणूस घेऊन येथें आला. तीं अकस्मात् हातास आलीं तीं वाचलीं त्या वरून कळलें तें लिहिलें आहे. राजे बहादर ( आम्हांवर ) फारशी माया करितात ' ह्मणोन लिहिलें, तरी ते थोरच आहेत. त्यांची आस्थाच फार तुमचे ठायीं आहे. ' जाहगीर लाऊन देतों ' म्हणतात, त्यांस कोणे गोष्टेचें अशक्य आहे ? आपल्या ठिकाणास जातील, आपला बंदोबस्त पाहतील, बाजदबरसाद सर्व ही युक्तीनें करून देतील. तुम्हीं दम धरणें. त्या दरबारीं ( कोणची ही गोष्ट ) होणेंचें कठीण. ( एकदां ) जाहलिया वरी मग कांहीं गुंता नाहीं. " श्रीमंत ईश्वरतीनेंच निघोन जातात. आवशास पोंहचलियावर भारी सामान टाकून [ आम्हीं ] सडे होणार " ह्मणोन लिहिलें तें यथार्थच आहे. ( श्रीमंतांस ) बंसालतजंगाचा भर फार आहे. अखेर त्यास ही तळावर टाकून जातात कीं काय न कळे ! समीप नबाब गेलियावरी; त्यांच्यानें दम धरवत नाहीं. लक्ष्मेश्वराहून चिरंजीव बापू कुरुंदवाडास पावले. त्यांचें पत्र आलें तेंच बजिन्नस पाठविलें आहे.

---

१ सेडगे हें कोणा शिलेदाराचें आडनांव. २ गोपाळरावापाशीं. ३ चमत्कारिक. ४ हा कोण हें कळत नाहीं. ५ रुसलेले. ६ अतिशय. ७ पावसाळ्या नंतर, पुढील वर्षी. ८ आपला आव राखून, लढाईच्या भरीस न पडतां. ९ आवसें हें शहर व किल्ला मोंगलाईंत आहे. १० मेघश्यामराव कृष्ण मंगळवेढेकर.

स्थलें ठेऊन खर्चा खालीं यावें लागलें. सोंपून द्यावीं, श्रीमंत आपल्या ठिकाणास जातील मग द्यावीं, असें ह्मणत होतों; परंतु ते जात नाहींत. या उपरी स्थलें जतन होणें कठीण. धण्यास ना कोणास असें होतें. काय करावें ? ये विशींचा बुद्धिवाद आज्ञा काय लिहिणें ती त्यांस लिहावी. त्या प्रमाणें वर्ततील. पाऊस फारसा नाहीं. बहुत काय लिहिणें हे आशीर्वाद. आज्ञा घेऊन याल ते अक्कलकोटाकडून भेटी घेऊन घेऊन यावें. नलदुर्गींचीं आणावीं. सारीं एक जागां राहूं. चिरंजीव समस्त मंडळीस आशीर्वाद. लिहिलें पारिसिजे. लोभ कीजे. हे आशीर्वाद. मग पुढें श्रीसत्ता प्रमाण. हे आशीर्वाद. जेव्हां नबाब निरोप देतील तेव्हां अक्कलकोटाकडून यावें. अगर सोय पडेल तिकडून यावें. तो मार्ग समीपच आहे. तुम्हीं न या तर चिरंजीव नीलकंठराऊ, कोन्हेरराऊ, आबा व भाऊ असे पाठवणें.

अपत्यें पुरुषोत्तमानें शिरसाष्टांग नमस्कार विनंती. आपण पत्रें पाठविलीं तीं पावलीं. वर्तमान सविस्तर तीर्थरूपांचे पत्रावरून कळेल. अलीकडे नकारनामक आलेला मजकूर कसा घडला तो लिहिला पाहिजे. वडिलीं पत्रें लिहिलीं आहेत त्यावरून कळेल. चिरंजीव बापूचीं पत्रें आपणाकडे रवाना केलीं आहेत त्यावरून कळेल. बहुत काय लिहिणें लोभ करावा हे विज्ञापना.

नं० ३०१

( ११ जून.)

श्रीगणपतिर्जयति.

आशीर्वाद उपरी. येथील कुशल तागायत अधिक वद्य चतुर्दशी मंदवार.

---

१ लक्ष्मेश्वर, शिरहट्टी वगैरे कर्नाटकांतील ठाणीं. २ अक्कलकोटास गोविंद हरीची बायको ( सत्यभामाबाई ) होती. तिला येतां येतां बरोबर घेऊन येण्याविषयीं हें लिहिणें.

यथास्थित जाणून स्वकीय लिहिणें. विशेष. तुम्हीं रविवारचें पत्र पाठविलें तें पावलें. त्या अलीकडे पत्र नाहीं. दुसरें रवाना केलें असलें तर पावेल. श्रीमंतांच्या लष्करचीं पत्रें वरचेवर येतात. त्यांचा निश्चय अद्याप लढाईचा लिहिला येतो. बसालतजंग यास लाख रुपयांची भरती करून दिली पुढें पंधरा दिसां दीड लाख द्यावे. ( असा करार झाला आहे. ) त्यास तोफांस बैल नाहींत हें ही कोडेंचें आहे. धारण महाग. वैरण नाहीं. व्याजें रुपया न मिळे. असा प्रकार आहे. कोणत्या भरावरी दम धरून [ श्रीमंत ] राहिले न कळे! निघोन जाते तरी बरें होतें! कदाचित् नबाबानीं चेळ दिल्हा, कचकरले, तर पुनः सांवर बसावयाचें कठिण! तेथील गृहस्थांनीं लिहिलें होतें कीं, " पुढें भवितव्य कसें आहे न कळे. यांचा भर तरी झुजावयाचा दिसतो. वांचलों तरी पुढें भेट. ईश्वराचें कर्तृत्व न कळे! प्रारब्धगतीनें यश आलें तरी येऊ! " आम्हीं लिहिलें होतें कीं, सावकाशीनें सर्व गोष्टी घडतील. तें अर्भकास श्रुत केलें. तो 'बहुत उत्तम' ह्मणोन बोलिला. सांवशीहून बाबुराव जगजीवन याचें पत्र आलें तोच माणूस तुम्हांकडे पाठविला आहे. त्याजवळी पत्रें आहेत त्याजवरून कळेल. त्यास काय उत्तर देणें तें लिहून देऊन रवाना करावें. चिरंजीव बापूचें ही पत्र त्या जवळी आहे. कुरुंदवाडाकडून हा गृहस्थ आला आहे. इकडे परवां बुधवारीं पर्जन्य च्यार घटका बराच पडला. गुरुवारीं किंचित् पडला. काली नाहीं. नदीस पाणी पुष्कळ आहे. तुम्हीं बहुत सावधपणें यावें. समागमें फौज नाहीं या करितां चिंता आहे. मुख्य गोष्ट श्रीमंत नबाबावरी चालोन येतात, आपण निरोप न मागितला, हें

---

१ मोठीच अडचण. २ हुसकून लाविलें. ३ पेशव्यांच्या लष्करांत आमचे स्नेही गोविंद शिवराम, विसाजी नारायण वगैरे आहेत त्यांनीं. ४ श्रीमंतांचा. ५ अर्भक कोण? ही बळवंतराव या नांवाची संज्ञा दिसते. ६ सांवशी धारवाड जिल्ह्यांत ७ माणनदीस.

उत्तम केलें. ( तुमची ) खर्चाची ओढ आहे. त्यांणीं कांहीं परामर्ष केला तरी उत्तम. नाहीं तरी उत्तम. वेध वारल्यावरी मग निरोप घ्यावा. रहावया स्थळ पाहिजे इतका आग्रह. बरें ! श्रीपंढरीनाथाची इच्छा ! आमचा रखणवाला तो आहे. त्याचे इच्छेनें होणें तें होईल. कागलकरांत व करवीरवासी यांत कलह लागला आहे. सेनापती[1] गुरें वळितात. आजरेंगांवचीं आणिलीं. शिऊ[2]भेट म्हैसकर आलियाचें वर्तमान लिहिणें. अहोरात्र निजध्यास लागला आहे. एक तें अरिष्ट जातें ह्मणजे प्रांत सारा सुख पावता. परंतु सबल भोग ! अद्याप लावणीचा प्रकार नाहीं. बहुत काय लिहिणें. लोभ कीजे. हे आशीर्वाद.

नं० ३०२

( १० जून )

श्रीगणपतिर्जयति.

आशीर्वाद उपरी. येथील कुशल तागायत [ अधिक ] ज्येष्ठ वद्य चतुर्दशी भृगुवार. यथास्थित असे. विशेष. तुम्हीं राजश्री बाळाजी नरसिंह याज बरोबर भौमवारचीं पत्रें पाठविलीं तीं काली गुरुवारीं अस्तमानीं पावलीं. सविस्तर वर्तमान कळलें. श्रीमंतांचे लष्करचीं[3] पत्रें[4] वद्य तृतीया रविवारचीं—मोंगलगिरा भागानगरा अलीकडे दहा कोसावरी मुक्काम होता—तेथील पत्रें अकरावे दिवशीं आलीं त्यांत लिहिलें आहे जे, कोंडलूर संगमाकडे[5] श्रीमंत चालिले. बसालतजंगाचें राजकारण करावें असें मानस आहे. मल्हारजी होळकर दोन मजली पुढें गेले होते. मागून श्रीमंत चा-

---

१ कापशीकर घोरपडे. या वाक्यांत गुरें वळण्याच्या उद्योगास लागलेल्या 'सेनापती' चा उपहास केला आहेसें दिसतें. २ शिवाजी बावाजी म्हैसकर. ३ श्रीमंतांच्या लष्करांचें. ४ पत्र गोविंद हरीचें गोपाळरावास. ५ कृष्णा व भीमा यांचा संगम रायचुरापासून आठ कोसांवर होतो त्यास हें नांव.

लिले. पुढें विजापुराकडून देशास मिरजेकडून यावें असा मनसबा आहे. बाबूजी नाईक व रामचंद्र गणेश नांदेड वसमत प्रांतें गेले होते. तिकडून इकडे आले. यांस ही तिकडे यावयाचीं पत्रें आलीं आहेत. जातील कीं नाहीं पहावें. नाईकाचे धास्तीमुळें करकंब, भोसें तमाम वोस झाले. पैका बंद झाला. तूर्त मध्यानकाळचें संकट झालें. आम्हीं मागती आजी श्रीमंतांच्या लष्करास जोडी रवाना केली. पहिली एक जोडी गेलीच आहे. तुम्हीं आपणाकडील मजकूर विस्तारें लिहिला तो कळला. ऐशास हा कालच असा आला आहे. याचा महिमा विचित्र आहे. तुम्हीं कांहीं चिंता न करणें. कोठें गेलें तरी प्रारब्ध प्रमाण. अनुकूल काल येईल तेव्हां सर्व चित्तानुसार घडेल. ये समयीं कोणावरी बोल ठेवावासा नाहीं. नवाब साहेब थोर वृक्ष. संकटकाल प्राप्त झाला ह्मणोन त्यांच्या छायेस गेलां, पुढें तुमचा अनुकूल काल येईल तेव्हां तेच मेहेरबानी करतील. कांहीं त्या गृहस्थांचें सूत्र असेल कीं, ‘ यांचा पाव भुईस न लागे तें करावें. वरकड तुमच्या चित्तास येईल तें करणें. ’ असें राजे बहादरास सुचविलें असेल तर न कळे! परंतु इतकें खरें—आपला प्रतिकूल काल या मुळें त्यांस तेशी वुद्धि होत नाहीं. लोकांस चिठ्या दिल्या त्याचा मजकूर कळला. नवाब धारूराकडे आले हे खबर आलियावरी नाईक टिकोन राहत नाहीं हें ही प्रमाणच आहे. चित्रगुप्ताकडील मजकूर कळला. उत्तम केलें. त्यास देखील दुग्धा. ‘ नलदुर्गचीं (माणसें) तूर्त आणावयाचें न करावें ’ ह्मणोन लिहिलें, त्यास आम्हीं ही तसेंच लिहिलें आहे. नाईक एकीकडे गेलियावरी आणावयाची तरतूद करूं. ‘ चांगल्या असाम्या ठेऊन रोजमऱ्यास आट असेल त्यांस निरोप द्यावा ’ ह्मणोन लिहिलें, त्यास तो प्रकार केला तर कोणी राहत नाहीं. श्रीमंत कोणे रोखे

---

१ सखारामबापूचें विठ्ठल सुंदराकडे आंतून सूत्र असेल कीं, गोपाळराव तुह्मांकडे गेला आहे याचे पाय भुईस न लागत तें करा! २ तुह्मांस जहागीर देण्याची.

जातात हें कळतें, तदनुसार करावयास येईल. तुम्हीं चिरंजीव दाजीस पत्र लिहिलें तें पाहिलें. ऐशास समयाचा गुण. तुम्हांस कधीं असें ठावकें नाहीं. घाबरे व्हाल तर न होणें. पुराणें ऐकतां, पांडवादिकांच्या गति काय झाल्या ! अलीकडे मोठे मोठे सरदार सरकारकून यांजवरी कसे कसे प्रसंग गुदरले ? तरी धैर्य करून तितके ही सोसून त्याणीं काल घालविला. तसा प्रसंग तुम्हांवरी नाहीं. तथापि संतोष मानून असावें. जे समयीं जें होणार तें होतच आहे. एक गोष्टी खरी. सखारामाचा मनोरथ जसा होता तसा सिद्धीस गेला. पुणें शहर जाळावें, ज्ञाती देशांतरास जावी, ( हा त्याचा मनोदय. ) त्रिवर्गांस देशांतून बाहेर घातलें, नवे फडणीस मुजुमदार केले, जें जें कर्म करणें तें त्याचें मात्र सिद्धीस गेलें ! तस्मात् त्याची तपश्चर्या विशेष ! श्रीमंतांची दौलत लयास नेऊन इतकें केलें तरी त्यासीं आजन्मांत दैव अनुकूल तदनुसार जालें. बहुत करून तुम्हीं निरोप घेतला असेल. नसला तर कार्याकारण जावें. सारी मंडळी समागमें न्यावयास कारण काय ? आमचे मतें तुम्हीं व चिरंजीव नारायणरायानीं जावें. वरकडांस लाऊन द्यावें. बरें. जें तुमचे युक्तीस आलें तें उत्तम. सोमवारचें पत्र वळुज देगांवचे मुक्कामचें आजी भृगुवारीं दोन तास दिवसास पावलें. त्यांतील अर्थ कळला. त्याणें फारच चिंतार्णवीं पडलों. त्या मागून मंगळवारचें पत्र अवसानाचें आहे. नाना प्रकारचीं भाषणें करून भय प्रदर्शन करून—अनायासें गेले तरी त्याचें निमित्य त्यावरी—अशी कोल्हेबुद्धीची गोष्ट करीत असतील ! असो. आपला काल प्रतिकूल, तेव्हां सर्व ही वाईट दिसतें हें प्रमाणच. वर्तणूक ही त्याच

१ हें वाक्य लिहितांना गोविंद हरीच्या ध्यानांत बाळाजी विश्वनाथ, खंडेराव दाभाडे, पहिले बाजीराव, चिमाजीआपा इत्यादि योद्धयांचीं नांवें आलीं असतील! २ कोकणस्थांची जात. ३ मोंगलाच्या लष्करा बरोबर जावें. ४ यावरून या सुमारास गोपाळरावाचें व विठ्ठल सुंदराचें खूप कडाक्याचें भांडण झालें असावें असें वाटतें.

प्रकारची. तेव्हां काळमहिमा खरा किंवा लटका ! चिरंजीव मंडळी रवाना केली आणि येथें आल्यास चिंता नाहीं. त्यांस पुसोन रवाना करावे अगर युक्तीस दिसेल तसें करावें. तुमचे हर एक विशीं [ साह्य करण्यास ] राजे खंदारकर[1] होते ते समयीं नाहींत. सेडबीस[2] गेले कीं काय न कळे. दम धरणें. श्रीभगवान् समर्थ. नळदुर्गीहून तूर्त न आणवावे हा प्रकार, मंगळवारच्या पत्रीं लिहिला त्या प्रमाणेंच करितों. बहुत काय लिहिणें. मीर आबस याचीं पत्रें पाठविलीं तीं पावलीं. त्याजकडे रवाना करितों. राजवाडे यांचें कुटुंब काली येथून अकलुजेस गेलें. वधू कोंकणांत रवाना होऊन आजी सहा रोज झाले. कळलें पाहिजे. बहुत काय लिहिणें. हे आशीर्वाद.

पै।। छ० ३ जिल्हेज.

समस्त चिरंजीव मंडळीस आशीर्वाद. लिहिलें परिसिजे. तुह्मीं लिहिलें तें प्रमाण. तुम्हीं जें कर्तव्य तें युक्तीनें करावें. फलदाता ईश्वर. बुद्धीस वैर न करावें. विचारें करून संतोषें निघोन यावें. राहिल्यानें खर्च भारी. रुपयास ठिकाण नाहीं. वरकड कितेक गोष्टी होणें नाहीं. त्या मध्यें प्रारब्ध प्रमाण. हे आशीर्वाद.

नं० ३०३

[ अजमासें अधिकज्येष्ठ वद्य जूनचा प० पंधरवडा. ]

श्रीगणपतिर्जयति.

आशीर्वाद उपरी. आजी तिसरे प्रहरीं पत्रें तुह्मांकडे रवाना केलीं.

---

१ खंदारकर राजे गोपाळसिंग. २ सेडब [ सेडम ] हें मोंगलाईत गुलबर्गा जिल्ह्यांत.

तों श्रीमंत दादासाहेबांचें पत्र मुजरद जासूद जोडी घेऊन आली. त्या पत्रांतील अर्थ लिहावासा नाहीं. 'हरकसें करून तुम्हीं आगमन करावें' हा मुख्य भाव. दीर्घ दृष्टीनें पाहतां परस्पर फजित पावले तरी बरें असा मजकूर! पांडु गोडबोल्याचे ही पत्रीं मुख्यांची आस्था अतिशय आहे. त्वरा करावी असा भाव. हें वर्तमान नबाबास कळल्या उपरी त्याणें ह्मणावें कीं, 'यांचें सूत्र!' तुम्हांवरी इतराजी केली अगर शब्द ठेविला तरी तें ही कामेंच झालें. त्या पत्राचा जाब कळेल तसा आम्हीं लेहून देऊन जोडी रवाना करितों. मुख्यांची आस्था, परंतु वरकड जे पूर्व मित्र त्यांचे मतें भलतसे फजित पावले तरी कामाचे. तुम्हांस परवांच लिहिलें होतें कीं, 'तुम्हीं राजे बहादर यांस जाऊन सांगणें कीं, श्रीमंत आम्हांकडे पत्रें पाठवितात. चौंकडून राजकारण करून लोकांचीं पत्रें पाठवितात. जीवनरायाच्या पत्राची गत. यास्तव अगोदर सांगून ठेवावें. काल एक प्रकारचा आला आहे. मर्जी रक्षून निरोप घ्यावा. नव्हे तरी खर्चास परिछिन्न द्या ह्मणावें. वरचेवरी तिकडील पत्रें मनास मानेल तशीं लिहितात, तेंच पत्र एक दुसरें दाखवावें. आपल्या वरील दोष वारावा.' हें परम संकटच तिसरें दिसतें. एक पत्र आलें, दोन आलीं, चार आलीं, नाहक नादीं लाऊन वर बुडवावयाची गोष्ट आहे! तुम्हांस समज नसेल तरी पुर्तें समजणें. मनांत एक, लौकिकांत एक, श्रीमंतांच्या मतें तुम्हांस आणावें,—तेव्हां त्यास हरकसा अपाय व्हावयाचा मजकूर सांगोन परस्पर फजित पावावे असें करितात! न केलें ह्मणजे त्यांस ह्मणतील कीं,

---

१ सखारामबापूचा मनोदय. २ 'पटवर्धनानीं आपणाकडे निघून यावें ही दादासाहेब व रावसाहेब पेशवे यांची फार इच्छा आहे,' असा अभिप्राय. ३ सखारामबापूच्या मना प्रमाणेंच झालें. ४ मित्र ह्मणजे शत्रू सखारामबापू इत्यादि! ५ अमुक अमुक. अर्थात् गोपाळराव. ६ हें वर्णन सखारामबापूचें. ७ तुह्मीं श्रीमंतांच्या मर्जी प्रमाणें न वागलां ह्मणजे सखारामबापू पेशव्यांस सांगेल कीं, इ. इ.

' तुम्हीं माया धरितां; परंतु त्यांची निष्ठा ( तुमच्या ठायीं ) अशी कोठें आहे ? ' असें समजावितील ! श्रीमंत सर्व प्रकारें सावध हें कळलेंच आहे. सर्व खेळ आहेत. अद्याप तरी सावध होणें. फिरोन पत्र आलें तरी जबानी सांगणें तें सांगावें, प्रत्योत्तर देखील देऊं नये, ह्मणजे त्यांस ( हे ) निष्ठुर [ असें ] कळेल. पत्रावीण प्रयोजन नाहीं. एक तरी, राज्य सोडून गेले तेथें ही पत्रें पाठवून उभयभ्रष्ट करावयाचा मजकूर आहे ! कळलें पाहिजे. आम्हीं उत्तर लेहून देतों. मग रागें भरले तरी चिंता नाहीं. पहिल्यापासून रागेंच आहेत. चिंता कोठवरी करावी ! आम्हीं आजी लिहिणें तीं यथास्थित लिहिलीं आहेत. या उपरी लिहितों कीं ' जें लिहिणें तें गोविंद शिवराम यास लिहिलें आहे. चिरंजीवाचें येणें घडत नाहीं. ' ऐसें लिहितों. केवळ निष्ठुर लिहेत नाहीं. परंतु विषाद आला तरी पुरवला. फिरोन पत्रें तरी लिहिणार नाहींत! तुम्हीं लिहून उत्तर द्यावयाचें न करणें. जबानी सांगणें कीं, ' आम्हीं तुमची सेवा सोडून येथें आलों. येथें आमची पाठी कां घेतली ' ऐसें सांगणें, ह्मणजे उगेच राहतील. हे आशीर्वाद. चिरंजीव मेघश्यामराऊ यांचें पत्र आजी येच समयीं आलें तें पाठविलें आहे. ते कुरुंदवाडास गेले असतील. ' गरजवंतको अक्कल नही ' असा प्रकार श्रीमंतांनीं केला आहे. हे आशीर्वाद.

अपत्यें पुरुषोत्तमानें व पांडूनें शिरसाष्टांग नमस्कार विज्ञापना. वडिलीं श्रीमंतांकडून कोणी येईल त्यास उत्तर स्पष्ट ल्याहावें जे, आम्हांस या समयीं यावयास गांठ पडत नाहीं. या प्रमाणें साफ लिहून अथवा जबानीनें सांगून पाठवावें. घात करावयास चुकणार नाहींत. यास्तव सावध असावें. हे विज्ञापना.

१ पटवर्धनांची. २ हें उपरोधिक लिहिणें. ३ दादासाहेब रागें भरले तरी. ४ घात करणारे सखारामबापू वगैरे.

नं० ३०४

( अजमासें अधिक ज्येष्ठ वद्य
जूनचा ५८ पंधरवडा )

श्रीगणपतिर्जयति.

चिरंजीव राजश्री आबास आशीर्वाद. उपरि. तुमचें पत्र पावलें. गंगाधर-, राव याजकडे तूर्त कोणी जात नाहीं. माणूसच हाताखालीं नाहीं. आम्हीं श्रीमंतांच्या आगमनामुळें प्यादे ठेवावे, झुजावें, ही लटकीच तरतूद. ठिकाण चांगलें नाहीं. कोणीकडे जावें या चिंतेंत आहों. अक्कलकोटीं सारीं सुखी आहेत. राजश्री अंताजी सखदेव तेथें आहेत. त्यांचें रोज पत्र येतें चिंता न करणें. आम्हीं कोण्या न्यायें वर्तावें तें लिहिणें. विचारीं पडलों आहों. हे आशीर्वाद.

चिरंजीव राजश्री भाऊ यास आशीर्वाद. तुम्हांपाशीं श्रीकृपेनें जासूद आहेत. आठ दिसां एक पत्र पाठविलें तर कोणी दूषण ठेवणार नाहीं! परंतु पत्र पाठवावयाचा दंडक नाहीं! तुम्हांस काय लिहावें! नळदुर्गास तरी पत्र पाठवीत जाणें. हे आशीर्वाद.

नं० ३०५

( अजमासें अधिक ज्येष्ठ वद्य
जूनचा ५० पंधरवडा. )

श्रीगणपतिर्जयति.

आशीर्वाद उपरी. आमचा संकल्प जे, या स्थलींहून न जावें. श्रीमंत

---

१ पत्र गोविंद हरीचें मोरो बल्लाळ यास. २ ज्यास हें पत्र लिहिलें आहे त्याची आई व बायको व मुलें यावेळीं अक्कलकोटास होतीं. ३ परशुरामभाऊ. ४ दंडक ह्मणजे वहिवाट. ह्याच शब्द मागें अंक ५ पृष्ठ १२९ व अंक १० पृष्ठ ३८६ येथें आला आहे तो पहा. ५ परशुरामभाऊची आई, बायको व दोघे चुलते नळदुर्गास होते त्यांकडे. ६ पत्र गोविंद हरीचें गोपाळरावास.

आले तर ह्मणावें कीं, " आम्हीं मोहळेस गेलों होतों. तुम्हीं मंगळवे-ढ्याची सनद पाठविली ह्मणून येथें आलों. आतां तुम्हीं बेइमानीस आलां तरी तुमची इच्छा! मारल्या हातें होईल तें हो!" पायगोंवा आहे तो मात्र लाऊन द्यावा. त्यास कोठें लावावा हें ठीक[1] नाहीं. मोहळेकडे आपल्या विचारास त्यांच्या[3] तालुक्रियांत नये, यास्तव आज पावेतों तिकडे कोणी पाठविलें नाहीं. ( जितका ) प्यादा येतो तो ही ठेवितों. मग ईश्वर इच्छा! पहिला मनसबा होता जे तुम्हीं पाठीवर दोन मजलींचे त-फावतीनें असल्यावरी यांच्यानें[4] येऊन बसवत नाहीं. पाणी मुख्य येथें समीप लष्करास नाहीं. मुक्काम माणेवरी अगर भीमेवरी करून येतील ( तर ) दोन प्रहर झुंज पडलें तरी सोसावें. सहजच उठोन जातील. मागील पायबंद[5] असला तरी मुक्काम पडणार नाहीं. हा मजकूर आमचा होता. बल्के चौ मजली पाठीवरी फौज असती तरी कांहीं फिकीर नव्ह-ती. जागा केवळ नाजुक. भिताड फार उंच नाहीं. गांवा भोंवतीं गांव-कुसू नाहीं. गांव पाहिजे तसा भरला आहे. आवांतर खेडीं ही कांसेगांव सांगोलें येथील आलीं आहेत. बेगमपुर येथें[6] लिंगप्पा भोगोजी नाईक होता. त्याची पाळत कोणी श्रीमंतांस सांगितली कीं,— राजश्री गमाजीबावा-कडील कांहीं ऐवज सांगोल्याहून त्यांजकडे स्वारांनीं पाविला— एवंच कोणी दुष्टानीं खबर पाविली, त्यावरून तेथून दोन हजार फौज अंताजी माणकेश्वर व धोंडो दत्तात्रय वगैरे श्रीमंतांनीं धरून न्यावया पाठविले ते पांच सातशें स्वार आले शुक्रवारीं अस्तमानीं. ते दिवशीं बेगमपुरांत

---

१ पायगुंतविणारी, पळून जाण्यास अडथळा करणारी कोणची ही गोष्ट. ( या स्थळीं कुटुंबाचीं मुलें माणसें. ) हाच शब्द अंक ५ पृष्ठ १८१ येथें आला आहे तो पहा. २ निश्चयात्मक. ३ निंबाळकरांच्या. ४ पेशव्यांच्यानें. ५ पाठीमागें मोंग-लाचा शह असला तर. ६ बेगमपुर व माचनूर या गांवासंबंधें अंक ९ पृष्ठ ३१४। ३१५ यांतील टीपा पहा.

पंचवीस चाळीस प्यादे होते. परंतु त्यानीं यांस पेठेंत घेतलें नाहीं. बाहेरच राहविले. वाणी वणुज प्यादे मिळोन चौकी पहारा केला. रात्रीं मध्यें दोनशें प्यादे मेळविले. गांवची बंदोबस्ती करून लिंगप्पा नाईक मंदवारीं पहांटेस बाहेर निघोन एक खेडियांत राहिला. त्यांचे मतें लिंगपा नाईकास हातीं द्यावें, नंतर आपण जावें. याणें तो असा प्रकार केला. ' गांवांत नाहीं. तुम्हीं घरोघर झाडा ध्या. ' म्हणतां ऐकेनांत. जो बोलावयास गेला त्यासच धरून मारूं लागले. मोचनूरचें खेडें तामिदरडी ( ? ) जवळी होती ते लुटून फस्त केली. शनिवारीं सारा दिवस, आदितवार तिसरा प्रहर पर्यंत पेठेजवळीच मुक्काम करून होते. गांवांतील गृहस्थ बोलीस गेला त्यासच मारूं लागले. आदितवारीं तिसरे प्रहरीं तेव्हां गांवांतील लोक सोडवावया गेले. कळ माजली. गांवकरी यानीं गोळ्या चालविल्या. दहा पांच माणूस जखमी झालें. दहा वीस ज़ीन राहिलें. ते उठोन दोन कोसांवरी राहिले. दुसरे दिवशीं श्रीमंतांकडे गेले. त्यांचे उपरोळीयास आणखी फौज येईल, आम्हां सन्निध नाहक कजिया वाढेल, ह्मणोन चिंतार्णवीं आहों. आम्हीं माचनुराकडून देखील कांहीं उपसर्ग केला नाहीं. तूर्त अरिष्ट टळलें आहे. येईल तेव्हां खरें. माघारे फिरले अशी खबर आली ह्मणजे लाऊन देणारास देऊं. आम्हीं राहूं ह्मणतों. आम्हीं येथें दम धरून राहिलों ह्मणून या प्रांतास अगर करकंब भोसें येथें दम आहे. आम्हीं निघालियावरी स्थलें जातील. असा प्रकार आहे. लोकांस निदानीं सांगणार कीं, श्रीमंत आले. आम्हीं तो निदान पतकरून राहिलों. समाधानें राहवेल त्याणें रहावें. न पुरवे त्याणें जावें. या प्रकारें बोलणार. तूर्त बरेच आहेत. कुरुंदवाडाकडील माणूस येत जात असतें. पत्रें आलीं तीं पाठविलीं आहेत. नरसिंगराऊ व बर्वे कित्तूर

१ पेशव्यांचे लोकांच्या मतें. २ माचनूर तालुक्या पैकीं. माचनूर या वेळीं पटवर्धनांकडे होतें. ३ याचा अर्थ दहावीस स्वार मेले ! ४ मदतीस.

प्रांतीं गेले. खंडणी तेथील झाली. पुढें जावें, त्यास हैदरनाईकाचा शह भारी आहे. मनोळीस करार दोन जाले. त्याचा ऐवज वसूल त्यास करावया सांगितला आहे. मोरशास्त्री मनोळीस आले आहेत. आम्हीं जासूद पाठविले होते. त्याणीं आपलें तापत्रय लिहिलें. पैसा द्यावयाची चर्चा नाहीं. त्याणीं आपली अवस्था कठिण निकडीची लिहिली आहे. कळलें पाहिजे. हे आशीर्वाद.

नं० ३०६

( ज्येष्ठ शुद्ध २
१३ जून. )

श्री.

विनंती* उपरी येथील कुशल तागायत छ० १ जिल्हेज मुक्काम नजीक काडलूरसंगमें जाणून स्वकीय कुशल लेखन करीत गेलें पाहिजे. विशेष. निजामअल्लीखान फौज सुद्धां देशीं गेले, पुणें जाळिलें, देव फोडिले, सिंहगडचें गुंढें लुटिलें. जामदारखाना, शिलेदारखाना वगैरे कारखाने खालीं ठेविले होते ते लुटिले गेले. किल्ल्याखालीं कारखाने ठेवावयासीं कारण हेंच कीं, तुम्हीं मध्यस्तीस पडोन खंडणी द्यावयाची बोली लाविली. घरें राखावीं, गडाखालीं उपद्रव न लागावा, ऐसी बोली लागली सबब राहिले होते. त्यासीं तुम्हांकडे बोली लागली म्हणून आळस

१ दोन लक्ष ? रक्कम मनोळीकरांच्या सामर्थ्याच्या मानानें जबर दिसते. २ त्यास म्हणजे कोणास ? ३ हे मोरशास्त्री कोण ? यानीं गोविंद हरीचें कांहीं देणें होतेंसें दिसतें. ४ भीमा व कृष्णा या नद्यांचा संगम रायचुराजवळ होतो त्यास काडलूर संगम किंवा कपाट संगम म्हणतात. ५ महाराष्ट्रांत. ६ आसपासचे गांवचे लोक किल्ल्याच्या आश्रयास आलेले. ७ पुण्यांतील वाडे. * हें पत्र गोपाळरावास पेशव्यांच्या लष्करांतून गोविंद शिवराम खासगीवाले याणीं लिहिलेलें आहे.

करून असा नाश झाला हें वर्तमान तुम्हांस ठाऊकच आहे. असो. पहिले मिरजेचे मुक्कामीं श्रीमंतीं आपल्यावर कृपा करून बोली चालीचा प्रसंग करून राजश्री पुरुषोत्तमराव यांशीं करारमदार करून यादी पाठविल्या, परंतु दिवस एक तेन्हेचे होते; याजमुळें गोष्टी घडून न आली. येथून ही [ तुम्हीं ] जावयाचें कारण हेंच कीं, तुमचा कारभार एक सोईचा जिकडे असावें तिकडेच असावें. त्यासीं दोन्ही धणी एकत्र झाले, आपलें बनेना, यास्तव ( तुमचें ) तिकडे जाणें झालें. तिकडे गेलां, मागती येणें कसें घडतें. तरी अखेर साल होऊं द्यावें, मग जें करणें तें करावें, असा भाव तुमचा असेल, याज करितां आपण राहिले ( असाल. ) आतां देशची गत अशी झाली, अखेर सालु झालें. येथून तरी तुम्हांस आणावें ऐसें उभयतां यजमानांचें मानस आहे. तरी उभयतां श्रीमंत तुम्हांस जशी पाहिजे तशी निशा करून देतील. उभयतां यजमानांची निशाच आहे. कारभारी यांज पासून अंतर पडेल त्यास मातबर सरदार मल्हारबा आदी करून आहेत. पाहिजे तशी निशा करून घ्यावी, आणि हर तजवीजीनें यावें, यांत उत्तम आहे. जर करितां मोंगलाचे घरीं असावें असें [ तुमचे मनांत ] असेल तरी उत्तम. परंतु मोंगलाचे जवळ तुमचें कसें बनेल? तूर्त मोंगल जों पावेंतों मोंगलाई बळकट होय तों पावेतों सर्वांचें अगत्य धरतील. परंतु परिणाम कळलाच आहे! पुण्याचे विषयीं त्याणें कसें केलें हें पहावें. तेव्हां पुढें काय गत ही कळलीच आहे.

---

१ मिरज पेशव्यानीं घेतल्या नंतर गोविंद हरीनें विंचूरकरांच्या मध्यस्थीनें समेटाचें बोलणें करण्या करितां पेशव्यांच्या लष्करांत आपला पुतण्या पुरुषोत्तमराव दाजी यास ठेविलें होतें हें वाचक विसरले नसतील. २ चमत्कारिक. ३ समेट. ४ एकल्ली. ५ दादासाहेब व रावसाहेब पेशवे यांचें. ६ तुमची जहागीर वगैरे परत देण्या विषयींची खात्री.

हे[1] ही सोडतात असी अर्थ नाहीं. मातबर सरदार मिळाले आहेत. पुण्यामुळें योंचें व यवनाचें हाडवैर पडलें, तेव्हां सैलुख होणें कळलेंच आहे. तेव्हां दोघांतून एक जण बुडेल. जर मोंगल बुडाला तरी त्याजकडे तुम्हीं असून पुढें गत काय? हे बुडाले तरी मोंगलाकडे होऊन श्रीमंतांचे बहुता दिवसांचे तुम्हीं चाकर असल्याचें सार्थक ही केलेंसें होतें[4]! व मोंगलाई झाली ह्मणजे गत ही समजलीच आहे. तरी श्रीमंत कृपा करून निशा करीत असतां इकडे यावें हेंच उत्तम. यामध्यें लौकिक ही उत्तम आहे. जर आपले चित्तास उत्तम वाटलें तरी आम्हांस लिहून पाठवावें. आम्हीं श्रीमंतांशीं बोलून श्रीमंतांचें ही पत्र आपल्यास पाठवून देऊं. इतकें पर्यायें लिहिलें हें पुरतें मनन करून पहावें. उत्तम असेल तरी तसेंच ल्याहावें. वरकड ईश्वरें जें योजिलें असेल तें होईल. परंतु निमित्यास मात्र धणी होऊं नये. बहुत काय लिहिणें. आपल्याकडील खुलासा मजकूर असेल तो लिहावा, त्या सारखें बोलून नीट होईल. लोभ असों दीजे हे विनंती. सर्व मंडेळीस नमस्कार. विनंती. सर्व हीं शहाणे आहां. उत्तम सल्ला दिसेल तें करणें. हे विनंती.

नं० ३०७

[ अजमासें अधिक ज्येष्ठ वद्य
जूनचा प०पंधरवडा ]

श्रीगणपतिर्जयति.

आशीर्वाद[6] उपरी. तुम्हीं लिहिलें कीं, ' ज्येष्ठ.वद्य पक्षीं लग्न तिथी

---

१ पेशवे ही मोंगलाचें पारिपत्य करावयास सोडतात असा अर्थ नाहीं. २ पुणें जाळल्यामुळें नबाबाचें व पेशव्यांचें हाडवैर पडलें. ३ तह. ४ तुम्हीं श्रीमंतांचें पुष्कळ दिवस अन्न भक्षिलें असतां आतां मोंगलाकडे जाऊन पेशवाई बुडविलीत ह्मणजे सार्थक झालें! ५ सर्व पटवर्धन भाऊबंद मंडळीस. ६ पत्र गोविंद हरीचें गोपाळरावास.

निश्चय करून ठेवणें. पत्र येतांच येऊं' ह्मणोन लिहिलें, ऐशास ज्येष्ठ वद्य पक्षीं तिथीचा शोध पाहतां वद्य अष्टमी मंदवार एक व दशमी सोमवार एक, दोन मुहूर्त आहेत. यांत घडेल तो प्रमाण. तुम्हीं पूर्णिमा करून तेथून निघावें आणि यावें. इतके दिवस मंगळवेढ्याचा ऐवज आला तो पोटास झाला. कांहीं प्यादे यांस झाला. ज्येष्ठमास लागला, परिछिन्न खर्चास नाहीं. तुम्हीं बेखर्ची[1] तुम्हांस काय लिहावें! तथापि न लिहितां गत्यंतर नाहीं यास्तव लिहिलें आहे. बहुत काय लिहिणें हे आशीर्वाद. पूर्णिमा झालियावरी निघावया दिनशुद्धि नसेल तरी अगोदर निघावें. चिरंजीव राजश्री भास्करपंत यास आशीर्वाद. लिहिलें पाविजे. हे आशीर्वाद.

नं० ३०८L

( ज्येष्ठ शुद्ध पंचमी
१६ जन. )

श्री.

तीर्थरूप मातुश्री बाई वडिलांचे सेवेशीं.

अपत्यें माधवरायानें चरणावरी मस्तक ठेऊन साष्टांग नमस्कार विज्ञापना. येथील क्षेम तागायत छ० ७ जिल्हेज मुक्काम नजीक चिंतापुर[3] येथें सुखरूप असों. विशेष. वडिलांकडील पत्र बहुत दिवस येऊन वर्तमान कळत नाहीं. तरी सदैव पत्र पाठवावयास आज्ञा केली पाहिजे. इकडील वर्तमान तर पूर्वीं पत्र लिहिलें आहे. बसालतजंगाचा मजकूर तर गंगाधर यशवंत चंद्रचूड त्यास आणावयास पूर्वीं पाठविले आहेत. त्याचा जावसाल अद्यापि आला नाहीं. त्यांस ही जाऊन आज सात दिवस झाले. त्यांचें

१ निर्धन. २ हें पेशव्यांचें गोपिकाबाईस पत्र. ३ चितापुर हें स्थान मोगलाईंत पंचमहालांत आहे.

हीं पत्र लौकरच येईल. बसालतजंगाची आमची तफावत पन्नास कोसांची आहे. ते येत नाहींत, परंतु वर्तमान कळावें. प्रस्तुत आमचा मुक्काम येथें एक दोन दिवस आहे. पुढें बाबूजी नाईक व रामचंद्र गणेश आहेत त्यांस ही बोलाविलें आहे. ते ही सत्वरच येतील. पुढें कर्तव्याचा मजकूर तरी [ आम्हीं मोंगलाशीं ] सख्य तो करीतच नाहीं. पुढें युद्धाचा अगर छावणीचा प्रकार तर मोगल गंगेच्या[२] अलीकडे असला तर झुंजच होईल. शहरांस[३] गेला तर छावणीचा डौल पडेल. प्रस्तुत तर नाहीं. महिन्या पंधरा दिवसां विचार ठरेल तो खरा. मोंगल ही धारूरास आला ह्मणून वर्तमान आहे. राजश्री गोपाळराव गोविंद यांशीं ही गोविंद शिवरामाच्या मार्फतीनें राजकारण केलें आहे कीं, जो पाहिला सरंजाम[४] आहे तो करार करावा. इकडे येऊन आम्हांबराबर मोंगलाशीं झुजूं लागले ह्मणजे मिरज ही देऊं. या प्रमाणें त्यांस सांगितलें आहे. गोपाळरायाच्या तीर्थरूपांस ही पत्र गोविंदपंतीं[५] लिहिलें आहे, त्याचा ही काय आशय येतो तो पहावा. सेवेशीं श्रुत होय हे विज्ञापना.

पै॥ छ० १८ जिल्हेज.

नं० ३०९

( अजमासें ज्येष्ठ वद्य
जूनचा प० पंधरवडा. )

श्री.

आशीर्वाद[६] उपरी. तुम्हीं पत्रीं लिहिलें कीं, " यवनानें पुणें जाळिलें.

---

१ अघाडीस. २ गोदावरीच्या. ३ औरंगाबादेस. ४ पटवर्धन मोंगलास सोडून आम्हांकडे आले ह्मणजे त्यांजकडे पूर्वी सरंजामाचा जो मुलूख होता तोच त्यांजकडे कायम करावा. ५ गोविंद शिवराम यानीं. ६ हें गोविंद हरीचें गोविंद शिवराम खासगीवाले यास पत्र. गोविंद शिवराम हा पेशव्यांच्या लष्करांत असून त्यांचा

सत्यानाश केला. आतां त्याचें ( श्रीमंतांशीं ) हाडवैर पडलें. तेव्हां सलुख होणें कळतच आहे. उभयतांतून एकजण बुडेल तेव्हां कार्यास येईल. श्रीमंतांचा नाश झाला तरी तेथें तुमचें कल्याण कसें होईल ? " त्यास श्रीमंतांचा श्रीकृपेनें जय व्हावा, कल्याण व्हावें, हेंच अहोरात्र श्रीपाशीं इच्छितों. मागें झाल्या त्या गोष्टी काढूं नयेत, ' गतं न शोचामि ' हें खरें; तथापि स्मरण होतें. मोंगलाशीं श्रीमंतानीं बिघाड करावयाचा नव्हता. परंतु इतका नाश व्हावा, रामेश्वरापासून अटकेपर्यंत — ' मोंगल पुण्यास जाऊन [ पुणें ] जाळिलें ' हे कीर्ति त्याची व्हावी, ह्मणोन असें झालें ! आतां सलुख न करितां पुढें मनांतील मुद्दे हंशील कसे [ सिद्ध ] होतील ? सलुख होईल तेव्हां देश लागेल[1]. द्रव्य प्राप्त होईल. द्रव्यामुळें ( आबादानीची ) गांठी पडेल. नालबंदी द्यावयाचा पथ पडल्या मुळें जो इच्छावा तो सरदार तयार होतो. द्रव्य नाहीं तेव्हां सरदारी, —— कर्तेपणावरी आंगेजणी करावी, समशेर धरावी, मरतां मारतां मिळवून लोकांस द्यावें, एक दोन वर्षे असेंच करीत जावें, तेव्हां बंदे[2] बसतो. तो प्रकार[3] कळोन गेलाच[4] आहे. पूर्वी[5] दरसाल मोंगलाशीं सल्ला करीत. मागती कांहीं अंतर आलें ह्मणजे बिघाड होत असे. या प्रमाणेंच चालत आलें. आतां ही त्याणें श्रीमंतांचें घर राखोन आसमंतात् भागें राहणार त्यांचीं घरें भस्म केलीं. निंबाळकर[6] नाईक याची गति केली. परंतु आपण पुढील

---

व पटवर्धनांचा समेट करून देण्याच्या खटपटींत होता. '

१ देशाची लावणी होईल. ' लावणी ' संबंधें अंक १२ पृष्ठ ४५९ येथील टीप पहा. २ मर्दुमी. ३ शिस्त. ४ तसें होईल न होईल हें कळून चुकलेंच आहे. ५ नानासाहेब पेशव्यांच्या कारकीर्दीत. ६ निंबाळकर कोण ? पुणें शहर बाळाजी विश्वनाथ पेशवे यांच्या ताब्यांत येण्या पूर्वी रंभाजी निंबाळकर याजकडे मोंगलाकडून जहागीर होतें. तोच हा निंबाळकर कीं काय ? त्यानें मोंगला प्रमाणें कधीं पुण्यांत जाळपोळ केल्याचें ठाऊक नाहीं.

कर्तव्यावर दृष्टि देऊन तह करावा. बंद पहिला आहे त्या प्रमाणेंच चालेल. ओढ धरलियानें बिगर सल्हा चालणार नाहीं. उभय पक्षीं युक्त नव्हे. भलताच मोंगलाच्या तर्फेचा होऊन मुलूख मारील, लुटील, अगर श्रीमंतांकडील अगर भलताच एखादा येऊन लोक मिळवून मुलूख लुटूं लागेल, तेव्हां कैद तुटेल, बंद सुटेल. यास्तव सलुख कबूल करावा. बल्के दौलताबादेचा आग्रह असेल तरी सोडून द्यावा आणि सलुख करून पुन्हां बाजी मारून घ्यावी. दौलताबाद ज्याकडे असेल त्याचें कल्याण हेच रीतीचें ! नैबाबानें पाच्छाई किल्लेदार काढून आपलीशी केली त्याचा परिणाम कळलाच. त्या उपरी निजामअल्ली याणीं त्यांस मारून आपलीशी केली, तेव्हां निजामअल्लीची गति बाकेघोटीं कोणे रीतीची झाली ते कळलींच आहे. त्या पासून श्रीमंतांनीं घेतली. सहा महिने नाहीं गेले तों

---

१ तहाशिवाय. २ निदान. ' केवळ दौलताबादे साठींच जर श्रीमंतांचा व मोंगलाचा तह होण्यांत प्रत्यवाय येत असेल तर श्रीमंतानीं मोंगलास दौलताबाद देऊन ही तह करून घ्यावा. दौलताबाद अपेशी आहे. ती ज्याच्या ताब्यांत असेल त्याचें कल्याण व्हावयाचें नाहीं. या करितां श्रीमंतानीं ती मोंगलास देऊन टाकावी. ' असा गोविंद हरीच्या लिहिण्याचा अभिप्राय आहे. यावरून अद्यापि दौलताबाद पेशव्यांच्या ताब्यांत होती हें उघडच होतें. यास आणखी पुरावा पाहिजे तर अंक ४ पृष्ठ १५७ व अंक ९ पृष्ठ ३२५ व ३४५ येथें पहावा. ग्रांटडफ् लिहितो कीं, माधवराव पेशव्यांस ताब्यांत आणण्या करितां दादासाहेबानीं इ.स. १७६२ त मोंगलाजवळ कुमक मागितली होती ती त्यानें त्यांस दिल्याबद्दल त्यानीं त्यास एकावन लक्षांचा मुलूख देऊं मात्र केला पण दौलताबादे शिवाय त्यास कांहीं दिलें नाहीं. ही डफ्साहेबांची चूक आहे. त्यावेळीं दादासाहेबानीं मोंगलास दौलताबाद देखील दिली नाहीं. ३ सलाबतजंगानें. त्याचा वाईट परिणाम असा झाला कीं, निजामअल्लीनें त्यास कैदेंत ठेविलें व पुढें ठार ही मारविलें. ४ सलाबतजंगास नव्हे, तर त्यानें नेमिलेल्या दौलताबादेच्या किल्लेदारास. ( दौलताबाद शहानवाजखानाकडे होती हा उल्लेख अंक १ पृष्ठ १७ येथें आला आहे. ) त्याजकडून ती काढून सलाबतजंगानें फ्रेंचांचा दिवाण हैवतजंग यास दिली होतीसें दिसतें. या हैवतजंगास १७५८ च्या मे महिन्यांत निजामअल्लीनें विश्वास दाखवून आपल्या डेऱ्यांत बोलावून नेऊन ठार मारिलें. ५ उदगीरच्या लढाईंत.

श्रीमंत भाऊसाहेब बुडाले. वर्ष नाहीं भरलें तों श्रीमंत नानासाहेब कैलासवासी झाले. अलीकडे या थरास गोष्टी आली. यास्तव ते[1] देऊन सलुख करावा हे उत्तम गोष्टी. नच करणें सलुख तेव्हां [ राज्य ] राहील याचा भरंवसा नाहीं. स्वतः सावध असलें पाहिजे. आम्हांस या कार्यभागाविर्णे गरज नाहीं हें प्रमाणच, तथापि बहुत दिवस श्रीमंतांचें अन्न भक्षीत आलों, पुढें ही दुसरियाची आशा नाहीं, यास्तव श्रीमंतांचे शुभ चिंतक आहों. त्यांच्या कल्याणानें बहुतांचें कल्याण. यंदा गति काय ! नाहक पृथ्वी प्रळय जाहला !! तुम्हीं देशास याल तेव्हां कळेल. मोंगलानें पुणें जाळिलेंसें नाहीं. सर्व प्रांताची गति एक झाली. अद्याप तरी सावध व्हावें. जें कर्तव्य तें पोक्तपणें सभ्यांचे मतें करावें. राजश्री मल्हारजी होळकर भेटल्या उपरी त्यांच्या मतें ( श्रीमंत ) सल्ला करतील हा भरंवसा होता. परंतु त्याणीं सलुखाची चर्चाच न केली किंवा श्रीमंतांनीं त्यांचें न ऐकिलें हें न कळे. हे आशीर्वाद.

नं० ३१०

( अजमासें अधिक ज्येष्ठ वद्य
जूनचा दुसरा पंधरवडा )

श्री.

आशीर्वाद[2] उपरी. तुम्हीं लिहिलें कीं, " मिरजेच्या मुक्कामींहून पुरुषोत्तमरायाबरोबर कित्येक प्रकारें सांगोन पाठविलें परंतु तो काळच तसा होता. गोष्ट न घडली. आतां साल ही जाहलें. पुढें श्रीमंत उभयतांच्या[3] चित्ता पासून रायास[4] आणावें, पूर्ववत् प्रमाणेंच चालवावें,

१ ती [ दौलताबाद. ]. २ हें पत्र गोविंद हरींचें गोविंद शिवराम खासगीवाले यास आहे. ३ दादासाहेब व रावसाहेब पेशवे यांच्या. ४ गोपाळराव मोंगलाकडे गेला आहे त्यास.

[ असें आहे. ] ये विशीं कार्यभागी यां विशीं मनांत संशय असेल तर मातबर मकोरनामका सारिखे आहेत त्यांची निशा करून देऊं. ते तुमची निशा करतील. गोपाळरावाचा कारभार निकर्षी, एककल्ली, जिकडे झाले तिकडेच असावें, धणी धणी एक झाले, आपलें बनेना, यास्तव गेले. आतां धणी कृपा करून यावें असें म्हणतात. तुमच्या विचारास येईल तर त्यांस सांगोन ताळ्यावर आणावें. उत्तर समर्पक पाठवावें." ह्मणून कित्येक प्रकारें लिहिलें, ऐशास ये विशींचें उत्तर विस्तारें न लिहिलें तरी तुह्मीं दुटप्पी गोष्ट लिहिली [ तीच खरी असें होईल. ] 'बनेना' ह्मणून गेले ह्मणून लिहिलें, त्यास उभयतां श्रीमंतांत विकल्प आला. दोन बंडें झालीं त्या मध्यें एक पक्षीं चिरंजीव झाले. मागती श्रीमंत एक झाले ( तेव्हां ) चित्तांत भय आणून दोन मजली लांबले. धण्यानीं गौरसीचें पत्र पाठवून समजावून न्यावें, दहा हजार फौजेनिशीं चाकरी घ्यावी, मनांत राग होता तरी साहेबीं कामावर घालावें, तें न करितां पत्र पाठविलें जे, 'बखेडा करून पळून गेले. त्यांजकडे पागा, गड, कोट, किल्ले, हत्ती, हिशेबकितेब, येणें त्यास ज्यास देववूं त्यास द्यावें. शिवाय मर्जी वर्तल्यास कार्यास येणार नाहीं.' ह्मणोन पत्र लिहिलें! तथापि आम्हीं उत्तर पाठविलें त्यांत काय काय लिहिलें तें पत्र तरी वाचून पाहावें होतें! त्यांत गैर काय लिहिलें? 'महाराजानीं कृपा करून सेवा घ्यावी, निदान

१ सखारामबापू विषयीं. २ मल्हारराव होळकरा सारखे. ३ आग्रही. ४ दादासाहेबांच्या दंग्यास गोविंद हरि 'बंड' ह्मणतो हें ठीकच, पण तो दंगा मोडण्यासाठीं राज्याचे मालक माधवराव पेशवे यानीं युद्धाची तयारी केली त्यास ही गोविंद हरि 'बंड' ह्मणतो हें काय! ५ गोपाळराव. ६ गौरवाचें. ७ जोखमीच्या व श्रमाच्या सरकारी कामावर. ८ दादासाहेबानीं. येथ पासून पुढें लिहिलेला मजकूर गोविंद शिवराम याणीं दादासाहेबांस वाचून दाखवावा किंवा त्यानीं तो स्वतः वाचावा ह्मणून गोविंद हरीनें लिहिलेला आहे.

[ राज्या ] बाहेर घालविणें असलें तरी कर्जाची वाट करावी, ' ह्मणून बहुत प्रकारें लिहिलें; तरी ध्यानास न आलें! आमचें प्राक्तनच फिरलें! धण्यास बोल कोण लावावे? तत्रापि श्रीमंत मिरजेस आले तेव्हां चिरंजीव फौजेसमेत कृष्णातीरीं व आम्हीं सहकुटुंब मिरजेंत ( असतां ) चिरंजीवानें एक पत्र फारच करुणा दाखवून लिहिलें, तेव्हां आज्ञा झाली जे, ' तुम्हीं कृष्णातीरीं रहावें. रामचंद्र गणेश यास आज्ञा करितों, तें पत्र पाठवितील. ' तें पत्र येतें ह्मणोन मार्ग पाहतात तों त्यांजवर फौज रवाना झाली! आम्हांकडे मध्यस्तीस गृहस्त पाठविले, त्यास आम्हांस रुबरू बलावून नेऊन आमच्या दोन गोष्टी विनंतीच्या, ऐकाव्या तें न केलें! चिरंजीवावर छापा घातला तेच दिवशीं मोर्चेबंदी झाली. जन्मवरी अन्न भक्षिलें, काय करावें, कोणाकडे जावें, जिव कसा वांचेल ह्मणून चिंता करीत होते तों घाला पडला! सर्वस्वापहार जाहला. एक धोतर नेसावयास. मनुष्य देखील समागमें नाहीं. प्राणाशीं संकट. एकनिष्ट सेवा केली तेंच पुण्य, तेणें करून पार होऊन पांच सात राऊतांनिशीं रामदुर्गास गेले. कोणाच्या आश्रयास राहून भयास टाकून स्वामिकार्य करून घ्यावें? कोणत्या चाकरीस अंतर पडलें हें ध्यानांत आणावें. केवळ अतिशयावरी येऊन सेवकाचे अवरूस खत्ता करावयाचा प्रकार न करावा. हा ही नाश झाला तरी ते ही कीर्ति महाराजांची आहे. सेवकानें न्यून पूर्ण लिहिलें ह्मणून विषाद न मानावा. स्वामीच्या चरणा वेगळा दुसरा अवलंब पूर्वीं पासून नाहीं. हा ही महाराजांनीं शोध घ्यावा. संग्रह कांहीं आहे नाहीं हें ही मनास आणावें. निमकहरामी केली नाहीं. दिग्मंडळीं उत्तम कीर्ति महाराजांची व सेवकाची होय तें करावें. यावरी महाराज सर्व जाण आणि समर्थ आहेत. एक स्वामी कीं एक भगवान! तिसरें जाणत ना

१ समक्ष. २ आग्रहावर. ३ हानि.

हीं. कृपा करावी. कोटि अपराध परंतु स्वामीचे एकनिष्ठ सेवक आहों. सेवे शीं श्रुत होय कृपा केली पाहिजे हे विज्ञापना.

## नं० ३११

" युद्धीं घातल्यानें ( ! ) जीव वांचेल असे मनसबा करितां कोठें आश्रय दिसेना. यवनाकडे जावें, तूर्त जीव वांचवावे, ह्मणोन मनसबा करून गेले. स्वामीचे नांवावरी त्याणें अभय वचन दिलें. त्या पाशीं राहिले. परंतु स्वामीचें अनिष्ट करावें हा अर्थ नाहीं. कर्ज स्वामींनीं वारावें, मिरज घ्यावी; ये विशीं नबाबानीं स्वामीस लिहिलें, परंतु आमचा काळ विपरीत — ते गोष्ट घडोन न आली. नबाबाचें येणें ( आमच्या ) मदतीस ही न जाहलें. तेव्हां त्या पाशीं सामान ही नव्हतें. राजश्री गमाजी बावा नबाबाकडे गेले. त्याणीं जाऊन भोंसले आणिले. तों श्रीमंतांनीं मिरज घेतली. पुढें नबाबानीं आपला भारीपणा जाणोन बिघाडाचा प्रकार केला तेव्हां श्रीमंतांनीं बुनगें लाऊन देऊन चार कोस पुढें होते तरी सलाबत[2] भारी बसती. ते[3] देशांत जावयाचीं या मध्यें लढाईची ही ली तरी कोणत्या कार्यावरी पडणार ! गनिमी कावा करून शत्रू हारीस आणावा, तें न करितां या दिवशीं झुजावयाची मसलत कार्यावरी पडणार नाहीं. घोडियांत तकवा राहिला नाहीं. यास्तव आपण[4] विनंती करून या समयीं लढाईचा प्रकार न करावा. अद्यापि लोक सरदार शिलकी आज्ञे प्रमाणें उभे राहतील. परंतु शिपाई यांचा विश्वास न धरावा. हें ही

---

१ हें ही पत्र गोविंद हरीचें गोविंद शिवराम यास. आंतील मजकूर दादा साहेबांच्या कानावर जावा या रोंखाचा लिहिलेला आहे. पत्राचा मधलाच एक बंद मिळाला. २ दरारा. ३ येथील अक्षरें फाटलेलीं असल्यामुळें संदर्भ नीट लागत नाहीं. ४ हें गोविंद शिवरामास उद्देशून लिहिणें. ५ फार दिवसांचें.

सेवकास सुचलें तें लिहिलें आहे. आपण चित्तास आलिया श्रुत करावें. नव्हे तरी राहों द्यावें. चिरंजीवाच्या येण्याची गोष्टी -- धण्याच्या आज्ञे बाहेर नाहीं. सा महिने सबुरी केली तैशी मास दोन मास क्षमा करावी. चिरंजीव ( नबाबाची ) आज्ञा घेऊन घरास--"

नं० ३१२

( ज्येष्ठ शुद्ध एकादशी
२१ जून. )

श्रीगणराज.

राजश्री याविराजीत राजमान्य राजश्री दादा स्वामीचे सेवेशीं.

पोष्य गोपाळ महादेव कोलटकर कृतानेक साष्टांग नमस्कार विनंती येथील कुशल तागायत छ० ९ जिल्हेज मुक्काम कसबे कलबुर्गें स्वामीचे कृपाकटाक्षें करून वर्तमान यथास्थित असे. विशेष. आपणाकडून बहुत दिवस पत्र येऊन वर्तमान कळत नाहीं तरी सदैव पत्रीं परामर्ष करीत जावा हें उचित आहे. इकडील[१] वर्तमान तरी सर्व परस्परें आपणांस विदित होतच आहे. मुख्य गोष्ट जो मनसबा होतो तितका ठीकच होत आहे. पुढें मनसबा अविंधाशीं[२] लढाई करावयाचा आहे. फौजेचा प्रकार म्हणावा तरी सारी फौज एकदिल आहे. व साळी भागनगर प्रांतींच्या खाऊन घोडें माणूस ताजें आहे. ईश्वर इच्छेनें घडेल तें खरें. स्वामींच्या[३] दर्शनाचा योग बहुत दिवसांत झाला नाहीं तेणें करून चित्त उदास आहे. बरें. ईश्वरकृपेनें भेटी ही सत्वरच होईल. सर्व चित्तानुरूप गोष्टी घडून येतील. वरकड वियोगाचा प्रकार तर कालानुरूप होतच आहे.

---

१ हा कोण हें ठाऊक नाहीं. यानें हें पेशव्यांच्या लष्करांतून पत्र लिहिलें आहे. २ मोंगलाशीं. ३ तुमचा ( गोपाळरावाचा. )

चारी दिवस सारखेच आहेत असा प्रकार नाहीं. मुख्य गोष्ट जनीं जनार्दन आहे. तोच अर्थ ईश्वर घडवितो. वरकड सर्व भेटीनंतर कळोन येईल. बहुत काय लिहिणें कृपा लोभाची वृद्धि होत जावी हे विनंती.

अपत्यें धोंडो[1] केशव यानें दोन्ही कर जोडून सांष्टांग नमस्कार विनंती. इकडील सर्व मजकूर राजश्री भिकाजी नाइकानीं लिहिला आहे त्यावरून विदित होईल. मुख्य गोष्ट• दादा! आपल्या चरणाचा वियोग झाला तेणें करून आम्हांस येथें कोणीच नाहीं ऐसें भासतें. काळाचे दिवस मात्र घालवितों. ईश्वर दर्शनाचा लाभ घडवील तो सुदिन असे. आम्हीं तो आपल्या खरीज केवळ परदेशी जाहलों. ईश्वर श्रम कधीं परिहार करील ते करो! हे विज्ञापना.

नं० ३१३L

(ज्येष्ठ शुद्ध द्वादशी
२२ जून.)

श्री.

तीर्थरूप मातुश्री बाई वडिलांचे सेवेशीं.

अपत्यें माधवरायानें चरणावर मस्तक ठेऊन शिर साष्टांग नमस्कार विज्ञापना येथील क्षेम तागायत छ० १० जिल्हेज मुक्काम कलबुर्गे येथें वडिलांचे आशीर्वादें करून सुखरूप असों. विशेष. ऐवजाचे तरतुदी विषयीं राजश्री नारो आपाजी यांस अलाहिदा पत्र पाठविलें आहे त्या प्रमाणें ते तरतूद करितील. आपण ही त्यांस आज्ञा करावी. वरकड

---

१ धोंडो केशव नेने हा पटवर्धनांचा कारकून पुढें पुष्कळ वर्षें रहिमतपुरास कमाविसदार होता. २ भिकाजी नाईक कोण? पत्र तर गोपाळ महादेव कोलटकर याणें लिहिलेलें आहे. ३ हें पेशव्यांचें गोपिकाबाईस पत्र.

मोंगल धारूरानजीक आले आहेत. त्यांजकडील मराठ्यांची फौज फार[1] करून गेली. खासा मोंगल व भोंसल्याची फौज अद्याप गेली नाहीं. कुचाचा ( ? ) प्रकार ह्मटला तरी नव्हे. त्यांजकडे गेले त्यांचाच संदर्भ[2] लागला आहे. बहुत करून सिद्धीस ही जाईलसें आहे. बसालतजंग यांची भेट जाहली. त्या ठिकाणाहून ( ते ) कूच करून[3] गेले होते. गंगोबा[4] गेल्यानंतर ते मागतीं आठ नऊ कोस माघारे आले, ह्मणोन वर्तमान आलें. बहुत करून येतीलसेंच आहे. व गंगोबा ही अद्याप आले नाहींत. बसालतजंग यादगिरीस आले ह्मणून वर्तमान उडतें आलें आहे. मागाहून सविस्तर लिहून पाठवूं. सारांश बसालतजंग आले तर उत्तमच झालें. न आले तरी आमच्या फौजा रामचंद्र गणेश व बाबूजी नाईक समीप आलेच आहेत. येथें येऊन दाखल जाहलियावर मोंगलावर लढाईस जाऊं. ते ही दो चौ रोजांत येतील. वडिलांस कळावें ह्मणून लिहिलें आहे. सेवेशीं श्रुत होय हे विज्ञापना.

पै॥ छ० १७ जिल्हेज.

नं० ३१४

( ११ जुलई. )

श्रीगणपतिर्जयति.

आशीर्वाद[5] उपरी. येथील कुशल तागायत आषाढ शुद्ध प्रतिपदा सोमवार. यथास्थित असे. विशेष. तुम्हीं गुरुवारचें पत्र पाठविलें तें काली रविवारीं सव्वादोन प्रहर दिवसास पावलें. नारायणभट आले त्यां जवळी अनुष्ठा-

---

१ प्रतिनिधि, पटवर्धन, धायगुडे, निंबाळकर, रायाजी पंवार इत्यादिकांची वहुतेक फौज घरोघर निघून गेली. २ नबाबाकडे गेलेल्या मराठे सरदारांचें समेटाचें राजकारण आह्मांकडे लागलें आहे. ३ चितापुर येथून. ४ गंगोबा तात्या उर्फ गंगाधर यशवंत हे होळकराचे दिवाण. ५ पत्र गोविंद हरीचें गोपाळरावास.

नाची पोथी पाहिली. अनुष्ठानसिद्धतेचा मजकूर लिहिला तो कळला. उत्तम केलें. अनुष्ठान करवावें. तेणें करून श्रेयस्करच आहे. फलदाता ईश्वर आहे. मुख्य ज्या स्थलीं अनुष्ठान करविलें तेथें साहित्यकर्त्ते अनुकूल, आचार्य सावध, व उपाध्या प्रतिकूळ नसावा; ह्मणजे सिद्धीस जाईल. थोड्याच दिवसांचें करवावें. खर्च भारी पडेल. यंदाचा प्रकार कळलाच आहे. दुसरें पत्र बाळाजी नरसिंह याज बरोबर शुक्रवार अडीच प्रहरचे रवानगीचें पाठविलें त्यावरून कळलें. बाळाजीपंतीं सांगितलें कीं शुक्रवारीं पाऊस पडला या करितां तेथेंच कोठे राहिलों. रविवारीं प्रातःकाळीं नगारा कुचाचा जाहला तेव्हां निघालों ते पोफली पांडवांची येथें राहिलों होतों, ह्मणून सांगितलें. तो ही काली रविवारीं तृतीय प्रहरीं येऊन दाखल झाला. दोन नद्यांस पाणी यामुळें मार्गीं गुंता झाला. नाहीं तर दोन प्रहरां येता. चिरंजीव मेवश्यामरायाचें पत्र व महादाजीपंतास तुम्हीं पत्र लिहिलें तें व आम्हीं आपलें पत्र देऊन आजी प्रातःकाळींच माणूस रवाना केलें. कापड तेथें कांहीं आंख नाहींत. खासगत सनगें आहेत, तीं जागां जागां त्यानीं पळविलीं आहेत. एक नगारखाना किंवा राहुट्या कनाता इतका मात्र आहे. त्यांस लिहिलें कीं तुम्हीं कार्याकारण आंखाच्या सुमारें कापड विकत घेऊन तीन रुपयांचें मुद्दल सनंग त्याजवरी पंधराचा आंख घालून घेतील त्यांस देणें. न घेत त्यांस न देणें. तीन रुपयांच्या सनगावरी दहाचा आंख पडतो. दोन सवाया घालून अगर एक सवई घातली तरीं साडे सातांचा तों पंधरांचा. या प्रमाणें लिहून पाठविलें. हर कोणाचे रुपये उसने कर्ज घेऊन देणें. चोविसशें चोपन रुपयांस दर तीन आणे वट्टा वजा करून अर्काट, गंजीकोट, परकी स्थलींच्यांस देणें.. त्या प्रांतीच्यांस हुकेरी देणें. नाइकत तरी पावला पांच आणे वट्टा पडत असें करून देणें. पाहिजे तरीं घेतील. तुम्हीं कागदीं

मकारनामकास लिहून देणें ह्मणोन संज्ञा लिहिली आणि फलाण्याच्या ऐवजीं ह्मणोन नांव कसें लिहिलें ? ये विशीं नारायणराव लिहितां चुकले. तें नांव अगदींच आम्हीं खोडून टाकलें. हर कोणाचे फेरमोबदला उसने घेऊन देणें, व्याजें घेऊन देणें, ह्मणोन लिहिलें आहे. जाधवाचे तीनशें अगोदरच हुकेरी त्याच्या समाधानेंच देविले आहेत. घेतील. आजी ही लिहिलें आहे. दोन पत्रांच्या[1] नकला व अमृतवचनी[2] आला तें वर्तमान कळलें. या पत्रांवरून ते केवळ मुर्ख असें वाटलें ! सैफेजंगी[3] करून आपण ऐकट्यानें[4] मरावें [ असें त्यांच्या ] प्रारब्धींच असल्या उपाय नाहीं ! होणार भावी काय तें आठ दिवसांत निवेडेल[5], त्यांत गृहस्थ गेला त्याणें सांगितल्यावरी देहावरी आले तर उत्तम. नाहीं तर परिणाम शुद्ध नाहीं. आम्हीं चिंता करून काय होणें ! तुम्हीं आपला मजकूर लिहिला तेणें करून समाधान जालें. उत्तम गोष्ट. त्यांशीं या प्रसंगीं षरीक[6] होऊन चाकरी करावी. पेस्तर ते[7] आज्ञा देतील तेव्हां यावें. आमचा आग्रह स्थलाचा [ तें त्यांस ] अनुकूल असलें तरी देतील. नेदीत[8] तरी त्यांजवरी शब्द काय ? आमचा ऋणानबंध ! वरकड जागिरीचा मजकूर —— त्यांची फत्ते झालियावरी देऊत. जेव्हां देतील तेव्हां घ्यावयास उशीर नाहीं. सबुरीनें सर्व ही होईल. आपण होऊन त्वरा न करावी. त्यांच्याच संतोषें मर्जी माफक वर्तावें. लागलेंच स्थल त्याणीं द्यावें, परंतु आमचा प्रतिकूल काल या मुळें अंतर झालें[9]. आमचा रखणवाला श्रीपंढरीचा नाथ समर्थ आहे. त्याणें अभिमान धरिला असतां फिकीर वागवीत नाहीं. पर्जन्य फार, ( तुमच्या लष्करच्या ) घोडियांस वैरण नाहीं,

---

१ श्रीमंतांकडून तुम्हाकडे आलेल्या पत्रांच्या. २ गोडबोले. ( पांडुरंगपंत. ) ३ पराक्रम. ४ एकव्या दादा साहेबानीं. ५ निकाला लागेल. ६ सोबती. ७ नबाब निजामअली. ८ न देईत. ९ चुकलें.

ह्मणोन ऐकिलें; पण त्याच्या लष्करचे हाल ऐकवत नाहींत! काय गति होईल न कळे. सोबती आणिला तो पाषाण गळां बांधून पाण्यांत उडी टाकावी या प्रकारचा. तारक नव्हे. श्री इच्छा प्रमाण! या उपरी दोन दिवसां एक पत्र या प्रमाणें रवाना करणें. ये विशीं आळस न करणें. दुर्गासें ही षडिलांस लिहीत जाणें. कुरुंदवाडचे लाखोटे चिरंजीव भास्करपंताकडील व नीलकंठरायाचे रवाना केले. कळलें पाहिजे. बहुत काय लिहिणें. हे आशीर्वाद.

नं० ३१९

[ १९ जुलई. ]

श्रीगणपतिर्जयति.

आशीर्वाद उपरी. येथील कुशल तागायत आषाढ शु० ९ भृगुवार यथास्थित असे. विशेष. तुम्हीं शु० १ सोमवासर छ० २९ तेरखेचें पत्र पाठविलें तें काली गुरुवारीं अस्तमानीं प्रविष्ट जालें. अनुष्ठानाचा मजकूर लिहिला तो कळला. तो ही एक प्रयत्न. दैवी मानवी उपाय करून पहावें; होणें जाणें श्रीसत्ता! श्रीमंत सफेजंगी करणार होते त्यांचें व कार्यभागी यांचें व सरदारांचें रहस्य प्रकरण लिहिलें तें कळलें. प्राक्तनें करून चालतें. एरव्हीं त्यांचे बुद्धींत कांहीं नाहीं. तसे ही यजमान कार्यभागी यांचे उपयोगी! ऋणानुबंधास उपाय नाहीं. सारा प्रांत वि-

---

१ पेशव्यांच्या. २ बसालतजंग. ३ नळदुर्गास. ४ पत्र गोविंद हरीचें गोपाळरावास. ५ श्रीमंत दादासाहेब व त्यांचे कारभारी व सरदार यांचें हें ‘ रहस्य प्रकरण ’ मागें नं० २८४ चे पत्रांत गोपाळरावानें लिहून पाठविलें आहे तें तर नव्हे-ना! त्यांत दादासाहेबांचा ‘ सफेजंगी ’ करण्याचा निश्चय सांगितलेला आहे खरा! पण तसें असेल तर त्या पत्रावर मिती घालण्यांत आमचे हातून दोन महिन्यांची चूक झाली असें होत आहे! ६ सखारामबापूचे.

ध्वंस केला. कोठे ही बाकी नाहीं. जाते तरी बरें होतें. नाहीं तर दुकाळ पडावयाचा प्रकार ! श्रीमंत निघोन जाणार ह्मणून ऐकिलें, तेव्हां गेलेच असतील. पुढें नबाब साहेब बेदरास जातील किंवा शहराकडे जातील न कळे. रहावयास कुटुंबास स्थल मिळतें तरी बरें होतें. त्यांजकडे शब्द ठेवावयास जागा नाहीं. ( त्यानीं ) कोठून द्यावें ! चारी स्थलें चौ जागां गुंतलीं. बरें. ऋणानुबंध म्हणावा ! एव्हां नाहीं, पुढें देतील. तुम्हीं आज्ञा त्यांची मर्जी रक्षून घेणें. दुर्गीं सारीं माणसें आहेत तीं एखादे सुस्थलीं ठेवावीं ( असा हेतु आहे. ) श्रीमंतांचा शह वारल्यावरी अक्कलकोटीं ठेवल्यास कार्यास येईल. अगर येथें आणिल्यास कार्यास येईल. कुरुंद-वाडाकडे पर्जन्य नाहीं. तुम्हीं लिहिलें कीं फावलें तर येते समयीं वडिलां-चीं भेट घेऊं. ऐशास मार्गच तो. भेट घ्यावया गुंता नाहीं. हत्ती कर-माळ्यास ठेविले त्यांची चंदी, मन माने ऐशी खरीदी, पण पैसा कोठें दृष्टीस पडेना ! रोजिना चार हत्तींस पंचवीस रुपये खर्च. करकंबेस आणावे तरी श्रीमंत कोण्या मार्गें जातील न कळे. या कारितां तेथेंच बहिरोपंतीं पाठविले. आम्हांस काली पत्र आलें त्यांस लिहिलें कीं, कर-कंबेस येणें. पहावें येतात कीं नाहीं ते. सर्व गोष्टींची गोष्ट जे, श्रीमंतांचे लष्करची पीडा एकीकडे गेली ह्मणजे विश्व सुखी होईल ! चिरंजीव मेघश्यामरायाकडे पत्रें रवाना केलीं. आजच माणूस गेला. 'आषाढ श्रावण मास दोन माहिने हर कसें करून स्थलें जतन करणें. पुढें ठेवा-वीशीं झालीं तरी ठेऊं. नाहीं तरी ज्यांचीं त्यांस देऊं. नाहक ठेऊन खर्चा खालीं यावें यांत जीव नाहीं.' असें लिहिलें. विश्वंभट दीक्षिताचें पत्र

१ औरंगाबादेकडे. २ नबाबाकडे. ३ घरीं निघून येण्यास आज्ञा. ४ नळ दुर्गास. ५ हत्तींच्या बरदास्तीवर ठेविलेल्या कारकुनाकडून. ६ कर्नाटकांतील आमच्या जहागिरीचीं स्थळे लक्ष्मेश्वर, बंकापुर, शिरहट्टी वगैरे. ७ पेशव्यांस.

आलें होतें. शिउभट म्हैसकर रवाना केले, समीप होते; येऊन गेले अ-सतील. लष्करचे[1] हाल फार. धान्य महाग. वैरण नाहीं. पाऊस अति-शय. लोक फार श्रमी होतात. बरें झालें जे श्रीमंत चालिले. तुम्हीं आपलेकडील वर्तमान लिहितां याच प्रकारें आव. चौं दिवशीं पत्र पा-ठवीत जाणें. बहुत काय लिहिणें हे आशीर्वाद.

समस्त चिरंजीव मंडळीस आशीर्वाद. लिखितार्थ परिसिजे. हे आशीर्वाद.

अपत्यें पुरुषोत्तमानें शिरसाष्टांग नमस्कार. वडिलीं पत्र पाठविलें तें पावलें. वडिलांचे पत्रावरून सविस्तर कळलें. चिरंजीवास[2] ही कुरुंद-वाडास लिहिलें आहे जे, '[3] हर कसें करून चार दिवस [ ठाणीं ] रहात असें करणें.' या प्रमाणें लिहिलें आहे. कळलें पाहिजे. बहुत काय लिहिणें. लोभ करणें हे विज्ञापना.

## नं० ३१६

श्रीगणपतिर्जयति.

आशीर्वाद उपरी. येथील कुशल तागायत आषाढ शु० ६ मंदवासर यथास्थित असे. विशेष. काली पत्र रवाना केल्या उपरी लक्ष्मेश्वराहून पत्रें आलीं त्यांत मजकूर — मीरफैजुल्ला हैदर नाईकाकडील पुढें[4] आला होता. त्याणें ठाणीं सावनूरचीं दोन चार घेतलीं. त्यां पैकीं एकांत राहिला होता. सावनूरचे लोक ( त्या ठाण्या समीप ) गेले, प्रत्यह गांवावरी जाऊन मारगीर करूं लागले, त्याणें आंतून शुजावें आणि केवळ गरिवी

---

१ हें वर्णन पेशवे व मोंगल या दोघांच्याही लष्करास लागू. २ धाकटा बंधु मेघश्यामराव यास. ३ पत्र गोविंदहरीचें गोपाळरावास. ४ सावनूरच्या नबाबाच्या मुलखावर चालून आला होता.

धरावी. ' बाहेर न निघें ' ऐसें दाखवून दुसरी फौज[1] आणविली. ती न कळत डोंगराच्या आड अस्तमानीं उतरविली. सावनूरवाले यांस कांहीं ( हें ) ठाऊक नाहीं. आणि प्रत्यह प्रमाणें हे चालोन गेले. तोफांची मारागिरी करूं लागले. तेव्हां तो आंतून बाहेर आपले फौजेनिशीं निघाला. तों मदतीची फौज तयार होऊन आली. मध्यें हे ! दोन्हींकडून तोफांचा बाणांचा मार दिला. फार खराबी सावनूरवालियांची झाली. पांच सातशांनिशीं सांभाळून[2] निघोन सावनुरास दाखल झाला. " ह्मणोन लिहिलें आहे. अगोदर हरीपंत[3] व भास्करराऊ नरगुंदकर व शिंदे[4] हे पांच सातशें प्यादे व स्वार तितकेच, इतकेनिशीं सामील झाले होते. ते ही युद्ध प्रसंगीं होते. त्यांची काय गति झाली न[5] कळे. सावनुरांत आलिया उपरी त्यांणीं[6] च दरवाजे बंद केले. आंतील माणूस बाहेर जाऊं देत नाहीं असा मजकूर केला. खासा हैदरनाईक ही मागून येत आहे. सावनूर परिच्छिन्न घ्यावेंसा त्याचा मजकूर[7] आहे. लक्ष्मेश्वराहून कागद परभारेंच आले त्यांच्या नकला पाठविल्या आहेत. बंकापुर आदी करून स्थलें राहत नाहींत. दक्षिण प्रांतींचीं ठाणीं मामलेदार तमाम बुडालेसे झाले. चौंकडून[8] कार्यभागी यानीं श्रीमंतांच्या कल्याणाचा प्रकार केला ! हैदर-

---

१ तुंगभद्रेअलीकडे हैदरअली राहिला होता त्याजकडून मीरफैजुल्लानें कुमकेस फौज आणविली. या लढाईचें वर्णन कर्नल विल्क यानें आपल्या म्हैसूरच्या इतिहासांत केलें आहे तें वाचकानीं पहावें. त्यांत व प्रस्तुत पत्रांतील हकिगतींत त्यांस पुष्कळच तफावत दिसून येईल. २ अशा रीतीनें सावनूरकर नवाब ' सांभाळून ' आला ह्मणजे जीव सांभाळून पळून आला ! ३ हरीराम उर्फ हरिपंत पोंभुर्लेकर हा इचलकर्जीकरांचा कारभारी. याजकडे कर्नाटकांत मुळगुंद तालुक्याची मामलत होती. ४ नीलकंठराव शिंदे मनोळीकर. ५ या तिघांस ही या लढाईंत कांहीं अपाय झाला नाहीं. ते सावनूरकरा प्रमाणेंच ' सांभाळून ' आले ! ६ सावनूरच्या नवाबानें. ७ मनोदय. ८ सखारामबापूनें.

अली फौज न गेली ह्मणोन बेळावला. आतां कोठपर्यंत येतो न कळे! श्री सत्ता प्रमाण! जहालें वर्तमान कळावें. प्रस्तुत तुम्हीं कोठें आहां? 'श्रीमंत दोन मजली अलीकडे आले' ह्मणतात. 'बुनगें किरकोळ किरकोळ चौकडून चालिलें' ह्मणतात. कोणत्या मार्गे जातात न कळे! प्रांताचें विघ्न श्रीकृपेनें चालिलें![3] पुढें कोणकोणाचा भोग आहे न कळे! नवाब बेदरास जातात किंवा शहरास जातात न कळे. तुह्मीं आज्ञा घेऊन निघाल तेव्हां खबरदारीनें मार्गाचे येणें. समागमें फौज नाहीं. थोडे आहांत. ते दुष्ट बाजूस आहेत. यास्तव सूचना लिहिली आहे. हा चांडाळ कोठ पावेतों येतो न कळे! पर्जन्यकाळीं निर्भय जाणून त्याणें चाल कली. मोठी दहशत पडली. सावनूर घेतलें ह्मणजे बाकी कृष्णे पावेतों रहात नाहीं. पुढें मिरज मात्र आहे. तेथील बंदोबस्ती श्रीमंतांची बरीच असेल. चार महिने पर्जन्यकाल मिरजे पावेतों येत नाहीं. पलीकडे प्रांत थोडा नाहीं! पुष्कळ पैका मिळवील. दिग्विजयास निघाला आहे! बहुत काय लिहिणें हे. आशीर्वाद.

---

१ 'दर वर्षी मराठ्यांची फौज कर्नाटकांत स्वारीस जात असे त्यामुळें तिकडील पुंड पाळेगार डोकें वर काढीत नसत. थंदा तशी दर वर्षा प्रमाणें फौज पाठविण्याची सखारामबापूनें तरतूद केली नाहीं ह्मणून हैदरअलीस हा दंगा करण्याची संधि सांपडली.' असा अभिप्राय. २ ह्मणंजे अर्थात् मोंगलाचें लष्कर. ३ प्रांत सोडून दूर जाऊं लागलें. ४ पेशव्यांचे सरदार बाबूजी नाईक वगैरे. ५ हैदरअली. ६ पावसाळ्यांत कांहीं पेशव्यांची फौज आपणावर येत नाहीं हें समजून निर्भय झालेला.

नं० ११७

[ अजमासें आषाढ शुद्ध
जुलईचा प० पंधरवडा ]

श्रीगणपतिर्जयति.

आशीर्वाद उपरी. मोठें संकट हेंच कीं, युद्धाचा प्रसंग, निरोप मागतां नये. राहिल्यानें किती दिवस लागतील न कळे. खर्चास पैसा नाहीं. सोबती ही राहणार नाहींत. जातीनिशीं, राहिल्यानें लौकिक नाहीं. ते गर्भश्रीमंत. कार्यभागी मतलबी. त्यांस परदुःख ठाऊक नाहीं. परंतु 'हे गृहस्थ आठ महिने सोबतीस खराब होतात. पैसा सरकारांतून न दिल्हा. यांजपाशीं आहे नाहीं कळतच आहे. कर्जदार यांची गति कैसी होईल न कळे, ( हें त्यांच्या ) ध्यानांत नाहीं. यास्तव युक्तीनें ह्मणावें कीं, आम्हीं युद्धप्रसंगास रहावें तरी ( आम्हां जवळ ) फौज नाहीं. जातीनें राहिल्या काम होणें नाहीं. बेखर्च आहों. निरोप देणें. पुढें जेव्हां आज्ञा कराल तेव्हां सेवेशीं हजीर आहों. ह्मणून पुसावें. खंदारकर राजे प्रस्तुत कोठें आहेत? ते तुमचे स्नेही. त्यांस सांगावें. ते जाऊन रदबदली कार्यभागी व मुख्यांजवळी करून निरोप देवितील. निरोप घेऊन यावें. जरी खर्चास दिलें तरी लोकांस देऊन चार दिवस सोबत देऊन मग यावें. किरकोळ मंडळी सारी लाऊन द्यावी. सर्वांच्या युक्तीस येईल तें करणें हे आशीर्वाद.

---

१ पत्र गोविंद हरीचें गोपाळरावास. २ मोंगल व पेशवे यांमध्यें लढाई होण्याची वेळ. ३ नबाब निजामअल्ली. ४ दिवाण विठ्ठल सुंदर. ५ अर्थात् गोपाळराव. ६ नुसते स्वतः ७ निर्धन. ८ खंदार शहर व किल्ला मोंगलाईंत नांदेडच्या नैऋत्येस २५ मैलांवर आहे. तेथील राजे गोपाळसिंग. ९ दिवाण विठ्ठल सुंदर व मुख्य निजाम अल्ली यां पाशीं. १० त्याच्या लष्करांत राहून.

## श. १६८५ मोंगल व पेशवे यांमध्यें युद्ध होण्याचा रंग इ.स. १७६३
## रुसलेल्या सरदारांची समजूत

नं० ३१८L

( आषाढ शुद्ध षष्ठी
१६ जुलई. )

श्री.

तीर्थरूप मातुश्री बाई वडिलांचे सेवेशीं.

अपत्यें माधवरायानें चरणावरी मस्तक ठेऊन साष्टांग नमस्कार विज्ञापना. येथील क्षेम तागायत छ० ४ मोहरम मुक्काम नजीक नेलदुर्ग येथें वडिलांचे आशीर्वादें करून सुखरूप असों. विशेष. वडिलांकडील आशीर्वाद पत्र येऊन वर्तमान कळत नाहीं. तरी सदैव पत्र पाठवावयासीं आज्ञा केली पाहिजे. इकडील वर्तमान पूर्वी सेवेशीं लिहून पाठविलेंच आहे. भोंसल्यांकडील कागद परवां आला. त्यांत भाव हाच कीं, " तुम्हीं [ मोगलावर ] चालून यावें ह्मणजे आम्हीं येऊं. व आमची यादी ठराऊन द्यावी कीं, तिसा लक्षांचा मुलूख द्यावा व अशेरीचा किल्ला द्यावा. सर्व

---

१ हें पेशव्यांचें गोपिकाबाईस पत्र. २ विजापुरच्या बादशहाच्या वेळीं हा किल्ला वळकटी विषयीं फार प्रख्यात होता. शेजारीं असलेल्या बोरी नदीस येथें त्याच बादशहांच्या कारकीर्दीत धरण बांधलें गेलें. इ. स. १८५३ च्या तहांत इंग्रज सरकारानें निजामा पासून नळदुर्ग जिल्हा घेतला. पण पुढें सात वर्षांनीं ह्मणजे ५७ च्या बंडाची शांतता झाल्यावर सदरहू सरकारानें मेहरबानी करून तो जिल्हा व सारा रायचूरदुआब निजामास परत दिल्हा. ३ जानोजी भोंसल्याकडील कागद पेशव्यांशीं सख्य करण्याविषयींचा. ४ अशीरगडकिल्ला व तीस लक्षांचा मुलूख द्याल तर मोंगलास सोडून मी तुह्मांकडे येऊन मिळतों, असें जानोजी भोंसल्याचें ह्मणणें पेशव्यांनीं मान्य केलें हें वर आलेल्या खुद्द पेशव्यांच्या पत्रावरून स्पष्ट होत आहे. ग्रांटडफच्या लिहिण्यांत अशीरगडाचें नांव नाहीं व मुलखाची बेरीज तो तिसांच्या ठिकाणीं बत्तिसांची लिहितो. नागपुरकर भोंसल्यांच्या बखरींत ही संख्या बत्तीस लक्षांचीच आहे. शिवाय तीस लक्षां पैकीं निम्मे मुलूख नर्मदातीरीं रेवा व मुकुंदपुर हे परगणे व बा-

मंडळीसें समजाऊन आणावें. " या प्रमाणें त्याच्या मतलबांची याद. त्यास त्याच्या यादीवर करार झाला कीं, " तीस लक्षांचा मुलुख द्यावा. त्यामध्यें पंधरापर्यंत रेवा व मुकुंदपुर. वरकड ( जहागीर ) वऱ्हाड लगती द्यावी. किल्ला अशेरी द्यावा. " असा करार करून रामाजीपंताजवळ यादी दिल्ही. त्यामध्यें मसलत हीच कीं, मोंगल बुडवावा! या प्रमाणें करार झाला. ते ही उदईक जातील. गोपाळरायाची याद एका दो दिवसां जाबसाल होऊन जाईल. वरकड वर्तमान जें होईल तें सेवेशीं लिहीन. सेवेशीं श्रुत होय. हे विज्ञापना. वरकडांचे ही थोडे थोडे मतलब करार केले आहेत. वडिलांस कळावें. हे विज्ञापना.

पै॥ छ० १२ मोहरम.

नं० ३१९

( १९ जुलई )

श्रीगणपतिर्जयति.

आशीर्वाद उपरी येथील कुशल तागायत आषाढ शुद्ध सप्तमी रविवासर यथास्थित असे. विशेष. ( तुम्हीं ) गंगाराम जासूद याज बराबरी बुधवारचें पत्र पाठविलें तें काली मंदवारीं पावोन वर्तमान कळों आलें. " श्रीमंतावरी ( चालून ) जावें ऐसें राजे बहादर यांच्या चित्तांत होतें, परंतु पर्जन्य अतिशय, यामुळें राहिले. " ह्मणून लिहिलें तें कळलें. तरी

कींवा निम्मे वऱ्हाडच्या आसपास असावा असें भोसल्याचें ह्मणणें कबूल केल्याचें वरील पत्रांत पेशव्यानीं लिहिलेलें आहे त्या विषयीं वरील दोन ग्रंथांत अथवा इतरत्र कोठें उल्लेख नाहीं.

१ भवानराव प्रतिनिधि, गमाजीबावा, पिराजी नाईक, बाबूराव फडणीस, सदाशिव रामचंद्र, नरसिंगराव धायगुडे व गोपाळराव पटवर्धन. २ रामाजी बल्लाळ हा पेशव्यांकडून जानोजी भोसल्या जवळ वकील होता. ३ पत्र गोविंद हरीचें गोपाळरावास.

# वर्गणीची पोंच.

## सन १८९७ । ९८

( ता. २२ मे पासून २२ जूनपर्यंत. )

## मागील वर्षाची.

| | |
|---|---|
| | रु० |
| रा. रा. काशिनाथ सखाराम भाटवडेकर. मु० दुरवेस तालुके माहीम. | ३ |
| " " सेक्रेटरी. ने. ज. लायब्ररी. शिगली. | ३ |

## मागील व चालू वर्षाची.

| | |
|---|---|
| रा. रा. नरसो रामचंद्र शेवडे, हुजूरट्रेझरर धारवाड. | ६ |
| रा. सा. कृष्णाजी बळवंत मोघे. चिटणीस. कलेक्टर आफिस " | ६ |
| रा. सा. श्रीनिवास व्यंकटेश यादगिरि. मामलेदार ता० इंडी | ६ |
| रा. रा. रामचंद्र विठ्ठल जोशी स्कूलमास्तर मु० साखरी आगर पोष्ट पालशेत. | ४ |

## चालू वर्षाची.

| | | |
|---|---|---|
| श्री. रा. भास्कर हरि उर्फ आपासाहेब पटवर्धन. | मिरज. | २८१० |
| रा. रा. गणेश विठ्ठल उर्फ बन्याबापू पटवर्धन | " | २८१० |
| " " रामचंद्र भिकाजी गोखले. | " | २८१० |
| रा. सा. नीलकंठ गोविंद गोखले. | " | २८१० |
| रा. रा. सेक्रेटरी. ने. ज. लायब्ररी. डिग्रज. | | ३ |
| रा. सा. त्रिंबक गंगाधर खांडेकर. जमखिंडी. | | ३ |
| श्री. रा. माधवराव विनायक किबे. इंदूर. | | ३ |
| रा. रा. हरि महादेव पंडित. नागपुर. | | ३ |
| रा. सा. सदाशिव अनंत छत्रे. मुरगोड. | | ३ |
| रा. रा. बाळाजी नारायण जोशी. राजकोट. | | ३ |
| श्री. रा. बाळासाहेब सरदेसाई. जांबोटीकर. बेळगांव. | | ३ |
| रा. रा. सखाराम त्रिंबक शिरवळकर. मुंबई. | | ३ |
| " " रामचंद्र गोविंद तळवलकर. | " | ३ |
| " " सखाराम गणेश देउसकर. कलकत्ता. | | ३ |
| " " श्रीधर कृष्ण साठे. | पुणें. | ३ |

" " सेक्रेटरी. ने ज लायब्ररी. पुणें ३
" " प्रिन्सिपाल. फर्ग्युसन कालेज " ३
डा० रामकृष्ण गोपाळ भांडारकर. एम्. ए., पी एच्. डी. " ३
रा. रा. गणपतराव कृष्ण उर्फ बाबासाहेब वावडेकर. " ३
प्रो० आबाजी विष्णु काथवटे. बी. ए. " ३
श्री. रा. खंडेराव चिंतामण उर्फ तात्यासाहेब मेहंदळे. बी. ए. " ३

ऐ० ले० संग्रह-कर्ते.


नवीन मराठी इंग्रजी

# साप्ताहिक पत्र

# समर्थ.

तीनचतुर्थांश मराठी एकचतुर्थांश इंग्रजी

ता० ६ जुलई १८९८ पासून

## कोल्हापूर येथें

दर बुधवारीं प्रसिद्ध होणार.

सर्व पत्रव्यवहार खालीं सही करणाराबरोबर करावा.

विनायक नारायण जोशीराव
प्रकाशक.

पत्ता—'श्रीसमर्थप्रसाद छापखाना,' कोल्हापूर.


## आमचे पुणें व मुंबई येथील एजंट

रा.रा. मुरलीधर मल्हार अत्रे, महाराष्ट्र बुकडेपोचे म्यानेजर, बुधवार पेठ पुणें. रा.रा. विष्णु दासो वनहट्टी. कमिशन एजन्ट आणि जनरल मर्चंट. गिरगांव ट्रामवे टरमिनस्. पेंडसे यांची नवी चाळ मुंबई.

सदरहू दोन असामींस आम्हीं ऐ०ले०संग्रहाचे एजंट नेमिलें आहे. त्यांजकडे तेथील वर्गणीदारानीं वर्गणी द्यावी. आमचीं सर्व पुस्तकें एजंटांकडे विकत मिळतात.

ऐ०ले०संग्रह कर्ते.

# ऐतिहासिक-लेख-संग्रह.

## मासिक पुस्तक.

आगस्ट. १८९८ इ०.

**अंक १५**

वासुदेव वामन शास्त्री खरे
मिरज हायस्कुलांतील संस्कृत शिक्षक.

यांनीं

कुरुंदवाड येथें
" भाऊनाना " छापखान्यांत छापविलें.

वर्षाची आगाऊ वर्गणी टपाल हांशीलसह तीन रुपये.
फुटकळ अंकास पांच आणे.

## ऐतिहासिक-लेख-संग्रह.

हें डेमी अष्टपत्री सांचाच्या चाळीस पृष्ठांचें मासिक पुस्तक दर महिन्यास मिरज येथें नियमानें प्रसिद्ध होत असतें. यांत पटवर्धन जहागीरदारांच्या जुन्या चिटणिशी दप्तरांतील ऐतिहासिक महत्वाचीं व प्रत्येक स्वारीतील भरपूर माहितीचीं पत्रें सालवारीच्या क्रमानें छापून प्रसिद्ध होत असतात. शिवाय अन्यत्र उपलब्ध झालेले कागदपत्र व बखरी वगैरेचा ही यांत समावेश होत असतो. या मासिक पुस्तकाची आगाऊ किंमत सालिना ट० हा० सुद्धां तीन रुपये आहे. ग्राहकांनीं सालिना वर्गणीच्या किंमतीचें व्हा० पे० मागवावें अथवा तितक्या रकमेची मनीआर्डर पाठवावी. त्या शिवाय पुस्तक सुरू केलें जाणार नाहीं.

ऐ० ले० संग्रह कर्ते.

# अगत्याची सूचना.

चालू सालची वर्गणी अद्यापि पुष्कळ आश्रयदात्यांकडून यावयाची आहे. दर महिन्यास त्यांस जागें करणें भाग पडतें ! बहुतेकांकडे गेल्या महिन्यांत आम्हीं वर्गणी पाठविण्याविषयीं कार्डें पाठविलीं आहेत. ज्यांकडून वर्गणी यावयाची आहे त्यानीं आतां बिलकुल विलंब न करितां ती पाठविण्याची मेहेरबानी करावी.

ऐ० ले० संग्रह कर्ते.

### आमचे पुणें व मुंबई येथील एजंट

रा.रा. मुरलीधर मल्हार अत्रे, महाराष्ट्र बुकडेपोचे म्यानेजर, बुधवार पेठ पुणें. रा.रा. विष्णु दासो वनहट्टी. कामिशन एजन्ट आणि जनरल मर्चंट. गिरगांव ट्रामवे टरमिनस्. पेंडसे यांची नवी चाळ मुंबई.

सदरहू दोन असामींस आम्हीं ऐ० ले० संग्रहाचे एजंट नेमिलें आहे. त्यांजकडे तेथील वर्गणीदारांनीं वर्गणी द्यावी. आमचीं सर्व पुस्तकें एजंटांकडे विकत मिळतात.

ऐ० ले० संग्रह कर्ते.

## श. १६८९ मोंगल व पेशवे यांमध्यें युद्ध होण्याचा रंग इ. स. १७६३
## रुसलेल्या सरदारांची समजूत

एक दोन मजली फौज पाठीवरी येती तरी ( श्रीमंतांची ) फजिती होती. परंतु दोन्हीं लष्करें पर्जन्यामुळें घावरी केलीं. प्रस्तुत श्रीमंत नलदुर्गा अलीकडे आले. तेथून विश्वंभर दीक्षिताचें पत्र आलें. शिऊभट पावले. त्या गृहस्थाचें पत्र पावलें. "एक गोष्टी होईल. एके गोष्टी साठीं फारच श्रमी कीं आपल्यास अनुकूळ नाहीं; यास्तव आग्रह करूं नये, पुढें सर्व ही होईल, असें विश्वंभर दीक्षितानें लिहिलें होतें. मुख्य गोष्ट, उभय सैन्यें समीप होतीं तरी श्रीमंतांच्या सैन्यांत बाकी नव्हती. महागाई मोठी. गवताचें नांव नाहीं. नबाबाचें लष्कर ताजें. हें गलबटलेलें. माघारे फिरते वेळेस आम्हांशीं घासाघीस करतील कीं काय न कळे. एक स्थल मिळतें तरी खातरेस न आणितों. कांहीं दुर्गांत, कांहीं येथें[3], कांहीं दुखणेकरी अक्कलकोटीं होतीं. परंतु बोभाट तेथील गृहस्थांनीं होऊं दिल्हा नाहीं. बरें! नवाब साहेब मेहेरबान होतील तेव्हां स्थल देतील. ईश्वरें त्यांचा बोलें केला हेच गोष्ट थोर. हैदरअली याचें व सावनूरकराचें झुजाचें वर्तमान तरी —— कुरुंदवाडास लिहिलें आलें त्याची नक्कल आली तीच पाठविली आहे. व चिरंजीव मेघश्यामाचें पत्र आहे त्यावरून कळेल. ठाणीं श्रीमंतांस ही दिल्हीं नाहींत. कर्जभरी होऊन इतके दिवस रक्षण केलें. परंतु यांचे धास्तीनें टिकाव धरतीलसें दिसत नाहीं. श्रसित्ता प्र-

---

१ हा विश्वंभर दीक्षित कोण? हा पटवर्धनांबद्दल पेशव्यांजवळ रदबदली करणारां पैकीं एकजण होता. यानें गोविंद हरीस पत्र लिहिलें त्याचा भाव असा दिसतो. 'आपली जहागीर व मिरज परत मिळावी असें तुमचें मागणें, तर त्यापैकीं जहागीर परत मिळेल. मिरज आजच मिळणार नाहीं.' २ नळदुर्गांत. ३ मंगळवेढ्यास. ४ बोलवाला, चढती कमान. ५ 'आमच्या जहागिरी पैकीं ठाणीं आम्हीं श्रीमंतांस परत दिलीं नाहींत. लोकांचें कर्ज काढून आजपर्यंत तीं रक्षण केलीं. आतां तीं हैदरअली घेणार.' ६ हैदराच्या.

माण ! तुम्हीं निरोप घेऊन याल तेव्हां बहुत सावधपणें वाटेचें येणें. थोर शत्रु आहेत. सोलापुरकर मार्गीं धांवतात. फारच सावधगिरीनें येणें. काली नीलकंठ महादेव याचे पांचशें स्वार बोपूसखाजी श्रीक्षेत्रीं उतराव-या आले. रात्रीं पत्र आलें. आजी उतरतील. कवड्या येतो. गुरसाळे यांशीं कजिया करणार, ह्मणोन आवई. परंतु थोडों आहे. बातमीच्या जासुदानें सांगितलें कीं, अक्कलकोटा अलीकडे राहिला होता. बसालत-जंग निरोप घेऊन मनुराजवळी भीमा पार होऊन जाणार. नाईक पावा-वया जाणार. ह्मणोन बोली आहे. कळलें पाहिजे. बहुत काय लिहिणें. हे आशीर्वाद. मर्जी रखून येणें. पुढें मुद्देहंशील होतील. ( तो ) दरबार थोर आहे. एकाएकीं सारें होणार नाहीं. हे आशीर्वाद. चिरंजीव नील-कंठरायाचा लाखोटा व विष्णुपंताचा व चिंतामणीचा व कुरुंदवाडचे पाठविले आहेत. समस्त चिरंजीव मंडळीस आशीर्वाद. लिहिलें पाविजे. याल तेव्हां मार्गाचे सुरक्षित सावधपणें यावें. बहुत काय लिहिणें. हे आशीर्वाद.

अपत्यें पुरुषोत्तमानें व पांडूनें शिरसाष्टांग नमस्कार. सविस्तर वाडेलांचे पत्रावरून कळेल. नबाबाची व राजे बहादर यांची मर्जी संपा-दून यावें. रहावया चांगलें स्थल तेच देतील. सर्व चिंता श्रीस आहे. दोन तीन दिवसा आड पत्रें पाठवीत गेलें पाहिजे. बहुत काय लिहिणें. लोभ करावा. हे विज्ञापना.

पै॥ छ० ८ मोहरम.

---

१ हे बापूजी नाइकाकडील लोक. २ हा नीलकंठ महादेव उर्फ आबा पुरं-दरे याजकडील सरदार. ३ भीमा उतरण्या करितां. ४ महिपतराव. ५ कवड्याजव ळ लोक थोडे आहेत. ६ बातमी श्रीमंतांच्या लष्करची.

## श. १६८५ मोंगल व पेशवे यांमध्यें युद्ध होण्याचा रंग इ.स. १७६३ रुसलेल्या सरदारांची समजूत

नं० ३२०

( आषाढ शुद्ध सप्तमी
१७ जुलई. )

श्रीगणराज.

विनंती[1] उपरी. येथील वर्तमान जकारनामकाच्या पुरोहितानें प्रथम आ-

---

१ हें पत्र गोपाळरावानें लिहिलें आहे. यांतील विषय व व्यक्ति यांचा सांकेतिक रीतीनें निर्देश केला असल्यामुळें हें दुर्बोध झालें आहे. याचा अर्थ उकलण्याची बरीच खटपट करून ही मनास पूर्ण समाधान होईल अशा प्रकारचा आह्मांस अर्थ काढितां आला नाहीं. तथापि जो समजला आहे तो येथें देतों. प्रथम व्यक्तींचीं नांवें सांकेतिक दिलीं आहेत त्यांचा अर्थ — १ जकारनामक=जानोजी भोंसले. २ रकारनामक=रामाजी बल्लाळ. हा पेशव्यांकडून भोंसल्याच्या दरबारीं नेहमीं राहणारा वकिल होता. ३ पिकारनामक=पिराजी नाईक निंबाळकर. ४ दकारनामक=दिवाकरपंत चोरघोडे. हे भोंसले यांचे दिवाण व पेशवाईतील साडेतीन शहाण्यापैकीं एकजण होते. ५ सकारनामक=सखारामबापू. पेशव्यांचे दिवाण. ६ उभयतां मध्यस्थ=विठ्ठल शिवदेव विंचूरकर व नारो शंकर राजे बहादर. हे दोघे ही सांप्रत पटवर्धन व पेशवे यां मध्यें सलोखा करण्या करितां झटत असून पेशव्यांकडून ठरलेल्या शर्ती अमलांत येतील याबद्दल पटवर्धनांची खात्री करण्या करितां हमीदार झाले होते. आतां पत्रांतील मचकूर आह्मांस जो समजला आहे तो असा. मोंगलाकडे रुसून गेलेले मराठे सरदार आतां पुन: पेशव्यांशीं समेट करून घेण्याची इच्छा करीत होते. पेशव्यांची ही तीच इच्छा असल्यामुळें हें राजकारण जुळून येण्याच्या रंगास आलें होतें. या विषयीं खुद्द दादासाहेबांकडून पत्रें घेऊन त्यांचे खिजमतगार गोविंद हरीकडे आले होते. गोविंद शिवराम खासगीवाले व विसाजी नारायण यांजकडून ही इशारा आला होता व विंचूरकर आणि नारो शंकर यांणीं पूर्वीं प्रमाणें मध्यस्थी करण्याचें कबूल केलें होतें. या बद्दल मागें उल्लेख आले आहेतच. त्यावरून गोपाळरावानें समेटाच्या शर्ती ठरविण्या करितां मोंगलाच्या लष्करांत आपण असतां तेथून दोन असामी पेशव्यांकडे पाठविले. त्या दोघांत एकजण कारकून होता व दुसरा त्याच्या भाऊबंदां पैकीं एक-

पणच हा प्रकार करावा ह्मणोन रकार नामकास रवाना केलें. तेव्हां आ-
म्हीं मागें पुढें घेत होतों. त्या समयीं कित्येक ( त्यानें आह्मांस ) स्व-

---

जण असावा. प्रस्तुतचें पत्र गोपाळरावानें त्या दोघां पैकीं जो कारकून होता त्यास लिहिलें आहे. याच विषयावर नं० ३२२ चें पत्र आहे तें त्यानें त्या दोघां पैकीं जो भाऊबंद होता त्यास लिहिलें आहे. आमच्या मतें हे दोघे गोपाळरावानें पाठविलेले मनुष्य शिवाजी बावाजी म्हैसकर व नारायणराव कृष्ण पटवर्धन हे असावे. हेच ते दोघे होते या विषयीं आम्हांस शंका नाहीं. भोंसल्याच्या मनांत फार दिवसांपासून होतें कीं, पेशवाई नष्ट करून तो अधिकार आपण मिळवावा. ह्याच हेतु सिद्ध करण्या करितां तो मोंगलास येऊन मिळाला होता. परंतु अलीकडे त्यास असें वाटूं लागलें होतें कीं, मोंगलाशीं सख्य केल्या पासून त्याचा मात्र फायदा झाला. आपला फायदा झाला नाहीं व आपला हेतु कधीं तडीस जावयाचें चिन्ह दिसत नाहीं. तर आतां पेशव्यांशींच समेट करून त्यांजकडून आपलें कल्याण करून घ्यावें. जानोजी भोंसल्यास पेशव्यांशीं समेट करण्या विषयीं सल्ला देणाऱ्या त्याच्या दरबारी लोकांत त्याचा ‘ पुरोहित ’ प्रमुख होता. पण हा पुरोहित कोण हें कांहीं आम्हांस उमगत नाहीं. व नागपुरकर भोंसल्याच्या बखरी वरून ही त्याचा खुलासा होत नाहीं. असो. या पुरोहितानें पेशव्यांकडून मोंगलाकडे रुसून गेलेल्या पटवर्धन, प्रतिनिधि, घायगुडे, निंबाळकर वगैरे सरदारांस सांगितलें कीं, श्रीमंतांशीं सख्य करावयाचें तें तुह्मीं आह्मीं मिळून सर्वांनीं एकदम केलें असतां अधिक फायदेशीर होईल. ते सरदार मोंगलाची बाजू सोडण्यास कबूल होईनात; तेव्हां त्यानें त्यांस बोध केला कीं, हिंदुधर्माचा उत्कर्ष करणाऱ्या पेशव्यांस आपण जाऊन मिळावें हेंच योग्य. यवनाकडे राहणें श्रेयस्कर नाहीं. या बोधावरून ते त्याच्या ह्मणण्यास कबूल झाले. मग पुरोहितानें ‘ रकारनामका ’ स ह्मणजे रामाजी बल्लाळ यास सलोख्याच्या शर्ती ठरविण्या करितां पेशव्यांकडे पाठविलें. पण ही मसलत भोंसल्याचा दिवाण दिवाकरपंत यास रुचली नाहीं. त्यानें पेशव्यांच्या लष्करांत नेहमीं राहणारा भोंसल्याचा वकील दुसरा एकजण होता त्यास गुप्तपणें सूचना पाठवून त्याजकडून आपल्या मतलबास उपयोगी असें जानोजी भोंसल्यास पत्र पाठवविलें. त्या पत्रांत भोंसल्यास उपदेश केला होता कीं, तुह्मीं पेशव्यांकडे येऊं नये. आलांत तर जाधवरावा प्रमाणें तुमची दशा होईल. पेशव्यांचें राज्य आतां लयास जावयाच्या बेतांत आलें आहे. या करितां तुह्मीं मोंगलाचें साह्य करावें व त्याच्या मदतीनें पेशव्यांस बुडवून त्यांचा अधिकार आपणच संपादा-

## श. १६८५ मोंगल व पेशवे यांमध्यें युद्ध होण्याचा रंग इ.स. १७६३
## रुसलेल्या सरदारांची समजूत

धर्मांचे बोध केले आणि सर्वांनीं जावें असा सिद्धांत केला. तेथील करार मदार त्यांचे मनोदयानुरूप होऊन यादी जाहल्या. ल्हा आमचे विषयीं थोडासा मात्र तेथें. त्यांच्या कामास तिलमात्र गुंता नाहीं असें जाहलें. परवां येथें पुरोहितानें आपल्या यजमानास काय समजाविलें न कळे. तेथून प्रथम जकार नामकाकडील वकिलानें पत्र लिहिलें होतें तें कांहीं स्वबुद्धीनें लिहिलें नाहीं. परबुद्धीनेंच लिहिलें. त्यांत नाना प्रकारे दंश लिहिले होते. तें पत्र [ आल्यावर भोंसल्यांनीं ] आह्मांसही दाखविलें. आम्हीं तें पाहिलें. कळेल तेणें प्रमाणें निराकरण ही केलें. " या प्रमाणें करार करून घेऊन जाऊन मागती दगाबाजी ( श्रीमंत व त्यांचे कारभारी ) करितील तर या गोष्टी कदापि घडणार नाहींत. पहिल्या पासून त्याचे हस्तानें तुमचें कामकाज होत होतें. या समयीं तुम्हीं त्यास कळूं न देतां परस्परें रकारनामकास पाठवून कार्य करून घेतलेंत. यास्तव तुमचा

---

वा ! हें पत्र भोंसल्यानें किंवा त्याच्या ' पुरोहितानें ' गोपाळरायास दाखविलें तेव्हां त्यानें सांगितलें कीं, तुह्मा आह्मांस श्रीमंत आपणाकडे यावयास सांगत आहेत ते ज्या प्रमाणें कबूल करितील त्या प्रमाणें तडीस नेतील. त्यांचा विश्वास आह्मांस आहे. दगाबाजी त्यांच्या हातून घडणार नाहीं. पण हें बोलणें भोंसल्यास खरें वाटेना व पुन: पुन: त्याच्या मनांत महत्वाकांक्षेनें उचंबळ खाल्लयामुळें तो ह्मणूं लागला कीं, सातारकर छत्रपतींच्या राज्याचा उपभोग पेशवे घेत आहेत तो त्यांनींच कां घ्यावा ? आम्हीं कां घेऊं नये ? मोंगलाची मदत घेऊन आपण पेशवाई बुडविणार ! गोपाळरावास पेशव्यांचा उच्छेद व्हावा अशी इच्छा नव्हती. त्यानें आपण स्वत: पेशव्यांकडे पाठविलेल्या दोघां वकीलां पैकीं एकास [ कारकुनास ] हें पत्र लिहून कळविलें कीं, विंचूरकर व नारो शंकर यांच्या मध्यस्थीनें आपल्या मागण्या श्रीमंतांकडून कबूल करवाव्या ह्मणजे आम्हीं फौजेसह तावडतोब निघून येतों. भोंसले कांहीं लालूच दाखवून आपणास बरोबर घेऊन जाऊं लागतील तर आपण त्यां बरोबर जात नाहीं. इ. इ.

योग न घडावा ह्मणून हा विचार त्यांनीं लिहविला. यजमानापासून करार झाला असतां आणि त्यांचे कार्याकरितां तुह्मीं गमन करून तेथें जाल तेव्हां त्या उभयतांकडून अशा गोष्टी कदापि घडणार नाहींत" अशी त्यांची निशा आह्मीं बहुता प्रकारें केली. परंतु त्यांस सत्य न भासे. शेवट त्याणीं रकारनामकास पत्र लिहिलें जे, 'तुह्मीं सत्वर निघून यावें.' हा भाव तेथें कळोंच देऊं नये, मशारनिल्हे येथें आल्यावर स्पष्ट लिहोन पाठवावें, या प्रमाणें करार करून पत्रें पाठविलीं. येथें आपले मुद्दे करार करून घेऊन पुरोहित इमान प्रमाणास गुंतले. पिकारनामक काल निघोन जात होते, त्यांस आपण मध्यस्ती करून आपणा समागमें गुंताविलें. " आम्हांस ही या प्रमाणें गुंतवावें. कोणास जाऊं देऊं नये. एक मुठीनें सारें असावें. अविंधासीं[1] घेऊन एक दोन मजली यजमानांच्या[2] पाठीमागें जावें. तदोत्तर त्याच मार्गें धारूरास जाऊन शहरास[3] जावें. आणि खानदेशांत छावणी करावी. आपले मतलब यवना जवळोन करून घेतले. तिर्कडे[4] न यावें. आजपर्यंत श्रीमंतांनीं राज्यभार केला. आतां त्यांस निर्दाळून आपणच पेशवाई दौलत करावी. यांचें[5] काम त्याणीं[6] व त्यांचें काम यानीं करून द्यावें." हा प्रकार झाला. यजमानांचें (ज्यांत) कल्याण तो मनसबा करीत होते ह्मणून आम्हीं त्यांत होतों. आतां हा नवीन प्रकार कारितात, तर त्यांत कांहीं आम्हीं गुंतत नाहीं. आम्हांस विश्वास त्यांचा[7] आहे. करार कारितील तेणें प्रमाणें निभावणी होईल हे आमची खातरजमा. त्यांत उभयतां दरम्यान, अशा गोष्टी असतां लटक्या कल्पना घ्यावयासीं कारण काय ? आजपर्यंत तिर्कडे[8] येणार ह्मणोन एक मुठीनें सारे[9] होते. आतां

---

१ नबाबास. २ पेशव्यांच्या. ३ औरंगाबादेस. ४ पेशव्यांकडे. ५ भोंसल्याचें. ६ नबाबानें. ७ पेशव्यांचा. ८ पेशव्यांकडे. ९ पटवर्धन, प्रतिनिधि वगैरे मोंगलाकडे गेलेले सर्व सरदार.

## श.१६८९ मोंगल व पेशवे यांमध्यें युद्ध होण्याचा रंग इ.स.१७६२
## रुसलेल्या सरदारांची समजूत

त्यांचें मानस यांतून कोणास जाऊं देऊं नये. लटकें बोलून ठेऊन घेऊन यजमान नाहींतच असें करावें आणि आपण राज्यभार करावा ! " त्यांनीं-च करावा, आम्हीं कां न करावा ? त्यांत आतां त्यांचे घरचा सर्व प्रकारें बखेडा. द्रव्य नाहीं. लोकांचे दंगे. पुढें जथही नाहीं. यवनाची काबू आपण साधून घावी. आपलें काम करून घ्यावें. " हा प्रकार केला ! राजकारणें सर्वांचीं या प्रमाणें लागलीं हें ही कारभारीयांजवळ सांगितलें ! आपल्या गुणास दकारनामक चुकले नाहींत. यास्तव तुम्हीं आपला प्रकार सकारनामक व उभयतां मध्यस्त यांजखेरीज फुटूं नये. या प्रमाणें धरबंद करून आपली निशा आपल्या उभयतांच्या विचारें करून घेणें आणि उत्तर पाठवून देणें. आम्हीं येथें यांजवळ गुंतत नाहीं. त्यांचें राज्य लयास जावें असा आमचा द्वेष नाहीं. हें वर्तमान या प्रकारें झालें याज करितां लिहिलें आहे. जकारनामकाच्या वकिलानें स्पष्ट लिहिलें जे, " तुम्हीं ज्या पक्षाचा अंगीकार केला तो पक्ष शेवटास नेऊन आपली काबू साधणें. या उपरी हें लयास जावया कांहीं फार दिवस लागत नाहींत. ईश्वर तुम्हांस श्रम न करितांच अल्पश्रमें करून कार्य करून देतो. येथें कांहींच जीव राहिला नाहीं. फौजेचा ही हंगाम या उपर पडत नाहीं. तुम्हीं अग्रेसर जाहलां म्हणजे विलंब लागत नाहीं. तर प्रस्तुत तुम्हीं यावयाचें न करणें. आणि मातबर ओझेंचें ईश्वर देतो हें घेणें. " या प्रमाणें नाना प्रकारें लेखन केलें होतें. " असें होऊन आलां तर जाधवराया प्रमाणें होतें. " ( असें लिहिलें होतें. ) एतद्विषयीं शपथ ही लिहिली होती.

---

१ भोंसल्याचें. २ मसलत. ३ दिवाकरपंतानें राजे विठ्ठल सुंदर यास सांगितलें कीं सारे मराठे सरदार पेशव्यांकडे जाऊं पहात आहेत. ४ श्रीमंतांचें. ५ पेशवे. ६ पेशव्यांकडे यावयाचें. ७ सर्व मराठी राज्याची मालकी.

बहुत काय लिहिणें. रवाना छ० ५ रोज रविवार. बहुत काय लिहिणें हे विनंती.

नं० ३२१L

( आषाढ शुद्ध नवमी
१९ जुलई. )

श्री.

तीर्थरूप मातुश्री बाई वडिलांचे सेवेशीं.

अपत्यें माधवरायानें चरणावरी मस्तक ठेऊन साष्टांग नमस्कार विज्ञापना. येथील क्षेम तागायत छ० ७ मोहरम मुक्काम नजीक नळदुर्ग येथें वडिलांचे आशीर्वादें करून सुखरूप असों. विशेष. वडिलांकडून बहुत दिवस पत्र येऊन वर्तमान कळत नाहीं. तरी सदैव पत्र पाठवावयासीं आज्ञा केली पाहिजे. विशेष. इकडील वर्तमान तर लढाई विषयीं तीर्थरूपांचा आग्रह बहुत होता. परंतु मल्हारबा आदीकरून येऊन विनंती केली कीं, 'प्रस्तुत घोड्यांत जीव नाहीं. व महागाईमुळें माणसें ही खराबींत आलीं आहेत. या दिवसांत लढाई करूं नये.' खर्चाचा मजकूर तर — सर्व ह्मणाले कीं, 'देशेच्या लगत्यास चलावें. ह्मणजे खर्चाची तजवीज करूं.' या प्रमाणें गोष्ट ठरून कूच व्हावें, त्यास आज पर्जन्य आला यास्तव मुक्काम होईल. उदईक कूच होऊन तुळजापुरच्या सुमारें येऊं. मोंगलाकडील प्रकार तर, येथून दहा कोस आवघा अलीकडे आहे. त्याची ही पावसानें बहुत खराबी केली. त्यानें एक कूच तीन कोसाचें केलें त्या दिवशीं तोफा राहिल्या. बैल व घोडीं राहिलीं होतीं. मग दुसरे दिवशीं

१ हें पेशव्यांचें गोपिकाबाईस पत्र. २ मोंगलाशीं लढाई करण्याचा दादासाहेबांचा आग्रह होता. ३ पुणें प्रांताच्या.

सर्व एका जागां झाले. या प्रमाणें त्याचा ही प्रकार आहे. लढाई करावी हें पैहिलें होतें तेव्हां न झाले. प्रस्तुत पैशाचा ही पेंच व दाणा ही अगदीं नाहीं. भोंसल्याकडील रामाजी बल्लाळ आज निरोप घेऊन करार मदार होऊन गेले. त्याणीं शपथ० केली कीं तुम्हीं तिसा कोसांचें अंतर पाडावें ह्मणजे शपथपूर्वक जानोजीस घेऊन येतों. या प्रमाणें बोलून आज गेले. वडिलांस कळावें. सेवेशीं श्रुत होय. हे विज्ञापना.

पै॥ छ० १३ मोहरम.

नं० ३२२

[ आषाढ वद्य प्रतिपदा
२९ जुलई ]

श्रीगणराज.

चिरंजीवांस आशीर्वाद उपरी. काल आम्हीं भोंसल्यानजीक राहिलों. त्याजकडे नैकारनामक धायगुडे गेले होते. त्यास उमज पडला. या उपरी आज कांहीं आम्हांशीं बोलणार. परंतु आपण निघतों ह्मणून (त्यानीं) आम्हांस ठेऊन घेतलें तरी (आम्हांस) राहणें नाहीं. कसा

---

१ लढाई करण्याची संधि पूर्वी होती तेव्हां लढाई केली नाहीं. २ नागपुरकर भोंसल्याच्या बखरींत रामाजी बल्लाळ हा पेशव्यांचा वकील होता असें लिहिलें आहे. वरील लिहिण्यांत तो भोंसल्याचा वकील होता असा ही अर्थ निघू शकतो. ३ हें गोपाळरावाचें (बहुधा) चुलतबंधु नारायणराव कृष्ण यास पत्र. ४ नरसिंगराव धायगुडे यानीं जानोजी भोंसल्याची गांठ घेऊन त्यास बोध केला कीं, मोंगलाच्या आश्रयानें पेशव्यांचा नाश करून सारें मराठी राज्य आपल्या ताब्यांत घेण्याचा तुह्मीं मनसवा केला आहे हा सिद्धीस न जातां यांत तुमचा नाश होईल. तेव्हां त्यांचें ह्मणणें खरें आहे अशी जानोजीची खात्री होऊन तो पेशव्यांशीं पुनः सख्य करण्याची इच्छा प्रदर्शित करिता झाला. ५ आज आमचें व भोंसल्याचें बोलणें होणार.

ही निकाल तुमचें पत्र आल्या नंतर काढून येतों. तुमच्या पत्राचा मार्ग पहातों. बाकी कांहीं गुंता नाहीं. काल संध्याकाळीं खंदारकर ही आले होते. [ त्यांचें ] बोलण्यांत कांहीं जीव नाहीं. ' स्थळ मिळेल तेव्हां देऊं. सरंजाम बसालतजंगाचा सोडवून तुम्हींच घ्यावा. ' ( असें ते बोलले. ) सारें वायूवरील मथन हें उमजलें. त्यांचा ही आम्हांशीं कांहीं अंतर विचार नाहीं. ज्या गोष्टीनें तुमचें कल्याण ते गोष्टी तुम्हीं आपली करावी या प्रमाणें मशारनिल्हेनीं घरोब्याचा विचार सांगितला. आम्हीं तुमचें पत्र आल्यानंतर निरोप घेऊन येतों. तुम्हीं सत्वर बुंद्धिकोटास जाऊन तेथें विलंब न लावितां निघोर्न जावें. आणि पत्र त्वरित पाठवावें. दिवाकर व जकारनामक उभयतां समजले. पिकारनामक गेले. चिंत्रगुप्त

१ पटवर्धनांचा मोंगलाच्या दरबारांत प्रवेश होण्यास कारण खंदारकर राजे गोपाळसिंग. त्याच्या मार्फतच नवाबानें व त्याच्या दिवाणानें गोपाळरावास आश्वासन दिलें होतें कीं, तुह्मांस राहण्या करितां आह्मीं एक किल्ला देऊं. शिवाय अदवानींचा नवाब बसालतजंग याची ही सारी जहागीर तुह्मांस देऊं. महाराष्ट्रांतील ही कित्येक ठाणीं व परगणे यावेळीं मोंगलानें गोपाळरावास देऊं केले असावे. ती देणग्यांची लांबची लांब याद पाहून तिची वास्तविक किंमत काय आहे हें गोविंद हरीनें त्याच वेळीं ताडिलें होतें. या यादींतील देणग्या ह्मणजे केवळ शिवलंगणाचें सोनें होय अशा अर्थाचा त्याचा त्या वेळचा उद्गार होता. ( पहा नं० १८० च्या पत्रांतील शेवटचा मजकूर. ) तोच खरा होता असें गोपाळरावाच्या प्रत्ययास आतां आलें! कारण कीं मोंगलाचा निरोप त्याच गोपाळसिंगाच्या मार्फत आतां गोपाळरावास आला कीं किल्ला आह्मीं तुम्हांस यावयाचा कबूल केला आहे खरा, पण तो आम्हांस मिळेल तेव्हां देऊं. बसालतजंगाची जहागीर तुम्हींच त्याशीं लढाई करून जिंकावी! २ आंतून एक, बाहेरून एक, अशी गोपाळसिंगाची वागणूक आम्हाशीं नाहीं. पेशव्यांकडे जाऊन तुमचें कल्याण होत असेल तर तुह्मीं तसेंच करा असें तो आह्माशीं बोलला. ३ अक्कलकोटास. ४ निघून श्रीमंतांच्या लष्करास जावें. ५ जानोजी भोंसले व दिवाकरपंत शुद्धीवर आले. ६ पिराजी नाईक निंबाळकर. ७ बाबूराव फडणीस चाकरीवर गेला असें गोपाळराव लिहितो याचा अर्थ कळत नाहीं. कारण त्याचा मुलगा

चाकरीवर गेला. हे सारे ' गच्छ ' करणार असें पुर्ते उमजोन शुद्धीवर आले असें दिसतें. परंतु भरंवसा धरून त्यांनीं येतों म्हटलें तत्रापि वचनांत सांपडून गंगेपर्यंत समागमें न्यावयाची युक्ति करतील तर त्यांत सांपडत नाहीं. तुम्हीं साऱ्यांस बोलोन घेऊन त्वरित जाणें जातांना सोलापुरास चिरंजीव दाजीस पत्र पाठवावें. तेथून जात तें करणें. तारीख छ० १३ मोहरम हे आशीर्वाद.

नं० ३२३L

( आषाढ वद्य पंचमी
३० जुलई. )

श्री.

तीर्थरूप मातुश्री बाई वडिलांचे सेवेशीं.

अपत्यें माधवरायानें चरणावरी मस्तक ठेऊन साष्टांग नमस्कार विज्ञापना. येथील क्षेम तागायत छ० १८ मोहरम मुक्काम सोनारी येथें वडिलांचे आशीर्वादें करून सुखरूप असों. विशेष. वडिलीं छ० १४ मोहरमचें पत्र पाठविलें तें पावलें. लिहिलें वर्तमान कळलें. इकडील वर्तमान मजकूर तर पूर्वीं सेवेशीं राजकारणाचा प्रकार लिहिला होता. त्यास प्रस्तुत पिराजी नाईक निंबाळकर मोंगल याची रजा घेऊन आले.

---

मोरोबा दादा गोपाळरावा बरोबर मंगळवेढ्यांस गेला व तेथून त्या बरोबरच श्रीमंतांच्या लष्करांत गेला. तेथें महिना पंधरा दिवस गोते खातां खातां शेवटीं फडणिशी गोपाळरावाच्या रदबदलीनें त्याचा चुलत भाऊ नाना फडणीस यास मिळाली. तेव्हां सांप्रत ' चित्रगुप्ता ' ची चाकरी त्याजकडे होती कोठें ?

१ शुद्धीवर येणारे अर्थात् भोंसले व, दिवाकरपंत. २ गोदावरीपर्यंत. ३ हें पेशव्यांचें गोपिकाबाईस पत्र.

त्यांची आमची भेट काल सुभेदारा[1] मार्फत झाली. तीर्थस्वरूप दादासाहेब यांची भेट आज झाली. त्यांचा मनोदय आहे कीं, चार दिवस घरास जाऊन सरंजाम सुद्धां येऊं. या प्रमाणें त्यांचें बोलणें आहे. परंतु त्यासीं बोलून ठराव होईल त्या प्रमाणें करितील. राजश्री गोपाळराव व मोरो बाबूराव व नरसिंगराव धायगुडे असे त्रिवर्ग उठून[2] मंगळवेढ्यांस पोंचले. त्यांशीं आणावयासीं गोविंदै[3] शिवराम जातील. त्यांचें ही पत्र आजच आलें. मिरजेच्या सनदा व मोरोबाच्या फडणिसीचा प्रकार — आजच त्यांसीं बोलावून आणून सनदा द्याव्या हा निश्चयच आहे. परंतु तीर्थस्वरूपांचे मतें कीं ते आल्यावर सनदा देऊं. व मोरोबास ही फडणिसी देऊं. या प्रमाणें तीर्थस्वरूपांचे मतें आहे. परंतु त्यांस आतांच सनदा गोविंदपंताजवळ[4] द्याव्या व मोरोबास ही घेऊन यावें या प्रमाणें करार करून मध्यस्थांजवळ सनदा द्याव्या, या प्रमाणें गोपाळरायाचा मनोदय आहे. त्यास तीर्थस्वरूपांजवळ ठीक करून त्यांची रवानगी करूं. सदाशिव रामचंद्र, ह्याचा प्रकार तर यावें असाच आहे. परंतु त्याची माणसें शहरांत[5] गुंतलीं आहेत. भोंसले यांची यादी करार होऊन गेली. परंतु त्याचा यावयाचा अनमान आहे. त्याचा ही दोन्ही डगरींवर हात आहे. व नबाबास ही त्याचा संदेह बहुत झाला आहे. प्रस्तुत मोंगलाचा मुक्काम धारूरानजीक आहे. मोंगलाच्या मतें धारूरचा घांट उतरून शहरास जावें. या प्रमाणें त्याचा मजकूर आहे. आवशा अलीकडे मुक्काम त्याचा होता. त्या मुक्कामीं चार दिवस झड बहुत बसली यामुळें तोफा साऱ्या राहिल्या,

---

१ मल्हारराव होळकरामार्फत. २ मोंगलाच्या लष्करांतून निघून. ३ पण पुढें गोपाळराव वगैरे पटवर्धन मंडळीस आणण्या करितां गोविंद शिवराम खासगीवाले गेले नाहींत. तें काम नारो शंकर याजकडे सोंपविण्यांत आलें होतें. नारो शंकर व विठ्ठलराव विंचूरकर हे पटवर्धनांचे मध्यस्थ होते हें पूर्वी कित्येकदां लिहिलेंच आहे. ४ खासगीवाल्यांची. ५ औरंगाबादेंत.

व बैल, घोडीं, व उंटें चार हजार पर्यंत राहिलीं. ही अवस्था पांडू[1] पाडून आला. प्रस्तुत ते[2] निम्मे तोफा बराबर घेणार. त्या ही न चालाव्या अशा आहेत. आमचे छावणीचा मजकूर तर अद्यापि निश्चय नाहीं. निश्चय झाल्यावर लिहीन. वडिलांस कळावें. सुभेदारांच्या[3] मतें चार दिवस एके जागीं चारा दाण्याची सोय पाहून महिना पंधरा दिवस राहून मग लोकांची समाधानी करून थोडें बहुत ( खर्चास ) देऊन मोंगलावर जावें. त्यास प्रस्तुत नगरच्यीं समीप येऊन मोंगलाच्या कर्तव्या प्रमाणें करावें लागेल. सेवेशीं श्रुत होय हे विज्ञापना.

पै।। छ० २३ मोहरम.

नं० ३२४

( अजमासें आषाढ वद्य
जुलईचा दु० पंधरवडा )

श्री.

राजश्रिया विराजित राजमान्य राजश्री गोविंदराव गोपाळ
स्वामीचे सेवेशीं:—

पोष्य विठ्ठलराव शिवदेव. कृतानेक साष्टांग नमस्कार विनंती उपरी येथील कुशल जाणून स्वकीय कुशल लेखन केलें पाहिजे. विशेष. श्रीमंतांनीं करार करून पत्रें पाठविलीं आहेत तें प्रमाणच आहे. आम्हीं निभाऊन देऊं. त्यांनीं अंतर केलें तर आम्हीं तुमचे सोबती ऐसें जाणून निःसंदेह सत्वर यावें. पूर्वी आम्हीं तुम्हां खेरोज नव्हतों. आतां ही नाहीं. कोणी कित्येक वसवॅसा[4] घालतील ( तर ) तिलतुल्य न धरावा. विशेष

१ पांडुरंगपंत गोडबोले. २ मोंगल. ३ मल्हारराव होळकराच्या. ४ संशय.

काय लिहिणें. लोभ असों दीजे हे विनंती. श्रीमंतांनीं मुद्यांची याद कलमें करार केलीं आहेत त्या प्रमाणें शपथपूर्वक निभाऊन देऊं. बहुत काय लिहिणें हे विनंती.

नं० ३२५L

( आषाढ वद्य एकादशी
५ आगस्ट. )

श्री.

तीर्थरूप मातुश्री बाई वडिलांचे सेवेशीं.

अपत्यें माधवरायानें चरणावरी मस्तक ठेऊन साष्टांग नमस्कार विज्ञापना. येथील क्षेम तागायत छ० २४ मोहरम मुक्काम नजीक बीड येथें वडिलांचे आशीर्वादें करून सुखरूप असों. विशेष. इकडील वर्तमान तर प्रस्तुत नगरच्या सुमारें येत आहों ह्मणून पूर्वी सेवेशीं लिहिलें होतें, त्यास तो प्रकार राहून बीडच्या सुमारें आलों; याचें कारण हेंच कीं, बीडची खंडणी घ्यावी व मोंगल गंगा शहागडाजवळ उतरणार यास्तव या सुमारें आलों. आह्मीं या सुमारें आल्यावर तो गंगा उतरतो किंवा आम्हांकडे येतो हें पहावें! प्रस्तुत मोंगलाचा मुक्काम शहागडावर गेला गंगेस पाणी बहुत आहे. असें ही कारितां तो नांवावरून उतरत आहे. तर त्या संधी मध्यें गांठावें हा ही प्रकार. व दुसरें बीडची खंडणी एक लक्ष बारा हजार करार केली. त्यामध्यें अठावन्न हजार रोख द्यावे असें ठरलें त्यास ते आणावयास महादशेट पाठविले आहेत. वरकड बाकीची मदत केली आहे. तो ही ऐवज सत्वरच येईल. मोंगलाची बातमी आली. त्यामध्यें हाच प्रकार आहे कीं, त्यांची फौज प्रस्तुत पंधरा सतरा हजार आहे. त्यामध्यें दाजीबास बरें वाटत नाहीं, यास्तव ते व त्यांचे धाकटे

---

१ हें पेशव्यांचें गोपिकाबाईस पत्र. २ दाजीबा हा जानबा निंबाळकर,

बंधु निरोप घेऊन फौज सुद्धां आले. व पूर्वीं ही गोपाळराव, पिराजी नाईक, मोरोबा, नरसिंगराव धायगुडे. हे पूर्वींच मंगळवेढ्यास आले. त्या वरून त्याची फौज बहुतच हलकी झाली व भोंसले आहेत त्यांचा ही इतबार त्यास येत नाहीं. व भोंसल्यांचे लोक खार्या वांचून उठोन जातात, अशी बातमी आज आली. त्यास आज सर्व सरदारांस बोलावूं पाठविलें आहे. त्यांच्या मतें जो विचार ठरेल त्या प्रमाणें करूं. गोपाळराव वगैरे यांस आणावयास नारो शंकर पाठविले आहेत. ते ही लवकरच येतील. पिराजी नाईक समागमेंच आहेत. महादजी शिंदे उज्जनीवर आले आहेत. त्यांनीं लिहिलें होतें कीं, आज्ञे प्रमाणें येऊन वऱ्हाडचें पुरतें पारिपत्य करितों. या प्रमाणें त्यांचीं ही पत्रें आलीं. वडिलांस कळावें. सेवेशीं श्रुत होय हे विज्ञापना.

पै॥ छ० ६ सफर.

नं० ३२६

( ७ आगस्ट )

श्रीगणराज.

चिरंजीव राजश्री महादाजीपंत यांसीं प्रती गोविंद हरि आशीर्वाद. उपरी येथील वर्तमान् तागायत आषाढ वद्य त्रयोदशी इंदुवार मुक्काम मंगळवेढें सुखरूप असों विशेष. इकडील वर्तमान तर चिरंजीव मंडळीसह आम्हीं येथें आलों. त्या उपरी श्रीमंतांकडून राजश्री नारो शंकर आले.

---

मोंगलाकडील प्रसिद्ध सरदार, याचा गुलगा.

१ खावयास न मिळाल्या मुळें घरोघर निघून जात आहेत. २ महादाजीपंत उर्फ महादाजी बल्लाळ हा हें पत्र लिहिणारा त्रिंबक हरि कुरुंदवाडकर याचा कारभारी. हा प्रस्तुत कुरुंदवाडींच होता.

एकादशीस क्षेत्रास आले. आम्हीं ही तेंथें गेलों होतों. त्यांस घेऊन येथें आलों. बोलणें झालें. श्रीमंतांची कृपा पूर्वीं पेक्षां विशेष दिसून आली. चिरंजीव मंडळी बुधवारीं श्रीमंतांकडे जातात. आम्हीं ही तेच दिवशीं निघून सहपरिवारें येतों. राजश्री विसाजीपंत ही नारो शंकर यां समागमेंच आले होते. ते व आम्हीं बरोबरच येतों. चिरंजीव राजश्री नीलकंठराव जातात. कळावें बहुत काय लिहिणें हे आशीर्वाद.

नं० ३२७

( ८ आगस्ट. )

श्रीगणराज.

अपत्यें धोंडूनें[1] दोनी कर जोडून शिरसाष्टांग नमस्कार विज्ञापना तागायत आषाढ वद्य चतुर्दशी इंदुवारीं प्रथम प्रहर. वडिलांचे आशीर्वादें करून सुखरूप असों. विशेष. इकडील वर्तमान तरी श्रीमंतांकडून राजश्री नारो शंकर समजाविशी करावयास मंगळवेढ्यास आले. मंदवारीं त्यांचें बोलणें चालणें व्हावयाचें तें झालें. राजश्री निघोन काल गेले. श्रीमंत यजमान मंडळी ही बुधवारीं प्रतिपदेस श्रीमंतांकडे भेटीस जाणार. भेटी झाल्या नंतर मिरजेच्या सनदा देणार. आधींच स्थल द्यावें तर लौकिकांत एक प्रकारचें[2] दिसतें. यास्तव भेटी अंतीं देतील. राजश्री लक्ष्मण[3] कोन्हेर यांस ( पेशवे सरकारांतून ) पत्रें गेलीं आहेत कीं, 'स्थळ रिकामें करून ठेवणें. सनदा येतांच स्थळ देणें,' ह्मणोन गेलीं आहेत. श्रीमंत राजश्री

१ या पत्रावर जरी 'गणराज' आहे तरी पत्र लिहिणारा धोंडू हा पटवर्धनां पैकीं कोणी होता असें समजावयाचें नाहीं. 'श्रीमंत यजमान मंडळी बुधवारीं प्रतिपदेस श्रीमंतांकडे [ पेशव्यांकडे ] भेटीस जाणार' असें या पत्रांत पुढें वाक्य आलें आहे त्यावरून हा पटवर्धनांच्या कारकुनां पैकीं एकजण होता असें सिद्ध होतें
२ चमत्कारिक. ३ हा सध्यांचा मिरजेचा किल्लेदार.

## रुसलेल्या सरदारांची समजूत

आपा कुटुंबा सुद्धां प्रतिपदेस बुधवारीं निघोन कुरुंदवाडास जाणार. राजश्री नीलकंठराव लष्करास जातात. कोन्हेरराव व वरकड सर्व मंडळी कुरुंदवाडास येतात. राजश्री विसाजीपंत आपा ही येथें आले होते. ते.व यजमान समागमेंच येतात. हे विज्ञापना.

नं० ३२८

( ८ आगस्ट. )

श्रीगणराज.

चिरंजीव राजश्री बापू[1] यास त्रिंबक हरि आशीर्वाद. येथील वर्तमान तागायत आषाढ वद्य चतुर्दशी इंदुवार मुक्काम मंगळवेढें. यथास्थित असे. विशेष. आम्हीं नलदुर्गाहून येथें आलों. चिरंजीव ही आम्हांसवेंच आले. नारो शंकर आले व राजश्री विसाजीपंत ही आले. भेटी जाहल्या. करार मदार ठरला. स्थळ सरंजाम निवडून आला. भेटीस जाण्याचा करार झाला. मिरज देवविले दिवशीं श्रीमंतांची भेटी ( व्हावयाची, ) तेच दिवशीं ( त्यानीं ) स्थळाची सनद द्यावी, स्थळ द्यावें, ( असा ) करार झाला. श्रीमंतांकडे बुधवारीं चिरंजीवें मंडळी जातील. किल्ला खालीं होऊन, लोक आंत जाय तों पावेतों चिरंजीव राजश्री गोविंदपंत येथेंच आहेत. आम्हीं सर्व कुटुंबसह बुधवारीं येतों. राजश्री विसाजीपंत ही येतात. हैदरनाइकास श्रीमंतांचीं पत्रें गेलीं. उपराळा बिदनूरचा करावा

१ त्रिंबक हरि. २ हें तिंबक हरीचें मेघश्यामराव कृष्ण पटवर्धन मंगळवेढेकर उर्फ मेघश्यामराव बापू यास पत्र. बापू या वेळीं कर्नाटकांत पटवर्धनांची जहागीर होती तिचें रक्षण करण्यांत गुंतला होता व त्या जहागिरीवर हैदरअल्लीचें सैन्य चालून येणार होतें त्याचें निवारण कसें होईल या फिकिरींत पडला होता. ३ मिरज किल्ल्याची. ४ गोपाळराव वगैरे सर्व. ५ रिकामा. ६ हैदरास श्रीमंतांचीं पत्रें गेलीं कीं, तुह्मीं बिदनुरास उपसर्ग देऊं नये. ७ कुमक.

याज कारितां तमाम तिकडील संस्थानिकांस पत्रें गेलीं. राजश्री विसाजीपंत हीं जमाव सहीत धारवाडाकडे जावयास येतात. ते आम्हीं बरोबरच येतों[1]. तुम्हीं पुढें सर्वांस पत्रें रवाना करून सिद्धता करावी. वरकड कुरुंदवाडच्या[2] द्रव्याचा अद्याप पत्ता लागत नाहीं. काय विचार आहे तरी त्याची तरतूद करणें. बहुत काय लिहिणें. आम्हीं लौकरच येतों. हे आशीर्वाद.

नं० ३२९L

( ८ आगस्ट. )

श्री.

तीर्थरूप मातुश्री बाई वडिलांचे सेवेशीं.

अपत्यें[3] माधवरायानें दोन्ही कर जोडून साष्टांग नमस्कार. विनंती. येथील कुशल तागायत आषाढ वद्य चतुर्दशी सोमवार पावेतों वडिलांचे आशीर्वादें करून सुखरूप असों. विशेष. इकडील वर्तमान तरी मोंगलाचा मुक्काम राक्षसभुवनावरी आहे. तोफखाना वगैरे गंगापार उतरला. सारी फौज भोंसले सुद्धां गंगे पलीकडेच आहेत. आमचा कूच आजच गणेशाचे निंब्याहून नव कोसांचा झाला आहे. एक दोन रोजांत यवनाची गांठ पडेल. वडिलांस कळावें ह्मणून लिहिलें आहे. भागवताची पोथी पाठविली आहे. येऊन पावेल. जतन ( करून ) ठेवावयासीं आज्ञा करावी. रवाना छ० २७ मोहरम. बहुत काय लिहिणें. हे विनंती.

पै॥ छ० २ सफर.

---

१ कुरुंदवाड पर्यंत ते व आम्हीं बरोबरच येतों. २ या वाक्याचा बोध होत नाहीं. ३ हें पेशव्यांचें गोपिकाबाईस पत्र.

## श. १६८९ मोंगल व पेशवे यांमध्यें युद्ध होण्याचा रंग इ.स. १७६३
## रुसलेल्या सरदारांची समजूत

नं० ३३०L

[ ९ आगस्ट. ]

श्री.

तीर्थरूप मातुश्री बाई वडिलांचे सेवेशीं.

अपत्यें माधवरायानें कर जोडून साष्टांग नमस्कार विनंती येथील कुशल तागायत आषाढ वद्य अमावास्या मंगळवार पावेतों मुक्काम मौजे मांदव मोही परगणे बीड येथें सुखरूप असों. विशेष. इकडील वर्तमान मोंगलांचे मुक्काम राक्षसभुवना पासून जवळच आहेत. त्यास आम्हांस आठ कोसांची तफावत आहे. त्यांचें लष्कर तोफा वगैरे बाजार बुनगें गंगापार झालें. सात आठ तोफा व सात आठ हजार फौज अलीकडे आहे. राजश्री जानोजी भोंसले सेना साहेब सुभा मोंगला पासून रुसकत होऊन गेले. गंगेच्या अलीकडील तीरानेंच बारा चौदा कोस खालीं गेले. या प्रमाणें कालची बातमी आली. बसालतजंग ही काली रुसकत होऊन आपले स्थळास जावया करितां गेले. उदईक प्रातःकाळीं येथून कूच होऊन ( आम्हीं ) मोंगलांचे मोहल्यावर जाणार. कदाचित गांठी पडेलसें दिसतें. येणें प्रमाणें वर्तमान आहे. वडिलांस कळावें ह्मणून लिहिलें आहे. राजश्री महाराव जानोजी निंबाळकर यांसीं आषाढ वद्य द्वादशी शनिवारीं देवाज्ञा झाली. त्यांची स्त्री समागमें ( सती ) गेली. जानबा निंबाळकर यांचे पुत्र दाजी यांस फार बरें वाटत नव्हतें याज करितां मोंगला पासून निरोप घेऊन ते बिडास आले होते. तेथें ते ही देवाना पावले. भोंसल्यांचा मजकूर व बसालतजंग याचा मजकूर पुरवणी पत्र अलाहिदा लिहिलें

१ हें पेशव्याचें गोपिकाबाईस पत्र. २ निरोप. ३ हें पुरवणी पत्र पुढील नंबरचें होय.

आहे त्यावरून सविस्तर विदित होईल. वडिलांचें पत्र छ० २३ मोहरमचें आलें तें पावलें. आतांच संध्याकाळीं पावलें. बहुत काय लिहिणें हे विज्ञापना.

पै॥ छ० ४ सफर.

नं० ३३१L

( ९ आगस्ट. )

श्री.

पुरः० तीर्थरूप मातुश्री बाई वडिलांचे सेवेशीं

विनंती उपरी. भोंसले मोंगला पासून निघोन गेले ते येथील अनुसंधान करूनच गेले. गंगेस पाणी फार आहे. मोंगलाचा कारखाना तोफा वगैरे पलीकडे गेले. सडा मात्र थोड्याशा तोफा व गाडदी व पांच सात हजार फौज इतकीच राहिली आहे. आम्हीं ही त्याच रोखें दोन तीन कूच करून मोंगलाकडेच येतों, तेव्हां मोंगलाची आमची गांठ पडेल हा अर्थ जाणूनच निघून गेले. दोन चार दिवसांत भोंसल्याच्या व आमच्या भेटी होतील. कांहीं गुंता पडणार नाहीं. बसालतजंगाचा मजकूर तर —— त्याचें येणें राहिलें. मल्हारजी होळकर यांचे विद्यमानेंच ( त्याचें राजकारण ) झालें होतें. त्यास त्याचे करार मदार होते त्या मध्यें अलीकडे अधिक आगळें बोलूं लागला. दौलताबाद किल्ला करारांत द्यावयाचा नव्हता. हल्लीं मागूं लागला. व [ त्याची ] फौज ही थोडी त्यास दोन लक्ष रुपये दरमहा, निदानीं दीड लक्ष रुपये द्यावे लागतात. प्रस्तुत सरकारांत रुपयाची ओढ फारच आहे. असा प्रकार जाणून मल्हारजी होळकर यांचेच मतें तूर्त निरोप द्यावा असा प्रकार होऊन त्यास सांगितलें कीं, तुम्हीं तूर्त

१ मोंगलास सोडून भोंसले निघून गेले.

## रुसलेल्या सरदारांची समजूत

भागानगर प्रांतांत जाऊन चार रुपये मिळवावे. फौज ताजी करावी. तूर्त निजामअल्लीखान शहरीस जातात. पुढें बाजत बरसात सराईच्या दिवसांत येऊन पोहोंचावें. अशीं कित्येक राजकारणें बोलून चालून पुढें राजकारण राखून तूर्त मल्हारबाचे विचारें त्यास निरोप दिला आहे. रवाना छ० २८ मोहरम. बहुत काय लिहिणें हे विज्ञापना.

नं० ३३२L

[ १० आगस्ट. ]

श्रीगणराज.

तीर्थरूप मातुश्री बाई वडिलांचे सेवेशीं.

अपत्यें गोपाळानें कृतानेक साष्टांग नमस्कार, विज्ञापना. तागायत श्रावण शुद्ध प्रतिपदा बुधवार पावेतों वडिलांचे आशीर्वादें समस्त मंडळी सुद्धां सुखरूप असों. विशेष. आम्हीं अविंधाचे लष्करांतून श्रीमंतांनीं कृपा करून बोलाविलें ह्मणोन निघून मंगळवेढ्यास आलों, आणि श्रीमंतांच्या सेवेशीं आलों ह्मणोन लिहून पाठविलें; उपरांतिक श्रीमंतांनीं राजश्री नारो शंकर व राजश्री विसाजी नारायण यांस आम्हांकडे पाठविलें. उभयतांनीं कितेक प्रकारें श्रीमंतांचे कृपेचीं उत्तरें सांगितलीं. त्यावरून आम्हीं आजी स्वार होऊन श्रीमंतांकडे गेलों. सेवेशीं विदित व्हावें. कुटुंबें जागां जागां होतीं तीं सारीं मंगळवेढ्यांस आणिलीं. पुढें श्रीमंत रहावया स्थळ देतील ते स्थळीं येऊं. सदैव कृपापत्रीं सांभाळीत असावें हे विज्ञापना.

---

१ औरंगाबादस. २ हें गोपाळराव पटवर्धनाचें गोपिकाबाईस पत्र.

नं० ३३३L

( १० आगस्ट. )

श्री.

तीर्थरूप मातुश्री बाई वडिलांचे सेवेशीं.

अपत्यें माधवरायानें दोनी कर जोडून साष्टांग नमस्कार विनंती. येथील कुशल तागायत श्रावण शुद्ध प्रतिपदा[1] बुधवार दोन प्रहर दिवस. वडिलांचे आशीर्वादें करून मुक्काम घोडराई परगणे बीड ( येथें ) सुखरूप असों. विशेष. आजच प्रातःकाळीं मोंगलाचे मुकाबल्यास फौज तयार करून गेलों. निजामअल्लीखान गंगापार होते. वरकड सरदार कुल अलीकडे होते. त्यांचें आमचें झुंज झालें. फार निकडीचें हत्यार झालें. त्यांचा मोड झाला. आमची फत्ते झाली. त्यांजकडील सरदार ठार झाले व धरून आणिले व आम्हांकडील सरदार ठार झाले व जखमी यांची यादी अलाहिदा पाठविली आहे त्याजवरून कळेल. वरकड मागाहून तपशीलवार लिहून पाठवूं. रवाना छ० २९ मोहरम. बहुत काय लिहिणें हे विज्ञापना.

पै॥ छ० ४ सफर. श्रावण. रविवार. तिसरा प्रहर.

नं० ३३४L

( श्रावण शुद्ध प्रतिपदा
१० आगस्ट. )

श्री.

यादी मोंगलाच्या लढाईंत ठार व जखमी झाले व पाडाव आले सरदार.[2]

१ हें पेशव्यांचें गोपिकाबाईस पत्र. २ ही यादी लढाई झाल्या बरोबर त्याच दिवशीं लिहिलेली असल्या मुळें ही पूर्ण नाहीं. मोंगलाकडून पाडाव आलेल्या कित्येक सरदारांचीं नांवें पुढील पत्रांतून आलेलीं आहेत तीं येथें दाखल केलेलीं नाहींत.

निII मोंगल.

खुद्द निजामअल्ली गंगेपलीकडे होते ते दोनशें राउतांनिशीं पळोन गेले. बाकी फौज राहिली त्याशीं युद्ध झालें. त्या पैकीं धरून आणिले व ठार झाले—

३ ठार झाले.
- १ विठ्ठल सुंदर याचें डोचकें कापून आणिलें.
- १ विनायकदास ठार झाले.
- १ खंदारचा राजा ठार झाला.

३

३ पाडाव.
- १ मुरादखान.
- १ माधवराव पिंगळे.
- १ बाबूराव जंगी.

३

निII सरकार.

५ ठार झाले.
- १ महादाजीराव निंबाळकर.
- १ खेळोजीराव पाटणकर.
- १ चिंतो कृष्ण चिमणगांवकर.
- १ देवजी नारायण.
- १ मानसिंग रजपूत.

५

३ जखमी.
- १ माधवराव नरसिंग. पागा हुजूर.
- १ हरिपंत[2] भिडे. हात तुटला.
- १ शंकराजी घोरपडे.

३

नं० ३३५L०

( श्रावण शुद्ध द्वितीया
११ आगस्ट. )

श्री.

अखंडितलक्ष्मी अलंकृत राजमान्य राजश्री व्यंकाजी माणकेश्वर[3] गोसावी यास—

१ या सरदाराचा पणतू वीस वर्षां पूर्वीं पुण्यांत आचाऱ्याचा धंदा करीत असे अशी माहिती मिळल्ये ! कालगति विचित्र आहे. २ हरिपंत भिड्याविषयीं अधिक माहिती मागें नं० १९३ च्या पत्रा खालीं एका टिपेंत सविस्तर दिली आहे. ३ हा व्यंकाजी माणकेश्वर कोण हें माहीत नाहीं.

सेवक माधवराव बल्लाळ प्रधान. नमस्कार. सुहुसन आर्बासितैन. मया व अल्लफ. तुम्हीं गेलां ते समयीं आज्ञा करणें ती केली होती. त्या नंतर तुम्हीं जाऊन बहुत एकनिष्ठेनें चाकरी चुकरी केली, हें सर्व ध्यानांत आहे. तुम्हीं पुरातन. एक निष्ठ. तुम्हांपासून कोणे ही गोष्टीची खत्ता होणार नाहीं हे निशा आहे. पुढें ही येथील लक्ष राखून एक निष्ठेनें सेवा करीत जावी. काल छ० ३० मोहर्रमीं विठ्ठल सुंदर वगैरे सात आठ हजार फौज व चार पांच हजार गाडदी गंगे अलीकडे राक्षसभुवनावर होते. निजामअल्लीखान बाजार बुनगें घेऊन गंगेपार उतरून गेले तों यांची आमची गांठ पडली. मोठी लढाई झाली. श्रीकृपेनें विठ्ठल सुंदर, विनायकदास, खंदारकर गोपाळसिंग, अगदीं ठार झाले. या खेरीज मुरादखान, पिंगळे, पाटणकर, बाबूराव जंगी वगैरे सरदार पाडाव आले. यश मोठें आलें. पुढें गंगा उतरून निजामअल्लीखान पळून औरंगाबादेस गेला, त्याचे पारिपत्यास जाणेंचा विचार होत आहे. भोंसले आदिकरून इकडील सरदार गेलेले आले. लौकरच येऊन भेटतील. जाणिजे. छ० १ सफर. बहुत काय लिहिणें.

नं० ३३६[L]

[ श्रावण शुद्ध द्वितीया
११ आगस्ट. ]

श्री.

तीर्थरूप मातुश्री बाई वडिलांचे सेवेशीं.

अपत्यें रघुनाथानें चरणावरी मस्तक ठेऊन साष्टांग नमस्कार विज्ञापना. येथील क्षेम तागायत छ० १ सफर पावेतों यथास्थित असे. विशेष. नबाब राक्षसभुवना जवळ गंगा उतरत होता इतक्यांत गांठ घालून

---

१ नुकसानीं. २ खात्री. ३ हें दादासाहेबांचें गोपिकाबाईस पत्र.

कांहीं काम होईल तरी करावें यास्तव जलद येऊन लढाई केली. वडिलांचे आशीर्वादें यश आलें. विठ्ठल सुंदर व विनायकदास वगैरे कुल सरदार मारले गेले. ( कांहीं ) धरिले. थोडे बहुत पळोन गेले. एकटे नबाव मात्र पलीकडे राहिले होते ते ही अर्ध रात्रीं बुनगें व डेरे टाकून पळोन शहरास गेले. गंगेनें ( नबाबाची ) मोठी कुमक केली! सविस्तर वर्तमान चिरंजीवांनीं लिहिलें आहे त्यावरून कळेल. बहुत काय लिहिणें हे विज्ञापना.

नं० ३३७L

[ श्रावण शुद्ध द्वितीया
११ आगस्ट. ]

श्री.

तीर्थरूप मातुश्री बाई वडिलांचे सेवेशीं.

अपत्यें माधवैरायानें चरणावरी मस्तक ठेऊन साष्टांग नमस्कार विज्ञापना येथील क्षेम तागायत छ० १ सफर पावेतों वडिलांचे आशीर्वादें यथास्थित असे विशेष. मोंगल राक्षसभुवैनावरी गंगा उतरोन जात होता. बाजार बुनगें व कांहीं फौज उतरली. दहा पंधरा हजार फौज सडी राहिली. त्यांचें पारपत्य करावें याज करितां छ० २९ मोहरमीं जाऊन पोंहचलों. विठ्ठलदास आदिकरून सरदार लढाईस उभे राहिले. चार सहा घटका लढाई मातबर झाली. विठ्ठलदास व विनायकदास व ईस्मालखान व गोपाळसिंग ठार झाले, व बाबूराव जंगी व उदाजी पवार व मुरादखान व जोत्याजी घाटगे व मालोजी घोरपडे व बाबूराव जाधव, व रघुपतराव

१ सर्व. २ अर्थात् माधवराव पेशव्यांनीं. ३ हें पेशव्यांचें गोपिकाबाईस पत्र. ४ हा इलिचपुरचा नबाब. हा मारला गेल्याचें येथें लिहिलें आहे हें खरें नव्हे. तो लढाईच्या गर्दीत गोदावरी उतरून पळून गेला.

पिंगळे पाडाव करून आणिले. तोफा सांपडल्या. श्रीकृपेनें मोठी फत्ते झाली. हें संतोषाचें वर्तमान वडिलांस कळावें सेवेशीं श्रुत होय हे विज्ञापना. पै॥ छ० ७ सफर.

नं० ३३८L

( श्रावण शुद्ध तृतीया
१२ आगस्ट. )

श्री.

रा० रा० रामचंद्र नारायण गोरे गोसावी यांस.

सेवक माधव बल्लाळ प्रधान नमस्कार सुरुसन आर्बा सीतैन मय्या व अल्लुफ. निजामअल्ली धारुरा वरून दर मजल राक्षसभुवनावर गंगा दक्षिण तीरीं दाखल होऊन बाजार बुनगें उत्तरतीरीं उतरलें. आपण ही खासा सडे स्वारीनेंच उतरला. वरकड तमाम सरदार व राजे विठ्ठलदास व विनायकदास सर्व ही दक्षिणतीरीं राहिले. हे बातमी आल्या नंतर बिडा वरून दर मजल मुक्काम मजकुरास आलें. लढाई झाली. विठ्ठल सुंदर व विनायकदास व खंदारकर राजे वगैरे मातबर सरदार ठार झाले. कांहीं मुरादखान, सुपेकर वगैरे पाडाव आले. आपणास कळावें ह्मणून लिहिलें असे. जाणिजे. छ० १.सफर बहुत काय लिहिणें.
पै॥ छ० सफर.

नं० ३३९L

( श्रावण शुद्ध षष्ठी
१४ आगस्ट. )

श्री.

तीर्थरूप मातुश्री बाई वडिलांचे सेवेशीं.

---

१ हा गोपिकाबाईचा विश्वासू कारकून होता हें पूर्वीं लिहिलेंच आहे. २ शहाजी सुपेकर हा मोंगलाचा एक सरदार.

अपत्यें माधवरायानें चरणावरी मस्तक ठेऊन साष्टांग नमस्कार विज्ञापना. येथील क्षेम तागायत छ० ४ सफर मुक्काम नजीक पैठण गंगा दक्षिणतीर येथें वडिलांचे आशीर्वादें करून सुखरूप असों. विशेष. वडिलीं पत्र पाठविलें तें पावलें. लिहिलें वर्तमान कळलें. इकडील वर्तमान लढाईचें पूर्वी सेवेशीं लिहून पाठविलें त्यावरून विदित झालेंच असेल. लढाई झाल्यावर मोंगल पलीकडे होता तो कायम राहून तोफांची व बाणांची मारगिरी करील असें वाटत होतें. परंतु लढाई झाली त्याच रात्रीं कूच करून शेहरास गेला. दहा तोफा व गोळे दारू व डेरे दांडे ( तळावर ) राहिले. सरदार फार करून विठ्ठल सुंदर याजकडील राहिले होते त्यां पैकीं कांहीं मारले गेले, व कांहीं पाडाव आले, व कांहीं थोडेसे पळाले. तसेच आपणाकडील ठार व जखमी झाले त्यांची याद अलाहिदा नांवनिशीवार लिहून पाठविली आहे त्यावरून विदित होईल. पूर्वी दोन तीन लढाया झाल्या परंतु मोंगलास या तऱ्हेची जरब कधींच बसली नव्हती. विठ्ठलपंतासारखा कारभारी इतबारी मर्द मोंगलास मिळणें नाहीं. व त्याची गत अशी झाल्यावर ते बहुत घाबरे होऊन पळाले. शहरास गेले. तोफा त्यांजकडील अलीकडच्या व पलीकडील मिळून कमपेश वीस पर्यंत राहिल्या. व त्यांजकडील घोडीं, उंठ, बैल वगैरे लूट लष्करांत बहुत आली. व पंधरा हत्ती लष्करांत पाडाव आले. वडिलांचे पुण्यप्रभावेंकरून या प्रमाणें वर्तमान झालें तें सेवेशीं लिहिलें असे. जानोजी भोंसल्यास आणावयास सखारामपंत गेले होते ते घेऊन आले. चतुर्थीचे दिवशीं भेट झाली. पुढें कर्तव्याचा मजकूर आज ठरेल तो मागाहून लिहून पाठवीन. वडिलांस कळावें. सेवेशीं श्रुत होय. हे विज्ञापना. पै।। छ० ९ सफर.

---

१ हें पेशव्यांचें गोपिकाबाईस पत्र. २ औरंगाबादेस. ३ नानासाहेब व थोरले बाजीराव पेशवे यांच्या कारकीर्दींत. ४ नवाब निजामअली.

नं० ३४०

( श्रावण शुद्ध अष्टमी
१६ आगस्ट )

श्रीगणराज.

राजश्री रामचंद्र नारायण गोरे गोसावी यांसीं.

सु॥ आर्बासीतैन मय्या व अलफ. तुम्हांकडून बहुत दिवस पत्र येऊन वर्तमान कळत नाहीं तरी सविस्तर वर्तमान लिहून पाठवावें. वरकड इकडील वर्तमान तर छ० २९ मोहरमीं नबाबांची फौज व विठ्ठलपंत, विनायकदास, [ वगैरे ] सर्व सरदार गंगे अलीकडे राक्षसभुवना नजीक उतरले होते. त्याची बातमी राखून कूच करून त्यांजवर चालून जाऊन लढाई केली. तेव्हां त्यांची लढाई बिघडली. विठलपंताचें डोचकें कापून आणिलें. व विनायकदास कामास आले. तैसेच खंदारचे राजे ही मृत्यु पावले. वरकड. सरदार सर्व पाडाव आले त्यांची यादी व सरकारच्या लोकांची यादी सर्व तीर्थरूप मातुश्री बाईच्या पत्रीं लिहिलें आहे त्यावरून कळेल. वरकड वर्तमान सविस्तर हमेशा लिहून पाठवावें. जाणिजे. छ० ६ सफर. बहुत काय लिहिणें.

नं० ३४१

(श्रावण शुद्ध नवमी
१७ आगस्ट. )

श्री.

राजश्री कृष्णाजी गोविंद गोरे गोसावी यांसीं.

सुहूरसन आर्बा सीतैन मय्या व अलफ. तुम्हांकडून बहुत दिवस पत्र

---

१ हें पेशव्यांनीं लिहिलेलें पत्र. २ मरण पावले. ३ हें ही पेशव्यानींच लिहिलेलें पत्र.

येऊन वर्तमान कळत नाहीं. तरी सदैव तुमच्या शरीर प्रकृतीचें वर्तमान प्रस्तुत तुम्हीं कोठें आहां, व तुम्हांस आम्हीं पूर्वीं पत्र पाठविलें तें पावलें किंवा नाहीं, हें सविस्तर लिहिणें. वरकड इकडील वर्तमान तर छ० २९ मोहरमीं नबाब गंगेच्या पार गेले होते. वरकड बुनगें बाजार बहुत करून गेलें होतें. व अलीकडे विठ्ठलपंत वगैरे सर्व सरदार राक्षसभुवनावर उतरले होते. त्यास त्यांची बातमी राखून त्यांजवर जाऊन लढाई केली. त्यांचा मोड झाला. विठ्ठलदास, विनायकदास मृत्यु पावले. तसेच खंदारकर ही कामास आले. वरकड सरदार बहुत करून पाडाव आले त्यांचीं नांवें:— मुरादखान, बाबूराव, जयाप्पा जाधव, बाजीराव पाटणकर, उदाजी पवार, शिवराव पवार, रघुपतराव पिंगळे, हणमंतराव निंबाळकराचे पुत्र, अजमखान पठाण अलजपुरकर, महमद गाजेखान, मीरमुस्साखान, या प्रमाणें पाडाव आले. वरकड सरदार पळाले व कित्येकांचें ठिकाण नाहीं. या प्रमाणें इकडील वर्तमान आहे. पुढें जें वर्तमान होईल तें लिहून पाठवीन. जाणिजे. छ० ७ सफर बहुत काय लिहिणें.

नं० ३४२L

( श्रावण शुद्ध नवमी
१७ आगस्ट. )

श्री.

तीर्थरूप मातुश्री बाई वडिलांचे सेवेशीं.

अपत्यें माधवरायानें चरणावरी मस्तक ठेऊन साष्टांग नमस्कार विज्ञापना. येथील क्षेम तागायत छ० ७ सफर मुक्काम पैठण, दक्षिणतीर, येथें वडिलांचे आशीर्वादें करून सुखरूप असों. विशेष. इकडील वर्तमान

१ पत्र पेशव्यांचें गोपिकाबाईस.

निजामअलीखान त्याच दिवशीं कूच करून शहरास गेले. त्या दिवशीं त्यांच्या तोफा व दारूगोळे वाटेनें राहिले व तळावर राहिल्या होत्या त्या तोफा सरकारांत आणिल्या. वरकड दारूगोळे अलीकडील व पलीकडील सर्व सरकारांत आलें. प्रस्तुत ते शहरास गेले आहेत. पुढें पहावें काय करितात. प्रस्तुत गंगेचें पाणी उतरत आहे. पुढें उंटाचा उतार झाला म्हणजे पार जाऊं. पुढें जें वर्तमान होईल तें सेवेशीं लिहीन. हे विज्ञापना.*

घे।। छ० १२ सफर.

---

१ राक्षसभुवनची लढाई झाली त्याच दिवशीं. * राक्षसभुवनच्या लढाई संबंधें नं० ३३३ पासून एकंदर हीं दहा पत्रें छापिलीं आहेत. नं० ३३३ चें पत्र लढाई झाल्या बरोबर लिहिलें आहे. त्यांत मोंगलाच्या फौजेचा पराजय झाला व आमची फत्ते झाली इतकाच मजकूर आहे व नं० ३३४ ची यादी त्याच वेळीं लिहिलेली आहे तींत तीन सरदार मोंगलाचे मारिले व तीन धरून आणिले एवढाच तपशील आहे. या वरून हें उघड होतें कीं, हें पत्र व यादी पेशव्यानीं लिहिली त्या वेळीं पाठलागास गुंतलेली त्यांची फौज अद्यापि गोटास परत आलेली नव्हती व लढाईचे परिणाम काय काय झाले याची इत्थंभूत हकिगत त्या वेळीं त्यांस कळली नव्हती व तशी ती त्यांस कळण्याचा मार्ग ही नव्हता. नंतरचीं पत्रें कांहीं दुसरे व तिसरे व चवथे दिवशीं व त्या नंतरचीं लिहिलेलीं आहेत त्यांत मुख्य मुख्य गोष्टी जरी त्याच लिहिलेल्या आहेत तरी बारीक-सारीक हकिगत प्रत्येक पत्रांत कांहीं तरी नवीन आहेच. सर्व पत्रांतून एकंदर इत्यर्थ निघतो तो हा —— बाजार बुणग्यासह निजामअली गोदावरी उतरून गेल्यानंतर मागें दक्षिणतीरीं दहा पंधरा हजार फौज व गारदी व तोफखाना घेऊन विठ्ठल सुंदर राहिला होता त्यावर पेशव्यांचें सैन्य येऊन पडलें. चार सहा घटका निकराचें युद्ध होऊन मोंगलाचा मोड झाला. विठ्ठल सुंदर, विनायकदास व खंदारचा राजा हे मारले गेले व उदाजी पंवार, जोत्याजी घाटगे, मालोजी घोरपडे, बाबूराव जंगी, माधवराव व रघुपतराव पिंगळे, बाबूराव जाधव, शहाजी सुपेकर, जयापा जाधव, बाजीराव पाटणकर, शिवराव पवार, हणमंतराव निंबाळकराचा पुत्र, मुरादखान, अजमखान पठाण अलजपूरकर, महमद गाजेखान, मीरमुस्साखान हे सोळा सरदार पाडाव सांपडले शिवाय मोंगलाच्या कमींत कमी वीस तोफा व पंधरा हत्ती, घोडे, उंटें, बैल, डेरे राहुट्या वगैरे सर्व सामान मराठ्यांच्या हातीं

नं० ३४३

( अजमासें श्रावण वद्य
आगस्टचा दु०पंधरवडा. )

श्रीगणपति.

अपत्यें साष्टांग नमस्कार. अर्विधाच्या लष्करचें वर्तमान लिहिलें तें

---

१ हें अंताजी विठ्ठल पटवर्धन यादवाडकर यांचें गोविंद हरीस पत्र.

( मागील पृष्ठावरून पुढें चालू )

सांपडलें. डफ् साहेबाच्या इतिहासांत मोंगलानीं मराठ्यांशीं दोन दिवस पर्यंत निकरानें टक्कर दिल्याचें लिहिलें आहे तें चूक आहे हें खुद्द पेशव्यांचीं इतक्या वेळ पर्यंत छापलेलीं पत्रें वाचिलीं असतां कळून येईल. या लढाईचा शेवट प्रहर दोन प्रहरांत झाला असला पाहिजे. नं० ३३७ च्या पत्रांत तर चार सहा घटका मातबर लढाई झाल्याचेंच लिहिलें आहे. आमच्या ' संग्रहां ' त या लढाई विषयीं जी माहिती आली आहे तिज पेक्षां इतर ग्रंथांत कांहीं अधिक माहिती आली आहे, यास्तव त्या त्या ग्रंथांतून या खालीं उतारे दिले आहेत.

" मोंगलांची फौज औरंगाबादेकडे चालली असतां रघुनाथराव कांहीं मजलीं त्यांच्या पिछाडीवर आला. गोदावरीवर येतांच कांहीं फौजेनिशीं निजामअली पार उतरून गेला व बाजार बुनगें पार होई तों त्यानें बाकीच्या फौजेसह दिवाण विठ्ठल सुंदर यास दक्षिणतीरीं ठेविलें. इतक्यांत दिवाणानें आपणास फौजेच्या खर्चा करितां पैका द्यावयाचा तो दिला नाहीं असें मिष करून जानोजी भोंसले मोंगलाच्या लष्करांतून निघून कांहीं अंतरावर जाऊन उतरला. ती खूण पोंचतांच रघुनाथराव झपाट्यानें चाल करून मोंगलावर हल्ला करिता झाला. तेथें तुमूल युद्ध होऊन मोंगल बेसुमार मारले गेले व त्यांचा पूर्ण पराजय झाला. मारिले गेलेल्या सरदारांत विठ्ठल सुंदर होता. मोंगलाचीं दोन दिवस पर्यंत निकरानें युद्ध चालविलें होतें. प्रत्येक हल्ल्यांत रघुनाथराव पुढारी असे. एकदां तर तो शत्रूच्या फौजेंत एकटाच सांपडला होता. पण पुतण्याकडून कुमक येई पर्यंत तो निकरानें लढत होता व त्याचा सोबती सखाराम हरि हा त्याजवळ होता तो ही शौर्यानें लढत होता, या मुळें त्याचा बचाव झाला. त्या तरुण [ माधवराव ] पेशव्यानें या युद्धांत स्वतः फार पराक्रम केला. त्यानें आपल्या चुलत्यास व हल्ल्याच्या निरनिराळ्या जागीं योग्य वेळीं जशी पाहिजे तशी कुमक

कळलें. श्रीमंतांस मोठें यश प्राप्त झालें. भोंसले यांचें राजकारण होतें ह्मणूनच ( या ) गोष्टी घडून आल्या. आणखी कांहीं अलीकडचें वर्तमान

---

केली या मुळें व त्याच्या शौर्यामुळें त्याची वाहवा विशेषच झाली. या युद्धांत दोहीं पक्षीं फार मोठें नुकसान झालें व असें सांगतात कीं, या प्रसंगीं मोंगलांचे दहा हजार लोक मारिले गेले. दमाजी गायकवाडाच्या हाता खालच्या एका टोळी पैकीं कोणी विठ्ठल सुंदर यास वार करून ठार मारिलें. परंतु मरण्या पूर्वी त्यास गोळीची जखम त्याच्याच फौजेपैकीं कोणाच्या हातून चुकून झाली होती. त्याचा प्रतिस्पर्धी मुरादखान यानेंच कोणाकडून तरी त्यास जखमी करविलें असा त्याजवर आरोप आहे तो निर्मूल दिसतो. होळकराच्या फौजेंत गिलच्यांची टोळी होती तिनें विठ्ठल सुंदराचें डोकें कापून तें भाल्यास टोंचून लष्करांतून मिरविलें." ग्रांटडफ्चा इतिहास.

"चार घटका रात्र असतां जलदी करून नबाबाच्या फौजेचें कुच होऊन गंगा उतरून चालिले. रघुनाथराव दादासाहेब यांजकडून फौजेची तयारी जाहली. परंतु दादासाहेबांस नेम अर्घ्यप्रदानाचा, सबब विलंब लागला. इतक्यांत नबाबाकडून फौज तयार होऊन मुकाबल्यास आली. व विठ्ठल सुंदर राजे बहादर पिछाडीस, फौज गंगा आडून उतरून पार पलीकडे जावें तों त्यांचे अडचणीचे संधींत अघाडीस. नबाब जातीनें होते त्यांजवर न जातां राजे बहादर याजवर काबूची वेळ पाहून दादासाहेब चाल करून आले. यांशीं त्यांशीं गांठ पडली व लढाई राक्षसभुवनचे मुकामीं मातबर जाहली. दादासाहेबांकडील फौजेशीं जंग भारी होऊन शेवटीं राजे बहादर यांणीं हत्ती पळवून दादासाहेबांचे हत्तीस टक्कर दिली. सबब दादासाहेबांचा हत्ती कच्चा पडून माघारी पळाला. राजे बहादरांचे हत्तीनें दादासाहेबांचे हत्तीचें शेंपूट दांतांत धरून टकरा मारित चालला. हें पाहून मल्हारजी होळकर व फौज व महादजी नाईक निंबाळकर जमावानिशीं दरम्यान येऊन आपला हत्ती चालविला. जवामर्दी विशेष करून उभयतांचे हत्तीची लगट तोडिली. तेव्हां दादासाहेबांस फुरसत पडून लढाई मातबर झाली. शेवटीं महादाजी नाईक निंबाळकर यांचे कडील वकिलानीं ( ? ) राजे बहादरांस गांठून मारिलें. दोन्हीकडील हौदे एकंदम खालीं जाहले. याजवरून नबाबानीं शिकस्त खाऊन पंतप्रधानांस यश आलें." नागपुरकर भोंसल्यांची बखर.

"मोंगल व भोंसले राक्षसभुवनास गंगातीरीं गेले. श्रीमंत आषाढ वद्यपक्षीं मादलमोहीचे घांटावर येऊन पोंचले. दुसरे दिवशीं श्रावण शुद्ध प्रतिपदेस कूच होऊन

आलें असलिया लिहावें. युद्ध झाल्यावरी श्रीमंत कोठें आहेत, नबाब कोठें

---

मुकाबला व्हावा तों भोंसले व प्रतिनिधि मोरो बाबूराव [ फडणीस ] यांचीं राजकारणें येऊन ते निराळे राहिले. मोंगल रात्रीं गंगा पार गेला. दिवाण विठ्ठल सुंदर फौजे सुद्धां ऐलतीरीं असतां सदाशिव रामचंद्र वगैरे त्याजवळ होते. तों सरकार फौज व उभयतां श्रीमंत चालून गेले. अघाडीस नीलकंठ महादेव व महिपतराव चिटणीस व महादजी शितोळे मांजरीकर व माधवराव नरसी हुजूर पागे व नारो कोन्हेर व दादो पोतनीस वडगांवकर गेले. तों नबावाचे दारूस व बाणांस आग लागून बाण उडाले. त्या संधींत नीलकंठ महादेव यांजकडील हरि गोपाळ व विठ्ठल शिवदेव यांजकडील फौजेनें तोंड लाविलें. तों श्रीमंत येऊन पोंचले. नीलकंठ महादेव वगैरे मोर्चा उधळून आंत गेले. मागाहून श्रीमंत रघुनाथ बाजीराव यांचा हौदा येतांच दरम्यान कमरग्यांत विठ्ठल सुंदर व विनायकदास व इस्मायलखान पठाण· अलजपुरचा सुभा असे पांच हजार फौजेनिशीं हौद्यावर येऊन हौदा माघारा फिरविला. हौदा पुढें, मागें पठाणांची फौज चालली. सरकार फौजेचा मोड जाहला. तों ईश्वरी कौतुक — त्यांचे लोकांत बार सुटून तो विठ्ठल सुंदरास लागला. ते लोक उभे राहिले. पुढें मल्हारजी होळकर जंबुरे पसरून होता त्याची शिलक झाली. यामुळें विठ्ठल सुंदर सात अंबाऱ्या फौज सुद्धां उभा राहिला. श्रीमंतांचा हौदा निघाला. तों श्रीमंत माधवराव बल्लाळ प्रधान घोड्यावर होते ते एकीकडे उभे राहून विठ्ठल सुंदर यांच्या अंबाऱ्या उभ्या राहिल्या होत्या त्यांजवर भले लोकांस पाठवून तंटा झुज घातलें. बाबुजी नाईक व महादजी गाइकवाड श्रीमंतांस पहात आले त्यांस त्यांजवर पाठविलें, तेव्हां श्रीमंतांजवळ भगवंतराव बारवकर व महादजी शितोळे व कृष्णाजीराव पारसनीस व नारो कोन्हेर व रंगो मल्हार व भिकाजी नाईक कोलटकर असतां महादजी शितोळे यानीं ' सात अंबारींतील अंबारी मारितों ' ह्मणोन बोलले. तेव्हां करार — मांजरीगांव व हत्ती व दोनशें राउतांची सरदारी वांचून आल्यास द्यावी — हा करार श्रीमंतीं केला. तेव्हां महादजी शितोळे व नारो कोन्हेर व रंगो कोन्हेर व भिकाजी नाईक तसेच झुजावर गेले. महादजी शितोळे याणीं अंबारी मारिली. त्रिवर्गानीं ( हौद्याच्या ) तटास भोंसकून माघारे आले. माधवराव नरसी पागे वहिरीचे शिंगीवर बसले असतां झिलींत सत्तावीस जखमा लागल्या आणि घोडी मेली. तटाचें झुज पडलें. नबाबानीं गंगे पलीकडून तोफांचा मार केला. तीन प्रहर दिवस आला. अकरा कोस मजल चालून येऊन लढाई होत असतां आभाळ येऊन पर्जन्य पडला. अंधकार जाहला. पठाणानीं

आहेत, श्रीमंत गंगा उतरणार कीं काय, हें सविस्तर लिहावें. चिरंजीव

---

घोड्यांच्या कुच्चा मारिल्या. भिजत उभे राहिले. तेव्हां माधवराव बल्लाळ प्रधान चालून आले. पठाण लुटून घेतले. विनायकदास ठार पडले. तीन कोस मुर्दे पडून रण जाहलें. तेव्हां विठ्ठल सुंदरास गोळी लागली होती. त्याचा मुर्दा हत्तीवरून लोटून दिला. तें होळकराकडील गिलच्यानीं पाहिलें. धांवून येऊन गळा कापून, भाल्यावर घातलें. श्रीमंतांचीं शहाजणें वाजलीं. अस्मानी फत्ते झाली. सदाशिव रामचंद्र व शहाजी सुपेकर वगैरे घोड्यावर बसून गंगा पार गेले. कित्येक बुडाले. सरकारची फत्ते झाली. विठ्ठल सुंदर याचे अंबारींत बसून उभयतां श्रीमंत बसून गवेराई धोंडराईवर मुक्कामास येले. पर्जन्य उघडला. उष्ण पडलें. गंगेस पूर होता. बावीस उमराव अंबारीनिशीं धरिले. विठ्ठल सुंदर व पठाण व मराठी फौज तीस हजार बुडविली. "

पंतप्रधान यांची शकावली—मुंबई प्रत.

" राक्षसभुवनचे लढाईंत मोंगल याची फौज खासा मोंगल व विठ्ठल सुंदर कारभारी व इकडून सरकारची फौज व श्रीमंत दादासाहेब व श्रीमंत माधवराव साहेब या प्रमाणें जे समयीं लढाईस आरंभ झाला ते समयीं तोफखाना इकडील व तिकडील सुरू जाहला. या प्रमाणें लढाई चालली. तिकडील मोंगलाचे कारभारी विठ्ठल सुंदर याणीं साडे तीनशें हौदे तिरंदाजीचे तयार करून तिरंदाजीचा मार केला. खासा निजामअली जनानखान्या सुद्धां लढाई पासोन एक कोसावर होते. अशी लढाई होत असतां विठ्ठल सुंदर याणीं तिरंदाजीच्या हौद्यांचे हत्ती आपल्या तोफखान्याच्या पुढें घातले. तें मोंगल याणीं दुर्बिणींतून पाहिलें आणि बोलिले जे, लढाई बिघडली. आतां मोड होतो. असें ह्मणून जनानखाना सांभाळून मागें सरों लागले. तों विठ्ठल सुंदर यवनी भाषेनें आपल्या लोकांस ह्मणों लागले कीं, ' पहातां काय ! पेशवे यांचा ( दादा साहेबांचा ) हत्ती असाच वळवा ! असें ह्मणतांच त्यांच्या फौजेनें श्रीमंतांच्या अंबारीवरच गर्दी केली. ते समयीं श्रीमंतांचे खवासखान्यांतील चवरीवारदार होता तो गोळी लागून उडाला. हें पहातांच दादासाहेब यांस धीर पुरेनासा होऊन बावा महात यास बोलले कीं, हत्ती बसीव. त्याणें उत्तर केलें कीं, महाराज, ही हत्ती बसविण्याची वेळ नव्हे. जर हत्ती बसविला तर आतां लढाई बिघडेल. या प्रमाणें बोलतांच श्रीमंत पुढें सरोन त्याच्या गळ्यास धरून बोलले जे, अरे, मला मारितोस कीं काय ! मी घोड्यावर बसणार. या प्रमाणें बोलतांच फौजदार याणीं हत्ती बसविला. तों गनीम याणीं येऊन हत्ती वेढिला. इकडील फौज हत्ती बसवितांच बेदिल जाहली. तों शत्रूंनीं

राजश्री रावसाहेब यांचें दर्शन झालेचें पत्र आलें असेल तर लिहावें. मकारग्रामीं ठाणें पडलेचें वृत्त लिहावें इकडील वर्तमान तर काल धारवाडाहून पत्रें आलीं. बंकापुर हैदरनाइकानें घेतलें. गोविंदपंत चांगले झुजले. कुमक न होय तेव्हां अगोदर एक दिवस किल्ल्यांतून निघोन मग त्यांनीं कौल घेतला.. स्थळ हस्तगत झालें. गोविंदपंत कोठे आहेत हें पत्र अद्याप आलें नाहीं, परंतु खुशाल आहेत. बंकापुर घेतल्या मुळें तमाम मुलूख

---

श्रीमंतांचा हत्ती तसाच वळिला हें श्रीमंत माधवराव साहेब यानीं पाहिलें. ते दादासाहेबांच्या नजर कैदेंत होते. त्यांच्या रखवालीस हुजरातचे मानकरी खासा पांचशें असामी होते ते सारे घोड्यावर बसून तयारच होते. त्यांस श्रीमंत रावसाहेब बोलले कीं, अहो, पहातां काय ! शत्रूनें दादासाहेबांचा हत्ती वळिला आणि तुह्मीं उगीच बसतां ! तेव्हां मानकरी बोलले कीं, आमची चाकरी पहाणारा धनी कोण आहे ? श्रीमंत बोलिले जे, मी धनी नव्हें कीं काय ? तेव्हां मानकरी बोलिले कीं, आपण ज्यास हटकून मारावयास सांगाल त्यास मारूं; परंतु जें मागूं तें स्वामीनीं बक्षीस द्यावें लागेल. ते समयीं श्रीमंतांनीं आज्ञा केली कीं, विठ्ठल सुंदर याचे हत्तीवरील महात भाल्यानें जाऊन मारावा. तेव्हां महादजी शितोळे बोलले कीं, दहा हजारांचा गांव व बसता हत्ती घेईन. तेव्हां श्रीमंतांनीं कबूल केलें. नंतर महादजी शितोळे यांणीं घोड्यास येड केली आणि शत्रूच्या फौजेंत शिरले. जाऊन विठ्ठल सुंदर याचा महात भाल्यानें ठार मारिला आणि येऊन श्रीमंतांस मुजरा केला. नंतर श्रीमंतांनीं अंकली व मांजरी हे दहा हजारांचे गांव इनाम दिले ते अद्यापि शितोळे यांजकडे चालत आहेत."

हरिवंशाची बखर.

शेवटचा उतारा जींतून घेतला आहे ती हरिवंशाची ह्मणजे हरिभटबावा पटवर्धन यांच्या वंशाची बखर असून ती आंबेकर पटवर्धनां पैकीं कोणी लिहिली आहे. ती सुमारें चाळीस पन्नास वर्षां पूर्वीं लिहिली गेली असल्यामुळें 'पेशव्यां' च्या बखरीं प्रमाणें हींत सुद्धां चुक्या व विसंगतपणा ओतप्रोत भरला आहे ! या बखरीचे आह्मांस कांहीं कांहीं बंद मधले मधले मात्र मिळाले आहेत. ही सबंध बखर मिळविण्या साठीं आह्मीं पुष्कळ तलास केला पण तो सफळ झाला नाहीं.

१ रावसाहेब ह्मणजे गोपाळराव याची व श्रीमंतांची भेट झाल्याचें. २ मिरजेस. ३ गोविंदपंत सखदेव हा बंकापुरचा किल्लेदार. बंकापुर, हुबळी, मिश्रीकोट, एकोंडी हीं या पत्रांत आलेलीं स्थळें धारवाड जिल्ह्यांत पटवर्धनांच्या जहागिरींत.

भयाण झाला. येथें[1] ही डळमळ झालें आहे. हुबळी व मिश्रीकोर वगैरे ठाणीं हैदरखानानें घेतलीं. खासा बंकापुरास आहे. बंदोबस्त करीत आहे. खंदक खणवीत आहे. दाणा वैरण सामान ( किल्ल्यांत ) घालीत आहे. आंत परशुराम[2] घोरपडे व गाडदी असें पांच हजार माणूस ठेविलें. खासा तेथेंच आहे. धारवाडास मीरफैजुल्ला फौज घेऊन आला आहे असें वर्तमान आलें आहे. येसाजीराम[3] वगैरे तमाम एकोडीस आले. श्रीमंतांनीं मोंगलाची फौज बुडविली हें वर्तमान हैदरअल्ली यास कळतांच पुढें यावयाची ( त्याची ) कस्त राहिली तरी न कळे! नाहीं तरी श्रीकृष्णेपर्यंत स्वराज्य करावें अशी हैदरअल्लीची कस्त आहे. यांत भगवदिच्छा प्रमाण! अशांत कांहीं फौज व लौकिकाचा सरदार इकडे येता तरी तमाम काटक सामील होतील. हैदरनाईकाचें पारपत्य होतें[4] तें लांबणीवर पडलें. वाडीस[5] ही दंगा माजला आहे. जिवाजी विश्राम पळोन गेले. गोमांतकास गेले. तेथून फिरंगी यास सामील करून उपद्रव करणार. मर्दनगड[6] [ फिरंग्यानीं ] घेऊन पाडून टाकिला. श्रीमंतांकडील व चिरंजीव रायांकडील वर्तमान लिहून कळवावें.[7] हे विज्ञापना.

नं० ३४४

(अजमासें श्रावण शुद्ध
आगस्टचा दु० पंधरवडा.

गोपाळराव यांचें गोविंद हरीस पत्र—

---

१ ' येथें ' कोठें? कदाचित् ' शिरहट्टी येथें ' असें वाटतें. २ परशुराम घोरपडे सांवशीकर हा हैदराकडे या पूर्वींच मिळालेला होता. ३ येसाजी राम हा पेशव्यांचा धारवाड येथील मामलेदार. ४ झालें असतें. ५ सावंताच्या वाडीस. तेथें विठ्ठल विश्राम ह्मणून तेथील देसायाचा कारभारी होता त्याचा हा भाऊ जिवाजी विश्राम. ६ मर्दनगड [ फोंडा ] हा गोमांतकाच्या हद्दीवरचा पेशव्यांचा किल्ला. ७ गोपाळरावाकडील.

" प्रस्तुत श्रमितांचे लोक तमाम फुटून जात आहेत. गंगेस पाणी भारी. नदीस नाव नाहीं असें मोगलानें केलें आहे. त्यानें नावा जमा केल्या होत्या त्या अगदीं फोडून बुडवून टाकिल्या. नाव नाहींशी केली याजमुळें पलीकडे उतरावयाचा सध्या लाग दिसत नाहीं. मोंगलाचें याप्रमाणें काम. जाहलें. या उपरी मीर आवेस ही उपसर्ग करणार नाहीं. ( त्याचा ) दम सुलाख होईल. तथापि बातमी रक्षावी. "

नं० ३४५

( श्रावण शुद्ध द्वादशी
२० आगस्ट )

श्रीगणराज.

अपत्यें साष्टांग नमस्कार विज्ञापना. तागायत छ० १० सफर. मुक्काम निंबगांव नजीक पैठण. येथें यथास्थित असे. विशेष. अष्टीहून कूच केलें ते नागतळ्यावर आलों. तेथून मानुरा पुढें कोरडगांवास मुक्काम करून ( श्रीमंतांचे ) सैन्य नजीक, यामुळें दुसरा ही मुक्काम तेथेंच केला. कां जे, मुहूर्त ( श्रीमंतांचे भेटीचा ) आज मंदवारीं तिसरे प्रहरीं. नजीक जाऊन राहिल्यानें लोकांस मुहूर्ता साठीं राहिलों हें कळणार नाहीं. यास्तव कोरडगांवींच मुक्काम केला. काल मुक्काम मजकुरास आलों. आज राजश्री नारो शंकर यांच्या गोटा नजीक मुक्काम करविला. श्रीमंत राजश्री पंतप्रधान सामोरे येणार असें [ ठरलें ] आहे. आले तरी उत्तम. नाहीं तर आम्हीं कांहीं ओढून धरीत नाहीं. डेऱ्यासच जाऊन उभयतां ( श्रीमंतांचीं ) दर्शनें घेऊन आपल्या डेऱ्यास जाऊं. विदीत होय. भेटी नंतर तेथील व-

१ निघून घरोघर जात आहेत. २ निजामअल्लीचा भाऊ मीरमोंगल याचा बक्षी मीर आबस विजापुर प्रांतीं दंगा करीत होता. ३ हें गोपाळरावाचें गोविंद हरीस पत्र. सदरहू प्रमाणें पुढचेंच नं० ३४६.चें.

र्तमान कळेल तेणें प्रमाणें सेवेशीं लिहितों. नबाब शहरीं काळ्या चौथऱ्यावरी मुक्काम करून दहा हजार फौजेनिशीं आहेत. त्यांची फौज शहरीं होती तेही जमा झाली आहे. सदाशिव रामचंद्र, शहाजी सुपेकर, ईस्मायलखान असे ( युद्धांतून ) वांचोन गेले. मुरादखान इकडे सांपडला त्याचे हस्तें संधान लागलें आहे. काल मकोर नामक बोलोन शहरास गेले. तह कोणे प्रकारचा होतो हें मागून सविस्तर लिहितों. राजश्री बाबूजी नाईक रुसून टोंक्यास गेले. सरंजाम देशीं मागतात. विदित होय. आम्हीं जाऊन पैठणावर आज श्रीमंतांचें दर्शन घेतों. पुढें तेथील रागरंग कळेल तेणें प्रमाणें जो विचार करणें तो करूं. हेंकडपण करीत नाहीं. विदित होय हे विज्ञापना.

नं० ३४६

( श्रावण शुद्ध चतुर्दशी
२२ आगस्ट. )

श्रीगणराज.

अपत्यें साष्टांग नमस्कार विज्ञापना तागायत छ० १२ सफर. मुक्काम पैठण येथें वडिलांचे आशीर्वादें करून समस्त क्षेम असों. विशेष. आम्हीं निंबगांवाहून मंदवारीं प्रातःकाळीं बुनगें लावून दिलें. राजश्री नारो शंकर यांच्या गोटानजीक रहावयासीं आम्हीं सडे अडीच प्रहर दिवसास आलों ते तेथेंच राहिलों. तदनंतर स्वार जाहलों ते पंचविसावे घटकेस लष्करानजीक आलों. तों उभयतां यजमानि व आबा पुरंदरे व कांहीं भले लोक व लक्ष्मणराव रास्ते असे पुढें आले. भेटी जाहल्या. आम्हीं व चिरंजीव राजश्री नीलकंठराव व भाऊ यानीं श्रीमंतांस नजरा करून तदुत्तर भेट घेतली. सर्व मंडळी आम्हांकडील व त्यांजकडील परस्परें भेटली. समागमें

१ इलिचपुरचा नबाब. २ मुरादखान.

राजश्री नारो शंकर होते. तिकडून ( आम्हांस नेण्यास ) राजश्री गोविंद शिवराम आले होते. भेट जाहल्यावर आम्हांस बरोबर घेऊन श्रीमंत डेऱ्यास गेले. आम्हीं बरोबरचा जमाव गोटास पाठवून दिला व घरच्या समुदायानिशीं तेथें गेलों. श्रीमंत दादासाहेबीं बहुतच संतोषी होऊन हास्यवदनें करून इष्टालाभाच्या व कालच्या युद्धाच्या[१] गोष्टी सांगितल्या. धाकटे श्रीमंत मागती आपल्या राहुटीहून तेथें आले. तदुत्तर आम्हांस विडे देऊन डेऱ्यास जावया आज्ञा दिली. आम्हीं निघोन मुदेबखांत[२] गेलों. मागून धाकटे श्रीमंत तेथें आले. आगत स्वागत जाहलें. आनंदें करून भाषण करीत बसलों. मग त्यांसच सांगून सकार[३] नामकास बोलाऊं पाठविलें. ते ही तेथें आले. भेटी जाहली. दोन घटका बसून मग निरोप घेऊन अस्तमानीं आपल्या डेऱ्यास आलों. सकारनामक युद्धांत नव्हते.[४] याजमुळें युद्धाचा पराक्रम फारसा स्तुतींत आणीत नाहींत. " अस्मानी यश आलें. त्यांनीं[५] बेतरतुदीनें लढाई केली ह्मणोन यश प्राप्त जाहलें " अशा भावें बोलले. आम्हाशीं चार गोष्टी युद्धांत नव्हते हा पराक्रम [ ? ] वेढून न आणितां बोलले. उभयतां श्रीमंत व आपली बहुत करून सर्व मंडळी परम हर्ष पावली. विदित होय. काल राजश्री नारो शंकर यानीं आमच्या सर्व मंडळीस भोजनास सांगोन वस्त्रें दिलीं. संध्याकाळीं त्यांस घेऊन होळकराचे घरीं जाऊन दर्शन घेतलें. त्यानीं इष्टालाभाचीं भाषणें केलीं, वस्त्रें दिलीं, ते समयीं आम्हीं बोलिलों जे, वस्त्रें देतां; ( आपण ) मला येथें आणिलें, ( यास्तव ) सर्व प्रकारें आमचा अभिमान धरावा. ' बहुत उत्तम ' ह्मणून

---

१ नुकत्याच झालेल्या राक्षसभुवनच्या युद्धांत. २ स्वयंपाकगृहांत. ही बसण्या उठण्याची व खलबत करण्याची ही जागा होतीसें दिसतें. निजामअलीचा भाऊ बसालतजंग भेटी करितां आला तेव्हां त्याचें व दादासाहेबांचें खलबत याच ठिकाणीं झालें. ( पहा नं० २८४ वें पत्र. ) ३ सखारामबापू. ४ सखारामबापू राक्षसभुवनच्या लढाईच्या वेळीं श्रीमंतांच्या आज्ञेवरून जानोजी भोंसल्यास आणावयास गेला होता. ५ निजामअलीनें. ६ डेऱ्यास.

बोलिले. वस्त्रें घेऊन घरास आलों. भोंसल्यास रामराम सांगून पाठविले. त्याचे कारभारी पिराजी नाईक व दिवाकरपंत यांची उभाउभी भेट सुभेदारांच्याच राहुटीस जाहली. एकवेळ त्यांचे डेऱ्यास जाऊन शेडी सलाम ( ? ) करून यावें लागतें. जाणार. विदित होय. हे विज्ञापना.

नं० ३४७L

(१४ आगस्ट.)

श्रीशंकर.

तीर्थरूप मातुश्री बाई वडिलांचे सेवेशीं.

अपत्यें रघुनाथाचा साष्टांग नमस्कार, विनंती. वडिलीं लिहिलें कीं, ' यश ईश्वरें मोठें दिलें असतां वर्तमान ( तुम्हीं ) लिहिलें नाहीं; ' त्यास वर्तमान वडिलांस न लिहावें तरी कोणास लिहावें ? सविस्तर वर्तमान लिहून पत्र पाठविलें आहे. पावलें असेल. जासुदास पावावयास उशीर लागला असेल. सारांश ईश्वरी दयेनें व वडिलांचे आशीर्वादानें यवनाचे फौजेचें उत्तम पारिपत्य झालें. एकटा यवन थोडे फौजेनिशीं पळोन शहरास गेला आहे त्याचें ही पारिपत्य होईल. इतके दिवस गंगों पूर चालली होती. सांप्रत उतार होत चालला. दोन तीन दिवसांत उतार होईल. लष्कर उतरत आहे. गोपाळराव गोविंद लष्करांत दाखल झाले. सर्व ही सांप्रत आले आहेत. लवकरच [ गंगा ] उतरणार आहों. चिरंजीव रायांनीं यंदां मेहनतींत व शिपायगिरींत कमी केली नाहीं. आम्हां पेक्षां अधिक जाहले. इतके दिवस त्यांनीं लढाई देखिली नव्हती. ( ही ) पहिली लढाई पाहिली.

१ जानोजी भोंसल्यांचा कारभारी पिराजी नाईक निंबाळकर कसा ? २ होळकराच्या. ३ हें दादासाहेबांचें गोपिकाबाई पत्र. ४ गोदावरीस पूर चालला होता. ५ बाकीचे रुसलेले सरदार भोंसले, प्रतिनिधि वगैरे. ६ अर्थात् माधवराव पेशव्यानीं. ७ इ. स. १७६१ च्या अखेरीस मोंगल पुण्यावर चालून आला तेव्हां त्याशीं ज्या लढाया झाल्या त्या पेशव्यानीं जरी सर्व पाहिल्या होत्या तरी त्यांत त्यानीं पुढाकार घे-

# ऐतिहासिक-लेख-संग्रह.

## मासिक पुस्तक.

सप्तेंबर. १८९८ इ०.

अंक १६

वासुदेव वामन शास्त्री खरे
मिरज हायस्कुलांतील संस्कृत शिक्षक.

यांनीं

कुरुंदवाड येथें

" भाऊनाना " छापखान्यांत छापविलें.

वर्षाची आगाऊ वर्गणी टपाल हांशीलसह तीन रुपये.

फुटकळ अंकास पांच आणे.

# वर्गणीची पोंच.

## सन १८९८ । ९९

( ता. २२ जुलई पासून २२ आगस्ट पर्यंत. )

### मागील वर्षाची

| | रु० |
|---|---|
| रा. रा. गोविंद बळवंत भावनगर. | ३ |
| " " सदाशिव मणि नारायण दीक्षित. बी. ए. मुंबई. | ३ |
| " " आपाजी काशिनाथ खेर. पुणें. | ३ |
| रावसाहेब काशिनाथ नारायण साने. बी. ए. " | ३ |
| मि० मोझेस् स्यामूसन. " | ३ |

### मागील व चालू वर्षाची.

| | |
|---|---|
| श्री. रा. मालोजीराव नानासाहेब घोरपडे. सं० मुधोळ. | ६ |
| रा. रा. जनार्दन सखाराम करंदीकर. बी. ए. " | ६ |
| " " अनंत बाबाजी देवधर. वडोदे. | ६ |
| " " रघुनाथ नारायण अभ्यंकर. धनोरी. | ६ |
| " " दत्तात्रय यशवंतरावजी देशपांडे. हलियाळ. | ६ |
| " " विष्णु वामन केळकर. पुणें. | ६ |
| " " दामोदर नीलकंठ खरे. बी. ए. एल्. एल्. बी. वर्धा | ६ |
| " " महादेव विनायक टिळक. मुंबई. | ६ |
| " " सेक्रेटरी. नेटिव जनरल लायब्ररी. श्रीवर्धन. | ६ |
| " " श्रीधर नारायण जोगळेकर. बुलढाणा. | ६ |

### चालू वर्षाची.

| | |
|---|---|
| रावबहादूर बाबासाहेब परांजपे. मिरज. | २।८।० |
| रा. रा. बळवंत रामकृष्ण गोगटे. बी. ए. " | २।८।० |
| रा. रा. रामचंद्र आत्माराम झाडकर्णी. वकील. " | २।८।० |
| रा. रा. जनार्दन महादेव गोखले वकील. " | २।८।० |
| रा. रा. गणेश जनार्दन कोल्होलीकर वकील. " | २।८।० |
| रा. रा. सेक्रेटरी. मिरजमळा लायब्ररी. " | २।८।० |
| श्री. रा. बापूसाहेब कुरुंदवाडकर. कुरुंदवाड. | ३ |
| " " दाजीसाहेब कुरुंदवाडकर. " | ३ |

ांत सर्व प्रकारें तरतूद अधिक केली. यांचा पुढें कर्तेपणाचा भरंवसा
ांस आला. सांप्रत कारभार चिरंजीवच करितात. आमचे मर्जी प्रमाणें
र्ततात. तिळमात्र वांकडे चालत नाहींत. आम्ही ही यथाज्ञानें सुचतें तें
त्यांस सांगतों. तेच कारभार करितात. माझें शरीर बहुत अशक्त झालें.
मेहनतीस कामाचें नाहीं. निजामअल्लीचा मनसबा शेवटास गेल्यावरी कोठे
तीर्थीं बसून कांहीं ईश्वरभजन करावें इतकेंच मानस आहे. परमेश्वर इच्छा
पूर्ण करणार समर्थ आहे. आतां निजामअल्लीस मारणें सहज आहे. परंतु
लोकांस ऐवज पावला नाहीं यामुळें लोक मन घालीत नाहींत. तथापि
ज़ोर करून ईश्वरस्मरण करून काम हरकसें शेवटास नेतच आहों. रा॥
ुण शु० त्रयोदशी. रविवार. बहुत काय लिहिणें हे विज्ञापना.

पै॥ छ० १६ सफर.

नं० ३४८L [ श्रावण शुद्ध त्रयोदशी
२१ आगस्ट. ]

श्री.

तीर्थरूप मातुश्री बाई वडिलांचे सेवेशीं.

---

तलेला नव्हता. स्वतःशीं घोडनदी व आळेगांव येथें पेशव्यांच्या ज्या लढाया झाल्या त्या दादासाहेबांच्या मतें मुळीं लढायाच नव्हत! लढाईच्या ऐन आणीबाणीच्या वेळीं कसें वागावें लागतें व कशा तरतुदी कराव्या लागतात हें, पेशव्यांस राक्षसभुवनचे लढाईत प्रथमच कळलें असें दादासाहेबांचें मत.

१ या वेळीं दादासाहेबांचें वय चाळिस वर्षां पेक्षां कमी असावें. फार झालें तर तितकें असेल. असें असतां त्यांची प्रकृति इतक्यांतच डबघाईस आली यांत नवल नाहीं. थोरले बाजीराव व थोरले चिमाजी आप्पा व नानासाहेब पेशवे यांचीं शरीरें क्षीण होऊन इतक्या वयास ते मरण देखील पावले. माधवराव पेशव्यांस तर मरणसमयीं पुरतीं एकूणतीस ही वर्षे नव्हतीं. त्या मानानें पहातां दादासाहेब दैववान् समजावयाचे. कारण ते साठ वर्षे पर्यंत तरी वांचले होते! २ हा ईश्वरभजनाचा संकल्प जर दादासाहेबांच्या हातून सिद्धीस जाता तर तो महाराष्ट्रास फार फायदेशीर झाला असता!

अपत्यें माधवरायानें चरणावरी मस्तक ठेऊन साष्टांग नमस्कार विज्ञापना. येथील क्षेम तागायत छ० ११ सफर मुक्काम पैठण दक्षिणतीर येथें वडिलांचे आशीर्वादेंकरून सुखरूप असों. विशेष. वडिलांकडून पत्र छ० ४ सफरचें आलें तें पावलें. लिहिलें वर्तमान कळलें. पत्रीं आज्ञा कीं, 'राजश्री मल्हारराव[2] रास्ते यांस भेटून त्यांचें समाधान करणें,' त्यास त्यांचे घरीं[3] जाऊन आज्ञेप्रमाणें समाधान करविलें. बाबा वैद्य यांस ही सांगून त्यांजकडे पाठवितों. ते ही त्यांस सांगतील. वडिलांस कळावें. इकडील मजकूर तर, येथें येऊन चार दिवस झाले. गंगेचें पाणी परवां पासून उतरूं लागलें. हत्तीचा उतार झाला आहे. काल पासून मल्हारवा उतरूं लागले. वरकड सरदार व हुजुरात ही उतरेल. वडिलांस कळावें. प्रस्तुत मोंगलाची फौज पांच हजार व गाडदी चार हजार या प्रमाणें सरंजाम सुद्धां शहरांत[4] आहेत. पुढें काय मनसबा करितात पहावें! मुरादखान येथून कित्येक प्रकार बोलून गेला आहे. पहावें काय विचार ठरतो! राजश्री गोपाळराव गोविंद व नरसिंगराव धायगुडे व मोरो बाबूराव असे काल येऊन भेटले. वडिलांस कळावें. सेवेशीं श्रुत होय हे विज्ञापना.

पै।। छ० १६ सफर.

नं० ३४९[5]

[ श्रावण शुद्ध पौर्णिमा
२३ आगस्ट. ]

श्री.

तीर्थरूप मातुश्री बाई वडिलांचें सेवेशीं.

अपत्यें माधवरायानें चरणावरी मस्तक ठेऊन साष्टांग नमस्कार

---

१ हें पेशव्यांचें गोपिकाबाईस पत्र. २ हा पेशव्यांच्या मामां पैकीं थोरला. आपल्या मामांविषयीं पेशव्यांस उल्लेख करावयाचा असतो तेव्हां मामांच्या नांवा मागें 'राजश्री' खेरीज दुसरें उपपद ते लावीत नाहींत! (पहा पृष्ठ १४४,१४५,३५८.) ३ 'घरीं' याचा अर्थ येथें अर्थात् 'डेऱ्यास' असा घ्यावयाचा. ४ औरंगाबादेस. ५ हें ही पेशव्यांचें गोपिकाबाईस पत्र.

विज्ञापना येथील कुशल जाणून स्वकीय कुशल लिहावें. विशेष. इकडील वर्तमान तर नबाब शहरांत आहेत. त्यांजवळ फौज चार पांच हजार व गाडदी चार हजार पर्यंत आहेत. प्रस्तुत कारभार नबाबच करीत आहेत. दिवाणगिरीचीं वस्त्रें अद्यापि कोणास दिलीं नाहींत. सलुखाचा प्रकार बोलावयासीं धोंडोपंतास[1] पाठविणार, ह्मणून धोंडोपंतीं बातमी पाठविली आहे. वडिलांस कळावें. रवाना छ० १३ सफर मुक्काम पैठण. गंगा उत्तरतीर. सेवेशीं श्रुत होय हे विज्ञापना.

पै।। छ० १९ सफर.

नं० ३५०

( २३ आगस्ट. )

श्रीगणराज.

अपत्यें नीलकंठानें[2] साष्टांग नमस्कार विज्ञापना. येथील वर्तमान तागायत श्रावण शु० पौर्णिमा. भौमवार. मुक्काम पैठण. वडिलांचे आशीर्वादें यथास्थित असे. विशेष. काल सविस्तर लिहिलेंच आहे. त्यानंतर काल श्रावणी करून दोन प्रहरांनंतर तीर्थरूप राजश्री राव[3] व सर्व मंडळी दरबारास गेलों होतों. उभयतां श्रीमंतांनीं तीर्थरूपांशीं बहुता प्रकारें ममतेचें भाषण केलें. सोमवार होता. भोजनास राहविलें. वरकड सर्व मंडळी माघारे आलों. तदनंतर रात्रौ थोरले श्रीमंतांनीं एकांतीं गंगातीरीं बसोन बहुतां प्रकारें वडिलांची खातर जमा केली. " निरपराधी तुह्मांस गांजिलें. तुह्मीं गेलां हें अंतर तुह्मांकडे नाहीं. आणि गेलां आलां हें आपले चित्तांत किमपि नाहीं. तुह्मीं एकनिष्ठ आहां. पूर्वीपेक्षां विशेष कृपा तुह्मांवर आहे. यांत अंतर असेल तर गंगेची शपथ !" असें बहुत ममतेनें बोलिले. उ-

---

१ हा धोंडोराम उर्फ धोंडोपंत निजामअल्लीच्या दरबारीं नेहमीं राहणारा पेशव्यांचा वकील. २ हें नीलकंठराव त्रिंबक यांचें त्रिंबक हरीस पत्र. ३ वडील चुलत बंधु गोपाळराव.

पर यानीं विनंती केली कीं, मजला स्वामीनीं त्याचे हातीं दिलें होतें, त्या मुळें त्या पक्षानें वर्तलों. आतां स्वामीखेरीज दुसरा अवलंब नाहीं. ऐसें बहुतच नम्रतेनें बोलिले. उपर श्रीमंत बोलिले जे, " आतां आमचे घरीं ही द्वैतभाव नाहीं. आमचें शरीर अशक्त जाहलें. प्रवास होत नाहीं. यास्तव अविंधाचा[2] तह जाहल्या उपरी पुण्यास जाऊं. तेथून त्रिंबकास जावें. यास सर्वांनीं निरोप द्यावा. तेथें महिना दोन महिने, पुण्यास महिना दोन महिने, या प्रमाणें राहून जडभारी[3] पडलेस बोलावाल ते वेळीं येऊं. " ऐसें बहुत निखालसपणें बोलिले. मिरजेची सनद देविली. काल कल्याणी संध्याकाळीं होत्या याजमुळें न घेतली. आज पंधरा घटिकांत सनद घेणार. तदनंतर एक कारकून कार्य होईल ऐसा घेऊन सत्वरच रवाना करितों. काल प्रातःकाळीं गंगेस उतार झाला. कमरे बरोबरी पाणी झालें. श्रीमंतांचे डेरे ढाला पलीकडे गेल्या. लष्कर तमाम उतरूं लागलें. खासे आज जाणार. आम्हीं ही आज कूच करून जातों. मुरादखानाचा जाब अद्याप आला नाहीं. लष्कर आज सारें पलीकडे जातें. फौज देखील भोंसले बारा हजार चौदा हजार आहे. गंगेच्या उत्तरतीरीं दहा पांच मुक्काम पडतील. सेवेशीं श्रुत होय हे विज्ञापना.

नं० ३५१ L

( श्रावण वद्य चतुर्थी
२७ आगस्ट. )

श्री.

राजश्री रामचंद्र नारायण गोरे गोसावी यासीं.

---

१ मोंगलाचें. २ मोंगलाचा. ३ फार महत्वाचें काम. संकटाचा समय. ४ मिरजेचा किल्ला लक्ष्मण कोन्हेर याजकडे होता तो त्याजकडून पटवर्धनांच्या हवालीं सुरळीतपणें करविण्याचें काम ज्याच्या हातून निभेल असा पेशव्यांचा कारकून. ५ मुरादखान शत्रूकडून जे सरदार पाडाव आले त्यांत होता. त्यास तहाच्या शर्ती मोंगलास कळविण्या करितां मराठ्यांनीं औरंगाबादेस पाठविलें होतें. ६ भोंसल्या सुद्धां.

सु॥ आर्बासीतैन मय्या व अलफ. तुम्हीं पत्र[1] छ० ११ सफरचें पाठविलें तें पावलें. लिहिलें वर्तमान कळलें. तुम्हीं लिहिलें कीं, ' देशीं यावयाचा प्रकार कधीं होईल ? ' त्यास प्रस्तुतचा प्रकार कसकसा होतो त्या सारखा येण्याचा प्रकार [ घडेल. ] प्रस्तुत तर नाहीं. तुम्हांस कळावें. असेंच सविस्तर वर्तमान हमेशा लिहून पाठवावें. तीर्थस्वरूप सौभाग्यवती काकूबाईस साष्टांग नमस्कार सांगणें. जाणिजे. छ० १७ सफर बहुत काय लिहिणें. मोंगलाच्या तोफां पैकीं पंचवीस तोफा व एक गरनाळ या प्रमाणें आली. छ० मजकूर.

नं० ३९२

( अजमासें श्रावण वद्य आगस्टचा दु०पंधरवडा. )

श्रीगणपतिर्जयति.

आशीर्वाद उपरी. बंकापूर हैदर नाइकानें घेतलें ह्मणोन धारवाडाहून पत्रें आलीं तींच पाठविलीं आहेत. काल गजेंद्रगडाहून दौलत राऊ घोरपडे यांचीं पत्रें आलीं तीं ही माणसें सांगतात कीं, आपण मनोळींत ऐकिलें कीं, बंकापूर गेलें. वर्तमान लटकें कोणी लिहिणार नाहीं. त्यांणीं युद्धाची शर्थ केली. शेवट उपराळा नाहीं, केवळ जेर झाल्यावरी अब्रूनें निघणें कठिण. यास्तव सव्वा महिनां ह्मणोन अब्रूनें निघाले. परंतु कोणीकडे गेले ! पुढें हैदर नाइकानें मनसबा काय केला; बंकापूर सावनूरवाले यांस दिलें किंवा आपलेंच ठाणें बसविलें; पुढें येणार किंवा माघारा जाणार; हें कळलियावर लिहून पाठवूं. " नबाब नवे लोक चाकरीस ठेवितो; सामानाची

---

१ पत्र पेशव्यांनीं लिहिलेलें. २ पुण्यास. ३ पानपतांत पडलेल्या भाऊसाहेबांची स्त्री पार्वतीबाई. ४ लुटींत व लढाईत प्राप्त झाली. ५ पत्र गोविंद हरीचें गोपाळरावास. ६ बंकापुरचा किल्लेदार गोविंदपंत सखदेव याणें.

वगैरे तरतूद करितो; " ह्मणून लिहिलें, तरी तो बे हिमती होऊन बसेल कीं काय! त्यांत अभिमानी जो आहे तो प्राण जात पर्यंत इरे सोडणार नाहीं. विठ्ठल सुंदर व विनायकदास याणीं मरून बरें ह्मणविलें! परंतु मरणार यामुळें त्यांच्या बुद्धीस विपर्यास होऊन धण्याच्या दौलतीस धक्का दिला. त्यानें आपला भाऊ आणविला, तेव्हां त्याचें कर्तेपण कळलेंच आहे. परंतु ( त्याजवळ ) द्रव्य आहे. त्यास कामकाजांत घालून त्याज पासून द्रव्याचा व्यय करवावा असा मनसबा करील. मुरादखान गेला तेव्हां कार्यभागी यांच्या अनुमतानेंच गेला असेल. हर एक प्रकारें संधानच करितील. श्रीमंतानीं आधीं बीड, खर्डें येथील खंडणींत साधेल तें द्रव्य घ्यावयाचें होतें. तह झालियावरी त्यास सोडावें लागेल. याची पैरवी कशी केली आहे न कळे! मुख्य गोष्ट — यश प्राक्तनानुसार आलें, पण पुढील कर्तव्यार्थाची काळजी कोणासच नाहीं! असो. तुम्हीं लिहिले प्रमाणें सबुरीनेंच वर्तावें. क्षुल्लक लोक मध्यें नाना प्रकारचे अन्याय कल्पितील; त्यास बहुत सावधपणें सनद तेवढी युक्तीनें हाताखालीं घालून रवाना करावी. जमखिंडी, अष्टें, यादवाड, शहापुर, पुणतांबें, वगैरे या सनदा घ्याव्या. सावनूर तालुका सांप्रत हैदरनाइकाच्या वेधांतच आहे. पुढें त्रि-

१ युद्धांत पराजित होऊन औरंगाबादेस गेल्या नंतर निजामअल्लीनें कुमके करितां आपला भाऊ बसालतजंग यास आणविलें. २ कारभारी सखारामबापू व मोंगलाच्या सैन्यांतून पाडाव सांपडलेला सरदार मुरादखान हे दोघे फार दिवसांचे स्नेही. आतां मोंगलाशीं तहा बद्दल बोलण्या करितां मुरादखान गेला आहे तो सखारामबापूच्या सांगण्यावरूनच गेला असेल. ३ तह मोंगलाशीं होण्यापूर्वी त्याचे तालुके बीड व खर्डें यांतून काय खंडणी मिळेल ती श्रीमंतानीं घ्यावयाची होती. तह झाल्यावर घेतली तर ती मोंगलास परत द्यावी लागेल; असा गोविंद हरीचा अभिप्राय आहे. बीड परगण्यांतून पेशव्यानीं एक लक्ष बारा हजार रुपये खंडणी या पूर्वींच घेतली होती हें गोविंद हरीस कळलें नव्हतेंसें दिसतें. ४ राक्षसभुवनच्या लढाईंत जय. ५ हैदराचें पारिपत्य करणें वगैरे कामांची. ६ मिरज देण्याविषयींची सनद.

लंब लागेला ह्मणोन चिंता नाहीं. तूर्त जवळील पैत्रें बागेवाडी, संपगांव वगैरे स्थळांचीं घ्यावीं. बहुत काय लिहिणें लोभ कीजे हे आशीर्वाद.

नं० ३९३L

( श्रावण वद्य चतुर्थी
२७ आगस्ट. )

श्री.

तीर्थरूप मातुश्री बाई वडिलांचे सेवेशीं.

अपत्यें माधवरायानें चरणावरी मस्तक ठेऊन साष्टांग नमस्कार विज्ञापना. येथील क्षेम तागायत छ० १७ सफर. मुक्काम पैठण, गंगातीर येथें वडिलांचे आशीर्वादें करून सुखरूप असों. विशेष. वडिलीं पत्र छ० ११ सफरचें पाठविलें तें पावलें. लिहिलें वर्तमान कळलें. पूर्वीं पत्र पाठविलें होतें त्यावरून कळलेंच असेल. " शत्रु शेष न ठेवावे, बाबा वैद्याचा समाचार घेत जावा, सखारामपंत पहिल्या प्रमाणें निखालसें पत्र पाठवीत नाहींत त्यांस ताकीद करावी, " ह्मणून आज्ञा; त्यास शत्रूचा प्रकार तर पूर्वीं महंमद मुरादखान बोलून गेले होते त्यास बोलून आले आहेत. त्यास काल दिवस वाईट होता, यास्तव बोलणें झालें नाहीं. आज त्यांशीं बोलून ते आपल्या मतलबा प्रमाणें करीत असल्यास उत्तमच आहे. नाहीं तर विघाड तर आहेच. आम्हीं मतलब न घालावे व शत्रु अशा पेंचांत आहे

---

१ सावनुरची सनद हातीं येण्यास विलंब लागला तरी चिंता नाहीं. २ पेशव्यांचीं ताकीदपत्रें तीं ठाणीं पटवर्धनांच्या हवालीं करण्याविषयीं तेथील ठाणेंदारांस. ३ पत्र पेशव्यांचें गोपिकाबाईस. ४ सरळपणाचें. ५ मोंगलाकडे जाऊन तहाच्या शर्ती ठरवून आले. ६ आमच्या. ७ आमची अमुक मागणी कबूल कराल तर तह करूं वगैरे कांहीं एक न बोलतां त्याचें सबंध राज्यच आम्हीं घ्यावें हें खरें, पण आमच्या लोकांस वेतन न मिळाल्यामुळें व देशीं त्यांचीं घरेंदारें लुटलीं व जाळिलीं गेलीं आहेत

तों बुडवावा, परंतु आमच्या फौजेस पैका ( आम्हांकडून मिळाला ) नाहीं. व लोक हुजुरातचे व पतक्यांचे बहुत करून घरदारें लुटलीं जळालीं याज मुळें देशीं गेले व पैका ही द्यावयास नाहीं. वरकड मसलती[1] बुडतात, यास्तव मतलब घालावे लागतात. व मल्हारबाचे ही मतें हेंच करावेंसें आहे. बाबा वैद्याचा समाचार आज्ञे प्रमाणें घेत असतों. त्याचे मतें घरास-जावयास निरोप मागावा असें आहे. तर वडिलीं त्यास लिहावें कीं, ' निरोप न मागणें. ' या प्रमाणें त्यास लिहून पाठविण्यास आज्ञा करावी. सखारामपंताचा प्रकार तर त्याचे मतें असें कृपेचें पत्र वडिलांचें यावें हे तर त्याची मर्जी बहुत आहे. त्यानें ही पत्र सेवेशीं लिहिलें आहे त्यावरून कळेल. कृष्णरायानीं[2] पत्र लिहिलें आहे त्यावरून सेवेशीं विदित होईल. वरकड वर्तमान जें होईल व निश्चय ठरेल तें सेवेशीं लिहून पाठवीन. बहुत काय लिहिणें हे विज्ञापना.

नं० ३९४L

( श्रावण वद्य अष्टमी
३१ आगस्ट. )

श्री.

तीर्थरूप मातुश्री बाई वडिलांचे सेवेशीं.

अपत्यें माधवरायानें[3] चरणावरी मस्तक ठेऊन साष्टांग नमस्कार विज्ञापना. येथील कुशल जाणून स्वकीय कुशल लिहिणें. विशेष. वडिलीं पत्र पाठविलें तें पावलें. लिहिलें वर्तमान कळलें. असेंच सदैव आशीर्वाद पत्र

---

ह्मणून सैन्यांतील पुष्कळ लोक घरोघर गेले. काय राहिले आहेत त्यांस ही द्यावयास पैका नाहीं. सबब शत्रूशीं तह करणें भाग पडत आहे.

१ हैदरअलीचें पारिपत्य करणें वगैरे. २ कृष्णरावबल्लाळ काळे यांणीं. ३ पत्र पेशव्यांचें गोपिकाबाईस.

पाठवावयास आज्ञा केली पाहिजे. इकडील वर्तमान तर काल मुरादखान येथें बनाव न बसे यास्तव निरोप घेऊन गेले. आम्हीं ही कूच करून पैठणानजीक राहिलों. उदईक कूच करावयासीं मुहूर्त नव्हता यास्तव कूच झालें. उदईक कूच करून मोंगलावर जाऊं. वडिलास कळावें. मोंगलाची फौज व गाडदी मिळून दहा हजार आहेत. ते[२] ही शहरा बाहेर निघणार. त्यांसीं बोलिलों[३] त्याचे तपशील—१करोड दहा लक्षांची द्यावी, खंदार, आवसें, अंतूर हे तिन्ही किल्ले द्यावे, औरंगाबाद शहर द्यावें, या प्रमाणें त्यास सांगितलें आहे..रवाना छ० २१ सफर बहुत काय लिहिणें हे विज्ञापना.

पै॥ छ० २९ सफर.

नं० ३९९[L]

( श्रावण वद्य दशमी
२ सप्तंबर. )

श्री.

तीर्थरूप मातुश्री बाई वडिलांचे सेवेशीं

अपत्यें माधवरायानें चरणावरी मस्तक ठेऊन साष्टांग नमस्कार विज्ञापना. येथिल क्षेम तागायत छ० २३ सफर मुक्काम कारकिण गांव ढोरकिणगांव परगणे पैठण येथें वडिलांचे आशीर्वादें करून सुखरूप असों. विशेष. वडिलीं पत्र पाठविलें तें पावलें. लिहिलें वर्तमान कळलें. सदैव आशीर्वाद पत्र पाठविण्यास आज्ञा केली पाहिजे. इकडील वर्तमान तर काल भोंसले यांचा खर्चाचा गुंता होता यास्तव काल येथें मुक्काम झाला.

१ तहाचें बोलणें मान्य न होई यास्तव. २ नबाब निजामअली. ३ तहाचीं कलमें बोललों. ४ हें पेशव्यांचें गोपिकाबाईस पत्र. ५ भोंसल्यास कांहीं द्रव्य द्यावयाचें ठरलें होतें तें द्यावयास नव्हतें ह्मणून अडचण पडली.

आज ही पर्जन्यामुळें मुक्काम ठरला. उदईक कूच करून शहरावर जाऊं. भोंसले ही कालच कूच करून अघाडीवर तीन कोसांवर उतरले. नबाबाचा प्रकार बातमीचा तर, त्याची थोडकीशी फौज व पेशखाना काळ्या चबुत्र्यावर उतरला. व नबावही आज उद्यां बाहेर निघतील. त्यांजवळ सरंजाम तर चार पांच हजार फौज व गारदी पांच सहा हजार व तोफा वीस पर्यंत आहेत. परंतु आव गेला आहे. व सलूखही करावयासी चाहतात. परंतु आह्मीं ह्मणतों त्या करारावर अद्यापि आले नाहींत. हिंमतीच्या गोष्टी तोंडीं बोलतात. परंतु असें ही ह्मणतात कीं, " या कालीं आह्मांवर रयांत केली तर आह्मी ही बहुत कामास येऊं. विठ्ठलपंतानीं इतका उपद्रयाप केला. असा प्रकार आमचे चित्तांत नाहीं व पुढें ही स्नेह बळकट व्हावा हीच आमची इच्छा आहे; " ह्मणून आमच्या वकिलाजवळ बोलत असतात. पुढें सत्वरच त्यांशीं गांठ घालून जें होईल तें सेवेशीं लिहूं. वडिलांस कळावें. शहरांत महागाई झाली आहे. बहुतकरून सलूखच त्यांस जेर केल्यावर होईल. राजश्री मोरो[3] बाबूराव यांसी व बाळाजी जनार्दन यांसी बरोबरच फडणीसीचीं वस्त्रें होतील. नानास ही कल्याणीस बोलावूं पाठविलें आहे. ते आल्यावर वस्त्रें होतील. गोपाळराव यास मिरजेची सनद दिली. परंतु कांहीं त्याच्या कारभाराचें बोलणें आहे यास्तव तें झाल्यावर सनद रवाना करितील. वडिलांस कळावें. सेवेशीं श्रुत होय हे विज्ञापना.

पै॥ छ० २ रबिलावल

---

१ काळा चबुत्रा औरंगाबाद शहरा बाहेर आहे. २ कृपा. ३ मोरोबा व नाना फडणीस हे चुलत चुलत भाऊ. ४ हें कल्याण सिंहगडच्या पायथ्याशीं आहे. येथें या वेळीं नाना फडणीस होता.

नं० ३५६L

[ भाद्रपद शुद्ध प्रतिपदा
८ सप्तंबर. ]

श्री.

राजश्री रामचंद्र नारायण गोरे यांसी

सु ॥ आर्बा सीतैन मय्या व अल्लैफ. तुह्मीं छ० २३ सफरचें पत्र पाठविलें तें पावलें. लिहिलें वर्तमान कळलें. इकडील वर्तमान तर नबाब शहरांत आहेत. तहाचा प्रकार बोलतच आहेत. ठरला नाहीं. ठरल्यानंतर लिहून पाठवूं. जहागीर व किल्ले मोंगलापासून घ्यावयाचा प्रकार तपशीलवार तीर्थरूप मातुश्री बाईच्या पत्रीं लिहिला आहे त्यावरून कळेल. तुह्मीं लिहिलें कीं, ' घरास यावयाचें कधी होईल तें लिहावें ' ह्मणून त्यास मोंगलाचा प्रकार शेवटास न्यावा असा आमचा हेतु आहे. मग पुढें ठरेल तें खरें ! प्रस्तुत तर हाच विचार आहे. तपशीलवार हमेशा पत्र पाठविणें जाणिजे. छ० २९ सफर बहुत काय लिहिणें.

पै॥ छ० १९ रबिलावल

नं० ३५७

( अजमासें भाद्रपद शुद्ध
सप्तंबरचा प०पंधरवडा. )

नारो आपाजी तुळसीबागवाले यांचें गोपाळरावास पत्र

श्रीमंतांनीं राजश्री नारो शंकर यांस मंगळवेढ्यास पाठवून मिरज वगैरे तालुका देऊन पूर्ववत प्रमाणें चालवावयाचा करार करून तुह्मांस बोलावून आणिलें, श्रावण शुद्ध त्रयोदशीचे दिवशीं श्रीमंतांच्या भेटी जाल्या, करारा

१ पत्र पेशव्यानीं लिहिलेलें.

प्रमाणें सनदा तयार होत आहेत, ह्मणून लिहिलें, तें कळोन बहुत संतोष जाला. जे गोष्ट व्हावीसें चिंतन करीत होतों तें ईश्वरें घडविलें. अवघे एक झालीं[1], फार उत्तम झालें.

नं० ३५८

( अजमासें भाद्रपद वद्य सतंबरचा दु० पंधरवडा. )

गोपाळरावाचें गोविंद हरीस पत्रः—

“ किल्ला नलदुर्ग पहिला पंचायशीं लक्षांच्या जहागिरींत होता तो मात्र द्यावा. दुसरा अंतूर आदिकरून मागत होतें परंतु मोंगलानें दिला नाहीं. नलदुर्ग झालें तरीं खालीं करून देत नाहींत. ‘ कळेल तेणें प्रमाणें ध्या, असें नबाबानीं सांगितलें. सारांश अविंधाकरवीं[2] ओढ धरवून शेवट आपण होऊनच निकाल काढून घेतला! पंचायशीं लक्ष जहागिरीचीं सनदापत्रें दिलीं. गंगोबा तात्या होळकराचे दिवाण मोंगलाकडून आल्यानंतर परगण्याची नांवनिशी कळेल. ते यावयाचा मात्र अवकाश. आले ह्मणजे श्रीमंत लागलेच कूच करून मावारे गंगेवर जाणार. तेथून भोंसल्यास निरोप देणार. आपण आपली सारी मंडळी घेऊन पुण्यास श्रीमंत मातुश्रीचे दर्शनास जावें असा ठराव[3] झाला आहे. सौभाग्यवती आनंदीबाईस ही आणावयास शिष्य पाठविला आहे. तेथें[4] जाऊन मास पक्ष राहून मग आपण निरोप घेऊन जावें हा बेत श्रीमंत दादांचा आहे. ”

१ कुटुंबाचीं माणसें एकत्र झालीं. ( आजपर्यंत तीं नलदुर्ग, अक्कलकोट, मंगळवेढें, वगैरे टिकाणीं होतीं. ) २ मोंगलाकडून. ३ हा ठराव दादासाहेबांचा. ४ त्र्यंबकेश्वरास जावें.

नं० ३५९

[ अजमासें भाद्रपद वद्य
सप्तंबरचा दु० पंधरवडा. ]

पांडुरंगराव यांचें गोविंद हरीस पत्रः—

सल्लयाचा मजकूर तरी राजश्री गंगोबा निसबत होळकर शहरास गेले आहेत. सल्लयाचा ठराव होत आहे. अंतूरचा किल्ला सरकारांत द्याव-याचा करार झाला होता तो ही मोडला. आतां किल्ला देखील नाहींसें झालें आहे! ठरतां ठरतां काय ठरेल तें पहावें! एका दो रोजांत काय तें उलगडेल. श्रीमंत राजश्री भवानराव प्रतिनिधि यांस सोमवारीं वस्त्रें दिलीं. पूर्ववत प्रमणें किल्ले आदिकरून दिले. पन्नास हजारांचा सरंजाम पहिले सरकारांत देत होते ते आतां पाऊण लक्षावर ठराव केला. लागलाच सरं-जाम देखील सरकारांतून ( प्रतिनिधींनीं ) तोडून घेतला.

नं० ३६०

( १० सप्तंबर. )

श्रीगणराज.

अपत्यें नीलकंठानें[१] साष्टांग नमस्कार येथील वर्तमान तागायत भाद्र-पद शु० तृतीया मंदवार. मुक्काम पिंपळगांव नजिक औरंगाबाद, पश्चिमेस, येथें वडिलांचे आशीर्वादेंकरून यथास्थित असे. विशेष. मिरजेच्या सनदा मागेंच तयार झाल्या होत्या परंतु कारभारी कांहीं दिक्कत निर्माण करून बसले होते; याजमुळें न पाठविल्या. त्यास काल श्रीमंतांनीं[२] आज्ञा केली कीं, करारप्रमाणें तुमचें काम विल्हेस लाऊन देतों. मिरजेची सनद पाठ-

---

१ पत्र नीलकंठराव त्रिंबक यांचें त्रिंबक हरीस. २ श्रीमंत माधवराव पेशवे यानीं गोपाळराव पटवर्धनास आज्ञा केली.

ऊन देणें. सनद पावतांच स्थळ ही देतील या प्रमाणें सांगितलें. मग आज प्रात:काळीं सनद रवाना केली आहे ते येऊन पावलीच असेल. श्रीमंत काल शहरचे पूर्वेस चार कोसांवर येऊन राहिले आहेत. नबाबाचे मतें श्रीमंत माधवराव पेशवे यांजकडे साडेबावीस लक्षांची जहागीर व साठलक्षांची जहागीर व एक किल्ला अंतूरचा देऊन विवेक करावा. श्रीमंतांचे मतें एक कोटी दहा लक्षांची जहागिर दिली तरी घ्यावी. परंतु इकडील व तिकडील कारभारी रंग भरून विवेक करूं देत नाहींत! यांचें तेज चढलें आहे तें उतरून मग जैसा बनेल तैसा तह करावयाच्या प्रकारांत आहेत! बहुतां प्रकारें दो चौं दिवसांत तहाचें होईलसें दिसतें. [ आह्मांस श्रीमंतानीं ] मिरज देविली. सरंजामाचे लढे आहेत ते ही उरकून देतील. परंतु आठ चार दिवस लागतील. तहाचें व कामकाजाचें विल्हे लागल्यावर निरोप घेऊन यावें असें ( मनांत ) आहे. यांत श्रीची इच्छा! बंकापुरें गेलें. वरकड वारी पलीकडील कोणतें ही स्थळ राहत नाहीं. सेवेशीं श्रुत होय. हे विज्ञापना.

नं० ३६१ L

( भाद्रपद शुद्ध चतुर्थी
११ सप्तंबर. )

श्री.

अपत्यें माधवरायानें चरणावर मस्तक ठेऊन शिर साष्टांग नमस्कार

---

१ मिरजेचा किल्लेदार लक्ष्मण कोन्हेर हा किल्ला तुमच्या हवालीं करील. २ साडे बावीस व साठ मिळून साडे ब्यायशीं लक्षांची जहागीर मोंगल द्यावयास कबूल झाला होता. ३ लढाईत जय मिळाल्यामुळें पेशव्यांची सरशी झाली आहे. ४ बंकापुर हैदराच्या हातीं गेलें. ५ मनोलीच्या वारी पलीकडील. ( अर्थात् धारवाड जिल्ह्यांतील) ६ हें पेशव्यांचें गोपिकाबाईस पत्र.

विज्ञापना. येथील क्षेम तागायत छ॰ ३ रबिलावल मुक्काम नजीक औरंगाबाद येथें वडिलांचे आशीर्वादें करून सुखरूप असों. विशेष. वडिलीं पत्र पाठविलें तें पावलें. लिहिलें वर्तमान कळलें. इकडील वर्तमान तर नबाब शहरांत आहे. त्याजकडून हिम्मतखान मुरादखानाचा भाऊ आला आहे. तो[1] ही येणार. हिम्मतखान मल्हारबाचे मार्फतीनें बोलत आहेत. त्यांचा मुद्दा हा कीं, साठांवर तह करावा. अथवा अधिक चार पांच पर्यंत म्हटलें तरी ऐकतील. असें त्यांच्या मतें. इकडील मुद्दा—जरूर म्हटल्यास नव्वदांची जहागीर व तीन किल्ले धारूर, खंदार, अंतुर या प्रमाणें द्यावें. निदान घरचा विचार पहागें तर ब्यायशींची जहागीर व दोन किल्ले द्यावे असें आहे. नबाबानीं कृष्णराव बल्लाळ व गंगोबा यांस बोलाविलें आहे. जावयाचा निश्चय ठरला नाहीं. ठरल्यावर लिहीन. काल भोंसल्यानीं ( आम्हांस ) मेजवानी केली. पुण्याच्या तोफा नजर केल्या. अशेरीचा किल्ला ठेवावा असें आज उद्यां ह्मणणार. वडिलांस कळावें. सेवेशीं श्रुत होय हे विज्ञापना.

पै॥ छ० ८ रबिलावल.

नं० ३६२L

( भाद्रपद शुद्ध द्वादशी
१८ सप्तंबर. )

श्री.

तीर्थरूप मातुश्री बाई वडिलांचे सेवेशीं

अपत्यें माधवरायानें चरणावरी मस्तक ठेऊन साष्टांग नमस्कार.

---

१ मुरादखान ही तहा प्रकरणीं बोलावयास येणार. २ नबाब मान्य करितील. ३ पुण्याहून लुटून नेलेल्या. ४ पूर्वी ठरल्या प्रमाणें अशीरगड आह्मांस देऊं नये. तो सरकारांतच ठेवावा. ५ पत्र पेशव्यांचें गोपिकाबाईस.

विज्ञापना. येथील क्षेम तागायत छ० १० रबिलावल मुक्काम नजीक शहर येथें वडिलांचे आशीर्वादें करून सुखरूप असों. विशेष. वडिलांकडून बहुत दिवस पत्र येऊन वर्तमान कळत नाहीं. तरी सविस्तर वर्तमान लिहिण्याची आज्ञा केली पाहिजे. इकडील वर्तमान तर नबाबाकडून हिम्मतखान आले होते त्यांनीं बोलून ठराव करून कृष्णरायास व गंगोबास घेऊन गेले. जहागिरीचा ठराव पहिली साठीची व आणखी बाविसांची घ्यावी, असा जहागिरीचा ठराव झाला आहे. व किल्ल्याचा प्रकार ठरला नाहीं. ठरल्यावर लिहीन. किल्ल्याचा प्रकार बोलावयास गेले आहेत. अद्याप जाब आला नाहीं. ठरल्यावर लिहीन. वडिलांस कळावें. श्रुत होय हे विज्ञापना. हा प्रकार लवकरच होईल. त्या नंतर घरास यावयास होईल. वडिलांस कळावें. हे विज्ञापना.

नं० ३६३L

[ भाद्रपद शुद्ध द्वादशी
१८ सप्तंबर. ]

श्री.

राजश्री रामचंद्र नारायण गोरे गोसावी यांसीं.

सु॥ आर्बा सीतैन मय्या व अल्लफ. [1]तुम्हांकडून बहुत दिवस पत्र येऊन वर्तमान श्रवण होत नाहीं. तरी त्या प्रांतीं थोडी बहुत लावणी जाहली किंवा नाहीं, पुण्याचे गांव लागले न लागले, हें कळलें नाहीं. पुण्यांतील घरें जळालीं आहेत, त्यास कोणकोणत्या घरांचें काम चालीस लागलें आहे, कोण कोण आले आहेत, मातबर माणूस कोण आले, व नाहीं कोण, हें लिहावें. त्र्यंबकराव मामा हे प्रस्तुत कोठें आहेत? त्यांस बोलाऊं

---

१ पत्र पेशव्यानीं लिहिलेलें.

पाठविलें होतें. ते अद्यापि आले नाहींत. तर त्यांचा शोध करून लिहावें. नाना फडणिसांस दोन तीन कागद यावयास पाठविले आहेत. ते ही अद्यापि न आले. ते आल्या नंतर त्यांचें काम त्यांजकडे होईल. दिनकर महादेव यांचे चिरंजीव यांस देवाज्ञा झाली सबब ते बहुतच श्रमी आहेत. त्यास तुम्हीं त्यांचें बहुत प्रकारें समाधान आमचे तर्फेनें करणें. मोंगलाकडील प्रकार तर नबाबाकडून मुरादखानाचे बंधु हिम्मतखान आले होते. ते सुभेदारांचे मार्फतीनें बोलत आहेत. जहागिरीचा प्रकार बोलून गंगोबास व कृष्णराव बल्लाळास बरोबर घेऊन काल गेले. त्यामध्यें किल्ल्याचा प्रकार अद्यापि ठरला नाहीं. व त्याचा ही जबाब अद्याप आला नाहीं. मामानीं पूर्वीं राजमाचीहून पत्र लिहिलें होतें तें पावलें. अलीकडील वर्तमान कळत नाहीं. तरी सविस्तर लिहिणें. कृष्णाजीपंत[1] कोठें आहेत? त्यांचें शरीर प्रकृतीचें वर्तमान कसें आहे? आम्हीं त्यांस पत्र पाठविलें होतें तें पावून उत्तर अद्यापि आलें नाहीं. तरी त्यांचा समाचार घेणें. वेदमूर्ति मोरो जोशी प्रस्तुत कोठें आहेत, त्यांचें वर्तमान काय, तें त्यांस पुसून लिहावें. त्यांच्या हिशोबा पैकीं कांहीं वरात दिली आहे, तरी वसते प्रमाणें ऐवज पावता करून जाब पत्र देणें. जाणिजे. छ० १० रबिलावल.

पै॥ छ० १९ रबिलावल.

नं० ३६४

[ १९ सप्तंबर. ]

श्रीगणराज.

तीर्थरूप राजश्री आपा वडिलांचे सेवेशीं—

---

१ कृष्णाजीपंत कोण? बहुधा कृष्णाजीपंत गोरे. या रामभाऊ गोऱ्याचाच कोणी भाऊबंद. [ यास पेशव्यानीं लिहिलेलें मागें नं० ३४१ चें पत्र छापिलें आहे. ]

अपत्यें गोपाळानें साष्टांग नमस्कार. विज्ञापना. तागायत भाद्रपद शु० त्रयोदशी मंदवासर मुक्काम पिंपळगांव नजीक चिखलठाण. यथास्थित असे. विशेष. मिरजेच्या सनदा पेशजी घेतल्या होत्या त्यांत कांहीं अड-थळा पडला होता, त्याजमुळें न पाठविल्या. काल श्रीमंतांनीं आणखी ताकीद दिली आणि ( सनदा ) रवाना कराचयाची आज्ञा ही केली. जाब सांल ही निर्गमांत आणिले आहेत. सनदा पेशजी घेतल्या त्या, व हल्लीं ताकिदी दिल्या त्या ऐशा पाठविल्या आहेत. पावतांच पुढें वडिलीं रवाना कराव्या. एक शहाणा कारकून पाठवावा. सरकारी खिजमतगार ही पाठविला आहे. या समागमें कारकून देऊन सत्वर रवाना करावा. उदईक आणखी खिजमतगार व पत्र देऊन परस्पर मिरजेस पाठवितों. श्रीमंत काल कूच करून येथें आले. अद्यापि तहाचें बोलणें नाहीं. कितेकांचे मतें अविंधाचें स्वरूप वाढवून मग तह करावा असें आहे. कोणें प्रकारें घडतें पहावें. अविंध शहरांतच आहे. पहिलीं पत्रें आहेत तीं आधीं द्यावीं, मागून घेतलीं हीं मग द्यावीं, या प्रमाणें जाणार कारकुनास ताकीद करावी. मोंगलअह्लीकडील मीरआबस ते प्रांतीं आला आहे. वडिलीं ही लोक जमा करण्याची तरतूद केली असेल. नरसिंगराव उद्धव यास ही उदईक पत्र सरकारचें देऊन रवाना करितों. ते ही सांगोल्याचे रोखें येतील. बहुधा बरडोलचे रोखें येणार नाहींत. दुरूनच खंडणी मात्र घेऊन माघारे जातील

१ पत्र गोपाळरावाचें चुलता त्रिंबक हरि यास. २ माधवराव पेशव्यानीं. ३ लढयाच्या बाबींचा निकाल लाविला आहे. ४ सखारामबापू, गंगोबा तात्या, कृष्णराव बल्लाळ व मोंगलाकडील मुरादखान यांच्या मतें. ५ मोंगलाचें तेज पराजयामुळें कमी झालें आहे तें वाढवून. आतां हें तेज कसें वाढवावयाचें, तर पेशवे जें जहागीर व किल्ले वगैरे मागत आहेत तितकें त्यांस मिळूं दिलें नाहीं ह्मणजे चढलें मोंगलास तेज ! वाहवारे घरबुडवे मुत्सद्दी ! ६ पटवर्धनांची कुमक करण्या विषयीं पेशव्यांचें नरसिंगरावास पत्र.

असें दिसतें. सनदा ताबडतोब रवाना कराव्या. बहुत काय लिहिणें. हे विज्ञापना.

नं० ३६९L

( भाद्रपद वद्य तृतीया
२९ सप्तंबर. )

श्री.

तीर्थरूप मातुश्री बाई वडिलांचे सेवेशीं.

अपत्यें माधवरायानें चरणावरी मस्तक ठेऊन साष्टांग नमस्कार विज्ञापना. येथील क्षेम तागायत छ० १७ रबिलावल मुक्काम नजीक शहर औरंगाबाद येथें वडिलांचे आशीर्वादें करून सुखरूप असों. विशेष. वडिलांकडून बहुत दिवस आशीर्वाद पत्र आलें नाहीं. पत्र पाठवावयासीं आज्ञा केली पाहिजे. इकडील वर्तमान तर नवाब शहरांतच आहेत. गंगोबास व कृष्णरायास हिम्मतखान बराबर घेऊन गेले, हें पूर्वी सेवेशीं लिहिलेंच आहे. प्रस्तुत गंगोबा तेथेंच आहेत. अद्यापि कारभार उरकला नाहीं. किल्ल्याचा प्रकार प्रस्तुत राहिला. जहागीर मात्र पावणेब्यायशींची ध्यावी ( असें ठरलें. ) किल्ल्याचा प्रकार प्रस्तुत राहिला. नळदुर्ग मात्र द्यावा. असें बोलण्यांत असावें या प्रमाणें करार ठरला आहे. कागद पत्र तयार नाहींत. यास्तव एका दो दिवसां येतील. हा कारभार उरकल्यावर सत्वरच येऊं. वडिलांस कळावें. हैदरनाईक यानें बंकापुर घेतलें. पुढें धारवाड प्रांतीं येऊन धारवाड घेणार असें वर्तमान आलें आहे. परंतु दुसरें पत्र आलें कीं लढाईचें वर्तमान ऐकून माघारे जाणार. असें वर्तमान आलें आहे. पुढें जें वर्तमान होईल तें सेवेशीं लिहीन. हे विज्ञापना.

---

१ पत्र पेशव्यांचें गोपिकाबाईस. २ गंगोबा परत येतील. ३ राक्षसभुवनच्या लढाईचें.

नं० २६६

( २५ सप्तंबर. )

श्रीगणराज.

•

तीर्थरूप राजश्री नाना वडिलांचे सेवेशीं.

अपत्यें पांडुरंगानें दोनी कर जोडून साष्टांग नमस्कार. विज्ञापना. येथील क्षेम तागायत भाद्रपद वद्य तृतीयायुक्त चतुर्थी रविवार. मुक्काम नजीक चिखलठाण, येथें वडिलांचे आशीर्वादें करून समस्त मंडळी सुद्धां सुखरूप असों. विशेष. वडिलीं श्रीक्षेत्रें[2]चे मुक्कामचें पत्र पाठविलें तें पावलें. राजश्री मोरोबादादांस[3] नमस्कार प्रविष्ट केला. त्यांणीं आपणास पत्र लिहिलें तें पाठविलें आहे. मिरजेची सनद राजश्री चिंतामणपंत शेखदार पुढें गेले त्यांजकडे पाठविली आहे ह्मणून लिहिलें, त्यास तेथील प्रकार त्यांनीं काय लिहिला तो लिहावा. राजश्री लक्ष्मण कोन्हेर पांडवगडा[4]कडे आला आहे. त्याजकडे राजश्री बाळाजीपंत पाठविले आहेत हें पेशजीच्या पत्रीं लिहिलेंच आहे त्याजवरून कळलेंच असेल. इकडील सल्ल्याचा मजकूर तरी—राजश्री गंगोबा व कृष्णराव शहरास गेले ते आजच येणार. पहिले साठी[5]मध्यें नळदुर्ग किल्ला सरकारांत आलाच. नवा किल्ला सरकारांत ( मोंगल ) देत नाहीं. जहागीर पंचायशीं ( लक्षां ) पावेतों ( देण्याचा ) ठराव झाला आहे. उदईक अथवा परवां कूच येथून होणार. श्रीमंत पक्षा कारितां गंगेवर जाणार आहेत. सल्ला झाला. गंगोबा आले ह्मणजे मजल दर मजल श्रीमंत पुण्यास जाणार. सारे सरदार देखील घेऊन जाणार ऐसें वर्तमान आहे. श्रीमंत दादासाहेब नऊ लक्षांची जहागीर व पांच किल्ले

---

१ हें पांडुरंगराव गोविंद यांचें गोविंद हरीस पत्र. २ पंढरपुरच्या. यावरून मंगळवेढें सोडून मिरजेकडे येण्याकारितां गोविंद हरि निघाला होता असें सिद्ध होतें. ३ मोरोबा दादा फडणीस यांस. ४ पांडवगड वांईजवळ आहे. ५ साठ लक्षांच्या जहागिरींत.

घेऊन त्रिंबकेश्वरीं राहणार. तेथें अग्निहोत्र घेऊन रहावें असें मानस आहे. तूर्त तो पुण्यास जावें, तेथें मास पक्ष राहून मातुश्री बाईची आज्ञा घेऊन मग जावें, हा बेत आहे. कारभारी यांचे मतें जहागीर आली थोडकी, आणि सरकारास देणें फार, तेव्हां जहागीर इतकीच पुण्यास गेलेवर वांटावी; सारे [ सरदार ] समजून हीच वांटून घेतली तर बरें. नाहीं तरी आपण अंगा निराळे होऊन कारभाराचा बखेडा करावा असें आहे. कारभारी यांजवर मातुश्रीचा रोष आहे. याज करितां बाबा वैद्य पाठविले आहेत कीं मनःपूर्वक निखालसता असलिया आपणांस बोलाविणें. नाहीं तरी निखालसता तुम्हींच तेथें राहून करणें. याज करितां पुण्यास पाठविले आहेत. राजश्री नीलकंठ महादेव यांस बरें वाटत नव्हतें ह्मणून निरोप दिला. ते कालच पैठणाजवळ गंगा उतरून गेले. घरास जाणार. राजश्री नाना फडणीस पैठणास आले ह्मणोन वर्तमान आलें आहे. पंचमीचा पक्ष करून येतील. राजश्री बळवंतरायाचे चिरंजीव कालच आले. राजश्री शेषो नारायण कर्वीरकर ही आले. कळावें. राजश्री आनंदराव रास्ते यांस कारभारी यांणीं बलावणें पाठविलें आहे. त्यास कारभारी यांचे मतें हुजरात फार झाली आहे ती मोडावी. परंतु श्रीमंत राव ऐकत नाहींत. याज करितां त्यांजकडून[3] सांगून पहावें. आणि पुण्यास गेले उपरी बाईसाहेबांची

---

१ मोंगलाकडून जहागीर थोडकी मिळाली. तेव्हां हिच्यांत वांटण्या सरदारांस करून द्याव्या. त्यांस पूर्वीं कबूल केल्या प्रमाणें जहागीर द्यावी तर सरकारच्या खास अमलाखालीं मुलूख थोडा राहतो. या करितां अशी व्यवस्था करावी. सरदारानीं कबूल केलें तर बरेंच; नाहीं तर आपण कारभार सोडून घरीं बसावें व दौलतींत पुनः घोंटाळा करावा असा सखारामबापूचा बेत आहे. २ ' सखारामबापूच्या मतें हुजरात फौज फार झाली आहे ती कमी करून खर्च तोडावा, परंतु ही मसलत रावसाहेब पेशव्यांस पसंत पडत नाहीं. या करितां त्यांचे मामा आनंदराव रास्ते यांजकडून तरी त्यांस सांगून पहावें, ह्मणून रास्त्यांस सखारामबापूनें बोलावणें पाठविलें आहे, ' असा अभिप्राय. ३ रास्त्यांकडून.

ही कृपा त्यांचे द्वारें करून घ्यावी, याज करितां आणिले आहेत. राजश्री मल्हारराव रास्ते योगी आहेत. दररोज प्रातःकाळीं घोड्यावर बसून रानांत जातात आणि तेथें रुदंती करितात. सायंकाळीं डेऱ्यास येतात. ऐसें वर्तमान आहे. कळावें. वरकड सविस्तर वर्तमान तीर्थरूपांनीं लिहिले वरून कळेल. बहुत काय लिहिणें. कृपा लोभ निरंतर कीजे. हे विज्ञापना.

नं० ३६७

( अजमासें भाद्रपद वद्य सप्तंबरचा दु० पंधरवडा. )

श्रीगणराज.

अपत्यें साष्टांग नमस्कार विज्ञापना. राजश्री आबा पुरंदरे येथून पैठणास गेले. तेथें पक्ष ही करतील. बाबा वैद्य निरोप घेऊन पुण्यास नवरात्राकरितां गेले. अंतर्यामींची मसलत — कारभारी यांजवर मातुश्रीची वक्रता, याज करितां नीट करावया बद्दल गेले आहेत. श्रीमंत दादांचें मानस नवा लक्षांची जहागीर व चार किल्ले घेऊन आपला बेकिलाफ मातुश्रीच्या विद्यमानें करून निरोप घेऊन स्नानसंध्या करावयास त्रिंबकास जावें, पुढें अग्निहोत्र घ्यावें, हा मनोदय आहे. दक्षिण प्रांतीं हैदरनाईक प्रबल झाला. त्याचे पारपत्या विषयीं काडीमात्र काळजी कारभारी करीत असतील तर शपथ! कारभारी यांचें मानस असें कीं, जहागीर हल्लीं थोडी मिळाली, यास्तव आपल्या मनोदयानुरूपे निकाल ( सरदारानीं ) करून घेतला तर उत्तम. नच ऐकत तर 'आपण कारभार टाकितों'

---

१ वैतागलेले. हे रानांत जाऊन रडत बसत होते असें येथें लिहिलें आहे! असें यांस काय दुःख झालें होतें न कळे! [ या संबंधें आणखी उल्लेख मागें नं० ३४८ च्या पत्रांत आला आहे तो पहा. ] २ गोपाळरावानें. ३ पत्र गोपाळरावाचें गोविंद हरीस. ४ सख्य.

ह्मणोन बखेड्यांत पुण्यांत गेले नंतर घालून बसावें, असे मनोदय आहेत. राजश्री नाना फडणीस आले ह्मणजे राजश्री मोरोबा दादांस वस्त्रें द्यावीं, तों पर्यंत देणें नाहींत, ( असें थोरले श्रीमंत म्हणतात. ) काल उडत वर्तमान आलें जे, राजश्री नाना निघून येत आहेत. सत्वर आले तर उत्तम. नाहीं तर मशारनिल्हेस[1] बराबर असावें लागेल. वोढ केल्यानें लौकिकांत विरुद्ध दिसेल, यास्तव उतावळी करों देत नाहीं. कालदेशवर्तमानानुरूप वर्तणूक करितों. विदित होय. हे विज्ञापना.

नं० ३६८

( अजमासें भाद्रपद वद्य
सप्तंबरचा दु० पंधरवडा )

श्रीगणराज.

अपत्यें साष्टांग नमस्कार विज्ञापना. यादवाड, जमखिंडी येथील प्रकार विस्तारें करून लिहिला तो कळला. गणोबाचे पत्रावरून येसाजी राम याचें पत्र याच मजकुराचें आलेलें यजमानांस[2] व कारभारी यांस दाखविलें. त्यावरून श्रीमंत राजश्री दादासाहेबांचे नांवचीं पत्रें बर्व्यांस व विठल विश्राम यांस घेतलीं. धाकट्या यजमानांचीं आणखी ताकीद पत्रें घेतलीं तीं पाठविलीं आहेत. प्रयत्न करून काम करावें. सारांश, मिरजेंत ठाणें बसले उपरी मग त्या प्रांतीं लढा पडणार नाहीं. बर्वे अष्टयांस आले ते तेथेंच आहेत तोंच गांठ घालून स्थळाचे[3] कागद पत्र करून ध्यावे. लांबणीवर पडूं देऊं नये. सरकारच्या पत्रांत लढा किमपि नाहीं अशीं

---

१ मोरोबा दादास स्वारी बरोबर हिंडावें लागेल. नाना फडणीस आले तर तत्काळ फडणिशीचीं वस्त्रें मिळून घरीं जावयास मोकळीक होईल. २ पंत गोपाळरावाचें गोविंद हरीस. ३ कर्नाटकांतील जहागिरी पैकीं ठाणीं बर्व्यांनीं घेतलीं होतीं तीं सोडून दिल्याच्या चिठ्या.

लिहून दिलीं आहेत. यादवाड, जमखिंडी, मिरजप्रांत, यांत पहिल्या मामलेदारानीं कांहीं बाकी ठेविली नाहीं! बरें! काय करावें! बोभाट ही सांगून परिणाम नाहीं! यजमान हीनवर, वरकड त्रिजवर, असा प्रकार झाला; त्यामुळें कैद ही चालत नाहीं. तूर्त बोभाट कोणे गोष्टीचा करितां येत नाहीं. मोंगलाचा तह झाला; त्यास मुरादखान ह्मणतो जे आमचें समाधान नाहीं. थोरले यजमान समाधानार्थ दहा पांच लक्षांची जहागीर माघारी द्यावी असें ह्मणतात. त्याचा अभिप्राय—पंचविसांची द्यावी तर समाधान—असें बोलतो! अद्यापि ठराव नाहीं. याच तळावर ठराव करून निरोप त्यास देणार. एवंच घरांतून कारभारी यांचा व मुत्सद्दी व यजमानांचाच अंतर्यामीं लग त्याजकडे; त्याज करितां हा असा प्रकार बोलतात! ऐकून आश्चर्य वाटतें. निजामअलीनें सलाबतजंगास गळीं देऊन मारून टाकिलें. या प्रमाणें निजामअलीनें काम केलें. विदित होय. सलाबतजंगाचे दोघे पुत्र होते ते ही मारिले. हें विनंती.

नं० ३६९

( भाद्रपद शुद्ध चतुर्दशी
२१ सप्तंबर. )

श्रीगणराज.

अपत्यें साष्टांग नमस्कार विज्ञापना. तूर्त मिरजेच्या फडणिशीचें पत्र बाळू दामल्यास आम्हीं लिहून दिलें आहे. ऐशियास तें पत्र ठेऊन

---

१ सलाबतजंग हा निजामअलीचा थोरला भाऊ व हैदराबादेचा नामधारी नबाब. या पूर्वींच त्यास निजामअलीनें बेदर मुक्कामीं कैदेंत ठेविलें होतें. बिचारा निरुपद्रवी होता. पण तो जिवंत तों पर्यंत राज्याचा मुख्य अधिकार आपल्या हातीं राहणार नाहीं अशी निजामअलीस भीती होती. त्यास गळफांस लावून मारून व त्याच्या मुलांस ही मारून निजामअली आतां निर्भय झाला!

चार दिवस त्यासीं ममता दाखवूनच काज काम घ्यावें. आधींच तुटक गोष्ट सांगों नये. दरबारीं थोरल्या श्रीमंतांजवळी होता, याज करितां ( त्यास फडणिशीची ) सनद दिली आहे. रोष तूर्त करूं नये. प्रतिनिधि आज छ० १३ रोजीं येथून निघोन गेले. नवरात्र तर समीप आलें. घरीं वार्षिक ( उत्सव ) करून मग सेतऋषीस जातील. राजश्री गंगोबा व कृष्णराव बल्लाळ नबाबाकडे गेले, त्यास पंचायशी लक्ष रुपयांची जहागीर [ मोंगलानीं ] द्यावी या प्रमाणें ठरावांत आलें. अंतुर किल्ल्याचा परम आग्रह श्रीमंतांचा होता, परंतु तो किल्ला ते देत नाहींत. एक किल्ला चव्हाणाचा मात्र द्यावा असें बोलणें झालें आहे. निदानीं तो ही न दिला तत्रापि ओढूं नये, निकाल काढावा, असेंच ठरलें आहे. आज तो येत नाहींत, उद्यां सनदा पत्रें घेऊन येणार. आल्या नंतर एका दो दिवसां येथून कूच करावें अशी मसलत आहे. एक वेळ मोंगलाचा विवेक झाल्या नंतर सर्व सरदारांस निरोप होऊन ( ते ) आपापल्या घरास जात आहेत. कामें काजें करारा प्रमाणें ( यांची ) निभावणी कारभारी करीत नाहींत, मग आपण उगेच राहोन कजिया कां करावा ? या करितां निकाल काढून घरास जावें;' अशा तजविजेंत [ सर्व सरदार ] आहेत. आमचें मानस [ असें आहे कीं, ] मिरज हातास येई तों पर्यंत काडीमात्र उदासीनता दाखवूं नये. साधक दिशा धरून उगेंच असावें. राजश्री नाइकांचें मानस व नारो शंकर याचें ( मानस ) जे, तह जाहल्या नंतर आपण योगी होऊन घरास जावें असें आहे. परंतु त्यांचे स्वाधीन स्थलें आहेत. थोडा बहुत सरंजाम ही आहे. आम्हीं त्यां समागमें उदासीनता केल्यानें

---

१ कऱ्हाडास. २ साताऱ्यास. ३ चव्हाणाच्या जहागिरी पैकीं नळदुर्गा सारखा. ४ गंगाधर यशवंत व कृष्णराव बल्लाळ हे मोगलाकडून निरोप घेऊन व तहाचीं कलमें पक्कीं ठरवून आज परत येत नाहींत. ५ तह. ६ बाबूजी नाईक बारामतकिर याचें. ७ वैतागलेले. ८ बाबूजीनाईक व नारो शंकर यांच्या. ९ किल्ले व ठाणीं.

परिणाम आमचा काय! याज कारितां केवळ तुटे असें ही भाषण करीत नाहीं. उठोन जावें असा ही भर देत नाहीं. उभयतांचें भाषण यागी होऊन गेल्यानें ( कारभारी ) निकाल काढून देतील, यास्तव जावें; असें त्यांच्या विचारें. तूर्त आम्हीं एक ही पक्ष सिद्ध असें बोलोन दाखवीत नाहीं. जसें जसें पुढें दिसेल तसें करूं. विदित होय हे विज्ञापना.

नं० ३७०

( अजमासें भाद्रपद वद्य
० सप्तंबरचा दु० पंधरवडा. )

गोपाळरावाचें गोविंद हरीस पत्रः—

" नाना फडणीस यांचें पत्र आलें जे, आठ चार दिवसांत मुहूर्त पाहून येतों. असें मोघम सरकारचे पत्रीं लिहिलें होतें. अंतस्थ गुरुजींचे[1] पत्रीं स्पष्ट लिहिलें होतें कीं, ' मोरोबा दादास वस्त्रें झालीं असलीं तर सावकाशीनें येऊं. नाहीं तर सत्वर येऊं. ' असें लिहिलें होतें. ते विजयादशमीच्या मुहूर्तें येतीलसें दिसतें. थोरल्या यजमानांस केवळ निकड करितां येत नाहीं. धाकल्यांस आपण होऊन हें[2] काम चालतें करावें असें करितां नये. ते[3] गृहस्थ व आम्हीं एकत्र आहों. थोरल्या श्रीमंतांचें शरीर फार कृश झालें आहे. त्यांचें मानस—तह झाल्यावर निर्काल काढून त्र्यंबकास जावें—या तरतुदेंत आहेत. ( त्यांनीं ) छपरबंदी करावयास नाशिकास शिष्य पाठविला आहे. राजश्री महादजी शिंदे उज्जनीहून निघून

१ महादाजीपंत गुरुजी. हे पेशव्यांच्या दरबारांत त्यावेळीं एक प्रसिद्ध मुत्सद्दी होते. २ रायरीकरांकडे दादासाहेबांनीं फडणिशी दिली होती ती त्यांजकडून काढून पुनः नाना व मोरोबा दादा फडणीस यांजकडे देण्याचें. ३ मोरोबा दादा फडणीस. ४ गोपिकाबाई व पेशवे यांजकडून आपल्या खर्चा कारितां जहागीर तोडून घेऊन. ५ या शिष्यांचा किंवा शागिर्दांचा दादासाहेबांच्या अमदानींत फार सुळसुळाट

नर्मदातीरास आले अशीं पत्रें आलीं. सारांश मोंगलाचा तह झाल्यास ब-खेडा कारभारी पाडितील असा रोंख दिसतो. ”

नं० ३७१

( भाद्रपद वद्य द्वादशी
४ आक्टोबर. )

श्रीगणराज.

अपत्यें साष्टांग नमस्कार विज्ञापना. राजश्री नाना फडणीस आले. भेटी झाल्या. दुसऱ्या दिवशीं आम्हीं जाऊन श्रीमंतांसे विनंती केली जे, नानाचा उजूर होता ते ही आले. या उपर स्वामिनीं [ त्यांस फडणिशीचीं वस्त्रें देण्याची ] आज्ञा करावी. त्याजवर ‘ उत्तम ’ ह्मणोन आम्हांसीं करार केला. ‘ मुहूर्त कधीं ? ’ ह्मणून पुसिलें. आम्हीं सांगितलें जे, ‘ उदईक त्रयोदशी बुधवारीं मुहूर्त उत्तम आहे. ’ ‘ बहुत सरस ’ म्हणाले. तदोत्तर धाकट्या यजमानांजवळ आलों. त्यांनीं रामचंद्र गणेश यासीं आज्ञा केली जे, ‘ तुम्हीं जाऊन विनंती फडणीसांविशीं करावी. ’ तों तेच ‘ यजमानांजवळ जातों. आपण रदबदल करितों. विजयादशमीस ( वस्त्रें ) द्यावीं असें श्रीमंत ह्मणतील. ’ ह्मणून आपणच उत्तर प्रति उत्तर केलें. मग गेले. तेथें हाच डौल सांगितला. आम्हीं करार करून आलों. यांनीं

झाला होता. त्यांचा बंदोबस्त करून त्यांस जरबेंत ठेवण्यास माधवराव पेशव्यांस सुद्धा फार प्रयास पडले. या शिष्यां पैकीं एका शिष्याची लीला मागें नं० २८४ च्या पत्रांत वर्णिलेली आहे ती पहा.

१ पत्र गोपाळरावाचें गोविंद हरीस. २ श्रीमंत दादासाहेबांस. ३ सबब ४ दादासाहेबांजवळ. ५ दादासाहेबानीं भाद्रपद वद्य त्रयोदशीस फडणिशीचीं वस्त्रें नाना फडणिसांस देण्याचें गोपाळरावाजवळ कबूल केलें होतें त्या प्रमाणेंच करण्या विषयीं पेशव्यांचा निरोप घेऊन दादासाहेबांकडे रामचंद्र गणेश गेला आणि परत सांगत आला

जाऊन हा प्रकार करविला ! तेव्हां कारभारी यांसच आम्हीं घेऊन जाऊन उद्यांच द्यावीं असा सिद्धांत करून उभयतांस घेऊन येतों असें बोलोन घरास आलों. प्रातःकाळीं आम्हीं जावयास सिद्ध झालों. तों यजमानांची चिट्ठी आली जे, ' आधीं उभयतांस न आणणें. तुम्हींच येणें. कांहीं सरकारी सवालजाब बोलावयाचा आहे. ' या प्रमाणें चिठी लिहून पाठविली. आम्हीं निघोन गेलों. तों सांगू लागले जे, फडणिसानीं लाख रुपये घ्यावे. बाकी जास्ती आकार सरकारांत द्यावा. अशी अप्रसीका काढली. आम्हीं उत्तर केलें कीं, " त्यांचा हेकड कारभार. त्यानीं अशी कानू कधीं आपणावर चढवून घेतली नाहीं. ते आतां कसे कबूल करितील ? एत्रंच ( आपणास फडणिशीचीं वस्त्रें त्यांस ) देणें नाहीं, तेव्हां ते कांहीं नमस्कारास येत नाहींत ! ते जातात. तेव्हां आम्हीं त्यांस टाकोन रहावें यांत कांहीं उत्तम नाहीं. मी बारगीर. आधींच एतद्विषयीं सूचना मजला

---

कीं, फडणिसांस वस्त्रें ठरल्या प्रमाणें त्रयोदशीच्या दिवशीं न मिळतां तीं पुढें बारा दिवसानीं मिळणार !

१ ' दसऱ्याच्या दिवशीं फडणिसांस वस्त्रें द्यावयाचें श्रीमंत बोलतात, परंतु उद्यां आह्मीं खुद्द सखारामबापूस व नाना व मोरोबा यांस घेऊन श्रीमंतांकडे जातों व त्यांची समजूत सखारामबापूच्या हातें करवून उभयतां फडणिसांस वस्त्रें देववितों ' असें बोलून. २ दादासाहेबांची. ३ नाना व मोरोबा फडणीस यांस. ४ 'अ प्र सि का' हीं चार अक्षरें एका श्लोकाच्या चार चरणाच्या प्रारंभींचीं आहेत. हा श्लोक ' कालिदासाच्या चातुर्या ' च्या गोष्टींत किंवा तसल्याच एखाद्या अतिशय जुनाट पुस्तकांत अगदीं लहानपणीं वाचल्याचें स्मरतें. ' अप्रसिका ' याचा येथें अर्थ ' शंका ' असा आहे. ५ फडणिसांचा. ६ लष्करांतून निघून जातात. त्यां बरोबर आह्मीं ही जातों. ७ गोपाळराव जरी सरदार होता तरी दादासाहेबां पुढें आपला कमीपणा दाखविण्या साठीं आपणास ' शिलेदार ' देखील ह्मणवीत नाहीं. सात आठ रुपये दरमहा मिळविणाऱ्या बारगिरांत आपणास गणीत आहे ! मागें नं० २४ च्या पत्रांत सुद्धां त्यानें नानासाहेब पेशव्यांस आपला ' बारगीर पेशा ' असल्याचें कळविलें आहे.

## फडणिसांची पुनः स्थापना

कळवावयाची होती, ह्मणजे समागमें घेऊन न येतों. प्रथम कबूल करून 'घेऊन येणें' ह्मणोन आज्ञा केली. तदोत्तर मोरोबा आल्यानंतर राजश्री नाना फडणीस याचा उजूर[३] केला. तेव्हां ही हा स्वालजाब ( आपण ) न केला. आतां लटकी दिक्कत काढितां. त्यांत काल करार केला ते समयीं हा कांहींच प्रकार न बोलला. आतां या समयीं असा प्रकार दर्शविला. तेव्हां ( आम्हांस ) निरोप द्यावा." हेंच भाषण केलें. मग कारभारी यानीं सावळागोंधळ करून मागती नीट समजाऊन 'एक लक्ष दहा हजार निदानीं घ्यावे, उरले द्यावे,' या प्रकारें ( देखील ) कांहीं बोलों नये. वस्त्रें द्यावीं, असें ठरावूनी अकरा घटिकांत उभयतांस वस्त्रें दिलीं. खासें कलमदान दिलें. कीर्दीचा रुमाल स्वाधीन केला. लागलेच बिर्‍हेस राहुट्या आणून देविल्या. या प्रमाणें हें काम एक वेळ ईश्वरें निभाविलें. ईश्वरें आम्हांस यश दिलें. हिसकेच भारी बसले! त्यांत धाकटे यजमान मनःपूर्वक [ आम्हांकडे व फडणिसांकडे ] ह्मणून हें कार्य सिद्धीस गेलें. नाहीं तर कांहीं जात नव्हतें! लढा कारभारी यानीं घातला तेव्हां धाकट्या यजमानानीं कारभारी यांस चिठ्ठी लिहिली जे, 'नवीन दिक्कती काढितां हा प्रकार कामाचा नाहीं.' असें लिहून चिठ्ठी पाठविली ( तेव्हां ) त्यांस ही कळलें ( कीं, ) या उपर दिरंग लावूं नये! ह्मणोन मग यजमा-

---

१ मोंगलाच्या लष्करांतून मी इकडे आलों तेव्हां मोरोबा दादास बरोबर घेऊन आलों नसतों. २ पेशव्यांच्या लष्करांत येऊन हजर झाल्या नंतर. ३ नाना फडणीस अजून आला नाहीं, तो आल्या शिवाय वस्त्रें देत नाहीं; अशी सबब सांगितलीत. ४ 'फडणिसानीं आपल्या उत्पन्ना पैकीं एक लक्ष रुपये घेऊन फडणिशीचें काम करावें, अधिक रक्कम होईल ती सरकारांत जमा करावी' असा सवाल जवाब. ५ वस्त्रें देण्याचा करार. ६ देवविलीं. ७ पेशव्यांच्या डेऱ्याच्या ज्या बाजूस फडणिसांची राहुटी नेहमीं असावयाची तेथें. ८ दादासाहेबांस.

नांस समजाऊन वस्त्रें देविलीं. तदोत्तर कारभारी आम्हाशीं बोलों लागले जे, ‘ जसें हें तुम्हीं नेट धरून कार्य केलें, त्या प्रमाणें मुजुमदारांचें काम काज करावें. ’ तेव्हां आम्हीं उत्तर केलें जे, ‘ यांचा ऐवज सरकारांत गुंतला आहे त्याचा मार्ग करून द्यावा. नंतर तुम्हीं रुसा. आम्हीं तुम्हां बरोबर येऊं. आमचा गुंता नाहीं. ’ असें मिष्ट भाषण करून निरोप घेऊन डेन्यास आलों. ईश्वरें मोठें काम सिद्धीस नेलें. विदित होय हे विज्ञापना.

नं० ३७२L

[ आश्विन शुद्ध एकादशी
१७ आक्टोबर. ]

श्री.

विनंती[2] उपरी. तुम्हीं गेल्या तागायत पत्र येऊन वर्तमान कळत नाहीं. तर प्रस्तुतैचा प्रकार कसकसा आहे, तुमची गांठ पडोन बोलणें झालें किंवा नाहीं, हें तुम्हीं कांहींच न लिहिलें. तरी सत्वर हा प्रकार लिहिणें. इकडील मजकूर तर नबाबाचा सलुख ब्यायशींवर झाला. प्रस्तुतचा

---

१ फडणिसां प्रमाणेंच मुजुमदारांस ही दादासाहेबानीं पदभ्रष्ट केलें होतें. त्यांची पुनः स्थापना करण्या विषयीं सखारामबापूचा दादा साहेबांपुढें आग्रह चालेना. सध्यांच्या प्रसंगीं सखारामबापू गोपाळरावास ह्मणाला कीं, जसें तुह्मीं फडणिसांचें काम नेट धरून तडीस लाविलेंत, तसेंच मुजुमदारांचें ही तडीस लावा. त्यावर गोपाळरावानें उत्तर केलें कीं, फडणिसांचा ऐवज सरकारांत कांहीं गुंतला आहे तो मोकळा करून द्या; ह्मणजे आमचें काम पूर्णपणें तडीस गेलें. नंतर मुजुमदारां साठीं तुह्मीं श्रीमंतांजवळ भांडण काढा. आह्मीं तुमचे सोबती होऊं ! २ हें पेशव्यांचें पत्र बहुधा रामचंद्र नारायण यास लिहिलेलें असावें. ३ आपली आई गोपिकाबाई हिच्या प्रकृतीविषयीं ही पेशव्यांची चौकशी. ४ ब्यायशीं लक्षांची जहागीर मोंगला पासून घ्यावयाचा करार करून त्याशीं तह झाला.

गुंता चौथाई जहागीर ( सरदारांपासून परत ) घ्यावी हा होता. परंतु काल सुभेदाराच्या येथें वडिलांनीं जावें, नंतर चौथाईचा प्रकार त्यानें कबूल करावा ( असें ठरलें होतें. ) त्यास वडिलीं रात्रीं [ त्याकडे ] जाऊन ठीक केलें. तुम्हांस कळावें. तीर्थस्वरूपांस विनंती करून त्र्यंबकचे देव व आनंदीबाई यांचें येणें पुण्यास करावेंसें करून बोलावूं पाठविलें आहे. प्रस्तुत वडिलांची शरीरप्रकृति क्षीण झाली आहे. तुम्हांस कळावें. ( आम्हीं तुम्हांस ) दोन पत्रें पाठविलीं परंतु एका ही पत्राचा जाब कां न आला हें कांहीं कळत नाहीं. सत्वरच पुण्यास आमचें येणें होईल. रवाना छ० ९ रबिलाखर बहुत काय लिहिणें हे विनंती.

पै॥ छ० १२ रबिलाखर.

नं० ३७३ L

[ आश्विन शुद्ध त्रयोदशी
१९ आक्टोबर. ]

श्री.

तीर्थरूप मातुश्री बाई वडिलांचे सेवेशीं

अपत्यें माधवरायानें चरणावरी मस्तक ठेऊन साष्टांग नमस्कार विज्ञापना. येथील कुशल तागायत छ० ११ रबिलाखर मुक्काम टोकें येथें वडिलांचे आशीर्वादें करून सुखरूप असों. विशेष. वडिलांकडून बहुत दिवस पत्र येऊन वर्तमान कळत नाहीं. तरी आशीर्वाद पत्र पाठवावें. इकडील वर्तमान तर नबाब शैहरांतच आहे. प्रस्तुत त्याचा कारभारी कोणी मुकरर झाला नाहीं. त्यां पासून रुपये मात्र दहा पंधरा लक्ष घेतले. लो-

१ हें पेशव्यांचें गोपिकाबाईस पत्र. २ औरंगाबादेंत. ३ त्यापासून ह्मणजे कोणापासून ? ज्यास नबाबानें दिवाणगिरी देऊं केली होती त्या पासून दहा पंधरा लाख रुपये आधीं नजराणा ह्मणून उकळले असें होतें.

कांची थोडी बहुत शिबंदी वारली. प्रस्तुतचें वर्तमान तर मीर मोंगल[2] पळाले. त्यास पळावयास कारण हेंच कीं, नबाबानें सलाबतजंगास मारिलें व पुढें ही माझी अवस्था हीच; असें समजून गेले. सदाशिव रामचंद्र ही गेले असें वर्तमान उडतें आलें आहे. शिवाजी केशव[3] यास लोकानीं अडवून कैद केलें. कीं, 'आमची तलब[4] देणें.' ह्मणून लोकानीं कैद केलें आहे. असें वर्तमान प्रस्तुतचें आहे. महादजी शिंदे यांची (व आमची) भेट झाली. त्यांज बरोबर ही फौज पांच सहा हजार आहे. प्रस्तुत कामावर[5] पडेशी आहे. तलब ही पोंहचून ठीक आहे. वडिलांस कळावें. लोकां पासून चौथाई जहागीर ध्यावयाचा गुंता होता तो ही उरकला. महाल मात्र निवडावयाचे आहेत. सत्वरच गुंता उरकेल. सेवेशीं श्रुत होय. हे विज्ञापना. .ा

नं० ३७४

( आश्विन शुद्ध त्रयोदशी
१९ आक्टोबर. )

श्री॰गणराज.

अर्पत्यें साष्टांग नमस्कार विज्ञापना. तागायत छ० ११ रविलावल मुक्काम टोकें जाणून यथास्थित असे. विशेष. श्रीमंत उभयतांचीं पत्रें[6] राजश्री गोपाळराव बर्वे वगैरे यांस घेऊन पाठविलीं आहेत तीं प्रविष्ट करोन स्थळें स्वाधीन करून घ्यावीं. राजश्री गोपाळराव बर्वे यांचे पत्रांत[8] कांहीं

१ फौजेंतील लोकांस. २ हा निजामअलीचा धाकटा बंधु. ३ हा मोंगलाचा एक सरदार. ४ पगार. ५ मोहिमेच्या कामावर. ६ हें गोपाळरावाचें गोविंद हरीस पत्र. ७ गोपाळराव बर्व्यास दादा साहेबानीं पटवर्धनांची जहागीर दिली होती ती पटवर्धनांस परत देण्या विषयीं त्यास पेशव्यांचीं आज्ञा पत्रें. ८ बर्व्यानें आह्मांस पत्र लिहिलें होतें त्यांत.

लक्ष्मण कोन्हेरा प्रमाणें उद्दाम प्रकार नाहीं. पत्र पाहिल्या नंतर विलंब[2] लावणार नाहींत असें दिसतें. नवीन वर्तमान राजश्री महादजी सिंद्याच्या आज दहा घटकेंत भेटी होणार. प्रथम त्याचा भाव ' जर माझ्या सरदारीची घालमेल असली तर मला भेटीसच येणें नाहीं; ' असा प्रकार होता. त्यास या गोष्टीचा धरबंद पुरता ठरावून काल कृष्णराव बल्लाळ त्याजकडे बेलभंडार देऊन ( श्रीमंतांनीं ) पाठविले जे, ' तुमची सरदारी कायम राखितों. काळजी न करावी. ' असें इमान प्रमाण पाठवून दिलें. दुसरें वर्तमान — येथें आज सहा मुक्काम झाले. होळकर व नारो शंकर व विट्ठल शिवदेव यांचा निर्गम करून निरोप द्यावा, त्याज नंतर आपण कूच करावें, ( असा श्रीमंतांचा बेत ठरला होता; ऐशीयासीं होळकराचेच घरीं श्रीमंत जाऊन असा निकाल काढिला जे, सालमजकुरीं नवीन सरंजाम सरकारांतून घेतला त्याच प्रमाणें चौथाई सरंजाम सरकारांत द्यावा. या प्रमाणें दार मदार झाला. प्रथम त्याणें कबूल केलें ह्मणजे ( बाकीचे ) सर्व ही या प्रमाणें ऐकतील, मग लढा पडणार नाहीं [ असें जाणून ] त्यास ' तुम्हीं सरकारांत कांहीं बाकी[3] राहिली नसतां ओढूं नये ' अशा गोष्टी सांगितल्या. तेव्हां मान्य होऊन होळकरानें कबूल[4] केलें. त्यास चांदवडाहून गेले, तेव्हां दहा लक्षांचा सरंजाम द्यावा, या प्रमाणें करार केला होता. मग त्यानें सैन्यांत अडअडून पंचवीस तीस लक्षांचा आणखी घेतला. त्यांतील चौथाई देणें ही त्यास अगाध नाहीं! आज देऊन पुढें मागती—दिल्या पेक्षां जास्ती घेईन—म्हणावयासी बळकट ही आहे! तूर्त वरकड सरदारांवर गेंडदु[5] चढविला. कारभारी याणीं आपण येणें प्र-

---

१ हा मिरजेचा किल्लेदार. २ आमचीं ठाणीं आमच्या हवालीं करण्यास बवें विलंब लावणार नाहीं. ३ सरकारच्या दौलतीस उतरती कळा आली असतां. ४ चौथाई जहागीर परत देण्याचें. ५ न सहन होण्या जोगें ओझें.

माणें प्रथम देऊन मागती ' या प्रमाणें सरकार किफायत केली ' हे ममता दाखवून लोभ विशिष्ट करून घ्यावा, ' आपण असे सरकार काम करणार' हा ही रुढि प्रकार करावा, या अन्वयें हा विचार मांडिला ! त्यांत प्रथम जेव्हां सरंजाम घेतले तेव्हां मन मानेल तशी वांटणी केली. जणो द्वारकाच लुटिली !! ज्या प्रकारें सीमोल्लंघनाच्या सोन्याची गत तसा प्रकार करून घेतली जहागीर. मग आतां ' चौथाई देणें हें ही मोठें संकटें करून कबूल केलें सरदारानीं ' असें दाखवावें हे प्रकार कारभारी यानीं केले. तूर्त होळकरानीं कबूल केलें. आतां नारो शंकर व विठ्ठल शिवदेव यांचा निकाल पडावयाचा आहे. तो मार्ग या पैकीं निघाला ह्मणजे कूच करून मजल दर मजल ( श्रीमंत उभयतां ) पुण्यास येणार. तमाम शिलेदार एकांडे आदिकरून निरोप घेत आहेत. आम्हीं काल जाऊन पुसिलें जे, " आम्हांस येऊन अडीच महिने होत आले. आमचा निर्गम करून देऊन निरोप द्यावा. आणखी असें करितां आठ पंधरा दिवस लागते तरी आम्हीं गडबड न करितों. ( परंतु ) आतां चिरंजीवें पाडाव होऊन त्यास सांपडले यास्तव आम्हांस सत्वर निरोप द्यावा. तिकडे जाऊन साम, दाम, दंड, भेद, हा प्रकार करून सोडून आणूं. ते तरतुदीस हा पल्ला लांब पडतो. यास्तव निरोप द्यावा. " या प्रमाणें बोलल्या नंतर " आज उद्यांत मार्ग काढून निरोप देतों, ". असें बोलले. त्यास कोणे विचारें मार्ग काढून निरोप देतात हें ही कळतें. केवळ उतावळी करून निभाव नाहीं. मिरजेच्या पत्राची मार्गप्रतीक्षा करितों. इतक्यांत हा ही जावसाल निर्गमांत येतो. आपणाकडून तुटे असें करीत नाहीं. विदित होय हे विज्ञापना.

---

१ पुतण्या विरुद्ध वंड दादासाहेबांनीं केलें तेव्हां नारो शंकर व विठ्ठल शिवदेव यांस सखारामबापूनें जहागिर देऊन. २ सरदारानीं दादासाहेबांस नडवून जहागिरी घेतल्या तेव्हां. ३ धाकटा चुलत बंधु मेघश्यामराव बापू. ४ हैदरअल्लीस. ५ कर्नाटकांत. ६ मिरजेंत आमचें ठाणें बसलें या मजकुराच्या पत्राची.

श.१६८९ **पेशवे परत फिरतात** इ.स.१७६३

## पटवर्धनांची पुनः मिरजेंत स्थापना

नं० ३७९

[ १९ आक्टोबर. ]

श्रीगणराज.

श्रियासह चिरंजीव राजश्री गोविंदपंत यांसी त्रिंबक हरि. आशीर्वाद उपरी येथील कुशल तागायत आश्विन शु० त्रयोदशी, बुधवार, जाणोन स्वकीय लिहिणें लिहीत जावें. विशेष. राजश्री माणको जिवाजी मिरजेस आले उपर राजश्री लक्ष्मण कोन्हेर यांची चिट्ठी राजश्री आनंदराव किल्लेदार यांस आली कीं, "राजश्री महादाजी बल्लाळ याचे गुजारतीनें जकिरा मोजदाद करून देऊन ठाणें स्वाधीन करून पावतीचें कबज घेणें." ह्मणून आली. त्याजवरून राजश्री आनंदरायानीं 'मशारनिल्हे यांस पाठवून देणें' ह्मणोन आम्हांस पत्र लिहिलें. त्याजवरून चिरंजीव राजश्री महादाजीपंत यांस परवां विजयादशमीच्या मुहूर्तें भोजनोत्तर पाठवूनं दिलें. ते दोन तास दिवसास तेथें गेले. राजश्री चिंतामणपंत ही कागवाडचे लोक वगैरे चारशें जमा करून काल गेले. पेठेंत जाऊन उतरले आहेत. कुरुंदवाडचे लोक ही सव्वाशें खेरीज पाठविले आहेत. चिरंजीव गेल्या नंतर विजयादशमीचे मुहूर्तें दहा लोक व निशाण व राजश्री माणकोजीपंत ऐसे आंत घेतले. जकिरा मोजदाद करावयास कारकून परवां पासून लाविले आहेत. चिरंजीव राजश्री महादाजीपंत ही आंत जाऊन आले. जकिरा मोजदाद जाहल्या नंतर एक दोन रोजांत ठाणें स्वाधीन करितील. सविस्तर चिरंजीव राजश्री महादाजीपंत लिहितील त्यावरून कळेल. ठाणें हस्तगत होतांच टाकोटाक आपणांकडे परभारें मिरजेहून लिहून पाठवितील.

---

१ दारूगोळी, धान्य व इतर सामान. २ महादाजीपंत यास. महादाजीपंत हा त्रिंबक हरीचा कारभारी. ३ कुरुंदवाडाहून मिरजेस.

अतःपर गुंता कांहीं पडणार नाहीं. ' धारवाड छ० २ इंदुवारीं लोकांनीं कौल घेऊन उतरून ठाणें स्वाधीन केलें[1]. तेथील बंदोबस्ती करून कूच करून हुलीस गेले[2], हुली घेतली आणि सिरहट्टीस गेले. ' ह्मणून वर्तमान आहे. चिरंजीव राजश्री बापू ( यांनीं आपणा ) समागमें नेले आहेत. दोन्ही स्थलांच्या चिठ्या त्यां पासून लिहून घेतल्या आहेत. जातांच स्थलें दिलीं तरी चिरंजीवाची लौकर सुटका होत नाहीं. राजश्री विसाजीपंतानीं गडी चिरंजीवाकडे पाठविला होता. त्यास भेटोन आला. मुख जबानी मशारनिल्हेस सांगोन पाठविलें - माणसा बरोबर, कीं दोन्ही स्थलांस चिठ्या पाठवून सावध करणें. त्याजवरून मशारनिल्हेनीं लिहून पाठविलें[3] जे, तुम्हीं " फौज शत्रूनें आणिली आणि चिरंजीवांची चिठ्ठी दाखविली तरी स्थलें एकाएकीं न देणें. त्यांचे[4] सुटकेचा विचार होईल. मातबर जामीन ( आपल्या सुटके बद्दल चिरंजीव ) घेतील तेव्हां तुम्हांस चिठ्ठी[5] येईल आणि [ मग ] स्थलें देणें, " ह्मणून लिहून पाठवून सावध केलें आहे. काय करितात पहावें ! चिरंजीवानीं तो त्यांस[6] उघडून गोष्ट

---

१ पेशव्यांच्या लोकानीं धारवाड छ० २ रविलाखर, आश्विन शुद्ध चतुर्थी, तारीख १० आक्टोबर इ. स. १७६३ रोजीं हैदरअल्लीच्या स्वाधीन केलें. २ विसाजी पंत हा इचलकरंजीकर घोरपड्यांचा कारभारी. घोरपड्यांची जहागीर कर्नाटकांत होती तिच्या बंदोबस्ता करितां हा तिकडे गेला होता. ह्या व मेघश्यामराव बापू हैदरअल्लीशीं लढत असतां त्यांचा पराजय होऊन मेघश्यामराव हैदराचा सरदार मीरफैजुल्ला याचे हातीं सांपडला. त्याच्या ताब्यांत ठाणीं होतीं तीं आपल्या लोकांच्या हवालीं करण्या विषयीं तेथील ठाणेदारांस चिठ्या त्या पासून मीरफैजुल्लानें पळजोरीनें लिहून घेतल्या. मेघश्यामरावाची गांठ घेण्या करितां विसाजीपंतानें गडी पाठविला होता त्या बरोबर मेघश्यामरावानें विसाजीपंतांस सांगून पाठविलें कीं, ठाणीं हवालीं करण्या विषयीं माझ्या चिठ्या घेऊन कोणी शत्रूचे लोक येतील तर त्यांस ठाणीं देऊं नयेत. या विषयीं ठाणेदारांस सावध करावें. ३ ठाणेदारांस लिहून पाठविलें. ४ मेघश्यामरावाच्या. ५ मेघश्यामरावाची. ६ मीरफैजुल्लास.

सांगितली आहे कीं, ' आमचे स्वाधीन ठाणीं नाहींत. सरकारचे लोक आंत आहेत ते आमचें ऐकणार नाहींत. ' ह्मणून साफ बोलले; परंतु त्यानें बळजोरीनें चिठ्या लिहून घेतल्या आहेत ! आठ पंधरा दिवस दम धरून स्थलें झुजलीं तरी कांहीं तरी बोली होऊन मातबर मध्यस्त जामीन घेऊन स्थलें स्वाधीन करून चिरंजीव सुटका करून घेतील. रात्रंदिवस चिंता लागली आहे. अनुष्ठानास ब्राह्मण लाविला आहे. श्रीभगवान् करील तें प्रमाण ! बहुत काय लिहिणें हे आशीर्वाद.

नं० ३७६

( २३ आक्टोबर. )

श्रीगणराज.

श्रियासह चिरंजीव राजश्री गोविंदपंत यासीं प्रती त्रिंबक हरि. आशीर्वाद. उपरी येथील कुशल तागायत आश्विन वद्य द्वितीया भानुवार पर्यंत यथास्थित असे विशेष. तुम्हीं पत्र पाठविलें तें पावलें. लष्करचा[१] लाखोटा चिरंजीवाचा पावला. ही गोष्ट मोठीसी झाली. वेध तुटला. श्रीमंत निघून गंगे[२] अलीकडे आले, उत्तम गोष्ट झाली. भोसल्यास निरोप दिला. ते आपले देशास गेले. वरकड राजश्री होळकर व राजश्री नारो शंकर व विठ्ठल शिवदेव यांची रवानगी हिंदुस्थानांत होणार ती जाहलीच असेल. आजीपर्यंत पुण्यास आले असतील. अलीकडे वर्तमान आलें असेल तें लिहिलें पाहिजे. आम्हीं ही जासूद मुजरद चिरंजीवाकडे रवाना केला आहे. मिरजेकडील वृत्त तर—अगोदर चिरंजीव राजश्री महादाजीपंत विज-

---

१ गोपाळरावाचा. पेशव्यांच्या लष्करांतून लिहिलेला. २ पेशव्यांच्या लष्करांत गोपाळरावाकडे.

यादशमीचे मुहूर्तें मिरजेस पाठवून दिले ते दिवशीं दहा लोक व निशाण त्याणीं घेतलें. त्याजउपर आंतील गृहस्थ आनंदराव मोरेश्वर येऊन भेटले. 'जंकिऱ्याची मोजदाद करून किल्ला देतों' ऐसा करार केला. दोन दिवस घालमेलीवर घालविले. मग आम्हीं चिरंजीव राजश्री कोन्हेरराव व राजश्री गोविंदपंत ऐसे पाठवून दिले. तेणेंकरून त्यासीं इभ्रत पडली. मग चिरंजीवानीं त्यासीं दोन गोष्टी साफ सांगितल्या. लोकें ही सातशें व राऊत दोनशें मिळून त्यासीं निकड फारच केली. तेव्हां त्यानीं किल्ला काली मंदवारीं स्वाधीन करून बाहेर निघून तासगांवासीं गेले. (तुम्हीं) तासगांवची सनद अगोदर पाठविली नाहीं. त्यासीं लागलीच दाखविली असती. चिरंजीवानीं त्यासीं सांगितलें कीं, तासगांव लौकर स्वाधीन करणें. ते ब्राह्मण हरामी आहेत! सनद आली ह्मणजे तें ही देतील. अष्ट्याकडे बऱ्यानें शें दोनशें राऊत मिळऊन गांवगन्ना उपद्रव केला आहे. वसूल घेतात. त्यास मिरज तो हस्तगत झाली. याज उपरी अष्ट्याकडे जमात घेऊन जाणें ह्मणून चिरंजीव कोनोंपास लिहिलें आहे. राजश्री अंताजीपंत ही गेले आहेत. तिकडे जाऊन बंदोबस्ती करून येतील. मिरजेहून ही तुम्हांस पत्रें आलीं असतील. लष्करास ही चिरंजीवास लिहून पाठवणें. वरकड दक्षिणेकडील वर्तमान तरी —— मीरफैजुल्ला धारवाडाकडे आहे. तेथील उस्तवारी किल्ल्याची करितो, पडझड बांधावयास लाविलें आहे, ऐसें वर्तमान आलें आहे. शिरहट्टीस त्याची कांहीं फौज गेली होती. त्यांनीं तीस जुमानलें नाहीं. हे समीप जाऊन उतरले होते. रात्री शिरहट्टीकरानीं बाहेर पडोन त्यांजवर चालोन गेले. मारामार फार केली. चारशें पांचशें गाडदी मारिले व घोडीं शें पन्नास जायां केलीं. शिरहट्टीकरानीं त्यांसीं

१ दरारा. २ निघून. ३ प्यादे. ४ तासगांवचें ठाणें देतील. ५ कोन्हेररावास. ६ शिरहट्टीकरानीं.

सवाल जाब केला कीं, आमचा धणी तुम्हीं नेला आहे तो आणून हवालीं करणें. मग जें काय बोलणें असेल तें बोलूं. ऐसें सांगितलें तेव्हां भेरी होऊन जवळ उतरले होते. मग याणीं या प्रमाणें केलें तेव्हां ते तेथून उठून कोसावर राहिले.[3]

नं० ३७७

( आश्विन वद्य षष्ठी
२८ आक्टोबर. )

श्रीगणराज.

अपत्यें साष्टांग नमस्कार विज्ञापना. तागायत छ० २० रबिलाखर मुक्काम नजीक सोनई पावेतों यथास्थित असे. विशेष. वडिलीं प्रतिपदा मंदवारचीं पत्रें पाठविलीं तीं बुधवारीं संध्याकाळीं पावोन वर्तमान कळलें तीर्थस्वरूप राजश्री आपांचीं व महादाजी बल्लाळ व चिंतामणपंताचीं पत्रें अक्षरशः वाचून पाहिलीं. विजयादशमीच्या मुहूर्तें निशाण, व दहा लोक, व माणको जिवाजी ऐसे आंत घेतले,[1] प्रतिपदा शनिवारीं आपण खुद्द निघून बाहेर येणार या प्रमाणें करार केला. मोजदाद होती. या उपरी गुंता नाहीं, हे खातरजमाच झाली आहे. तत्रापि लबाडी केली तर, आपला जमाव भारी जथला. दुसरें, त्यांजवळ जमाव नाहीं तेव्हां लांबविणार ही नाहींत. सारांश कळेल तेणें प्रमाणें त्यास बोध करून काम करावें. भयप्रद कदापि बोलोन नासूं नये. आज पर्यंत पत्र स्थल आपले स्वाधीन झालियाचें वडिलीं रवाना केलेंच असेल. आम्हीं पत्राचा मार्ग लक्षीत व-

१ मेघश्यामराव. २ हैदराचे लोक बेफामपणानें किल्ल्याजवळ जाऊन उतरले. ३ हें पत्र इतकेंच अपुरें सांपडलें. ४ हें पत्र गोपाळरावाचें गोविंद हरीस. ५ त्रिंबक हरीचीं. ६ त्रिंबक हरीनें मिरज हातीं आल्याचें.

सलों आहों. पत्र येतांच येथील निकाल काढून येणार. चिरंजीव मेघश्यामराव यांचे हातची चिठी पाहोन संतोष झाला. सारांश जिवानिशीं स्वस्ति क्षेम आहेत परंतु दुष्टाच्या हातून निघणें कठीण! बरें! ईश्वरकृपा व वडिलांचा आशीर्वाद [ आहे ] तर कल्याण सत्वरच होईल. वडिलांचा साह्यकारी श्रीपंढरीनाथ आहे. तेथें आम्हीं चिंता करावी असें होणार नाहीं. वरचेवर पत्र पाठवून राजश्री विकाजीनामकास सूचना करीत जावी जे, इकडील दुराशेस न गुंततां जसें कळेल तसें राजकारण करून आपला हात काढून घेणें. आमचा उजूर न धरणें. या प्रमाणें लिहून आणखी पत्र पाठवून द्यावें. आम्हांस परम चिंता. तो दरबार परम हरामी! राजकारणाचा प्रकार ( तेथें चालणार ) नाहीं. याजे करितां संकट वाटतें. श्रीनें काळजी न घालावयाची तेच घातली आहे. बरें! भयप्रद भयनाशक तोच आहे. सेवेसीं विदित होय हे विज्ञापना.

नं० ३७८

[ आश्विन शुद्ध एकादशी
१८ आक्टोबर. ]

श्रीगणपतिर्जयति.

आशीर्वाद उपरी. छ० ४ रबिलाखर बुधवारचीं पत्रें लाखणगांवचे मुक्कामचीं तुम्हीं पाठविलीं तीं परवां रविवारीं अस्तमानीं पांचवे रोजीं पावलीं. ' श्रीमंत माघारे फिरले. भोंसल्यास निरोप होऊन [ ते आपल्या मुलखाकडे ] गेले. श्रीमंत आज गंगादक्षिणतीरास काळगांवा जवळी उत-

१ ही चिठी मेघश्यामरावानें हैदराच्या लष्करांतून कैदेंत असतां लिहिलेली. २ सुटून येणें. ३ विसाजी नारायण यास. ४ श्रीमंतांकडून किंवा आह्मांकडून कुमक होईल या आशेस. ५ मेघश्यामरावाची सुटका करून घ्यावी. ६ हैदरअल्लीचा दरबार. ७ पत्र गोविंद हरीचें गोपाळरावास.

| | |
|---|---|
| श्री रा. बाळासाहेब पंतअमात्य. सं० बावडा. | ३ |
| रा. रा. सेक्रेटरी. ने. ज. लायब्ररी. सांगली. | ३ |
| रा. सा. हरि गणेश करमरकर. " | ३ |
| " " केशव बळवंत उर्फ दादासाहेब काळे. जमाखिंडी. | ३ |
| रा. रा. विनायक सदाशिव पुसाळकर " | ३ |
| रा. रा. अनंत विनायक पटवर्धन. बी. ए. " | ३ |
| रा. रा. जगन्नाथ केशव दामले. मुंबई | ३ |
| प्रो० हरि महादेव भडकमकर. बी. ए. " | ३ |
| रा. रा. गोपाळ हणमंत जोग. वकील. तासगाव. | ३ |
| श्री. रा. रामचंद्र गोविंद इनामदार मु० कल्लोळ. | ३ |
| रा. रा. सेक्रेटरी. ने. ज. लायब्ररी. गुडगेरी. | ३ |
| रा. सा. महादेव चिंतामण केळकर. बी. ए. कऱ्हाड. | ३ |
| रा. रा. सेक्रेटरी. मित्रसमाज वाचनमंदीर. चिकोडी | ३ |
| रा. रा. बाळाराम तुकाराम माने. मु० भोज | ३ |
| रा. रा सेक्रेटरी. दत्तप्रसाद वांचनमंदीर. मु० अकोळ | २ |
| रा. रा. सेक्रेटरी. शंकर लिंग ने. ज. लायब्ररी. रबकवी | ३ |
| श्री. रा. नारायणराव विनायक ऊर्फ बाळासाहेब यादवाडकर मु० आसंगी. | ३ |
| रा. रा. बाबाजी नारायण नगरसूलकर. नाशीक | २ |
| रा. रा. सेक्रेटरी. ने. ज. लायब्ररी. मोडनिंब | २८६ |
| श्री. रा. गणपतराव विठ्ठलराव देशमुख पतंगराव सं० चिकुर्डे | ३ |
| रा. रा. अनंत सीताराम देसाई. बी. ए. मालवण | ३ |
| रा. रा. विष्णु गोपाळ वेलदे. मु० कावनई | ३ |
| रा. रा. हणमंत अनंत कोणूर. कलघटगी. | ३ |
| श्री. रा. दादासाहेब बुधिहाळकर. मु० बुधिहाळ. | ३ |
| रा. रा. सेक्रेटरी. ने. ज. लायब्ररी. मुधोळ. | ३ |
| वे. शा. रा. रा. कृष्णशास्त्री पुराणीक वैद्य पनवेलकर. पनवेल. | ३ |
| रा. रा. सेक्रेटरी. ने. ज. लायब्ररी. पळस्पे. | २८६ |
| " " गोविंद नारायण खरे. जेनापुर. इलाला बंगाल. | ३ |
| " " सेक्रेटरी. ने. ज. लायब्ररी. बाळापुर. प्रांत वऱ्हाड. | ३ |
| रा. रा. रामराव कृष्णराव जांभेकर. अहमदाबाद. | ३ |
| " " सेक्रेटरी. नहिची आडरीडिंगरूम. वेंगुर्ले. | ३ |

रावबहादूर डी. एम्. पटवर्धन. बी. ए. डि. डे. कलेक्टर. ठाणें. ३
" " पुरुषोत्तम विनायक पतमुळे. रतलाम. ३
रा. रा. वासुदेव कृष्ण निगुडकर. मुंगावली. सं० ग्वाल्हेर. ३
रा. रा. चिंतामण काशिनाथ जोशी. पुणें. ३
रा. रा. सेक्रेटरी. स्टूडन्ट्स् रीडिंगरूम. डेक्कनकालेज. " ३
रावबहादूर गणेश रामचंद्र फडके. " ३
रा. रा. गणेश दत्तात्रय काळे. सेक्रेटरी. वृत्तवाच शाळा खंडाळी. ३

ऐ॰ले॰संग्रह—कर्ते.

## ऐतिहासिक—लेख—संग्रह.

हें डेमी अष्टपत्री सांचाच्या चाळीस पृष्ठांचें मासिक पुस्तक दर महिन्यास मिरज येथें नियमानें प्रसिद्ध होत असतें. यांत पटवर्धन जहागीरदारांच्या जुन्या चिटणिशी दप्तरांतील ऐतिहासिक महत्वाचीं व प्रत्येक स्वारीतील भरपूर माहितीचीं पत्रें सालवारीच्या क्रमानें छापून प्रसिद्ध होत असतात. शिवाय अन्यत्र उपलब्ध झालेले कागदपत्र व बखरी वगैरेचा ही यांत समावेश होत असतो. या मासिक पुस्तकाची आगाऊ किंमत सालिना ट० हा० सुद्धां तीन रुपये आहे. ग्राहकांनीं सालिना वर्गणीच्या किंमतीचें व्हा० पे० मागवावें अथवा तितक्या रकमेची मनीआर्डर पाठवावी. त्या शिवाय पुस्तक सुरू केलें जाणार नाहीं.

ऐ॰ले॰संग्रह कर्ते.

## अगत्याची सूचना.

चालू सालची वर्गणी अद्यापि पुष्कळ आश्रयदात्यांकडून यावयाची आहे. दर महिन्यास त्यांस जागें करणें भाग पडतें! बहुतेकांकडे गेल्या महिन्यांत आम्हीं वर्गणी पाठविण्याविषयीं कार्डें पाठविलीं आहेत. ज्यांकडून वर्गणी यावयाची आहे त्यानीं आतां बिलकुल विलंब न करितां ती पाठविण्याची मेहेरबानी करावी.

ऐ॰ले॰संग्रह कर्ते.

# ऐतिहासिक-लेख-संग्रह.

## मासिक पुस्तक.

आक्टोबर. १८१८ इ०,

## अंक १७

वासुदेव वामन शास्त्री खरे
मिरज हायस्कुलांतील संस्कृत शिक्षक.

यांनीं

कुरुंदवाड येथें
" भाऊनाना " छापखान्यांत छापविलें.

वर्षाची आगाऊ वर्गणी टपाल हांशीलसह तीन रुपये.
फुटकळ अंकास पांच आणे.

# अगत्याची सूचना.

चालू सालची वर्गणी अद्यापि पुष्कळ आश्रयदात्यांकडून यावयाची आहे. दर महिन्यास त्यांस जागें करणें भाग पडतें! बहुतेकांकडे गेल्या महिन्यांत आम्हीं वर्गणी पाठविण्याविषयीं कार्डें पाठविलीं आहेत. ज्यांकडून वर्गणी यावयाची आहे त्यानीं आतां बिलकुल विलंब न करितां ती पाठविण्याची मेहेरबानी करावी.

ऐ० ले० संग्रह कर्ते.

**चुकीची दुरुस्ती**—सोळाव्या अंकांत वर्गणीची पोंच दिली आहे तींत श्रीवर्धन लायब्ररीचे सेक्रेटरी व श्रीधर नारायण जोगळेकर यांच्या नांवापुढें सहा सहा रुपयांचे आंकडे पडले आहेत, तेथें अनुक्रमें पांच व चार हे आंकडे पाहिजेत.

## वर्गणीची पोंच.

### सन १८९८ । ९९

( ता. २२ आगस्ट पासून २२ सप्तंबर पर्यंत. )

### मागील व चालू वर्षाची.

| | रु० |
|---|---|
| रा. सा. गंगाधर बल्लाळ आपटे. यवतमाळ | ६ |
| रा. रा. शंकर नारायण गुरळकर. सौंदलगें | ४ |
| " " रघुनाथ परशुराम फाळकर. चिंम्हरें. जि० रत्नागिरी | ६ |
| " " प्रभाकर काशिनाथ ओक. कल्याण. | ६ |
| " " गोविंद लक्ष्मण देसाई. वकील सातारा. | ६ |
| " " सेक्रेटरी. सातारा हायस्कूल रीडिंगरूम. सातारा. | ६ |
| " " हरि रघुनाथ फडणीस. दाभोळ. | ६ |
| श्री. रा. नानासाहेब फडणीस. मेणवली. | ६ |

रून राहणार.' ह्मणोन लिहिलें वरून समाधान जालें. 'या उपरी टों-क्यास जाऊन तेथून सरदारांस निरोप देऊन पुढें निंबदेहेरे याच्या घांटानें जाणार' ह्मणून लिहिलें, बहुत उत्तम् आहे. * तुम्हीं नि-काल काढून येऊं ह्मणून लिहिलें तो प्रकार खराच. तेथें पुण्यास गेल्या नंतर सारा दौलतेचा मनसबा पडेल. क्षणभंगुर बुद्धि. आपण कोणाच्या ही कजियांत नसावें ही लक्ष गोष्टींची गोष्ट. परंतु त्यांचे मर्जी प्रमाणें अगर तुमचे मर्जी प्रमाणें निरोप जाला पाहिजे कीं नको? हैदरअल्लीनें सारा देश घेतला. त्याचा उपमर्द करण्याचा मनसबा तो कांहींच नाहीं! करणारांनीं जिकडील तिकडे आपले थांगे केले. यवनाकडे केला. दुसरा भोंसलियाकडे केला. तिसरे होळकर, विठ्ठल शिवदेव वगैरे त्यांचेच आ-हेत. नवीन प्रतिनिधीचा प्रकार—त्याणीं अंगेजणी केली. आपला हस्तक कार्यभागास दिला यामुळें ते ही आपल्या कूटांत घेतले! आबा पुरंदरे बरें [illegible]टत नाहीं ह्मणून घरास आले, परंतु दसरा जालियावरी ते सालप्याचा

---

१ दादासाहेबांची बुद्धि क्षणभंगुर. २ श्रीमंतांच्या. ३ कारस्थानें करणारा-नीं ह्मणजे अर्थात् सखारामबापूनें. ४ आश्रयाच्या जागा. 'सखारामबापूनें संकटका-ळीं मोंगलाच्या दरबारीं आश्रय मिळण्याची सोय करून ठेविली व त्याची मर्जी संपा-दन केली ती त्यास सोयस्कर असा प्रस्तुतचा तह ठरवून. त्यानें बत्तीस लक्षांचा भों-सल्यास मुलूख देऊन त्यास प्रसन्न करून घेतलें होळकर व विंचूरकर यांजकडे त्याचें वळण पूर्वीं पासूनच आहे. तेव्हां मोंगल, भोंसले, विंचूरकर, होळकर वगैरेचें पाठबळ असल्यामुळें सखारामबापू सार्‍या राष्ट्रांत बलाढ्य झाला;' असा अभिप्राय. ५ भवान-राव प्रतिनिधीचा. ६ पराक्रम केला. दादासाहेबानीं त्यास पदच्युत केलें तेव्हां तो अपमान त्यास सहन झाला नाहीं. त्यानें मोंगलाकडे राजकारण केलें व दादासाहेबानीं त्याची जहागीर नारो शंकरास दिली असतां ही त्या पासून ती त्यानें परत हिसकून घेतली हा त्याचा पराक्रम. ७ मुतालीक. अर्थात् गमाजी यमाजी. 'पेशव्यांच्या सा-मर्थ्याची हानि करणें हा जो मोंगलाचा कार्यभाग तो सिद्धीस नेण्या साठीं प्रतिनिधीनें आपला मुतालीक मोंगलाच्या दिमतीस दिला ह्मणून सखारामबापूनें भिऊन त्यास आ-पल्या कूटांत सामील करून घेतलें;' असा अभिप्राय.

घांट चढून ( साताऱ्याकडे ) येणार. प्रतिनिधीची त्यांची भेट होऊन तेथील संस्थान[1] त्याजकडील आहे त्याचा बंदोबस्त करून प्रतिनिधि निमित्यास करून किल्ले[2] तमाम हस्तगत करावे हा प्रकार दिसतो. चहूंकडे ( त्यानीं ) आपलें केलेंसें जालें. असो ! पुढें विस्कळीत प्रसंगीं सर्व ही अनुभवास येईल. तुम्हांस निरोप झाला तरी यावें. फौजेची वाट नाहीं, कर्जाची वाट नाहीं, राहून फल काय ? बसावयास स्थळ पाहिजे त्याचा[3] जाबें आज सायंकाळ पावेतों येतांच लिहितों. हे आशीर्वाद.

नं० ३७९

( अजमासें आश्विन वद्य
आक्टोबरचा दु० पंधरवडा. )

गोपाळरावाचें गोविंद हरीस पत्र—

" गंगेवरून [ श्रीमंतांच्या लष्करांचें कूच छ० १८ रबिलाखरीं होऊन नेवाशा अलीकडे दोन कोसांवर मुक्काम झाला. काल येथें आलों. या उपर मजल दर मजल पुण्यास येत आहेत. होळकर निरोप घेऊन गेले. गंगोबा कामकाजा निमित्त राहिले आहेत. राजश्री नारो शंकर गेले. मुरादखान ही निघोन गेले. दहा लक्षांची जहागीर माघारी देऊन नबाबाचें समाधान रक्षावें असें श्रीमंत दादासाहेबांचें मत होतें, पण ते गोष्ट सध्या राहिली. नबाब आपले जनानखान्यांत ( गर्क ) आहेत. मसलत मनसवा कांहींच नाहीं. सलाबतजंगास मारून निश्चित बसले ! लोकांस श्रीमंतांनीं

---

१ साताऱ्याच्या महाराजांचें संस्थान प्रतिनिधीच्या धोरणानें चालत आहे तें. २ सातारा प्रांतांतील सातारा, परळी, वासोटा, वसंतगड व दुसरे सर्व किल्ले. ३ मिरज हातीं आली न आली हें वर्तमान.

तमाम निरोप दिले. महादजी शिंदे घांट[1] चढल्या नंतर निरोप घेऊन श्री गोंदास जातील.

नं० ३८०

( आश्विन वद्य षष्ठी
२८ आक्टोबर )

पांडुरंग[2] नरसी अनगळ याचें गोविंद हरीस पत्र
छ० २० रबिलाखरचें:—

"रा० जनकोजी शिंदे कुरकुंभास[3] आज फाऊण महिना आले. त्याजवरून श्रीमंतांकडून हो तेथें बंदोबस्ती करितां प्रथम कोणी पाठविले होते त्याची निशा[4] जाहली. त्याजवरून दिनकर[5] महादेव जोशी व भुलोजी ढमढेरे पाठविले. त्यांचें ही लिहिलें आजच आलें कीं सत्य जनकोजी खरे! खाणाखुणा सर्व उतरल्या. आतां संशय राहिला नाहीं. संतोषाचें वर्तमान स्वामीस लिहिलें आहे."

नं० ३८१

( अजमासें कार्तिक शुद्ध
नोवेंबरचा प० पंधरवडा )

गोपाळरावाचें गोविंद हरीस पत्र—

" श्रीमंत सौभाग्यवती आनंदीबाई वाडा दाखल[6] जाहले त्या दिवशींच येऊन पोहोंचलीं. रा० आनंदराव रास्ते आले आहेत. पुढें मातु-

१ नगराजवळ निंवदेहऱ्याचा घांट आहे तो चढल्यावर. २ पत्र लिहिणारा हा पटवर्धनांचा कारकून. याचें हें गोविंद हरीस पत्र. ३ कुरकुंभ हें देवीचें स्थान धोंडच्या स्टेशनाजवळ आहे. ४ खात्री झाली कीं, हा जनकोजी शिंदे खराच! ५ दिनकर महादेव हा फडणिशीकडील कारकून व ढमढेरे हा एक शिलेदार. या दोघांस गोपिकाबाईनें पाठविलें. ६ वाडा दाखल झाले. पुण्यास शनवारच्या वाड्यांत दाखल झाले.

श्रीचें व कारभारी याचें ठीक करून द्यावें याच धांवतीचा प्रकार करितात. धाकटे यजमानांचें मानस आज कालावर नजर देऊन त्यांशीं निखालसपण दाखवावें, पुढें ईश्वरी इच्छेकरून करणें तें करावें, ( असें आहे. ) आजपर्यंत बाबा वैद्य पुढें आला होता. परंतु थैाक कांहीं लागला नाहीं. आतां काय होईल पहावें. रा० मामांचीं पत्रें वाचोन आणखी काय लिहिणें असेल तें लिहोन पत्रें तावडतोब रवाना करून द्यावीं. जनकोजी शिंद्यांची पुरवणी आहे तीच त्याजकडे पाठवावी. सारांश लटका केला तत्रापि जनांत सर्वांस भ्रम आहे जे, ' जनकोजी शिंदा खरा असतां दाटून हे लबाडी करितात अशी सर्वतोमुखीं बोली आहे. "

नं० ३८२

( अजमासें कार्तिक शुद्ध
नोवेंबरचा ५० पंधरवडा. )

श्रीगणराज.

अर्पत्यें साष्टांग नमस्कार. विज्ञापना. जनकोजी शिंदा ह्मणोन कुरकुंबीं प्रकट होऊन त्यानें दहा बारा हजार फौजेचे तैनात जाबते केले. दोन हजार फौज जमा जाहली. जनकोजी प्रमाणें खाणाखुणा ही त्याजला होत्या. मनुष्यांस वळखावें, अमकें तुजजवळ बोललों होतों ह्मणोन साक्ष

१ मसलतीचा. २ सखारामबापूशीं सरळपणानें वागावें. ३ ठाव. सखाराम बापू विषयीं गोपिकाबाईच्या मनांत वैमनस्य आहे तें काढून टाकावें ह्मणून बाबा वैद्य आला होता पण तिच्या मनाचा ठाव त्यास कांहीं लागला नाहीं. ४ त्रिंबकराव मामांस आह्मीं पत्रें लिहिलेलीं तुह्मांकडे पाठविलीं आहेत तीं. ५ तोतया जनकोजीची जींत हकिगत लिहिली आहे ती. ६ चौकशी करून खोटा ठरविला तरी. ७ पेशवे व त्यांचे कारभारी वगैरे. ८ हें गोपाळरावाचें गोविंद हरीस पत्र. मागच्या पत्रांत ' जनकोजी शिंद्याच्या पुरवणी ' चा उल्लेख आला आहे ती पुरवणी हीच.

पुरवावी, ( असें करीत असे ह्मणून ) मोठा भ्रम सवत्रांस पडला. तदोत्तर श्रीमंत मातोश्रीनीं रा० दिनकरपंत व भुलेजी ढमढेरे यांस पाठविलें. हे त्याजवळ गेले. तेथून श्रीगोंद्यास जाऊन त्या नंतर मातोश्रीकडे गेले. तिनें अंगावरील कांहीं खुण सांगितली. त्या प्रमाणें येथें[3] येऊन कांहीं उत्तम खूण मिळाली. अशा बहुत साक्षी आल्या. तदोत्तर त्यास घेऊन येथें आले. तों आम्हीं पवाराच्या कवठ्या नजीक आलों, यास्तव संगमाच्यामध्येंच उतरविला. भापकर, गराडे, सरलष्कर, गाढवे, खानाजी जाधव, आदिकरून त्यास ओळखोन एक ताटीं बसोन जेवले. ' गोविंदपंत बुंदेले याचे पुत्र व गोपाळराव बर्वे वगैरे यांजवर सात लक्ष रुपये आपले येणें ' ह्मणोन त्यानें यादी ठराविली ! कोणाचा ही तर्क ' हा लटका ' असा नच चाले असें जाहलें. तों दुसरे दिवशीं छ० २९ रबिलाखरीं श्रीमंत पुण्यास आले. ते दिवशीं ( वाड्यांत येण्यास ) मुहूर्त नव्हता, याज करितां ते ही संगमाजवळ राहिले. खरें लटकें करून तेच दिवशीं पारिपत्य करावें, असा डौल थोरले यजमानांचा होता. परंतु ते दिवशीं सबूर करविली चौघानीं. दुसरे दिवशीं यजमान वाड्यांत दाखल जाहले. संध्याकाळीं त्यास बोलाऊन आणून नाचाच्या दिवाणखान्यांत बसविला. पांच सात भले लोक समागमें होते. धाकटे नाना व गोविंद शिवराम तहकिकात करितां तो ' थोरात रवोजी ' असा ठराव जाहला. त्याची आईबाप व बायको हीं आणावयासीं माणसें गेलीं. तो कैद करून ठेविला. गोटांत भले लोक

---

१ गोपिकाबाईनें. २ जनकोजीच्या मातोश्रीकडे. ती श्रीगोंदें उर्फ चांभारगोंदें जिल्हा नगर येथें रहात असे. शिंदे हिंदुस्थानांतून दक्षिणेंत आले ह्मणजे कार्याकारण पुण्यास राहून चांभारगोंद्यासच रहावयास जात. ( नं० ३७९ मधील शेवटचें वाक्य पहा. ) ३ तोतया जनकोजीकडे कुरकुंभास. ४ मराठे शिलेदार. ५ धोंडोपंत नाना पुरंदरे. ६ तहकीक ह्मणजे खरें. तहकिकात करितां = खरें काय आहे ही चौकशी करितां.

होते ते फार करून पळून गेले. कांहीं सांपडले ते अटकेंत आहेत. वाड्यांत समागमें होते पांचसात जण त्यांचीं हत्यारें घेऊन ते ही ( अटकेंत ) बसविले. लोकांस मोठी दुराशा लागली होती ! परंतु लटकें जाहलें. मराठे सात आठशें एक जागां जेवले. या प्रमाणें खूळ जाहलें होतें. आतां यजमानांचे चित्तीं आहे कीं, त्यास एकांतीं पुसावें जे, ' तूं कशावरून हें काम केलेंस ? तुजला कोणीं भर दिल्हा ? ' हें विचारावें असें मानस आहे. गिरगाजीपंत बोकील, कारभारी यांचे सख्खे चुलत बंधु, ते कारभार त्याजवळ करीत होते. फार जणांस ' हाच जनकोजी ' अशी दुराशा होती. परंतु तोतया जाहला. विदित व्हावें. हे विज्ञापना.

नं० ३८३

( अजमासें कार्तिक शुद्ध
नोवेंबरचा प० पंधरवडा )

श्रीगणराज.

चिरंजीव राजश्री नाना यांसीं आशीर्वाद. उपरी. आपण जनकोजी शिंद्याचे मजकुराची नक्कल लिहून पाठविली ती पावली. वर्तमान अवघें कळलें. परंतु अद्याप खरें खोटें होणें आहे. त्याची बायको व आईबाप आलेवर अवघें तथ्य असेल तें ठरेल. वरकड वर्तमान मीर आबेस तेरदाळची खंडणी साहा हजार रुपये घेऊन पुढें कंकणवाडीस गेला ह्मणून वर्तमान आलें. पुढें मीर फैजुल्लाकडे त्याचें राजकारण असेल तरी उभयतां

१ मराठे शिलेदार तोतया बरोबर जेवले यांत कांहीं दोष दिसत नाहीं. कारण तो जरी खरा जनकोजी शिंदा नसला तरी थोरात आडनांवाचा मराठाच होता. २ हें त्रिंबक हरीचें गोविंद हरीस पत्र. इतःपर त्रिंबक हरि व गोविंद हरि यांच्या नेहमीं राहण्याच्या जागा पूर्वी प्रमाणें अनुक्रमें कुरुंदवाड व मिरज या समजाव्या. ३ नं० ३८२ ची नक्कल. ४ निजामअल्लीचा भाऊ मीर मोंगल याचा मीर आबस हा बक्षी होय, हें या पूर्वी अनेकवेळां लिहिलेंच आहे.

भेटतील ऐसें दिसतें. यांत घडेल तें खरें. करवीर प्रांतांत कागलकरानीं धामधम मांडली. खेडीं मारितात[1]. हे आशीर्वाद.

नं० ३८४

( मार्गशीर्ष वद्य षष्ठी
२१ दिसेंबर )

श्री

अखंडित लक्ष्मी आलंकृत राजमान्य राजश्री धोंडोराम[2] गोसावी यासीं सेवक माधवराव बल्लाळ प्रधान नमस्कार स॥ आर्बा सितैन[3] मय्या व अल्लफ. शहर औरंगाबाद वगैरे महाल अंतूर सुद्धां यांची मामलत राजश्री त्रिंबकराव लक्ष्मण याजकडे आहे. त्यांस सांप्रत मोंगलांकडील उपसर्ग लागतो. कितेक महालीं कहीचा उपसर्ग व तोफा बैलांच्यी[4] चिठ्या व जप्ती केली आहे ह्मणून त्याणीं विदित केलें. ऐशियास सरकारचे जहागिरींत नबाबाचे लोकांनीं उपसर्ग करावा, चिठ्या तोफखान्याकडील व्हाव्या, जप्ती व्हावी, ही गोष्ट कार्याची नसे. तरी तुम्हीं येविशीं नबाबास सांगून जे उपसर्ग करीत असतील त्यांस निक्षून ताकीद करणें. येंचे मामलते संबंधें[5] काम काज पडतें, त्याविषयीं हे तुम्हांस लिहितील त्या प्रमाणें करून देत जाणें. आणि बंदोबस्त यांचे मामलतीचा यथास्थित राहे तें करणें. जाणिजे. छ० २० जमादिलाखर. आज्ञा प्रमाण.

---

१ लुटितात. २ हा पेशव्यांकडून नेहमीं मोंगलाचे दरबारीं राहणारा वकील. ३ सु० स० ११६४. ४ तोफांस जोडण्या करितां बैल पुरविण्याविषयीं गांवोगांवचे अधिकाऱ्यांस चिठ्या. ५ मामलेदार त्रिंबकराव लक्ष्मण यांचें मामलती संबंधें मोंगलाच्या दरबारीं हरवक्त काम पडतें.

# हैदरअल्लीवर पहिली स्वांरी

प्रत्येक प्रकरणाच्या प्रारंभीं आह्मीं जो प्रस्तावनारूप लेख लिहीत असतों त्यांत त्या त्या प्रकरणा संबंधें पुढें येणाऱ्या पत्रांतील कथाभाग सुसंबद्ध पण संक्षिप्त रीतीनें देत असतों. प्रस्तुत प्रकरण " हैदरअल्लीवर पहिली स्वांरी " हें आहे. ही स्वांरी इ० स० १७६४ । ६५ या वर्षीं झाली. आणखी ही पुढें याच हैदरअल्लीवर मराठ्यांच्या स्वाऱ्या झालेल्या आहेत. हैदरअल्लीचें राज्य म्हैसूर देशीं होतें, व एका वेळीं तर त्यानें बहुतेक कर्नाटक व्यापिलें होतें. अर्थात् मराठ्यांचे बहुत युद्धप्रसंग त्या देशीं झालेले आहेत, व त्यांचीं अनेक कारस्थानें त्या देशाचे निरनिराळे भाग ताब्यांत आणण्याविषयीं पुढें निरनिराळ्या वेळीं झालेलीं आहेत. हा विषय आमच्या पुस्तकाच्या वाचकांस नवीनच असल्यामुळें नेहमी प्रमाणें त्रोटक रीतीनें प्रस्तुत हातीं घेतलेल्या प्रकरणांतील कथाभाग दिला तर तो त्यांस नीट समजणार नाहीं. तो नीट समजावा ह्मणून कर्नाटका विषयीं कांहीं माहिती, त्या देशाचा पूर्वींचा थोडासा इतिहास, आणि मराठ्यांचा प्रवेश कोठपासून कसकसा होत गेला या विषयींची हकीगत थोडी थोडी सांगणें इष्ट दिसतें. तसेंच हैदरअल्लीचें ही या पूर्वींचें थोडथोडें चरित्र सांगणें जरूर आहे. या करितां प्रस्तुत प्रस्तावनेचे दोन भाग केले आहेत. पहिल्या भागांत कर्नाटका विषयीं माहिती, त्या देशाचा इतिहास, आणि १७६४ पर्यंत त्या देशांत झालेल्या मराठ्यांच्या स्वाऱ्या, हैदरअल्लीचें त्या मुदती पर्यंत घडलेलें चरित्र हीं सांगण्यांत येतील. दुसऱ्या भागांत हैदरअल्लीवर ही जी १७६४ । ६५ सालीं मराठ्यांची स्वांरी झाली, तिज संबंधें पुढें आम्हीं जीं पत्रें छापणार आहों त्यांतील कथाभाग सांगण्यांत येईल.

# हैदरअल्लीवर पहिली स्वारी

## भाग १ ला.

## कर्नाटकाचा इतिहास.

### हैदरअल्लीचें पूर्व चरित्र.

ज्या देशांत कानडी भाषेचा मुख्यत्वें प्रचार आहे तो खरोखरीचा 'कर्नाटक' देश होय. 'खरोखरीचा' असें ह्मणण्याचें कारण, मुसलमानी राज्यें दक्षिणेंत स्थापित झालीं तेव्हां त्या लोकांनीं कृष्णे पासून रामेश्वरापर्यंत सर्वच प्रदेशास 'कर्नाटक' ही संज्ञा दिली होती. परंतु त्या संज्ञेनें कर्नाटकांत द्रविड देशाचा ही अंतर्भाव होत होता! मराठी भाषा ज्या देशांत चालत्ये त्यास जसें आपण 'महाराष्ट्र' म्हणतों, जेथें तैलंगी भाषा चालत्ये त्याला 'तैलंगण' म्हणतों, त्याच प्रमाणें जेथें कानडी भाषा चालते तोच खरा 'कर्नाटक' देश होय. याची उत्तर दक्षिण लांबी अजमासें ४४० मैल व रुंदी २५० मैल आहे. याच्या पश्चिमेस सह्याद्रि असून पूर्वेस ही एक तुटक तुटक डोंगरांची ओळ आहे. ध्यानांत राहण्या सारखी याची उत्तर सीमा ह्मटली ह्मणजे कृष्णानदी ही होय. दक्षिणेस ही डोंगरांच्या ओळी असून तिकडे कोइमत्तूर व पालघांट हे प्रांत यांच्या व द्राविड देशाच्या सरहद्दीवर आहेत. कर्नाटकाच्या वायव्येस व उत्तरेस महाराष्ट्र, ईशान्येस व पूर्वेस तैलंगण; आग्नेयीस व दक्षिणेस द्रविड देश आणि पश्चिमेस मलबार. या प्रमाणें स्थूल मानानें सीमा आहेत. या देशांत प्राचीन काळा पासून पाळेगार लोकांचें प्राबल्य विशेश होतें. हे पाळेगार ह्मणजे प्राचीन काळच्या हिंदु राजानीं महालो महालीं जमाबंदीच्या कामावर नेमलेले अधिकारी होत. तीं राज्यें नष्ट झालीं तेव्हां हे अधिकारी आपणास पाळेगार ह्मणजे संस्थानिक ह्मणवूं लागले. बेळगांव, धारवाड,

विजापूर, व मोंगलाई पैकीं गुल्बर्गा हे जिल्हे महाराष्ट्राच्या लगत्यास आहेत तरी ते प्राय: कर्नाटकाचेच भाग आहेत. या जिल्ह्यांत जे तालुक्यानिहाय देसाई आहेत व होते ते ही वर सांगितलेल्या पाळेगारांच्या वर्गा पैकीं होत. महाराष्ट्रांत ही मुसलमानी कारकीर्दींत देशमुखांचें प्राबल्य फार होतें. मराठी राज्याचा जसजसा अभ्युदय होत चालला तसतसे देशमुख फिक्के पडत चालले, आणि इंग्रजी झाल्यापासून तर त्यांच्या हातची सर्व सत्ता निघून गेली आहे. कर्नाटकांतील पाळेगार व देसाई यांचा क्षय हैदरअल्ली व टिपू यानीं क्रमा क्रमानें करून आपलें राज्य अगदीं निष्कंटक केलें होतें. त्या पूर्वीं पाळेगारांचे तिकडे नेहमीं दंगे धोपे सुरू असून एकमेकांत लढाया चालल्या असत. दक्षिणेंत मुसलमानी राज्यें स्थापित झाल्यावर महाराष्ट्राचा बहुतेक भाग त्या राज्यांत मोडूं लागला. परंतु कर्नाटकांत मुसलमानांचा ह्मणण्या सारखा स्थायिक अंमल फारच थोड्या भागावर होता. बाकीचा देश पाळेगारांच्या हातीं असून ते मुसलमानी राजांचे नांवाचे मात्र मांडलिक असत. मुसलमानांनीं तरवारीच्या जोरावर मिळेल तेव्हां पाळेगारां पासून खंडणी घ्यावी असेंच होत आलें, पण त्यांच्या ताब्यांतला मुलूख जिंकण्यास मुसलमानांस फुरसत किंवा सामर्थ्य कधींच झालें नाहीं. महाराष्ट्राच्या पूर्व सीमेवर बालेघांट ह्मणून डोंगरांची ओळ आहे. त्या डोंगरांच्या माथ्यावर समुद्रा पासून तीन चार हजार फुट उंचीवर जो विस्तीर्ण प्रदेश आहे त्यास ही ' बालेघांट ' असें म्हणतात. बालेघांटाच्या पूर्वेस डोंगरांच्या पायथ्यास जो प्रदेश आहे त्यास ' पाईनघांट ' असें नांव आहे. बालेघांट हा महाराष्ट्राचा भाग व पाईनघांट हा तैलंगणाचा भाग होय. हीच बालेघांटाची ओळ खालीं तहत दक्षिणसमुद्रा पर्यंत गेलेली असून ती कर्नाटक व द्रविड यांची पूर्वसीमा आहे. अर्थात् तिकडे ही ' बालेघांट ' व ' पाईनघांट ' हीं नांवें आहेतच. त्यांत बालेघांट कर्नाटकाचा व पाईन घांट द्रविड देशाचा भाग आहे. या

कर्नाटक बालेघांटा पैकीं विजापूरच्या बादशहानीं बराच प्रदेश घेतला होता.

कर्नाटकांत मराठयांचा प्रवेश पहिल्यानें शिवाजी महाराजांचे वडील शहाजी राजे भोंसले यांच्या कारकीर्दींत झाला. विजापूरच्या बादशहाकडून कर्नाटक बालेघांटच्या बंदोबस्ता करितां त्यांची नेमणूक झाली होती. व फौजेच्या खर्चा करितां त्यांस जहागीर पांच परगणे मिळाली होती ती ही तिकडेच होती. त्या पांच परगण्यांचीं नांवें शिरें, होसकोटें, कोलार, बाळापूर व बेंगरूळ ( बंगलोर ) अशीं आहेत. शहाजी राजे कर्ते व पराक्रमी पुरुष होते. त्यानीं त्या देशींच्या संस्थानिकांवर दरारा बसवून आपल्या धन्याच्या राज्याचा बंदोबस्त राखिला, आपल्या जहागिरींत कित्येक किल्ले नवीन बांधिले, व जुन्यांचा जीर्णोद्धार केला, इतकेंच नाहीं, तर घांटाखालीं उतरून पाईनघांटा पैकीं ह्मणजे द्रविड देशा पैकीं आरणी, वेलोर व जिंजी हे किल्ले व तंजावरचें संस्थान काबीज केलें. त्यानीं आपणा बरोबर तिकडे शेंकडों ब्राह्मण महाराष्ट्रांतून नेले होते. त्या ब्राम्हणांचे वंशज अद्यापि त्या देशीं बहुत स्थळीं नांदत आहेत. नंतर ही निरनिराळ्या प्रसंगीं इकडील पुष्कळ ब्राम्हण गेल्या शतकांत तिकडे जाऊन राहिले आहेत. या मराठी ब्राम्हणांची सरकारी कामकाजांत तर्बेज व हुषार असल्या विषयीं तिकडे लवकरच ख्याति झाली, आणि तद्देशीय राजे रजवाड्यांच्या दरबारांत त्यांस आश्रय मिळूं लागला व त्यांचें महत्व वाढूं लागलें. अठराव्या शतकांत मराठ्यांच्या वैभवाला कळस होऊन गेला. त्यांचे सेनासमुद्र दर वर्षास हिंदुस्थानाच्या कोना कोपऱ्यांतील प्रांतांवर देखील जाऊन आदळूं लागले. मराठी भाषा ही सार्वभौम राजांची भाषा होऊन वसली. कर्नाटकांतला केवढा बलिष्ट पाळेगार असला तरीं त्यास मराठी ब्राम्हण कारकुनानें लिहून आणलेल्या पत्राच्या शेवटीं ' बहुत काय लिहिणें लोभ करावा हे विज्ञापना ' हीं वेडीं वांकडींच कां होईनात, पण

मोडी लिपींत अक्षरें लिहितां येण्याची जरूर पडूं लागली व भूषण वाटूं लागलें ! मराठे सरदारांशीं खंडणी बद्दल बोलणें किंवा पत्रव्यवहार करणें, त्यांच्या भेटी घेऊन व नजराणे देऊन त्यांची मर्जी सुप्रसन्न राखणें, त्यां जवळ कुमक मागणें, इत्यादि प्रसंग तिकडील राजे रजवाड्यांस हरहमेषा पडूं लागले. या मसलती पार पाडण्या करितां मराठी ब्राम्हण नेहमीं नौकरीस ठेविल्या वांचून त्यांस गत्यंतरच नव्हतें.

शिवाजी महाराजानीं इ० स० १६७७ या वर्षीं सत्तर हजार फौजेनिशीं कर्नाटकावर स्वारी केली. चौथ सरदेशमुखीच्या वसुला करितां त्या देशावर आलेली ही मराठ्यांची पहिलीच टोळधाड होय. या स्वारींत महाराजानीं आपले सावत्र बंधु व्यंकोजी राजे यांज पासून बापाची सर्व जहागीर हिसकून घेतली, व तंजावर खेरीज पाईन घांटांतलीं शहाजी राजे यांच्या ताब्यांत पूर्वीं असलेलीं सर्व स्थळें घेतलीं. शिवाय बारा महाल पैकीं महाराजगड, कर्नाटकगड, जगदेवगड हे व दुसरे अनेक किल्ले घेऊन त्या प्रांतीं आपला अंमल बसविला; आणि भोंवतालच्या तमाम मुलखांत फौजा पाठवून खंडण्या वसूल केल्या. परत तुंगभद्रेकडे येतां येतां त्यानीं बल्लारीचा किल्ला घेतला, आणि त्या नदीच्या उत्तरतीरीं आल्यावर कोपळ, बहादूरबिंडा व दुसरे अनेक किल्ले घेतले, व कृष्णा आणि तुंगभद्रा यांच्या चिमट्या मधला प्रदेश बहुतेक ताब्यांत आणिला. त्या दुआबा मधील ज्या प्रबळ पाळेगारानीं मुसलमानी राजांच्या सैन्यास कधीं जुमानिलें नाहीं, त्यांस आतां शिवाजी महाराजांपुढें मान वांकवावी लागली; व खंडणी द्यावी लागली. शिवाजी महाराजांचें जितकें राज्य महाराष्ट्रांत होतें त्याच्या निम्या पेक्षां अधिक त्यानीं कर्नाटकांत संपादिलें होतें. हें नवीन मिळविलेलें राज्य नेहमी ताब्यांत ठेवितां यावें, व आणखी वाढवितां यावें, या उद्देशानें त्यानीं त्या मुलखाशीं दळणवळण ठेवण्याची सोय उत्तम केली होती. दुआब तर महाराष्ट्राच्या लगत्यासच होता. तेथन शाहाजी राजे

यांच्या जहागिरीच्या परगण्यांत जाण्याच्या रस्त्यावर बल्लारीचा किल्ला त्यांच्या ताब्यांत होताच. शिवाय तो रस्ता चित्रदुर्ग व हरपनहळ्ळी येथील संस्थानिकांच्या मुलखांतून जात असे, त्या दोन संस्थानिकांशीं महाराजांच्या घराण्याचा स्नेह शहाजी राजे यांच्या वेळे पासूनच होता. तेथून म्हणजे शिरें, होसकोटें वगैरे परगणे कर्नाटक बालेघांट प्रांतीं आहेत, तेथून पाईन घांटाकडे जाण्यास रस्ता निर्वेधच होता, व जिंजी, वेलोर वगैरे तिकडल्या स्थळांस उपद्रव झाला असतां बालेघांटावरून कुमक जाण्यास हरकत नव्हती. महाराष्ट्रांत जसे त्यांचे रायगड, सिंहगड, पुरंदर वगैरे फार बळकट डोंगरी किल्ले होते, तसेच तिकडे बालेघांटच्या मुलखांत नंदीदुर्ग, भैरवदुर्ग वगैरे अनेक प्रख्यात पहाडी किल्ले होते, ते त्यांच्या राज्य स्थापनेच्या पद्धतीस निःसंशय फार उपयोगी पडते. महाराजांचे बेत काय असतील ते असोत, पण ते त्यांच्या हातें सिद्धीस जाण्याचा योग आला नाहीं! कारण कीं, कर्नाटकच्या स्वारीहून परत आल्यावर दोन वर्षांच्या आंतच ते दिवंगत जाहले.

या कर्नाटकच्या राज्याचा उपभोग शिवाजी महाराजांस घेतां आला नाहीं, तरी त्यांचे पुत्र राजाराम महाराज यांचें इकडील राज्य नष्टप्राय होण्याची वेळ आली तेव्हां त्यांस तिकडे जाऊन कांहीं वर्षें जिंजी येथें आसरा धरितां आला. सारें दक्षिण हिंदुस्थान जिंकण्याची प्रतिज्ञा करून औरंगजेब बादशहा इ० स० १६८४ मध्यें प्रचंड सेनेसह दक्षिणेंत आला. त्यानें विजापूर व गोवळकोंडें येथील मुसलमानी राज्यें बुडविलीं. त्या दोन राज्यांत महाराष्ट्र, कर्नाटक आणि तैलंगण या देशांतले जितके मुलूख मोडत होते तितके सर्व औरंगजेबाच्या ताब्यांत गेले. नंतर मराठी राज्याचा उच्छेद करण्याच्या यत्नास तो लागला, आणि त्या मुळेंच वर सांगितल्या प्रमाणें राजाराम महाराजांस कर्नाटकांत जावें लागलें. बादशाहाच्या ही फौजा त्यांस जेर करण्या करितां तिकडे गेल्या, व त्यांशीं मराठ्यांचीं पु-

प्कळ तुमुल युद्धें तिकडे झालीं. इकडे महाराष्ट्र देशांत ही मोंगलांच्या फौजांशीं मराठ्यांचीं युद्धें सुरूच होतीं. एकंदर सुमारें पंचवीस वर्षें पर्यंत ही झोंबाझोंबी सतत चालू होती. तिचा परिणाम असा झाला कीं, मराठ्यानीं बादशहाचें कांहीं चालूं न देतां आपलें स्वातंत्र्य कायम राखिलें; पण त्या अवधींत कित्येक डोंगरी किल्ल्यांशिवाय बादशहानें मराठी राज्याचा बहुतेक भाग ताब्यांत आणिला; व कर्नाटकांत मराठ्यांचें जें राज्य होतें ते तर सर्वच घेतलें. तिकडे एक तंजावरचें संस्थान मात्र शिवाजी महाराज यांचे सावत्र बंधु व्यंकोजी राजे यांच्या वंशजांकडे राहिलें.

इ० स० १७०७ या वर्षीं औरंगजेब मरण पावला. त्यानें जें येवढें अवाढव्य राज्य संपादन केलें होतें, तें रक्षण करण्याची अक्कल त्याच्या वंशजां पैकीं कोणामध्यें राहिली नाहीं. या मुळें उत्तरहिंदुस्थानांत निरनिराळ्या प्रांतांवर त्यानें जे सुभेदार नेमिले होते त्यानींच ते ते प्रांत बळकाविले, आणि दक्षिण हिंदुस्थानांत ही तीच स्थिति होऊन लहान मोठीं शेंकडों संस्थानें नवीन निर्माण झालीं.

औरंगजेब बादशहानें दक्षिण हिंदुस्थानांत जितकें राज्य काबीज केलें होतें त्याचे त्यानें सहा सुभे केले होते. त्यांचीं नांवें—१ खानदेश, २ वऱ्हाड, ३ औरंगाबाद, ४ बेदर, ५ हैदराबाद (गोवळकोंडें), ६ विजापूर. ह्या सहा सुभ्यांत शेवटचे दोन फारच मोठे होते. कारण मोंगलानीं कर्नाटकांत जितकें नवीन राज्य मिळविलें होतें, तितक्याचा समावेश या दोन सुभ्यांत झाला होता. विजापूरच्या राज्यांत जितकें कर्नाटकचें राज्य होतें त्यास विजापूर कर्नाटक असें बादशाहानें नांव देऊन तें राज्य विजापूरच्या सुभ्यास जोडिलें होतें. तसेंच गोवळकोंड्याच्या ताब्यांत पाईनघाटा पैकीं ह्मणजे द्रविड देशा पैकीं व तैलंगणा पैकीं जितकें राज्य होतें तितकें सगळें हैदराबादच्या सुभ्यास त्यानें जोडिलें व त्या राज्यास हैदराबाद कर्नाटक असें नांव दिलें. कर्नाटकांत बंदोबस्त राखण्या

कारितां बादशहानें जे सुभेदार व फौजदार वगैरे अधिकारी नेमिले होते, ते बादशहा मेल्या बरोबर स्वतंत्र होऊन आपणास नबाब म्हणवून घेऊं लागले. निजाम उल्मुलूख नांवाच्या एका पराक्रमी सरदाराच्या ताब्यांत दक्षिणच्या सहा सुभ्यांची वहिवाट दिल्लीच्या बादशहाकडून होती. तो निजाम इ० स० १७२० या वर्षीं बादशहाचा अंमल झुगारून देऊन या सहा सुभ्यांचें राज्य बळकावून बसला. तो बलिष्ट असल्यामुळें त्याच्या ताब्यांत कर्नाटकांतल्या सर्व संस्थानिकांस व नबाबांस वागावें लागे, व त्यास खंडणी द्यावी लागे. या नबाबांत पांच नबाब बरेच सामर्थ्यवान् होते. त्यांच्या राजधान्या अर्काट, शिरें, कडपें, कर्नूळ व सावनूर या होत्या. अर्काटच्या नबाबाचें राज्य कर्नाटक पाईन घांटांत होतें व शिरें येथील नबाबाचें राज्य कर्नाटक बालेघांटावर होतें. विजापूरच्या बादशहाकडून शाहाजी राजे यांस मिळालेली जहागीर या नबाबाच्या राज्यांतच होती. कडपें व कर्नूळ येथील नबाबांचीं राज्यें त्या त्या टांपूवर होतीं. सावनूरच्या नबाबाचा अंमल मात्र बऱ्याच विस्तीर्ण प्रदेशावर पसरला असून शिवाजी महाराजांनीं कृष्णा व तुंगभद्रा यांच्या दुआबा मध्यें जो मुलूख जिंकिला होता तो सावनूरच्या राज्यांत मोडत होता.

एकतंत्रानें राज्यकारभार चालविण्याची शिस्त सुटल्यामुळें ज्या राष्ट्रांत बहुनायकी उत्पन्न होत्ये तें राष्ट्र लौकरच मोडकळीस येतें. परचक्राचे तडाखे सहन करण्याचें सामर्थ्य त्यांत राहत नाहीं. त्यांतील प्रजेची नेहमी अमर्याद पायमल्ली होत असत्ये. अठराव्या शतकांत या बहुनायकीचें कर्नाटक देशीं जणू काय भरपूर पीकच आलें होतें ! त्या देशावर सत्ता चालविणारे पांच नबाब व त्यांहून वरिष्ट असा हैदराबादचा नबाब ह्मणजे निजाम यांचीं राज्यें दक्षिणेंत मोंगलांची स्वारी झाल्यामुळें अस्तित्वांत आलेलीं होतीं. पण त्यांच्या पूर्वीं कित्येक शतकें ज्यांच्या राज्याची स्थापना होऊन गेली होती व कालचक्राच्या अनुकूळ किंवा प्रतिकूळ गतीच्या

योगानं ज्यांचा अभ्युदय किंवा ऱ्हास होत आला होता अशा तद्देशीय संस्थानिकां विषयीं येथें उल्लेख करावयाचा राहिलाच आहे. या संस्थानांत म्हैसूरचें राज्य कर्नाटकाच्या दक्षिणेकडील अर्ध्या भागांत होतें. उत्तरेकडील अर्ध्या भागांत बिदनूर, चित्रदुर्ग, हरपनहळ्ळी, अनागोंदी व रायदुर्ग हीं संस्थानें बरींच मोठीं होतीं. या पांचांत मोठें बिदनूर. त्याच्या खालोखाल चित्रदुर्ग व बाकीचीं या दोहोंपेक्षां लहान होतीं. सोंदें संस्थान घांटाच्या पायथ्यास हल्लींच्या कारवार जिल्ह्यांत होतें. त्याचा ही वर घाटीं थोडा बहुत अंमल होताच. मराठ्यांचें राज्य कर्नाटक देशीं होतें, तें मोंगल बादशहानें घेतल्याचें मागें लिहिलेंच आहे. तें सर्व राज्य आतां वर सांगितलेल्या संस्थानिकांनीं व नबाबानीं हाताखालीं घातलें होतें. नाहीं म्हणावयास दोन टांपू मात्र त्यांच्या ताब्यांत राहिले होते. पैकीं एक तंजावरचें संस्थान शिवाजी महाराज यांचे सावत्र बंधु व्यंकोजी राजे यांच्या वंशजांकडे चालत होतें. दुसरे संस्थान गुत्तीकर घोरपड्यानीं जिंकिलेलें होतें. पूर्वीं राजाराम महाराज व संताजी घोरपडे सेनापति यांमध्यें विरोध उत्पन्न होऊन महाराजांनीं संताजीस ठार मारविलें. तेव्हां संताजीचा पुतण्या शिधोजी सैन्य जमवून कर्नाटकांत जाऊन लुटालूट करूं लागला. त्यानें तिकडे गुत्ती, गजेंद्रगड व सोंडूर हे किल्ले व त्यां भोंवतालचा प्रदेश काबीज करून तिकडे एक स्वतंत्रच संस्थान स्थापिलें. हे घोरपडे महापराक्रमी सरदार होते, यास एक उत्तम प्रमाण असें आहे कीं, ज्येथें दंगे, लढाया, व बंडाळी नेहमीं चालत होती अशा पर मुलुखांत केवळ तरवारीच्या जोरावर मिळविलेलें हें चिमुकलें संस्थान त्यानीं महाराष्ट्राच्या अधिपतींचें बिलकूल पाठबळ नसतां पाऊणशें वर्षें पर्यंत उत्तम रीतीनें रक्षण केलें, व कृष्णेपासून रामेश्वरापर्यंत सर्व राजे रजवाड्यांवर आपला दरारा बसविला. या घराण्यांत शिधोजीचा मुलगा मुरारराव हा फारच प्रख्यातीस आला. क्लाईव्ह साहेब एका मोठ्या संकटांत पडला असतां त्यास कुमक करण्या विषयीं तयार

## हैदरअल्लीवर पहिली स्वारी

झाल्या बद्दल ज्या मुराररावाचें इंग्रज इतिहासकारानीं वर्णन केलें आहे तो हाच मुरारराव होय. कर्नाटकांत कोठें ही लढाईचा प्रसंग उपस्थित होवो, मुराररावाची स्वारी लढणाऱ्या दोन पक्षां पैकीं एकाकडे नाहीं असें व्हावयाचेंच नाहीं! आपल्या राज्यांतील ठाण्यांस शिबंदी पुरवून शिलक राहण्या जोगें व नेहमीं लढाईच्या उपयोगीं पडण्या जोगें सैन्य मुराररावा जवळ सहा सात हजारां पेक्षां अधिक नसे; पण तें अति उत्तम व निवडक असून त्याच्या विश्वासांतलें व अगदीं एक जुटीनें जीवास जीव देऊन लढणारें असे. त्याचा तोफखाना जुजबीच असे. पण गारदी कवाईत शिकलेले उत्तम लढाऊ असत. घोडेस्वारांचा भरणा तो दर वर्षास महाराष्ट्रांतून हजारों शिलेदार नेऊन करीत असे.

अठराव्या शतकांत वर सांगितल्या प्रमाणें कर्नाटकांत मुसलमानी, कानडी, व मराठी अशीं तीन प्रकारचीं निरनिराळीं राज्यें होतीं. या सर्वांचा उच्छेद करण्यासच जणुकाय निर्माण झालेला महाप्रतापी जो हैदरअल्ली त्याच्या हकीगतीकडे आतां वळावयाचें. पण तसें करण्या पूर्वी १७२० पासून पानपतच्या लढाई पर्यंत तिकडे ज्या कित्येक उलाढाली झाल्या त्यां विषयीं व त्या देशावर मराठ्यांनीं तितक्या अवधींत ज्या स्वाऱ्या केल्या त्यां विषयीं थोडें दिग्दर्शन केलें पाहिजे.

दिल्लीच्या बादशाहाचे दोघे वजीर सय्यद नांवाचे होते, त्यानीं बाळाजी विश्वनाथ उर्फ थोरले नानासाहेब पेशवे यांस इ० स० १७१८ मध्यें कुमकेस बोलावून नेलें, व त्यांच्या मदतीनें महमदशहा बादशहाची तक्तावर स्थापना केली. त्या नंतर त्या बादशाहानें पेशवे यांच्या हातीं चौथ, सरदेशमुखी व स्वराज्य अशा तीन हक्कांच्या तीन निरनिराळ्या सनदा दिल्या. सरदेशमुखी ह्मणजे दहावा हिस्सा व चौथ ह्मणजे चवथा हिस्सा दक्षिणचे सहा सुभे कोणचे हें पूर्वीं सांगितलेंच आहे. या सुभ्यांचा ऐन वसूल अठरा कोटी रुपये होता. त्या पैकीं दहावा हिस्सा ह्मणजे एक

कोटी ऐशीं लक्ष रुपये सरदेशमुखी बद्दल मोंगल अधिकाऱ्यां पासून घे-ण्याचा मराठ्यांस या सनदेवरून हक्क आला. सरदेशमुखीची रक्कम वजा जातां अठरा कोटी पैकीं जी रक्कम राहिली तिचा ही चौथ ह्मणजे चवथा हिस्सा घेण्याचा हक्क बादशहानें दिलेल्या चौथाच्या सनदेवरून त्यांस प्राप्त झाला. तिसरी सनद स्वराज्याची होती. ' स्वराज्य ' शब्दाचा अर्थ ' शिवाजी महाराजांच्या मरणसमयीं त्यांच्या ताब्यांत होतें तें सर्व राज्य ' असा होता. अलीकडे औरंगजेबानें स्वराज्या पैकीं बहुतेक भाग जिंकिला होता, तो महमदशहानें या 'स्वराज्या' च्या सनदेनें मराठ्यांस परत दिला. पण तुंगभद्रेच्या उत्तरेस शिवाजी महाराजांचें जेवढें राज्य होतें तेवढें मात्र बादशहानें ' स्वराज्य ' ह्मणून मराठ्यांस परत दिलें. कर्नाटक बालेघांटा-वर शिरें बेंगरूळ वगैरे पांच परगणे ( शहाजी राजे यांची पूर्वींची जहा-गीर ) व पाईनघांटांतील बारा महाल जिंजी, वेलोर इत्यादि प्रांत व स्थळें व तंजावर पैकीं शिवाजी महाराजांचा हिस्सा होता तो, या सर्वांची गणना ' स्वराज्यांत ' करण्याचें बादशहानें नाकारिलें; व ते मुलूख मराठ्यांस त्यानें परत दिले नाहींत. यामुळें आतां तंजावरच्या राजांची फक्त मोंगलांच्या जहागीरदारांत गणना होऊं लागली. अर्थात् इतर संस्थानां बरोबर तंजाव-रापासून ही खंडणी घेण्याचा हक्क सातारकर छत्रपतींस प्राप्त झाला! म्हैसूर, त्रिचनापल्ली व कर्नाटकांतलीं इतर शेंकडों लहान मोठीं संस्थानें दक्षिणच्या सहा सुभ्यांखालीं मोडत होतीं, त्यामुळें चौथ - सरदेशमुखीचा वसूल मराठ्यानीं त्यांज पासून ही घ्यावा असें ठरलें होतें. त्या संस्थानांची व खुद्द छत्रपतींच्या कुळांतले राजे ज्या संस्थानाचे अधिपति होते त्या तं-जावर संस्थानाची योग्यता आतां सारखीच होऊन बसली!

हल्लीं इंग्रज सरकारचे राज्यांत सर्वत्र शांतता असल्यामुळें प्रजेची आबादानी आहे. त्यामुळें या सरकारच्या वसुलाची रक्कम भरपूर जमा होत आहे. तरी सर्व बाबी धरून मुंबई व मद्रास या इलाख्यांचा आणि वऱ्हाड

प्रांत व निजामाचें राज्य यांचा मिळून वसूल हल्लीं जवळ जवळ तीस कोटी रुपये येतो. पण अफू व पूर्वी अस्तित्वांत नसलेल्या इतर बाबी यां बद्दल तिसरा हिस्सा या रकमेंतून वजा केला तर वीस कोटी राहतात. या वीस कोटींचा वसूल ज्या मुलखांतून येत आहे त्या मुलखांतून सारा सिंध प्रांत, सारी गुजराथ, पुणें, सातारा व नाशीक या जिल्ह्यांचे बहुतेक भाग, कोंकणचे चारी जिल्हे, उत्तर व दक्षिण कानडा आणि मलबार, व तंजावर इतके जिल्हे वजा करावे, तेव्हां मोंगलांचे त्या वेळचे सहा सुभे होणार. तेव्हां या सुभ्यांचा वसूल अठरा कोटी रुपये जो धरिलेला आहे, तो फक्त कागदपत्रीं नमूद झालेला मात्र पहाण्यास सुंदर दिसतो. खरोखर वसूल निम्मे तरी येत असेल कीं नाहीं याची वानवाच! कारण, औरंगजेब मरण्या पूर्वी पंचवीस वर्षे पर्यंत लढाया व लुटालूट सारखी सुरू असल्यामुळें सारा देश हैराण होऊन गेला होता, आणि प्रांतचे प्रांत ओस पडले होते. वसुलाची अशी निकृष्ट स्थिति होती तरी या सहा सुभ्यांच्या उत्पन्नांतून सुमारें सहा कोटी रुपये दर-साल चौथ सरदेशमुखी बद्दल मोंगलानीं मराठ्यांस द्यावयाचे होते! यांत देणाऱ्यानीं तरी काय द्यावें व घेणार तरी काय घेतात! या वरून हें सहज लक्ष्यांत येईल कीं, हे चौथ सरदेशमुखीचे हक्क अशा स्वरूपाचे होते कीं, ज्यांची वहिवाट मराठे व मोंगल या उभय पक्षीं सरळपणानें चालण्या जोगी नव्हती. मराठ्यानीं मनगटाच्या जोरावर साधेल तितकें दडपावें व मोंगलानीं राखवेल तितकें राखावें हाच या तंट्याचा निकाल! चौथ सरदेशमुखीची मूळ कल्पना शिवाजी महाराजांनीं काढिली. त्यांच्या मरणा नंतर पंचवीस वर्षे हे हक्क मोंगलां कडून जबरदस्तीनें कबूल करविण्याची मराठ्यांची खटपट चालली होती, ती शाहू महाराजांचे कारकीर्दींत सिद्धीस गेली. या दोन हक्कां पासून प्राप्त होणाऱ्या मुबलक पैक्याची वांटणी ब्राह्मण मुत्सद्यांनीं सर्व मराठे सरदारांत एकी रहावी म्हणून किती अक्कलेनें केली, व 'स्वराज्य' शब्दा-

चा अर्थ त्यानीं किती व्यापक केला, व या दोन गोष्टीनीं मराठी राष्ट्राचें कसें अपरिमित कल्याण झालें, हा विषय फार मनोरंजक आहे; परंतु त्याचा प्रस्तुत प्रकरणाशीं विशेष संबंध नसल्यामुळें त्या विषयीं आम्हीं लिहीत नाहीं.

राज्यें जिंकणारे लोक आज पर्यंत या भूतलावर असंख्य झाले आहेत. पण त्यांच्या कृतीमध्यें हा नियम दिसून येतो कीं, त्यानीं प्रथम एक प्रांत ताब्यांत घ्यावा; तेथें आपला अंमल निर्वेधपणें चालूं लागला ह्मणजे दुसरा प्रांत जिंकण्याच्या यत्नास लागावें; व या प्रमाणें करीत करीत शेवटीं सार्वभौम ऐश्वर्याचे मालक व्हावें. मराठयांची मात्र पद्धति याच्या अगदीं उलट होती. त्यांच्या चळवळीस एक प्रांत पुरतच नव्हता! साऱ्या हिंदुस्थानभर एकाच वेळीं त्यांच्या स्वाऱ्या व कारस्थानें चालू होतीं. पण निष्कंटक व निर्वेध असा अंमल थोड्याच प्रांतांवर त्यांचा चालत असे. प्रत्येक देश व प्रांत या प्रमाणें वर्षानुवर्ष बलहीन करीत गेलें, ह्मणजे येईल तेव्हां सारें हिंदुस्थानच आपल्या ताब्यांत येईल असें त्यांस वाटत असावें! दक्षिणच्या सहा सुभ्यांत चौथ सरदेशमुखी मिळाल्या बरोबर तिचा अंमल पक्का बसविण्याचें किंवा ते सारेच सुभे ताब्यांत घेण्याचें काम फावेल तसतसें करण्याचें ठरवून त्यानीं आधीं कर्नाटक, गुजराथ, माळवा, राजपुताना, बुंदेलखंड, आग्रा, दिल्ली, रोहिलखंड, बंगाला या दूरदूरच्या प्रांतांवर दरसाल स्वाऱ्या करण्याचा उपक्रम सुरू केला! यामुळें काय चमत्कार झाला आहे पहा. त्यानीं १७४१ त त्रिचनापल्ली घेतली, आणि १७५२ त त्रिंबकचा किल्ला घेतला! १७५८ त त्यांचा लाहोरांत अंमल बसला आणि १७५९ त अहमदनगर त्यांच्या हातीं आलें! 'स्वराज्या' ची सनद त्यांस बादशहाकडून मिळाली होती व तें 'स्वराज्य' दक्षिणेंत खानदेश, बागलाणा, मध्यमहाराष्ट्र व उत्तर कर्नाटक यां मध्यें पसरलेलें होतें. तें तत्काळ घेण्याचा त्यानीं यत्न केलाच नाहीं. पण

## हैदरअल्लीवर पहिली स्वारी

जेव्हां संधी आली तेव्हां निरनिराळ्या ठिकाणचें ' स्वराज्य ' व त्या बरोबर ' परराज्य ' ही त्यांनीं घेतलें !

इ० स० १७२६ त थोरले बाजीराव पेशव्यांनीं श्रीरंगपट्टणावर स्वारी करून खंडणी घेतली. नंतर १७४० त रघोजी भोंसले व इतर सरदार पन्नास हजार फौजेसह कर्नाटकचे स्वारीस निघाले. या प्रसंगीं त्यांस गुत्तीहून मुरारराव घोरपडे येऊन मिळाला होता. त्यांशीं झुजण्यास अर्काटचा नबाब दोस्त अल्लीखान तयार झाला. परंतु त्यानीं त्याचा पराभव करून त्यास मारून टाकिलें व त्याची फौज लुटून घेतली. नंतर त्या प्रांतीं चोहोंकडे लुटालूट करण्यास त्यानीं सुरुवात केली, तेव्हां दोस्त अल्लीचा मुलगा सफदरअल्ली यानें खंडणी देऊन त्यांस वाटेस लाविलें. दोस्तअल्लीचा जांवई चंदासाहेब हा त्रिचनापल्ली बळकावून बसला होता, व तो सारें राज्य आपणा पासून घेईल अशी सफदरअल्लीस भीति वाटत होती; ह्मणून त्यानें मराठ्यांशीं राजकारण करून त्यांजकडून चंदासाहेबावर स्वारी करविली. त्यानीं त्रिचनापल्ली तीन महिने लुटून काबीज केली, व तो प्रांत मुरारराव घोरपड्याच्या स्वाधीन करून व चंदासाहेबास कैद करून बरोबर घेऊन ते परत आले.

या नंतर दोन वर्षांनीं निजाम उल्मुल्खानें कर्नाटकावर स्वारी केली, तेव्हां मुराररावापासून सलोख्यानें त्रिचनापल्ली काढून घेऊन ती त्यानें पुनः अर्काटच्या नबाबाकडे दिली. निजामाच्या या स्वारींत एक गमतीचा प्रकार घडून आला, तो सांगितला ह्मणजे त्यावेळची देशस्थिति कशी होती हें कळून येईल. मागें सांगितलेंच आहे कीं, औरंगजेब मेला तेव्हां मोंगल अधिकारी आपल्या ताब्यांतले प्रांत, महाल व किल्ले बळकावून स्वतंत्र होऊन आपणास ' नबाब ' ह्मणवूं लागले होते. एके दिवशीं निजामानें दरबार भरला असतां तेथें त्याच्या भेटीस एका मागून एक अठरा नबाब आल्याची चोपदारांनीं पुकारणी केली. तेव्हां तो रागानें ह्मणाला,

अरे, आजपर्यंत मी समजत होतों कीं, दक्षिणेंत सहा सुभ्यांवरचा अधिकारी व ' नबाब ' या पदवीला योग्य असा मी एकच आहें; पण आतां पहातों तों या प्रांतीं जिकडे तिकडे नबाबच नबाब बोकाळले आहेत ! इतउत्तर जर कोणी असला नबाब दरबारास येईल तर त्याला चावकांचा सडकून मार देण्यांत येईल !!!

बाजीराव बल्लाळ पेशवे मरण पावल्या नंतर बाळाजी बाजीराव उर्फ नानासाहेब यांस पेशवाईचीं वस्त्रें मिळालीं. बाबूजी नाईक बारामतीकर यांस शाहू महाराजांकडून पेशवाई देवविण्याचें रघोजी भोंसल्याचे मनांत होतें, परंतु त्याची ती मसलत सफळ झाली नाहीं. तथापि कृष्णा व तुंगभद्रा या नद्यां मधील मुलखाच्या चौथ सरदेसमुखीची कमाविशी सात लक्ष रुपये सालिना मक्त्याच्या करारावर भोंसल्यानें महाराजांकडून बाबूजी नाइकास देवविली होती. तो मुलूख सावनूरकर नवाब अबदुलमजीदखान याच्या ताब्यांत होता. त्या प्रांतीं कित्तूर, नवलगुंद, शिरहट्टी, हावनूर व डंबळ येथील देसाई फार प्रबळ होते. ते देसाई व सावनूरकर नबाब कांहीं केल्या बाबूजी नाइकाचा अंमल वसूं देईनात. उभयपक्षीं पांच सहा वर्षे झगडाझगड चालू होती. तींत बाबूजी नाईक फौजेच्या खर्चा खालीं अगदीं जेरीस आला. ही कमाविशी सदाशिवराव भाऊ साहेबांच्या नांवें करून देऊन तूं हिजवरचा आपला हक्क सोड ह्मणजे आम्हीं सर्व यथास्थित बंदोबस्त करूं; असें पेशव्यानीं नाइकास पुष्कळ वेळां सांगून पाहिलें, पण त्या दोघां मध्यें वांकडें व स्पर्धा असल्यामुळें तें ह्मणणें तो ऐकेना. शेवटीं अधिक उपेक्षा करावी तर उत्तर कर्नाटक अगदींच हातांतून जाईल असें समजून पेशव्यांच्या आज्ञेनें भाऊ साहेब फौज घेऊन तिकडे इ.स. १७४७ त स्वारीस गेले. जरूर पडल्यास त्यांची कुमक करितां यावी ह्मणून आणखी फौजेसह नानासाहेब पंढरपुरास येऊन तेथें दळ देऊन राहिले. भाऊसाहेबांचें वय या वेळीं १७ वर्षांचें होतें. ते लहान ह्मणून त्यांस

## हैदरअल्लीवर पहिली स्वारी

सल्ला मसलत देण्या करितां सखारामबापूची योजना त्यांच्या दिवाणगिरीवर झाली होती, व त्या स्वारींचें सर्व जोखीम त्याच्याच शिरावर होत. भाऊ साहेबानीं तुंगभद्रे पर्यंत स्वारी करून सावनरकर नबाब व तिकडील देसाई व इतर पुंडपाळेगार यांस पादाक्रांत केलें, व नबाबा पासून पाच्छापूर, कित्तूर, परसगड, गोकाक, यादवाड, बागलकोट, बदामी, नवलगुंद, डंबळ, अनिगिरी, तोरगल, हल्याळ, हरिहर, बसवापट्टण व दुसरे कित्येक मिळून एकंदर छत्तीस परगणे त्यानीं घेतले. सावनूरकराकडे मिश्रिकोट, हुबळी, बंकापूर, हनगल, कोड व राणेबिदनूर पैकीं बहुतेक भाग, कुंदगोळ व कांहीं इतर मिळून बेवीस परगणे मात्र राहिले. बंकापूर, तोरगल, व बेळगांव हे किल्ले ही त्याजकडेच राहिले. नबाबा पासून या स्वारींत जो मुलूख मिळाला त्या वरचा त्यानें आपला वारसा सोडिला इतकेंच. तो सर्व मुलूख तत्काळ मराठ्यांच्या ताब्यांत आला असें नाहीं. तिकडील देसायांस बलहीन करून आपला अंमल त्या प्रांतीं बसविण्याचें काम पुढें कित्येक वर्षे त्यानीं चालू ठेविलें होतें. त्या नबाबा पासून घेतलेल्या मुलखांत कांहीं भाग 'स्वराज्या' पैकीं होता हें वाचक विसरले नसतीलच. स्वराज्याची सनद मिळून अठावीस वर्षे झालीं होतीं, तरी सनदे प्रमाणें या उत्तरकर्नाटकांतील स्वराज्य ताब्यांत घेण्यास मराठ्यांस आजपर्यंत फुरसत मिळालीच नाहीं, व आतां तें त्यानीं ताब्यांत आणिलें, तेव्हां त्या बरोबर सावनूरकराचें ही सुमारें अर्धे राज्य घेतलें! तिकडील काटक लोक दंगेखोर असल्यामुळें त्यांजवर दरारा बसविण्या करितां दर वर्षास पुण्याहून तिकडे फौज पाठवावी लागत असे.

इ० स० १७४० त महादाजीपंत पुरंदरे यांस पेशव्यानीं कर्नाटकच्या स्वारीस पाठविलें होतें, तेव्हां त्यांज बरोबर मुझफरखान ह्मणून गारद्यांचा सरदार होता. त्याचें व पुरंदरे यांचें कांहीं कारणामुळें भांडण झालें. त्यावरून तो मुझफरखान पेशव्यांचें लष्कर सोडून सावनूरकरांचे

आश्रयास गेला. त्यास हवालीं करण्या विषयीं मराठ्यानीं सावनूरकराशीं बोलणें लाविलें तें त्या नबाबानें ऐकिलें नाहीं. तेव्हां उभय पक्षीं युद्धाची पुनः तयारी झाली. कडपें व कर्नूळ येथील पठाण जातीचे नबाब व मुरारराव घोरपडे हे सावनूरकरास मिळाले. इ० स० १७५६ त नानासाहेब व भाऊसाहेब मोठी फौज बरोबर घेऊन कृष्णा उतरून सावनुरावर चालून आले. मागच्या तहांत बागलकोटचा किल्ला नबाबानें मराठ्यांस देऊं केला होता, पण तो अद्यापि त्यांच्या हातीं आला नव्हता; तो यावेळीं काबीज करण्यांत आला. भागानगराहून सलाबतजंग ही आपल्या सैन्यासह येऊन पेशव्यांस मिळाला. या प्रसंगीं सावनूरकर याच्या साथीदारानीं त्याची कांहींच कुमक केली नाहीं. त्यामुळें मोंगल व पेशवे यांशीं लढाई करण्याचा बोजा त्या एकट्या नबाबाच्याच शिरावर पडला. सावनुरावर कित्येक महिने पर्यंत ज्यारीनें लढाई सुरू होती. शेवटीं मुराररावाच्या मध्यस्थीनें तो नबाब पेशव्यांस शरण येऊन उभय पक्षीं तह झाला. त्यांत अकरा लक्ष रुपये खंडणी व मिश्रिकोट, हुबळी, आणि कुंदगोळ हे परगणे त्यानें मराठ्यांस दिले; आणि सोंधें व बिदनूर या संस्थानां पासून खंडणी घेण्याचा आपला हक्क ही त्यानें त्यांस देऊन टाकिला. इतकें झाल्यावर मराठ्यांनीं पूर्वीं घेतलेल्या परगण्यां पैकीं तीन परगणे त्यास परत दिले. आतां नबाबाचें राज्य सालिना सुमारें आठ लक्ष रुपये उत्पन्नाचें मात्र राहिलें. खंडणीच्या अकरा लक्ष रुपयांची तत्काळ फेड करण्याचें त्यास सामर्थ्य नव्हतें. त्या रकमेची फेड होई पर्यंत बंकापूरचा किल्ला त्यानें मराठ्यांच्या हवालीं केला. इतकें झाल्यावर पेशव्यांचा निरोप घेऊन सलाबतजंग भागानगरास परत गेला. त्या नंतर श्रीमंतानीं गोपाळराव पटवर्धना बरोबर दहा हजार फौज देऊन सोंधें संस्थाना पासून खंडणी घेण्या साठीं त्यास रवाना केलें. त्यानें जाऊन सोंध्यास वेढा घालून तेथील देसायास जरब दिली, तेव्हां त्या देसायानें शरण येऊन आठ लक्ष रुपये

खंडणी देण्याचें कबूल केलें, व त्या पैकीं अडीच लक्ष रोख देऊन बाकी रकमेबद्दल मर्दनगड ( फोंडा ) किल्ला ओलीस दिला. या प्रमाणें ‘ स्वराज्या ’ पैकीं अत्युत्तम असा हा किल्ला पुनः मराठयांच्या हातीं आला. पेशव्यांची स्वारी सावनुराहून निघून तुंगभद्रेच्या दक्षिणतीरीं येऊन बिदनूर व इतर संस्थानां पासून खंडणी घेऊन परत पुण्यास गेली. दहा वर्षां पूर्वीं स्वराज्याची सरहद्द कृष्णेवर होती ती आतां तुंगभद्रे पर्यंत जाऊन पोंचली.

इ० स० १७५७ त नानासाहेब व भाऊसाहेब पुनः साठ हजार फौजेसह कर्नाटकच्या स्वारीस निघाले. तिकडे गेल्यावर त्यांस मुरारराव घोरपडे सहा हजार फौजेनिशीं येऊन मिळाला. त्या वर्षाच्या मार्च महिन्यांत त्यानीं म्हैसूरच्या राजधानीस ह्मणजे श्रीरंगपट्टणास शह दिला, व नंदराजाजवळ खंडणी बद्दल ते बेसुमार पैका मागूं लागले. नंदराज हा तेथील राजाचा प्रधान होता. राजा केवळ नामधारी मात्र असून सारी सत्ता याच्याच हातीं होती. नंदराजानें खंडणी माफ होण्याबद्दल किंवा निदान थोडी रक्कम घेण्याबद्दल पेशव्यांची फार विनवणी केली. परंतु त्यानीं तें कांहीं एक न ऐकतां श्रीरंगपट्टणास वेढा बसविला, आणि बातेऱ्या बांधून तीस तोफांचा मारा त्या शहरावर सुरू केला. नंदराजानें ही पुष्कळ दिवस हिमतीनें टक्कर दिली. परंतु त्याचा कांहीं उपाय चालेनासा होऊन तें शहर काबीज होण्याच्या बेतास आलें. इतक्यांत एके दिवशीं असें झालें कीं, त्या शहरांत श्रीरंगाचें देवालय प्रसिद्ध आहे, त्याच्या शिखरास बाहेरील तोफेचा गोळा लागून शिखर मोडलें, व त्याच वेळीं बाहेरच्या बातेऱ्यांत ही एक तोफ फुटून कित्येक गोलंदाज ठार झाले. तेव्हां उभय पक्षीं हा अपशकुन झाला असें समजण्यांत येऊन तहाचें बोलणें पुनः सुरू झालें. त्यांत बत्तीस लक्ष रुपये खंडणी घेऊन वेढा उठविण्याचें मराठयानीं कबूल केलें. नंदराजानें रोख काय ते पांच लक्ष रुपये दिले. बाकी रकमेच्या फडीं करितां त्यानें म्हैसूरच्या राज्या पैकीं उत्तम सुपीक

चौदा महाल मराठ्यांकडे लावून दिले. त्या महालांचीं नांवें—१ नागमंगल, २ बेळूर, ३ किकेरी, ४ चेनरायपट्टण, ५ कडूर, ६ बाणावर, ७ हरनहळ्ळी, ८ होनवल्ली, ९ तुरविकिरे, १० कंदिकिरें, ११ चिक नायकनहळ्ळी, १२ कडबा, १३ केळूर, १४ हुलियारदुर्ग. हीं नांवें येथें देण्याचें कारण, या पुढें या पुस्तकांत हीं पुनः पुनः यावयाचीं आहेत. असो, पेशव्यानीं या चौदा परगण्यांत वसुला करितां कमावीसदार नेमून व त्यांच्या रक्षणा करितां सहा हजार फौज ठेवून शिरें प्रांतावर स्वारी केली. शिरें, होसकोटें, बाळापूर, कोलार व बेंगरूळ हे परगणे एकमेकांस लगत असून ते ' स्वराज्या ' पैकीं होते; अर्थात् ते ताब्यांत घेणें श्रीमंतांस सर्वथा इष्ट होतें. दुसरें कारण आमच्या बुद्धीस असें वाटतें कीं, पेशव्यांचा प्रतिस्पर्धी बाबूजी नाईक याजकडून उत्तर कर्नाटकच्या चौथ सरदेशमुखीचा मक्ता पेशव्यानीं काढून घेतल्या नंतर त्यानें मोंगलाचा आश्रय मिळवून शिरें प्रांतीं तळ दिला होता. हें श्रीमंतांस अर्थातच न आवडल्यामुळें त्यानीं तो प्रांतच घेऊन त्याचा आसरा मोडून टाकावयाचें मनांत आणिलें असावें. श्रीमंतांनीं शिरें प्रांतीं जाऊन तिकडील कित्येक ठाणीं घेतलीं. मागें कर्नाटकचे पांच नबाब सांगितले आहेत त्यां पैकीं या शिऱ्यांच्या नबाबाचें राज्य अलीकडे कित्येक वर्षे अगदीं मोडकळीस आलें होतें, आणि त्याचा बहुतेक भाग कडप्याच्या नबाबानें बळकाविला होता. या घराण्यांतला शेवटचा नबाब दिलावरखान मरण पावल्यावर त्याचा जांवई मीरफैजुल्लाखान तेथील गादीवर बसला होता. श्रीमंतांनीं सारें राज्य खालसा केलें, तेव्हां या मीरफैजुल्लास निर्वाहा करितां थोडीशी जहागीर लावून दिली व शिरें शहर त्याच्या हवालीं केलें. पण तेथील किल्ला मात्र आपल्या ताब्यांत ठेविला होता. त्या प्रांतींच्या स्वराज्या पैकीं बेंगरूळ म्हैसूरकरांनीं घेतलें होतें व बाकीचीं ठाणीं व परगणे कडप्याच्या नबाबाच्या ताब्यांत होते. तो नबाब अलीकडे मराठ्यांशीं उन्मत्तपणानें वागत होता.

# हैदरअल्लीवर पहिली स्वारी

इतर संस्थानिकां प्रमाणें त्यानें या स्वारींत खंडणी दिली नव्हती. त्या नबाबाचें पारिपत्य करणें, अर्काटच्या नबाबा पासून खंडणी वसूल करणें, आणि तिकडील सर्व स्वराज्य ताब्यांत आणणें, हीं तीन कामें फार जरू-रीचीं होतीं; परंतु पावसाळा समीप आल्यामुळें बरीच फौज कर्नाटकांत छावणीस ठेवून श्रीमंत परत आले. छावणीस ठेवलेल्या फौजेवर बळवंतराव मेहेंदळे हा मुख्य सरदार होता. पावसाळा सुरू झाल्यावर कडप्याच्या नबाबानें सावनूर व कर्नूळ येथील पठाण नबाब, मुरारराव घोरपडे, व त्या देशींचे चित्रदुर्गकर वगैरे पाळेगार यांशीं राजकारण लावून त्यांस आप-णाकडे मिळवून घेतलें. मद्रासकर इंग्रजांस ही त्यानें आपल्या कुमकेस बोलाविलें. या सर्वांचा बेत असा होता कीं, मराठ्यांची फौज बुडवून त्यांच्या खंडणीचें जूं मानेवरून झुगारून द्यावें. परंतु जेव्हां बळवंतरावाची व कडप्याच्या नबाबाची लढाई जुंपली तेव्हां त्याच्या सोबत्यां पैकीं कोणीच कुमकेस आलें नाहीं. बळवंतरावानें होसकोटें, मुलबागल व कडपनाथ हीं ठाणीं भर पावसाळ्यांतच घेतलीं. शेवटीं त्या नबाबाचें व बळवंतरावा-चें तारिख २४ सप्तंबर रोजीं कडपें शहराजवळ भयंकर युद्ध झालें. त्यांत बळवंतरावाचा जय होऊन कडप्याचा नबाब मारिला गेला व हजारों प-ठाणांची कत्तल उडाली. राजधानी कडपें शहर तत्काळ मराठ्यांच्या हातीं लागलें तें त्यानीं लुटून फस्त केलें. मराठ्यांच्या बाजूस या लढाईत जे लोक ठार झाले त्यांत संभाजी घोरपडे देशिंगकर हा मिरज प्रांतींचा ना-मांकित शिलेदार होता. कडप्याचा नबाब मरण पावल्यावर त्याचा वारस अब्दुलनबीखान ह्मणून होता, तो जरी हिमतीनें लढत होता, तरी त्याचें अर्धें राज्य मराठ्यानीं घेतलेंच. या पूर्वीच अर्काटच्या नबाबाजवळ बळ-वंतरावानें खंडणीची मागणी केली होती. त्या प्रसंगीं त्या नबाबानें पुष्कळ आढे वेढे घेतले, व त्याचे साथी मद्रासकर इंग्रज यांनीं ही खंडणी माफ होण्या विषयीं फार खटपट केली होती. परंतु तें सारें निष्फळ होऊन

# हैदरअल्लीचें पूर्व चरित्र

शेवटीं अर्काटचा नबाब महमद अल्ली यास साडेचार लक्ष रुपये खंडणी द्यावी लागली. इतक्यांत म्हैसूरकरांशीं पुनः युद्ध करण्याचा मराठ्यांस प्रसंग आला. तो प्रकार असा—

नंदराजाच्या लोभांतला हैदरअल्ली ह्मणून एक सरदार म्हैसूरच्या दक्षिण सरहद्दीवर दिंदिगल येथें सुभेदार होता. त्यानें मेहंदळ्याचें व कडपेकरांचें युद्ध जुंपलें आहे, असें पाहून नंदराजास मसलत दिली कीं, 'तूं मराठ्यांस काय ह्मणून खंडणी दिलीस ? मला जर दिंदिगलाहून बोलावून आणितास, तर मी फौजेसह येऊन तुझी कुमक केली असती. मग पाहिलें असतें मराठे कशी काय खंडणी घेतात तें ! असो. झाली ती गोष्ट झाली. अजून तरी त्यांच्या ताब्यांत चौदा परगणे दिले आहेस ते हिसकून घे. पुण्याहून मराठ्यांची फौज पावसाळा संपेपर्यंत कांहीं इकडे येत नाहीं. मेहंदळे इकडे आहे तो कडपेकरांशीं लढण्यांत गुंतला आहे. या वेळीं हें कार्य साधण्या जोगें आहे.' नंदराजास ही मसलत पसंत पडली, आणि त्यानें तत्काळ त्या परगण्यांतून मराठ्यांस हुसकून लावून तेथें बळजबरीनें आपला अंमल बसविला.

मराठे लोकांचें सामर्थ्य किती प्रचंड आहे, हें रामेश्वरापासून हिमालयापर्यंत सर्व देशांतील लोकांस आतां चांगलेंच माहीत झालें होतें. त्यांत त्यांचा सैन्य–समुद्र म्हैसुरावर नुकताच लोटला होता. या वरून म्हैसूरच्या मुत्सद्यांस व शिपायांस तर तें अगदीं पक्कें च माहीत असलें पाहिजे होतें. असें असतां त्याशीं मुद्दाम कुरापत काढण्याचें अचाट धारिष्ट करणारा असा हा हैदरअल्ली होता तरी कोण ? असें काय याजमध्यें सामर्थ्य होतें, कीं ज्यानीं देशोदेशींच्या शेंकडों उत्तम फौजा रणांगणांत तुडवून धुळीस मिळविल्या, त्या मराठ्यांशीं इमानपूर्वक केलेले करार मोडले असतां आपला निभाव लागेल असें त्यास वाटलें ! अशी पृच्छा करणाऱ्यांस जबाब द्यावयाचा ह्मणजे त्यांस हैदरअल्लीचें आजपर्यंतचें चरित्रच

सांगितलें पाहिजे.

हैदरअल्लीचा पणजा महमद बेलोल नांवाचा एक फकीर पंजाबां-तून फिरत फिरत दक्षिण देशीं येऊन गुलबर्गा जिल्ह्यांत अळंद येथें रा-हिला. त्यास दोन मुलगे महंमदअल्ली व महंमदवली नांवाचे होते. ते मोठे झाल्यावर पोट भरण्या साठीं बापास सोडून कर्नाटकांत शिरें येथें गेले. तेथील नबाबानें त्यांस जमाबंदीकडील वसूल करणाऱ्या शिपायांची नोकरी दिली. महंमदअल्लीस शिरें येथें फत्ते महंमद नांवाचा मुलगा झाला. हाच हैदरअल्लीचा बाप होय. शिरें सोडून ते दोघे भाऊ त्याच नबाबाच्या राज्यांत कोलार येथें गेले. तेथें महंमदअल्ली मरण पावला. त्या वेळीं त्या-च्या भावानें पुतण्या फत्तेमहंमद व त्याची आई यांस घरांतून घालवून दिलें. त्यांची ती दुर्दशा पाहून तेथें कानडी प्याद्यांवरचा एक मुसलमान नाईक होता त्यास करुणा आली व त्यानें त्यांस आपल्या कुटुंबांत आश्रय दिला. फत्तेमहंमद वयांत आला तेव्हां त्याच नाइकानें त्यास आपल्या ज-मातींत शिपायाची चाकरी दिली. फत्तू शिपाई शूर होता व दैववान् ही होता. एके प्रसंगीं त्याचें शौर्य शिऱ्यांच्या नबाबाच्या नजरेस आल्यावरून त्यानें खुष होऊन त्यास वीस प्याद्यांची नाइकी दिली. तेथून तो वाढत वाढत शेवटीं पन्नास स्वार व चवदाशें प्यादे इतक्या सैन्याचा सरदार झाला ! त्यानें एका कोंकणी मुसलमानाच्या मुलीशीं लग्न केलें, व तिज पासून त्यास शाहाबाज, व हैदर असे दोन मुलगे झाले. कोलार येथें इ० स० १७२२ त हैदर जन्मास आला. त्या पूर्वीं तें शहर मराठ्यांच्या हातून नुकतेंच गेलें होतें. तें ठाणें त्यांच्या ‘ स्वराज्या ’ पैकीं होतें. शिवाय शिरें ही त्याच्या बापाच्या अन्नदात्याची राजधानी, ती ही मरा-ठ्यांच्या स्वराज्या पैकींच होती, आणि त्याच्या आईचें माहेर महाराष्ट्रांत कोंकण प्रांतीं होतें. या वरून पुढें ज्यांचा तो दुर्निवार शत्रु ह्मणून ख्याति पावला, त्या मराठ्यांचें नांव अगदीं लहानपणीं सुद्धां त्याच्या कानावरून

हजारों वेळां गेलें असेल ! असो.

फत्ते महंमद एका लढाईत ठार पडला. त्या वेळीं त्याचे मुलगे शाहबाज व हैदर हे अनुक्रमें ९ व ७ वर्षांचे होते. त्या वेळचा शिऱ्यांचा नबाव होता तो फार दुष्ट स्वभावाचा होता. त्यानें या दोन मुलांचे व त्यांच्या आईचे हाल हाल करून त्यांजवळ काय होतें नव्हतें तें वित्त बुचाडून घेऊन त्यांस हांकून लाविलें. तेव्हां ती अनाथ बाई आपल्या मुलांसह बेंगरूळ येथें गेली. तेथें तिचा भाऊ इब्राहिम साहेब ह्मणून होता तो तेथील किल्लेदारचा नोकर होता. तेथें आपणास आश्रय मिळेल अशी त्या बाईस आशा होती. बेंगरूळचा किल्ला म्हैसूरच्या राजाच्या ताब्यांत होता. त्या राजाच्या दोन तीनशें किल्ल्यां पैकींच हा एक अम्मळ बरासा किल्ला होता. त्या किल्ल्यावरील किल्लेदाराच्या पांच पन्नास नोकरां प्रमाणेंच इब्राहिम साहेब हा ही एक साधारण नोकर होता. त्या इब्राहिमानें मिळविलेल्या भाकरी पैकीं चतकोर आपणास व आपल्या पोरांस खावयास मिळेल, या आशेनें ही बाई जंगलांतून वाटेचे खडतर कष्ट सोशीत आपल्या त्या दोन लहान मुलांस बरोबर घेऊन बेंगरूळाकडे चालली होती. दैवगति किती चमत्कारिक आहे ! त्या लकतऱ्या पांघरलेल्या दोन तीन पोरक्या पोरां पैकीं धाकटा पोर पुढें बेंगरूळ किल्ल्याचाच नव्हे, तर साऱ्या म्हैसूरच्या राज्याचा मालक होणार आहे, व आपल्या दराऱ्यानें परराष्ट्रांतील मोठमोठ्या मुत्सद्यांच्या व महाप्रतापी सेनापतींच्या मनास थरकांप उत्पन्न करणार आहे, हें त्या बिचारीच्या स्वप्नीं ही नव्हतें !

इब्राहिम साहेबानें आपल्या बहिणीचा व तिच्या मुलांचा उत्तम सांभाळ केला. त्याच्या हाताखालीं ही प्याद्यांची एक लहानशी टोळी होती. पण त्याचा थोरला भाचा शहाबाज हा मोठा झाला तेव्हां आपल्या हाताखालीं त्यास नोकरीस घेणें हें इब्राहिम साहेबांस पसंत पडलें नाहीं. म्हैसूरच्या राजाच्या लष्करांत त्याचा एक स्नेही चाकरीस होता त्याच्या

द्वारें त्यानें शहाबाज यास त्या लष्करांत चाकरी लावून दिली. ती ही चाकरी कानडी प्याद्यांच्या 'नाइका' चीच होती. शहाबाज हा उत्तम शिपाई असल्यामुळें त्याचा उत्कर्ष अतित्वरेनें होऊन तो लवकरच दोनशें स्वार व एक हजार प्यादे इतक्या सैन्याचा सरदार झाला. हैदर आपल्या भावा जवळच रहात असे. तो पराकाष्ठेचा उनाड व स्वच्छंदी असल्यामुळें त्याचें नशीब उदयास येण्याचें त्या वेळीं तरी कांहीं चिन्ह दिसलें नाहीं. म्हैसूरच्या गादीवर चिक् कृष्णराज नांवाचा राजा होता. तो पांच वर्षांचा असतांच गादीवर बसला होता. त्याच्या लहानपणा पासून देवराज व नंदराज या नांवाचे दोघे बंधु त्याचे प्रधान होते त्यांनीं सारें राज्य आटोपिलें होतें. तो राजा वयांत आला तरी त्याच्या हातीं राज्याची सत्ता देण्याचें त्यांच्या मनांत मुळींच नव्हतें. दिवसें दिवस त्यांची त्यावर अधिक अधिकच कदर बसत चालली होती. देवराज हा शहाणा व शूर होता. नंदराज ही शूर होता, पण गर्विष्ट व मूर्ख होता. देवराज जसजसा म्हातारा होत चालला तसें तसें राज्यकारभारांतून त्यानें अंग काढून घेतलें, आणि नंदराजावर राज्याचा सर्व भार टाकिला. या नंदराजानें एके समयीं देवनहळ्ळी नांवाच्या एका किल्ल्यास वेढा घातला होता. त्याच्या सैन्यांत शहाबाज आपल्या जमातीनिशीं हजर होता, व हैदर ही भावा बरोबर मौजेनें आला होता. तेथें सात महिने लढाई चालली होती. या लढाईंत हैदरानें बहुत पराक्रम व कौशल्य प्रकट केल्यामुळें नंदराज त्यावर प्रसन्न झाला, व तो किल्ला हातीं येतांच त्यानें त्यास त्याच किल्ल्याच्या एका दरवाजावर सरनोबत नेमिलें; आणि पन्नास स्वार व दोनशें पायदळाचा त्यास 'नाईक' बनविलें. हैदराचा आजा, बाप, मामा व भाऊ हे सारे प्याद्यांचेच 'नाईक' होते. तो ही प्रथम उदयास आला तो 'नाईक' होऊनच! पूर्वीं पासून घोडेस्वार पायदळाच्या शिपायांस तुच्छ मानीत आले आहेत. तेव्हां असल्या पायदळाच्या तुकडीवरचा नाईक जो

हैदरअल्ली तो त्या राज्यांतील सरदार व बडे लोक यांस किती तुच्छ भासत असावा! तो पुढें मोठा बलाढ्य राजा झाला तरी त्याचें 'हैदरनाईक' हें नांव लोकांच्या स्मरणांतून गेलेंच नाहीं!

इ० स० १७४० त रघोजी भोंसल्यानें कर्नाटकावर स्वारी केली होती, तेव्हां अर्काटचा नबाब सफ्दरअल्ली याच्या चिथावणीवरून त्यानें चंदासाहेबास कैद करून सातान्यास नेलें होतें, असें मागें सांगितलें आहे तें वाचकांस आठवत असेलच. चंदासाहेब सुटेल तर तो आपलें राज्य घेईल हा सफदरअल्लीस धाक होता. त्यामुळें तो वर्षाच्या वर्षास मराठ्यांची खंडणी आपण होऊन चुकती करून देत असे. मराठ्यांची मर्जी प्रसन्न न राखावी तर ते चंदासाहेबास सोडून देतील हीच त्याला मोठी काळजी होती. सफदरअल्ली कांहीं वर्षांनीं मरण पावला, व अनेक घालमेली होऊन शेवटीं अनवरुद्दिन त्याच्या गादीवर बसला. आतां सफदरअल्ली मेल्यामुळें अर्काटाकडून मराठ्यांस खंडणी येईनाशी झाली, आणि त्यामुळें चंदासाहेबास कैदेंत ठेवण्या पासून त्यांस कांहीं फायदा होईनासा झाला. फ्रेंच लोकांच्या मनांतून चंदासाहेबास बंधमुक्त करून अर्काटच्या गादीवर स्थापावें, व त्या पासून आपला फायदा करून घ्यावा, असें होतें. त्यानीं इ० स० १७४८ त मराठ्यांस खंड भरून चंदासाहेबास मुक्त केलें. नंतर तो चंदासाहेब कर्नाटकांत जाऊन अर्काटच्या गादीवर आपला वारसा सांगूं लागला. याच वर्षी निजामउल्मुलुख मरण पावला होता. त्याच्या मुलीचा मुलगा मुजफरजंग ( हिदायत मोहिदीनखान ) यानें जाहीर केलें कीं, निजामाच्या राज्याचा खरा वारस मी आहें. माझे मामा सहा असामी आहेत त्यां पैकीं कोणाचा ही राज्यावर हक्क नाहीं! हा मुजफरजंग व चंदासाहेब एकत्र झाले व फ्रेंचांची फौज कुमकेस घेऊन त्यांनीं अर्काटावर स्वारी केली, आणि अनवरुद्दिनाशीं लढाई करून त्यास मारून टाकून त्याचें राज्य घेतलें. अनवरुद्दिनाचा मुलगा महंमदअल्ली हा

त्रिचनापल्लीस प्रळून गेला. त्याच्या प्रतिपक्षाकडे फ्रेंच लोक मिळाले होते, ह्मणून मद्रासकर इंग्रज त्यास कुमक करण्यास प्रवृत्त झाले.

निजामाचा थोरला मुलगा नासीरजंग यास कर्नाटकांत मुझफरजंग, चंदासाहेब व फ्रेंच लोक यानीं केलेल्या दंग्याचें वर्तमान कळलें तेव्हां तो त्या तिघांस जरबेंत आणून त्यांचें पारिपत्य करण्याची तयारी करूं लागला. आणि लवकरच अवाढव्य सैन्य बरोबर घेऊन इ० स० १७५० त तो कर्नाटकच्या स्वारीस निघाला. त्या वेळीं मराठ्यां पैकीं जानोजी भोंसले व मुराराव घोरपडे त्यास मिळाले होते, व सावनूर, कडपें व कर्नूळ येथील नबाब व म्हैसूरच्या राजाकडून व्यंकटराव बाकीं नांवाचा एक सरदार असे सर्व आपआपल्या जमावानिशीं त्या लष्करांत हजर झाले होते. म्हैसूरच्या सैन्यांत हैदरनाईक आपल्या जमातीं सुद्धां होताच. त्यानें तीनशें बेरड नुकतेच चाकरीस ठेविले होते. त्या बेरडांचें व या बेरडांच्या ‘ नाईका ’ चें चोऱ्या व लुटालूट करण्याचें काम त्या अफाट मोंगलाई लष्करांत कित्येक महिने पर्यंत जारीनें सुरू होतें. बेरडाची जात इमानी पण बिलंदर चोर ह्मणून प्रसिद्धच आहे. ते हत्यारें, पैका, वस्त्रें, घोडीं, गुरें वगैरे, लष्करांत किंवा लष्करा बाहेर, रात्री किंवा दिवसा, जें साधेल तें चोरून आणून त्यांतला वांटा हैदरनाइकास देत. दरोडे व वाटा मारणें हीं कामें ही ते करीत असतच, आणि त्यांतील प्राप्तीचा वांटा ही हैदरनाइकाकडे बिन तक्रार येत असे. तो ही आपल्या फौजेसह लहानसाहान गांवांवर नेहमी घाले घालून द्रव्य काढण्यांत मग्न असे. यामुळें हैदराजवळ लवकरच खूप पैका जमला, व आणखी नवी फौज चाकरीस ठेवण्याची त्यानें सुरवात केली.

नासीरजंग आपल्या सर्व सैन्यासह अर्काटावर चालून गेला होता तेव्हां चंदासाहेब व फ्रेंच लोक भयभीत होऊन फुलचेरीस पळून गेले. त्या प्रसंगीं मुजफरजंग निरुपायानें आपल्या मामास ह्मणजे नासीरजंगास

शरण आला. त्यानें त्यास आपल्या सैन्यांत कैद करून बंदोबस्तानें ठेविलें. नंतर सावनूर, कडपें व कर्नूळ येथील नबाबांशीं फ्रेंच लोकांनीं फितूर खेळवून त्यांजकडून नासीरजंगास ठार मारविलें. तेव्हां त्या लष्कराची फुटाफूट होऊन जो तो सरदार आपापल्या ठिकाणास परत जाऊं लागला. नासीरजंगाचा खून होण्याच्या लगबगींत त्याच्या खजिन्यापर्यंत हैदराच्या बेरडानीं प्रवेश करून तेथून होनांनीं खचून लादलेले दोन उंट बघतां बघतां लांबविले ! नासीरजंग मरण पावल्यावर त्याच्या फौजेंत फ्रेंच लोकांचें प्रस्थ वाढलें. त्या लोकांनीं मुजफरजंगास कैदेंतून मुक्त करून गादीवर बसविलें. पण तो ही कडप्याच्या नबाबाच्या हातें पुढें लवकरच मारला गेल्या मुळें फ्रेंच लोकांनीं नासीरजंगाचा भाऊ सलाबतजंग याची गादीवर स्थापना केली. असो. या पूर्वींच व्यंकटराव बार्की म्हैसुरास परत आला होता. या प्रमाणें १७५१ त या स्वारीचा शेवट झाला. या स्वारींत तीनशें घोडे व पांचशें बंदुका बेरडानीं हैदरास आणून दिल्या होत्या. बारगीर नोकरीस ठेवून त्यानें लवकरच त्या तीनशें घोड्यांची पागा तयार केली, आणि पायदळास कवाईत शिकविण्या साठीं फ्रेंचांच्या पलटणींतून लोक आणवून पांचशें शिपायांचें पलटण तयार केलें, व त्याच्या हातीं त्या लुटींत मिळालेल्या बंदुका दिल्या. त्या पलटणाची नंदराजास जेव्हां हैदरानें कवाईत करून दाखविली तेव्हां तो त्यावर फार खुष झाला. म्हैसूरचे राज्यांत हें पायदळाचें पहिलेंच पलटण तयार झालें असल्यामुळें त्याच्या अजब कर्तबगारीविषयीं लोकांत नाना प्रकारच्या बातम्या पसरल्या होत्या.

वर सांगितलेली हैदराची अर्काट प्रांतीं पहिली मुलुखगिरी झाल्यावर पुनः लवकरच त्यास खुद्द नंदराजा बरोबर त्याच प्रांतीं जाण्याचा प्रसंग आला. तो प्रकार असाः— चंदासाहेबास फ्रेंचानीं आश्रय दिला होता, ह्मणून त्यांचे प्रतिस्पर्धी इंग्रज लोक यानीं चंदासाहेबाचा प्रतिस्पर्धी

महंमदअल्ली यास आश्रय दिला होता. त्या महंमदअल्लीनें व इंग्रजांनीं फ्रेंचाशीं युद्ध सुरू केलें व मुरारराव घोरपडे व म्हैसूरकर व तंजावरकर यांस आपल्या कुमकेस बोलाविलें. तेव्हां नंदराज समागमें बरेंच सैन्य घेऊन तिकडे गेला. त्याज बरोबर हैदरनाईक आपल्या सैन्यासह होता. या स्वारींत अनेक मसलती व पुष्कळ लहान मोठ्या लढाया झाल्या त्यांचा येथें उल्लेख करण्याचें कारण नाहीं. सांगावयाचें इतकेंच कीं, या व पूर्वीच्या स्वारींत इंग्रजांचें व फ्रेंचांचें युद्ध कौशल्य, सैन्यरचना व त्यांचा कावा व एकमेकां विषयींचा द्वेष या सर्व गोष्टींची हैदरास उत्तम प्रकारें माहिती झाली व तिचा त्यानें पुढें पुष्कळ उपयोग करून घेतला. मुरारराव घोरपड्याची फौज या दोन्ही स्वाऱ्यांत हजर होतीच. तिची कर्तबगारी ही त्याच्या नजरेस आल्या शिवाय राहिली नसेल. मुराररावानें ही आपल्या या भावी दुस्मानाची ओळख याच वेळा पासून धरिली असावी. या स्वारींत हैदरा बरोबर पूर्वी पेक्षां अधिक बेरड होते, व त्या लोकांच्या नव्या नव्या टोळ्या तो चाकरीस ठेवीत होताच. शिवाय पुष्कळ पेंढारी ही त्यास येऊन मिळाले होते. यामुळें या खेपेस चोऱ्या व लुटालूट करून हैदरानें मनस्वी पैका जमा केला. एखाद्या मोठ्या सरदाराच्या लष्करा प्रमाणें या ' नाइका ' च्या स्वारीचा थाट बनून राहिला. पंधराशें स्वार, तीन हजार गारदी ह्मणजे कवाईत शिकलेले पायदळाचे शिपाई, दोन हजार प्यादे, व चार तोफा, इतकें सैन्य त्यानें आतां बाळगिलें होतें. डेरे, राहुट्या, हत्ती, उंटें, व निरनिराळे कारखाने वगैरे सर्व थाटमाट बाळगण्याची त्यास आतां ऐपत आली होती. त्याचा दिवाण खंडेराव ह्मणून एक मराठा ब्राह्मण पूर्वी पासून त्याजवळ होता. तो मोठा चलाख, दक्ष व धीट मनुष्य होता; हैदरनाईक ह्या वैभवास चढण्यास खंडेरावाचे प्रयत्न बऱ्याच अंशीं कारणीभूत झाले होते.

हैदरनाइकावर, नंदराजाजी बहालमर्जी झाली होती. राज्यांत कर्ता,

हिमती, व कारस्थानी मनुष्य हाच एवढा एक आहे असें त्यास वाटे. व विश्वासाच्या व धोक्याच्या जाग्यांवर या शिवाय दुसरा कोणीच मनुष्य नेमण्यास लायख नाहीं असें त्याच्या मनानें घेतलें होतें. हैदराचें कल्याण करण्याची संधी आली असतां नंदराजानें ती फुकट जाऊंच दिली नाहीं. वर सांगितलेल्या स्वारीहून परत आल्यावर त्यानें त्यास दिंदिगल येथें सुभेदार नेमिलें. दिंदिगल प्रांत डोंगराळ असून तेथील पाळेगार पुंडावा करीत असत, व ते नंदराजास जुमानीत नसत. या सुभेदारीवर नेमणूक झाल्या बरोबर त्याणें तिकडे कूच केलें. प्रथम त्यानें त्या पाळेगारांशीं तडजोडीचें बोलणें लावून त्यांस अभयाचें आश्वासन दिलें. परंतु सुरक्षितपणें सर्व सैन्यासह दिंदिगलास तो जाऊन पोंचतांच त्याचें खरें उग्र स्वरूप त्यांच्या दृष्टीस पडलें! पाळेगारांचीं गांवें लुटावीं, जाळावीं, त्यांचे रयत लोक व गुरें ढोरें धरून आणावीं, त्यांजवर रात्रंदिवस छापे घालून कत्तल करावी, अशा उपायांनीं थोडक्याच वेळांत त्यानें त्यांस अगदीं दीन करून सोडिलें. आपला दिवाण खंडेराव यास त्यानें श्रीरंगपट्टणास दरबारीं आपला वकील ह्मणून ठेविलें होतें. तो खंडेराव हैदराच्या पराक्रमा विषयीं व इमाना विषयीं नंदराजाजवळ खूप गप्पा मारी. इकडून दिंदिगलाहून हैदरनाईक पाळेगारांशीं झालेल्या संग्रामांचीं लांबलचक काल्पनिक वर्णनें लिहून पाठवी. त्यांत आपल्या सैन्याची खराबी, पैक्याची हलाखी, नंदराजाच्या पायांवर पूर्ण निष्ठा, हेच विषय असत. मीं होतों ह्मणूनच इकडील बंदोबस्त यथास्थित झाला, दुसऱ्याच्यानें इतकी करामत झाली नसती, हेंच कायतें या साऱ्या 'रिपार्टांचें' प्रमेय होतें, आणि तें हैदराच्या हेतू प्रमाणें मूर्ख नंदराजाच्या मनावर पूर्ण ठसून गेलें! नाईक ह्मणेल तें खरें, असें होऊं लागलें. जखमी झालेल्या लोकांच्या लांबच लांब यादी हैदरानें नंदराजाकडे लिहून पाठविल्या; आणि दर जखमी माणसास दरमहा चौदा रुपये प्रमाणें जखमपट्टीची आकारणी केली. राजधानीहून

तपासणी साठीं सरकारी अंमलदार आले तेव्हां त्यांची मूठ दाबून त्यानें धडधाकट परंतु पायांस हळदीचीं फडकीं गुंडाळून लंगडणाऱ्या शेंकडों ढोंगी जखमी लोकांचीं त्यां समोर 'परेड' करून जखमपट्टीची सर्व रक्कम घेतली! नवी फौज चाकरीस ठेवल्याचें सरकारांत लिहून गणतीच्या वेळीं वास्तविक दहा हजार लोकांची अठरा हजार गणती करवून त्यानें तितक्या साऱ्या फौजेच्या वेतनाचा पैसा सरकारांतून घेतला. अशीं एक ना दोन, नंदराजा पासून पैसा उपटण्याचीं त्यानें शेंकडों बस्तानें जुळविलीं होतीं!

या प्रमाणें द्रव्यसंग्रह करून आपली फौज वाढवावी व ती मध्यें उत्तम सुधारणा करावी, हा त्याचा मनोदय होता तो ही क्रमा क्रमानें सिद्धीस जात होता. या सुमारास त्यानें फुलचेरीहून फ्रेंच कारागीर आणवून दिंदिगल येथें तोफा ओतण्याचा व दारू तयार करण्याचा कारखाना घातला; व पलटणांत फ्रेंच सरदार ठेवून त्यांच्या कवाइतची जय्यत तयारी करविली. या योगानें तो म्हैसूरच्या राज्यांत याच वेळीं बलाढ्य मनुष्य होऊन बसला होता.

येथपर्यंत हैदराची पूर्वपीठिका वर्णन केली आहे, तिजवरून तो कशा प्रकारचा मनष्य होता याची कल्पना वाचकांस होईल. अशा मनुष्यानें मराठ्यांच्या दराऱ्यास न जुमानतां १७५७ च्या पावसाळ्यांत म्हैसूरच्या राज्या पैकीं त्यांच्या ताब्यांत गेलेले परगणे हिसकावून घेण्यास नंदराजास प्रवृत्त केलें यांत आश्चर्य नाहीं! असो. त्याच्या या साहसाचे परिणाम काय झाले व त्यांच्या योगानें आपली महत्वाकांक्षा पूर्ण करून घेण्याचे प्रसंग त्यास कसकसे येत गेले या विषयीं आतां लिहूं:—

म्हैसूरकरांच्या आगळिकी बद्दल त्यांचें पारिपत्य करण्यास बळवंतराव मेहेंदळ्यास फुरसत सांपडली नाहीं. कारण, पावसाळा संपे तों कडपेकरांशीं झुंजण्यांत व त्यांचें अर्धें राज्य ताब्यांत घेण्यांत त्याचा तो काळ निघून गेला. या सुमारास बिदनूर संस्थानांत झोटिंगबादशाही सुरू झाली

होती. तें संस्थान पादाक्रांत करण्याचा नानासाहेब पेशव्यांचा फार दिवसांचा मनोदय होता, तो सिद्धीस नेण्या करितां त्यांजकडून बळवंतरावास हुकूम आला होता तो ही अमलांत आणणें त्याजकडून झालें नाहीं. या वेळीं पेशव्यानीं महाराष्ट्रांत दोन फौजा तयार केल्या होत्या. एक दहा हजार लोकांची फौज विश्वासराव ( पेशव्यांचे ज्येष्ठ पुत्र ) व दत्ताजी शिंदे यांच्या हाताखालीं गोदावरीच्या तीरीं मोहिमेवर गुंतली होती. दुसरी तितकीच फौज गोपाळराव पटवर्धनांच्या हाताखालीं तयार होती. या दोहोंपैकीं एक फौज कर्नाटकांत जाऊन बळवंतरावास मिळावी व नंतर त्यानें पावसाळा संपल्यावर म्हैसुरावर स्वारी करून नंदराजाचें पारिपत्य करावें, असा श्रीमंतानीं संकेत ठरविला होता. परंतु मोंगलाईत याच समारास कांहीं राजकारण उपस्थित झाल्यामुळें चोहींकडून सैन्य जमा करून त्यांस बालेघांटाकडे कूच करणें जरूर पडलें. त्यामुळें नवी फौज कर्नाटकांत न येतां उलट बळवंतरावासच सर्व सैन्यासह ताबडतोब परत निघून येण्या विषयीं श्रीमंतांचीं पत्रें गेलीं व त्या प्रमाणें तिकडले सर्व मनसबे तसेच ठेवून तो परत आला. या वेळीं जर म्हैसुरावर स्वारी होती व बिदनूरची मसलत साधली असती, तर हैदराचा अभ्युदय होण्याचा मुळींच संभव नव्हता. परंतु त्याचें दैव बलवत्तर असल्यामुळें तसा योग जुळून आला नाहीं.

म्हैसूरचा राजा चिक्कृष्णराज यास देवराज व नंदराज या बंधूनीं कैदेंत ठेवून राज्याचा बंदोबस्त सारा आपल्याच ताब्यांत ठेविला होता हें मागें सांगितलेंच आहे. हा त्यांचा शिरजोरपणा राजा वयांत आला तेव्हां त्यास सहन होईनासा झाला आणि त्यानें व त्याच्या आईनें त्या दोघांस ही अधिकारभ्रष्ट करण्याची कांहीं मसलत केली. ती कुणकुण नंदराजास कळतांच त्यानें राजवाड्यांत जाऊन राजाच्या विश्वासांतले व या मसलतींत ज्यांचें अंग होतें, असे सर्व लोक पकडून राजासमक्ष त्यांचे

हालहाल करून त्यांस ठार मारिलें, आणि खुद्द राजाची निर्भर्त्सना व अपमान करण्याची त्यानें पराकाष्ठा केली. धाकच्या भावाची ही क्रूरता देवराजास बिलकुल पसंत पडली नाहीं. त्यामुळें दोघां बंधूंत कडाक्याचें भांडण होऊन देवराज श्रीरंगपट्टणांतून निघून गेला. भावाभावां मध्यें अशी फुटाफूट झाल्या बरोबर राज्यांत चोहोंकडे अस्वस्थता उत्पन्न झाली. फौजेंतील लोकांचे पगार तुंबले होते, त्यांनीं नंदराजाचे दारीं धरणें धरिलें, व अन्न सामुग्री व पाणी त्याच्या वाड्यांत जावयाचें बंद करून चार आठ दिवसांतच त्यास नको जीवसें करून टाकिलें. नंदराजावर राजा संतापलेला व त्यानें केलेल्या अपमानाबद्दल दुःखी झालेला, देवराज तर कारभाराविषयीं अत्यंत उदासीन, नंदराज ही फौजेच्या देण्याच्या पेंचांत सांपडल्या मुळें दगदगलेला, अशी एकंदर स्थिति झाली होती. त्या तिघांस ही सांप्रतच्या अडचणींतून मुक्त करून संतुष्ट करण्याची हैदरनाइकानें मोठ्या अकलेनें व्यवस्था केली. त्यानें पुढारीपण घेऊन फौजेच्या देण्याची तडजोड काढिली व नंदराजाच्या दारांतलें धरणें उठविलें. दुसरी एक मोठी गोष्ट त्यानें अशी केली कीं, देवराज व नंदराज यांची समजूत पाडून त्या दोघांचें पुनः ऐक्य करून दिलें. त्या नंतर देवराज लवकरच मरण पावला हें जरी खरें आहे; तरी ज्येष्ठ बंधूशीं सख्य करून दिल्या बद्दल नंदराजावर हैदराचे उपकार हे झालेच. तिसरी व सर्वांत फार महत्वाची गोष्ट त्यानें अशी घडवून आणिली कीं, क्रुद्ध व दुःखी झालेल्या राजाची माफी मागावयास नंदराजास प्रवृत्त करून राजाची त्यानें आपल्यावर बहाल मर्जी करून घेतली. एकंदरींत ज्याच्या त्याच्या तोंडीं हैदरनाइकाची तारीफ होऊं लागली. राजा जरी नंदराजाच्या जाचांतून अद्यापि सुटला नव्हता, तरी त्यास वाटे कीं, एका हैदरनाइकामुळेंच सांप्रत आपली गादी बचावली आहे. तो जर आज येथें नसता तर नंदराज कांहीं आपणास शरण येता ना. उलट आपणास पदच्युत करून व कदाचित् आपला

# चालू वर्षाची.

| | |
|---|---|
| रा. रा. शामराव रामराव उर्फ दादासाहेब चंदुरकर. मिरज | २४।० |
| रा. सा. मामलेदार. तालुका मिरज. ( कवठें पिरान व मालगांव येथील लायब्ररीयांकरितां २ प्रती. ) ,, | ५८४ |
| श्री. रा. बळवंतराव माणकेश्वर कुलेकर. ,, | २४।० |
| रा. रा. पांडुरंग सखाराम मुसरीफ. बी. ए. ,, | २४।० |
| मे० सय्यद शमसुद्दीन शहाअलम बोखारी. इनामदार. कनवाडकर. मिरज. | २४। |
| रा. रा. विठ्ठलराव महिपत सुपनेकर. कऱ्हाड. | ३ |
| ,, ,, केशव हैबतराव धायगुडे. पंढरपुर. | ३ |
| ,, ,, गणेश बचाजी सप्रे. भडोच. | ३ |
| ,, ,, रामकृष्ण बापूजी कुळकर्णी. मु० शेंदुरजन. | ३ |
| ,, ,, सखाराम गणेश प्रमु. फ. अ. मा. शाळा वेंगुर्ले. | २ |
| ,, ,, गोविंद गोपाळ ठिपणीस. महाड. | २८ |
| ,, ,, सेक्रेटरी ने. ज. लायब्ररी. डहाणू. | ३ |
| ,, ,, सेक्रेटरी. ने. ज. लायब्ररी. मंगळवेढें. | ३ |
| ,, ,, हवालदार रामय्या. थर्ड बांबे लाइट इन्फंट्री. मलाकंड फिल्ड फोर्स. | ३ |
| रा.रा. पुरुषोत्तम नारायण दातार. झांशी. | ३ |
| श्री. रा. बळवंतराव गोविंद उर्फ बाबासाहेब भुसकुटे. बऱ्हाणपुर. | ३ |
| रा. रा. सेक्रेटरी. वाचनवाटिका. जमखिंडी. | २ |
| ,, ,, दत्तात्रय रघुनाथ अभ्यंकर. रावेर. | ३ |
| ,, ,, आत्माराम रामकृष्ण देशपांडे. स्कूलमास्तर. अक्कलकोप. | ३ |
| ,, ,, म्यानेजर. पाटणकर संगीत नाटकमंडळी. नागपुर. | ३ |
| रा. सा. विश्वेश्वर व्यंकटेश कल्याणपुरकर. सबजज्ज. सौंदत्ती. | ३ |
| रा. रा. गोपाळ बळवंत वैद्य. फौजदार. कुंदगोळ. | ३ |
| रा. रा. नागेश सखाराम साठे. हसबनीस. ,, | ३ |
| रा. रा. नारायण रामचंद्र पाळंदे. फडणीस. ,, | ३ |
| श्री. रा. बाबासाहेब चिपळूणकर. मुंबई. | ३ |
| डा० मोरेश्वर गोपाळ देशमुख. एम्. डी. ,, | ३ |
| रा. सा. विष्णु वासुदेव फडके. बी. ए. सबजज्ज. बागलकोट. | ३ |
| रा. रा. सेक्रेटरी. ने. ज. लायब्ररी. कोल्हापुर. | ३ |
| ,, ,, गोविंद महादेव खरे. ,, | २ |
| ,, ,, सदाशिव शिवराम बापट. स्कूलमास्तर. गुहागर. | ३ |

रा.रा. भास्करराव रामचंद्र यादवाडकर. मु० आसंगी, ३
" " सेक्रेटरी. नेटिव लायब्ररी. लोणावळें. ३
" " मुकुंदराव नारायण पाटोळे, पुलाचीवाडी तर्फ भांबुर्डे. ३
" " नारायण महादेव समर्थ. बी. ए. एल्. एल्. बी. मुंबई. ३
रा.रा. वामन नारायण कुळकर्णी. मु० भांबुर्डे. ३
रा.सा. विठ्ठल नारायण पाठक एम्. ए. पुणें. ३
रा. रा. गणपतराव दिनकर उकिडवे. " ३
रा. रा. वामन विष्णु लेले. वकील. " ३
रा. रा. शंकरराव श्रीपत उर्फ बापूसाहेब देशपांडे. " ३
" " गोपाळ बाळकृष्ण ऋषि. " ३
रा सा. रामचंद्र परशुराम गोडबोले. " ३
रा. रा. नारायण विष्णु बर्वे. सुपरवायझर. मुठाक्यानाल. ३
रा. ब. हरि विनायक साठे. असि० सुपरिंटेंडट. कोंकण सर्वेक्याप. " ३
रा. रा. शंकर विठोबा शेट गुळवे. " ३

ऐ०ले०संग्रह–कर्ते.

## आमचे पुणें व मुंबई येथील एजंट.

रा.रा. मुरलीधर मल्हार अत्रे, महाराष्ट्र बुकडेपोचे म्यानिजर, बुधवार पेठ पुणें. रा.रा. विष्णु दासो वनहट्टी. कमिशन एजन्ट आणि जनरल मर्चंट. गिरगांव ट्रामवे टरमिनस्. पेंडसे यांची नवी चाळ, मुंबई.

सदरहू दोन असामीस आम्ही ऐ०ले०संग्रहाचे एजंट नेमिलें आहे त्यांजकडे तेथील वर्गणीदारांनीं वर्गणी द्यावी. आमचीं सर्व पुस्तकें एजंटा कडे विकत मिळतील.

## ऐतिहासिक–लेख–संग्रह.

हें डेमी अष्टपत्री साचाच्या चाळीस पृष्ठांचें मासिक पुस्तक दर महिन्यास मिरज येथें नियमानें प्रसिद्ध होत असतें. यांत पटवर्धन जहागीरदारांच्या जुन्या चिटणिशी दप्तरांतील ऐतिहासिक महत्वाचीं व प्रत्येक स्वारींतील भरपूर माहितीचीं पत्रें सालवारीच्या क्रमानें छापून प्रसिद्ध होत असतात. शिवाय अन्यत्र उपलब्ध झालेले कागदपत्र व बखरी वगैरेंचा ही यांत समावेश होत असतो. या मासिक पुस्तकाची आगाऊ किंमत सालिना ट० हा० मुद्धां तीन रुपये आहे. ग्राहकांनीं सालिना वर्गणीच्या किंमतीचें व्हा० पे० मागवावें अथवा तितक्या रकमेची मनीआर्डर पाठवावी. त्या शिवाय पुस्तक सुरू केलें जाणार नाहीं.

ऐ०ले०संग्रह कर्ते.

# ऐतिहासिक-लेख-संग्रह.

## मासिक पुस्तक.

नोवेंबर. १८९८ इ०.

## अंक १८

वासुदेव वामन शास्त्री खरे
मिरज हायस्कुलांतील संस्कृत शिक्षक.
यांनीं

कुरुंदवाड येथें
" भाऊनाना " छापखान्यांत छापविलें.

वर्षाची आगाऊ वर्गणी टपाल हांशीलसह तीन रुपये.

फुटकळ अंकास पांच आणे.

# वर्गणीदारांस विनंती.

१ ज्यांकडे चालू सालची व मागील बाकी राहिली आहे त्यांनीं ती आतां त्वरित पाठवावी व्ही. पी. नें अंक पाठविण्याविषयीं आम्हीं नेहमीं अनुत्सुक असतों. तथापि कांहीं वाट पाहून वर्गणी न येईल तर अंक व्ही. पी. नें पाठवून वसूल करून घ्यावा लागेल. मुंबईतील वर्गणीदारानीं इकडे विशेष लक्ष द्यावें. तेथें आमचे एजंट आहेत त्यांजकडे वर्गणी भरण्याची त्यांस सोय आहे. वर्गणीच्या तगाद्याबद्दल पत्रव्यवहार करण्याच्या यातायातींत आश्रयदात्यानीं आह्मांस इतःपर पाडूं नये.

२ दर महिन्याचें टपाल आह्मीं स्वतः पाहून रवाना करितों. अंक न पोंचल्याबद्दल चूक आह्मांकडून होत नाहीं. तथापि कोणास अंक न पोंचला असल्यास त्या महिन्याच्या १५ तारखेच्या आंत कळवावें ह्मणजे पाठवूं. त्या उपर कळविल्यास फुटकळ अंकाची किंमत द्यावी लागेल.

ऐ. ल. संग्रह कर्ते.

## आमचे पुणें व मुंबई येथील एजंट.

रा.रा. मुरलीधर मल्हार अत्रे, महाराष्ट्र बुकडेपोचे म्यानेजर, बुधवार पेठ पुणें. रा.रा. विष्णु दासो बनहट्टी. कमिशन एजन्ट आणि जनरल मर्चंट. गिरगांव ट्रामवे टरमिनस्. पेंडसे यांची नवी चाळ, मुंबई

सदरहू दोन असामींस आह्मीं ऐ० ले० संग्रहाचे एजंट नेमिलें आहे. त्यांजकडे तेथील वर्गणीदारानीं वर्गणी द्यावी. आमचीं सर्व पुस्तकें एजंटांकडे विकत मिळतील.

जीव देखील घेऊन तो दुसऱ्याच कोणाला तरी गादीवर बसविता. नंदराजास वाटे कीं, हैदरनाइकानें आपणास फौजेच्या जाचांतून सोडविलें. नाहीं तर आपण खचित मारिले गेलों असतों ! निदान अब्रूस व सर्वस्वास तरी मुकलों असतों. फौजेची तर खात्रीच झाली कीं, राज्याचा कारभार हैदरनाइकाकडे असेल तरच आपला पगार मिळेल व चलती राहील. नाहीं तर आपल्यास उपाशीं मरण्याची पाळी येईल ! या प्रमाणें त्याची सर्वतोपरी नुसती वाहवाच होऊन राहिली असें नाहीं. राज्याची उत्तम कामगिरी बजाविल्यामुळें राजा व नंदराज प्रसन्न झाले व त्यानीं दिंदिगलची सुभेदारी त्याजकडेच कायम करून; शिवाय कोइमत्तूर प्रांत ही त्याजकडे वहिवाटीस दिला, आणि कुटुंबास राहण्या करितां ह्मणून बेंगळूरचा किल्ला त्याच्या हवालीं केला.

लवकरच आपणावर मराठ्यांची स्वारी होईल, व ते पूर्वीं आपल्या ताब्यांत होते तितके परगणे परत घेतल्या शिवाय कधीं स्वस्थ बसावयाचे नाहींत, हें म्हैसूरकरांस वाटलेंच होतें, व त्या प्रमाणेंच पुढें घडून आलें. मोंगलाच्या मसलतीसंबंधें एक वर्ष भर नानासाहेब पेशव्यांस प्रचंड सेना महाराष्ट्राच्या पूर्व सीमेवर तयार ठेवावी लागली होती. तें वर्ष संपतांच ह्मणजे १७५९ च्या प्रारंभीं त्यानीं म्हैसूरच्या स्वारी करितां कांहीं सैन्य रवाना केलें. त्या सैन्यांत गोपाळराव पटवर्धन मुख्य व आनंदराव रास्ते दुय्यम सरदार होता. ही फौज येतांच तिनें आधीं चवदा परगण्यांत पुनः अंमल बसविला. नंतर ती आग्नेयीस सावंतिदुर्ग उजवें टाकून बेंगळळावर चालून गेली. जातांच त्या शहरास तिनें वेढा घातला. याच फौजे पैकीं पायदळाची एक निवडक टोळी कोणास न कळत दाट जंगलांतून पश्चिमेकडे येऊन तिनें चेनापट्टणचा किल्ला अकस्मात् हल्ला करून घेतला. हा किल्ला श्रीरंगपट्टणच्या पूर्वेस चाळीस मैलांवर आहे.

या परचक्राचें निवारण करण्यास समर्थ असा सरदार म्हैसूरच्या

राज्यांत त्या वेळीं हैदरनाईक मात्र होता. नंदराजानें इतर सरदारांस विचारून पाहिलें, परंतु या मसलतीचें जोखीम शिरावर घेऊन ती पार पाडण्याची धमक कोणांत ही दिसेना. तेव्हां कसें तरी करून मराठ्यांच्या स्वारीच्या अरिष्टांतून राज्याचा बचाव करण्याविषयींचा नंदराजानें सर्व भार हैदरावर सोंपविला. मराठ्यांशीं कळागत काढण्यास त्यानेंच नंदराजास चिथावून दिलें होतें, त्या अर्थीं आतां लढाईच्या वेळीं ही प्रमुखपणा त्यानें स्वीकारावयास पाहिजेच होता; व तसा त्यानें हौसेनें पतकरिला. सर्व सैन्यावरील मुख्य अधिकाऱ्यास म्हैसूरच्या राज्यांत 'दळवाई' अशी पदवी असे. हा अधिकार नंदराजाचा होता, तो त्यानें 'तूर्त' ह्मणून हैदराच्या हवालीं केला. या 'नाइका' च्या हाताखालीं आपणास चाकरी करावी लागणार, व तेणेंकरून आपली मानहानि होणार, असें पाहून त्या राज्यांतील कित्येक प्राचीन व मानी घराण्यांतले सरदार चाकरी सोडून घरीं बसले.

युद्ध सुरू करण्या पूर्वीं श्रीरंगपट्टणच्या पूर्वेस मादूर व मालवल्ली हे दोन किल्ले आहेत, त्यांचा प्रथम हैदरानें उत्तम बंदोबस्त केला. हे दोन्ही किल्ले बेंगरूळ व श्रीरंगपट्टण यांच्या वाटेवर आहेत. मादूर पासून चेनापट्टण फक्त तेरा मैल अंतरावर आहे. मादूरच्या किल्ल्यांत लतीफअल्ली बेग ह्मणून एक शूर सरदार हैदरानें ठेविला होता. त्या लतीफानें चेनापट्टणाचा किल्ला मराठ्यांपासून घेण्याची मसलत योजिली. शत्रूस नाना प्रकारच्या हुलकावण्या दाखवून एके रात्रीं हळूच चेनापट्टणास फौज नेऊन उजाडतां उजाडतां शिड्या लावून तो किल्ला त्यानें घेतला! चेनापट्टण काबीज होतांच हैदरानें आपलें सारें सैन्य तेथें गोळा केलें. शत्रूंचे मुलखांत मोहीम करण्याची मराठ्यांची अशी तऱ्हा होती कीं, त्यांच्या सैन्याच्या लहान लहान टोळ्या साऱ्या प्रांतभर पसरत व लुटालूट आणि जाळपोळ एकदांच चोहींकडे सुरू करून रहिवासी लोकांस व शत्रूच्या फौजेस

अगदीं भेदरून सोडीत. त्यांची लढण्याची शिस्त अशा तऱ्हेची होती कीं, तिच्या योगानें कसले ही पराक्रमी व बलाढ्य शत्रु मैदानांत त्यांच्या तावडींत एकदां सांपडले ह्मणजे बहुधा सुरक्षितपणें सुटत नसत ! पण त्यांस ही हैदरनाईक हा पक्का वस्ताद शत्रु भेटला ! पुढें त्यांशीं जे त्याचे अनेक युद्धप्रसंग झाले, त्यांत त्यानें दाखविलेल्या कावेबाजपणाचा मासला या पहिल्याच प्रसंगीं गोपाळरावाच्या दृष्टीस पडला, आणि त्यावरून त्याची तत्काळ खात्री झाली कीं, हा साधारण शत्रू नव्हे ! याशीं लढतांना जर यत्किंचित बेफामपणा केला किंवा घमेंड धरिली तर तो आपणास खचित चीत केल्या शिवाय राहणार नाहीं ! जेथें घोडेस्वारांचा कांहीं इलाज चालावयाचा नाहीं, अशी अडचणीची जागा पाहून हैदरनाईक तेथें आपल्या सैन्याचा तळ घाली, व त्या स्थळा भोंवती खंदक खणून जागोजागीं बातेऱ्या बांधून त्यांवर जय्यत तोफखाना तयार ठेवी. नुसत्या घोडेस्वारांच्या फौजेचा त्याच्या असल्या या छावणीवर काय एल्गार चालणार ! या कामास पायदळ व मुबलक तोफखाना पाहिजे तो मराठे प्रत्येक स्वारींत बरोबर बाळगीत नसत. कारण, त्यांच्या नेहमीच्या 'गनीमी काव्या' स पायदळ व तोफा यांचा कांहीं उपयोग होत नसे. आपण मैदानांत आलों तर हजारों मराठे स्वार आपणावर तुटून पडतील व नाश करितील, हें हैदरास पक्कें माहीत होतें. त्यामुळें दिवसा तो आपली फौज घेऊन मैदानांत मुळींच येत नसे. केव्हां केव्हां मात्र कवायती पायदळाच्या टोळ्या घेऊन आड रानांतून हिंडण्याची त्यानें वहिवाट ठेविली होती. अशा वेळीं शत्रूची एखादी टोळी त्याच्या आटोक्यांत आली तर अकस्मात् जंगला बाहेर पडून तिचा फडशा पाडून तो पुनः जंगलांत गुप्त होई ! बातमी ठेवण्याच्या कामांत त्याचा हातखंडा असे, आणि त्या देशच्या वाटा व जागा त्यास सर्व माहीत असल्यामुळें तो मायावी राक्षसाप्रमाणें भलत्याच ठिकाणीं अचानक प्रकट होई, व शत्रूची नासाडी करून वेगानें नाहींसा

होई! त्याची रात्रीचे छापे घालण्याची शिताफी फारच वर्णनीय होती. शत्रूस कांहीं एक सुगावा लागूं न देतां तो आपल्या छावणींतून बाहेर पडे, व दहा दहा पंधरा पंधरा हजार कवायती पायदळ व तोफा सुद्धां बरोबर घेऊन बारा बारा कोसांची मजल करून पहांटेच्या सुमारास पहारे बेफाम असतात, त्या वेळीं मराठ्यांच्या छावणीवर तो येऊन पडे! अशा वेळीं ते सावध असले तर बरें, नाहीं तर सारें लष्कर लुटलें जाऊन हजारों लोकांची कत्तल होण्याची ती भयंकर वेळ! अशा या शत्रूशीं गोपाळरावानें आपलें विशेष नुकसान न होऊं देतां तीन महिने सामना केला. आणि त्याचीं कित्येक ठाणीं काबीज केलीं. हैदरानें ही अनेक वेळां त्याच्या फौजेवर छापा घालण्याचा यत्न केला. बारीक सारीक झटापटी ही केव्हां तरी होत. पण या लढाई पासून दोहों पक्षांपैकीं एकाचा ही विशेष फायदा होत नव्हता. शेवटीं दोघांस ही लढाईचा कंटाळा येऊन त्यांमध्यें तहाचें बोलणें सुरू झालें. त्यांत असें ठरलें कीं, रोख बत्तीस लक्ष रुपये घेऊन मराठ्यानीं चौदा परगण्यांवरचा हक्क सोडावा व प्रांतांतून निघून जावें. हा ठराव होतांच हैदरानें नंदराजास निकड लाविली कीं, कसें ही करून या रकमेचा भरणा ताबडतोब करावा, ह्मणजे मराठ्यांची ब्याद राज्यांतून घालवून देतों. पण नंदराजाजवळ तरी पैसा कोठचा असणार! त्यानें रकम जमविण्याचें काम हैदराचा दिवाण खंडेराव याजवर सोंपविलें. मारून मुटकून कसे तरी सोळा लाख रुपये त्या दिवाणानें जमविले. बाकीची रक्कम तुह्मींच कसें तरी करून उभी करा असा राजाचा व नंदराजाचा हैदरास निरोप आला. मराठ्यांच्या लष्करा बरोबर जे सावकार होते, त्यानीं या सोळा लाखांची भरती हैदराच्या सांगण्यावरून गोपाळरावास जागच्या जागीं करून दिली! या वरून शत्रूच्या छावणींत सुद्धां हैदराची इभ्रत किती वाढली होती हें लक्षांत येईल. येवढी मात्र अट त्या सावकारांनीं घातली होती कीं, चवदा परगणे मराठ्यांच्या ता-

ब्यांतून सुटले ह्मणजे ते हैदरानें आपल्या ताब्यांत घेऊन त्यांच्या वसुलांतून आमच्या रकमेची फेड करावी. ते परगणे बळकाविण्यास हैदरास ही कांहीं निमित्य पाहिजेच होतें, व बहुधा त्याच्याच इषाऱ्यावरून सावकारानीं ही अट घातली असावी. त्यानें त्या परगण्यांत आपले लोक पाठवून तत्काळ अंमल बसविला आणि बत्तीस लक्ष रुपये घेऊन मराठ्यांची फौज म्हैसूर सोडून निघून गेली. कर्नल विल्क याच्या लिहिण्यांत या लढाईत हैदराची सरशी झाली असा अभिप्राय आहे. " हैदरानें तुमचें स्वरूप नेलें " असें नानासाहेब पेशव्यानीं गोपाळरावास खिजविल्याचा उल्लेख या पुस्तकाच्या दुसऱ्या अंकांत नंबर २४ च्या पत्रांत आहे, तो विल्क याच्या लिहिण्यास बळकटी आणितो. पण आपण हारीस आलों हें गोपाळराव बिलकुल कबूल करीत नाहीं. ' आम्हांकडून हैदरास चांगली तंबी पोंचल्या शिवाय कांहीं त्यानें आम्हांस खंडणी दिली नाहीं ' हा गोपाळरावाचा त्या पत्रांतील मुद्दा अगदीं खरा आहे. आपला आतां कांहीं एक उपाय चालत नाहीं, अशी पक्की खात्री झाल्या शिवाय नुसत्या अवडंबरास भिऊन कोणास खंडणी बिंडणी देणारा मनुष्य हैदरनाईक नव्हता! कर्नाटकच्या मोहिमांसंबंधानें नानाविध प्रसंगांचीं वर्णनें पुढें या पुस्तकांत पुष्कळ वेळां येणार आहेत, तीं वाचून पाहिल्यावर आम्ही ह्मणतों हें बरोबर आहे अशी वाचकांची बालंबाल खात्री होईल.

अशा रीतीनें या मोहिमेचा शेवट लाविल्यावर हैदरनाईक श्रीरंगपट्टणास परत आला, तेव्हां त्याच्या स्वागताकरितां राजानें मोठा दरबार भरविला. त्या दरबारांत हैदरनाईक गेल्या बरोबर नंदराजानें उठून त्यास आलिंगन दिलें, व राजानें त्याची फार फार तारीफ करून त्यास ' फत्ते हैदर बहादूर ' असा किताब दिला. ' दळवाई ' हें पद नंदराजाकडे आतां नांवाचें मात्र राहिलें होतें, सारी फौज हैदरनाइकाच्याच लगामीं लागली असल्यामुळें त्या पदाचा उपभोग तोच घेत होता. दिंदिगल, को-

इमत्तूर, बंगलोर आणि मुकतेच मिळालेले चौदा उत्तम सुपीक परगणे मिळून म्हैसूरच्या राज्यापैकीं हैदरानें इतकावेळपर्यंत अर्धा भाग गिळंकृत केला होता. बाकी राहिलें होतें, तें ही त्याच्या हातीं लागण्याचें निश्चित झाल्या सारखेंच दिसत होतें !

नंदराजास वाटत असे कीं, हैदरास आपण " प्याद्याचा फर्जी " बनविला आहे. ते उपकार स्मरून तो आपल्या आज्ञे बाहेर काडीभर सुद्धां जाणार नाहीं. त्याचें पाठबळ आपणास मिळाल्यामुळें आपला अधिकार पूर्वी प्रमाणेंच पुढें ही निर्बाध चालावयास कांहीं हरकत नाहीं. पण हा त्याला निव्वळ भ्रम होता. त्यापासून जितका फायदा होण्या जोगा होता तितका हैदरानें करून घेतला असल्यामुळें, आतां तो त्याला दृष्टीस सुद्धां नकोसा झाला होता ! नंदराजा विषयीं राजाच्या मनांतून पूर्वींचा दंश गेलेला नव्हताच व त्यास ही तो नकोच होता. हैदरानें आपला दिवाण खंडेराव याच्या द्वारें राजाशीं गुप्तरूपानें मिलाफ करून घेतला आणि नंदराजास घालवून देण्याच्या मसलतींत त्याची संमति मिळविली. ही मसलत लवकरच पार पाडण्याचा बेत ठरला. हैदराकडे अर्धें राज्य गेल्यामुळें राज्याची जमा थोडी, व खर्च तर पूर्वी प्रमाणें मोठा, अशी स्थिति झाली होती. त्या योगानें फौजेचा पुनः लवकरच पगार तुंबला. तेव्हां कित्येक सरदारांस हैदरानें आपल्या घरीं बोलावून नेऊन पुढें कसकशी बतावणी करावी हें त्यांस पढविलें, आणि त्या प्रमाणेंच त्यांनीं बतावणी केली ! प्रथम ते पगारासाठीं हैदराच्या दारांत धरणें देऊन बसले. तेव्हां तो त्यांस ह्मणाला कीं, माझ्या फौजेच्या खर्चा पुरती जहागीर मला सरकारांतून मिळाली आहे. तुमच्या पगाराचा मजकडे काय संबंध आहे ? राज्याचा सर्व अधिकार नंदराजाकडे आहे. त्याकडे तुम्हीं चला ह्मणजे तो या भानगडीचा निकाल लावील. तेव्हां त्यांनीं आग्रह धरिला कीं, तूं आम्हांबरोबर आतांच्या आतां नंदराजाकडे येऊन मध्यस्थी करून आमचा पगार

आम्हांस देववला पाहिजेस! या लोकांच्या आग्रहापुढें आपलें कांहीं चालत नाहीं, असें ढोंग करून त्यानें त्या लोकांसह नंदराजाच्या दारीं धरणें दिलें. धरणें आलें ह्मणजे काय काय विपत्ति होतात याची पूर्वींच्या प्रसंगामुळें नंदराजास चांगलीच माहिती झाली होती. आतां पुन: तेंच आरिष्ट उपस्थित झालें, व आपल्या गळ्यांतील ताईत हैदरनाईक ही फितूर होऊन दंगेखोरांस मिळाला आहे, हें पहातांच त्याचा थरकांप झाला. राजाचें व हैदराचें आपणाविषयीं कांहीं तरी बोलणें झालें आहे, अशी कुणकुण या पूर्वींच त्याच्या कानावर पडली होती पण ती त्यास खरी वाटली नव्हती. परंतु आतांचा हा प्रसंग आलेला पाहून त्यानें विचार केला कीं, आतां आपली सद्दी फिरली; यास्तव कसें तरी करून अब्रूनें येथून निघून जावें; याप्रमाणें निश्चय करून तो दंगेखोरांस म्हणाला, बाबानों, माझ्यानें आतां कारभार होत नाहीं. मी राजधानी सोडून कोठें एकांत स्थळीं जाऊन हरि हरि म्हणत बसणार. निघून जाण्याची तयारी देखील मीं केली आहे. मग आतां पगाराबद्दल तुम्हीं मला कां बरें सतावतां? तेव्हां ते ह्मणाले, बरें आहे तर, आम्हाला काय, आम्ही राजाकडे जाऊं! आम्हांस उपाशीं मरण्याचा प्रसंग आला आहे, आमचा निरुपाय झाला आहे, काय होईल तें होवो, पण आजच्या आज आमचा सारा पगार चुकता करून घेतल्या शिवाय आम्ही राहणार नाहीं! इतकें बोलून हैदरास पुढें घालून ते राजद्वारीं गेले आणि तेथें गलबला करूं लागले. इतकें हें सगळें करावयाचें राजाच्या संमतीनेंच हैदरानें ठरविलें होतें त्या त्या प्रमाणें घडून आलें. नंतर राजानें धरणें धरणाऱ्या व इतर हजारों लोकांसमक्ष आधीं हैदराकडून शपथ घेवविली कीं, 'स्वामींची जी जी आज्ञा होईल ती ती मी मन:पूर्वक पाळीत जाईन. नंदराजाप्रमाणें बेइमानी व अमर्यादा करणार नाहीं!' ही त्यानें शपथ घेतांच राजानें जाहीर केलें कीं, आजपासून आपण सर्व राज्याचा कारभार नंदराजाकडून काढून हैदरअल्लीच्या

हवालीं केला आहे. फौजेचें काय काय देणें असेल तें देऊन टाकण्या विषयींची तजवीज तो करील. हा हुकूम ऐकतांच धरणें उठलें व लोक घरोघर निघून गेले !

म्हैसूरच्या राजाच्या हाताखालीं प्राचीनकालापासून तीन असामींचें मंत्रिमंडळ कारभाराची व्यवस्था राखण्या करितां नेमण्याची वहिवाट होती. सर्वाधिकारी, प्रधान व दळवाई अशीं त्या तीन मंत्र्यांस नांवें असत. त्यांत ' सर्वाधिकारी ' हा राजाचा मुख्य कारभारी होय. ' प्रधाना ' चें काम राजाजवळ नेहमी राहून त्यास सल्ला मसलत देण्याचें असे. ' दळवाई ' हा सैन्याची व्यवस्था पाही. अलीकडे हे तिन्ही अधिकार नंदराजच चालवीत होता. परंतु आतां त्यास घालवून द्यावयाचें ठरलें तेव्हां फक्त ' सर्वाधिकारी ' हें पद नांवाला मात्र त्याजकडे ठेवण्यांत आलें. त्यानें राजधानी पासून दूर जाऊन रहावें, तीन लक्ष होनांचा सरंजाम त्यास तोडून द्यावा. त्यांत एक लक्ष जातखर्चाकरितां ठेवून बाकी दोन लक्षांत त्यानें फौज बाळगून सरकारच्या चाकरीस पाठवावी, असा ठराव झाला. दळवाई व प्रधान यांच्या जागेवर अनुक्रमें हैदरनाईक व त्याचा दिवाण खंडेराव यांची नेमणूक झाली. सदरहू ठरावाप्रमाणें नंदराज आपलें सारें खटलें घेऊन श्रीरंगपट्टणांतून निघाला तो पहिल्या मजलीस तेथून नऊ मैलांवर म्हैसूर शहरीं पोंचला आणि अजारीपणाचें मीष करून कित्येक महिने तेथेंच राहिला. हैदरास तें न आवडल्यामुळें त्यानें नंदराजास कूच करून जाण्याविषयीं निकड लाविली. तेव्हां तो संतापून हैदरास म्हणाला कीं, ' अरे, तूं यःकश्चित् मनुष्य होतास त्या तुला मीं एवढ्या योग्यतेस चढविलें. सर्व प्रकारें तूं माझा नाश केलास. इतकें असून मी या ठिकाणीं उगीच डोकें टेंकून आहें हें ही तुझ्यानें पाहवत नाहीं ! बरें ! तुला वाटेल तें तूं कर ! मी कांहीं म्हैसुरांतून हालणार नाहीं ! ' राजा म्हणजे केवळ बाहुलें होतें. तें आजपर्यंत नंदराजाच्या हातीं होतें, तें

# हैदरअल्लीचें पूर्व चरित्र

आतां हैदराच्या हातीं सापडलें होतें. त्यास पाहिजे तसें नाचविण्यास तो समर्थ होता. नंदराजाचा म्हैसुरांतून न हालण्याचा हेतु हैदरानें राजास कळविला आणि हा बखेडेखोर मनुष्य राजधानीजवळ राहूं देणें फारच धोक्याचें आहे, असें त्याच्या मनांत भरवून दिलें! तेव्हां राजे साहेबांचा तत्काळ हुकूम झाला कीं, बऱ्या बोलानें नंदराज म्हैसूर सोडीन नसेल तर बळजबरीनें त्यास काढून लावावें! हैदरास; आधींच या कामीं उल्हास, त्यांतून ही राजाची आज्ञा! मग काय विचारावयाचें आहे! त्यानें तत्काळ फौजेचा म्हैसुरास वेढा दिला आणि तीन महिने पर्यंत लढाई करून शेवटीं नंदराजास बाहेर येणें भाग पाडिलें! या नंतर हैदराच्या चिथावणीवरून नंदराजाच्या सरंजामा पैकीं दोन लाख होनांचा मुलूख त्या पासून राजानें काढून घेतला, व खर्चा करितां एक लाख होनांचा सरंजाम मात्र त्याजकडे ठेवून एका दूरचे गांवीं त्यास रहावयास पाठविलें.

ही बडी कामगिरी बजाविल्याबद्दल हैदरनाईक राजाजवळ आणखी चार निवडक परगणे जहागीर मागूं लागला. खंडेराव हा हैदराचा पूर्वीचा दिवाण खरा, पण आतां तो राजाचा प्रधान झाला असल्यामुळें आपल्या पूर्वींच्या यजमानाची ही सारेंच राज्य बळकावण्याची बुद्धि त्यास बिलकुल आवडली नाहीं. नवीन जहागीर हैदरास न मिळावी म्हणून त्यानें पुष्कळ खटपट केली. पण जबरदस्ती पुढें दुर्बलाचें शहाणपण कसें चालणार? हैदरास शेवटीं ते चार परगणे मिळावयाचे ते मिळालेच! उत्पन्नाच्या मानानें पाहतां आतां राजाच्या खासगत अंमला खालीं एक हिस्सा व त्याचा नोकर हैदर याजकडे जहागिरीचा मुलुख दोन हिस्से राहिला! या वेळे पासून खंडेरावाच्या मनांत हैदराविषयीं वैषम्य उत्पन्न झालें. या गोष्टी इ० स० १७६० त घडून आल्या.

राजाची आई मोठी खटपटी बायको होती. ती सांगे त्या प्रमाणें राजा ऐके. स्वतःची अशी अक्कल त्यास मुळींच नव्हती. नंदराजास ही

## हैदरअलीवर पहिली स्वारी

राजमाता व तिचा पुत्र अगदीं पाण्यांत पहात असत. या करितांच त्यास अधिकारभ्रष्ट करण्याच्या कामांत हैदरानें सांगितलें त्या प्रमाणें तीं नाचत होतीं. पण लवकरच तो नंदराज पुष्कळ बरा, पण आपलें सारेंच राज्य हाताखालीं घालण्याची दुर्बुद्धि धरणारा हा हैदर नको, असें त्यांस वाटूं लागून तीं फार पस्ताव्यांत पडलीं. या दुष्टाचें निर्मूलन कसें होईल हाच विचार त्यांच्या मनांत घोळूं लागला. आपणासाठीं नुकताच खंडेराव हैदराशीं निकरानें भांडला होता, यास्तव तो आपणास या मसलतींत अनुकूल होईल असें वाटल्यामुळें त्यानीं एकांतीं आपलें सारें इद्गत त्यास कळविलें; आणि ' राज्याचा सर्व अखत्यार तुला देतों,. पण हर प्रयत्न करून हैदराचा एकदांचा पक्का नायनाट करून टाक, असें त्यास विनवून सांगितलें. खंडेरावानें ही मसलत कबूल केली, व श्रीरंगाच्या मूर्ती समोर ' तुम्हांशीं इमानानें वागेन ' अशी त्यानें त्या दोघांस शपथ दिली.

खंडेरावाची ही मसलत सिद्धीस जाण्यास ती वेळ फार अनुकूल होती. अर्काट प्रांतीं अलीकडे राहून राहून फ्रेंच व इंग्रज यांमध्यें युद्ध चालू होतें, त्यास आतां कांहीं निराळें स्वरूप आलें होतें. प्रथम प्रथम फ्रेंचांची सरशी झाली होती, पण अलीकडे इंग्रजांस वारंवार जय मिळूं लागल्यामुळें त्यानीं नेमिलेला नबाब महमदअली हाच अर्काटच्या गादीचा खरा वारस ठरला होता, व तें राज्य ही त्याच्या ताब्यांत आलें होतें. फ्रेंच लोक हतप्रभ झाले होते, त्यानीं नेमिलेला अर्काटचा नबाब चंदासाहेब मरून गेला होता, तथापि त्याचा मुलगा रेजासाहेब यासच अर्काटचा नबाब ठरवून ते इंग्रज व महमदअली यांशीं लढत होते. अलीकडे फ्रेंच लोकानीं हैदरापाशीं कुमक मागितली होती व या लोकांस कुमक दिली तर आपणास फार मोठा लाभ होईल असें समजून हैदरानें मखदूमअली नामक शूर सरदारा बरोबर पंधरा हजार निवडक फौज घांटाखालीं पाठविली होती. बाकीची बहुतेक फौज टोळ्या टोळ्यानीं हैदराच्या जहागिरींत राहिलेली,

होती. श्रीरंगपट्टण हें शहर एका बेटावर वसलेलें असून त्यास कावेरीचा चोंहोंकडून गराडा पडला आहे. पावसाळा नुकताच सुरू झाला असल्यामुळें नदीस पूर येऊन राजधानीचें बाह्यप्रदेशाशीं दळण वळण नावांखेरीज होत नव्हतें त्या नदीच्या उत्तरतीरीं हैदराचें थोडेसें पायदळ व तोफा अडकून राहिल्या होत्या. दक्षिणतीरीं फक्त शंभर स्वार व पंधराशें पायदळासह हैदरअल्ली शहरच्या तोफांच्या माऱ्यांत बिनघोरपणें छावणी देऊन राहिला होता. इतकें होतें तरी हैदरावर दग्यानें छापा घालण्याची खंडेरावास छाती झाली नाहीं. त्यास वाटत असावें कीं, हैदर सांपडला किंवा मारिला गेला तर बरें, जर तो निसटून गेला तर या मसलतीचे काय काय परिणाम होतील कोणास ठाऊक ! एतावता कोणा बलिष्ठाचें साहाय्य मिळाल्या शिवाय या मनसब्यांत पडूं नये असें त्यास वाटलें. तें साहाय्य ही त्यास लवकरच मिळालें. भाऊसाहेब पानपतच्या स्वारीस निघून गेल्या नंतर विसाजीपंत बिनीवाले व गोपाळराव पटवर्धन यां बरोबर वीस हजार फौज पेशव्यांनीं कर्नाटकांत पाठविली होती. गेल्या तीन वर्षांत शिऱ्यांचा सुभा व कडपेकरांचें अर्धें राज्य त्यानीं जिंकिलें होतें. नवीन राज्य जिंकिलें ह्मणजे पक्का अंमल बसे तों कांहीं वर्षेंपर्यंत तिकडे दर वर्षास फौज पाठविण्याचा त्यांचा शिरस्ता होता, त्यास अनुसरूनच कर्नाटकांत ही फौज धाडण्यांत आली होती. ही फौज सांप्रत बाळापुर व देवनहळ्ळी यांच्या मधल्या मुलखांत खंडण्या घेत हिंडत होती. ही फौज आपणाकडे मिळवून घेण्याचा खंडेरावानें निश्चय केला. मराठ्यांस आपणाकडे गुंतवून न ठेविलें तर ते हैदरास मिळतील हें त्यास ठाऊक होतें. त्यानें विसाजपंताशीं फार गुप्तपणें राजकारण सुरू केलें व त्यास कांहीं पैका देऊन वश करून घेतलें. मग असा संकेत ठरला कीं, 'तारीख २२ आगस्ट ( इ० स० १७६० ) या दिवशीं गोपाळराव पटवर्धनानें सहा हजार फौजेसह श्रीरंगपट्टणास जाऊन पोंचावें, आणि त्या दिवशीं त्यानें व खंडेरावानें मिळून

## हैदरअल्लीवर पहिली स्वारी

हैदराच्या छावणीवर हल्ला करावा !

त्या दिवशीं उजाडतें न उजाडतें तोंच शहरच्या तटबंदीवरून हैदराच्या छावणीवर एकदम तोफांचा भडिमार सुरू झाला व त्या छावणींत चोंहोंकडे दाणादाण होऊन आसऱ्या साठीं लोक सैरावैरा धांवूं लागले. हैदर खडबडून जागा होऊन पहातो, तों त्याच्या लोकांपैकीं कांहीं ठार झाले आहेत, कांहीं घायाळ रक्तबंबाळ होऊन कण्हत आहेत, चोंहोंकडे धांवाधाव, किंकाळ्या व गलबला कानीं येत आहे; त्याची गरोदर स्त्री त्या धडक्या सरशीं भेदरून प्रसूत झाली आहे, आणि क्षणोक्षणीं तोफांचे विद्युत्पाताप्रमाणें भयंकर अवाज निघत असून गोळ्यांचा छावणीवर वर्षाव सुरू आहे ! ही स्थिति पहातांच तो ओरडला कीं, अरे, माझ्या खंडेरावास आधीं शहरांतून बोलावून आणा ! हा काय अनर्थ आहे हें तो आल्याशिवाय कळणार नाहीं, व याचा बंदोबस्त ही व्हावयाचा नाहीं ! इतक्यांत वर्दी आली कीं, खुद्द खंडेरावच या अनर्थास कारणीभूत असून तो याक्षणीं तटावर गोलंदाजांस नेम कोठें कोठें धरावा हें दाखवितांना नजरेस पडत आहे ! हें ऐकून मात्र, त्याची कंबर बसली व या दग्याचें पूर्ण भयंकर स्वरूप त्याच्या नजरे समोर दिसूं लागलें. इतक्यांत शहरांतून कांहीं फौज बाहेर येऊन नदी ओलांडून हैदराचें पायदळ पलीकडे उतरलें होतें त्यावर पडली, व त्यांचा धुव्वा उडवून त्याच्या साऱ्या तोफा तिनें हिसकून घेतल्या. कसा ही प्रसंग आला तरी न डगमगणें हा फार मोठा गुण हैदरामध्यें वसत होता. असा कठिण प्रसंग त्यावर येऊन गुदरला तरी धीर न सोडतां त्यांतल्या त्यांत आपल्या बचावाचा काय बंदोबस्त होण्या जोगा होता तो त्यानें केला. त्या दिवशीं संकेता प्रमाणें गोपाळराव येऊन पोंचला नाहीं, यामुळें हैदराच्या छावणीवर हल्ला करण्याचा बेत खंडेरावानें दुसऱ्यादिवसापर्यंत तहकूब केला. मराठ्यांस दूषणें देण्याची इतर इंग्रज इतिहासकारांप्रमाणेंच कर्नल विल्क यास खोड आहे. त्यानें ध्वनित

केलें आहे कीं, त्या दिवशीं मराठे ठरावा प्रमाणें येऊन हजर झाले नाहींत यांत त्यांची कांहीं तरी लुच्चेगिरी होती ! वस्तुतः तसा प्रकार घडला असेल असें आम्हांस वाटत नाहीं. पावसाळ्याचे दिवस आणि लांबचा पल्ला, या मुळें एखादा दिवस आगें मागें झाल्यास तो सहजगत्याच झाला असला पाहिजे. कसें ही असो, मराठे त्या दिवशीं न आल्यामुळें हैदरास मात्र आपली घसरलेली बाजू सांवरतां आली हें खरें आहे.

हैदर मोठा कपटनाटकी होता. खंडेरावाविषयीं जरी त्याच्या मनांत द्वेषाग्नीनें पेट घेतला होता, तरी त्यानें अत्यंत दीन झाल्याचें सोंग आणून त्यास निरोप पाठविला कीं, " आजपर्यंत तुझ्या मदतीनें मी एवढ्या वैभवास चढलों आणि शेंकडों अनर्थांतून बचावत आलों. तूं मला सोडिलेंस ह्मणजे मी पंगु झालों. आपला पूर्वींचा प्रेमभाव मनांत आण. मी कसा लाचार झालों आहें हें पहा. माझा अंत घेऊं नकोस. माझ्या हातून जे कांहीं अपराध झाले असतील ते माफ करून यावेळीं माझें रक्षण कर. "

लहानपणापासून खंडेरावाचें सारें आयुष्य हैदराच्या नोकरींत गेलें होतें. त्या दोघांत एकमेकांविषयीं प्रेम व विश्वास अव्याहतपणें वसत होता. जें हैदराचें हित तेंच आपलें हित अशी खंडेरावाची बुद्धि होती. असें असल्यामुळें विपत्तींत पडलेल्या हैदराचा हा निरोप ऐकून खंडेरावाचें मन दयार्द्र झालें, हें साधारण व्यवहारांत जरी त्याच्या भलेपणाचें लक्षण ह्मणून समजण्यांत येत असलें तरी राजकीयदृष्ट्या तें त्याच्या अत्यंत मूर्खपणाचें लक्षण होय यांत संशय नाहीं ! त्यानें हैदरास उलट निरोप धाडिला कीं, " तुझ्या जिवास किंवा अब्रूस धक्का लावावा हा माझा हेतु नाहीं. परंतु राजास मी इमानपूर्वक वागण्याविषयीं शपथ दिली असल्यामुळें माझा नाइलाज आहे. म्हैसूरच्या राज्यांत पुनः पाऊल न ठेवण्याविषयीं जर तूं अभिवचन देशील तर तुझ्या पळून जाण्यास मजकडून प्रतिबंध होणार नाहीं. ही सवलत आजच्या दिवसा पुरती आहे. उद्यां मराठे येऊन पों-

चले ह्मणजे कांहीं सबब न राहिल्यामुळें मला तुजवर हल्ला करणें भाग पडेल !

हैदरानें जितक्या मिळवतील तितक्या नावा दिवसासच मिळवून ठेविल्या होत्या. रात्र पडतांच बरोबर शंभर स्वार होते त्यांसह कावेरी पार होऊन त्यानें बेंगरूळचा रस्ता धरिला. कुटुंबाचीं माणसें, पायदळ, तोफा व सारी चीजवस्त त्यानें छावणींत तशींच टाकून दिली. शंभर स्वारांस नेववेल इतका खजिना मात्र त्यानें बरोबर घेतला होता. त्यास अडवावयाचें जर खंडेरावाच्या मनांत असतें तर तो तें सहज करूं शकता. परंतु त्यानें कानाडोळा केल्यामुळें हैदरास नदी पार होतां आलें. दुसऱ्या दिवशीं खंडेरावानें हैदराची छावणी ताब्यांत घेतली, तेव्हां त्याच्या स्त्रियेस व दोघा पुत्रांस शहरांत नेऊन ठेविलें व ममतेनें व आदरानें त्यांची बरदास्त राखिली. त्या दोन पुत्रांत थोरला टिपू सुलतान नऊ वर्षांचा होता. दुसरा करीमसाहेब आदल्याच दिवशीं जन्मास आला होता. तो पुढें अर्ध वेडा निपजला.

त्या रात्रीं हैदर श्रीरंगपट्टणाहून निघाला तो उजाडण्या पूर्वीं अनिकल येथें पोंचला. या दोन स्थळांत पाऊणशें मैल अंतर आहे. इतका प्रवास त्यानें एकाच घोड्यावर केला. बरोबरच्या स्वारांपैकीं चाळीस असामींचे घोडे वाटेंत थकून पडले. त्याच दिवशीं सायंकाळीं तो बेंगरूळास सुरक्षितपणें जाऊन पोंचला. तेथें गेल्यावर त्यानें कर्ज काढून फौज जमविण्याचा क्रम जारीनें सुरू केला. म्हैसूरच्या राज्यांत त्याच्या फौजेच्या टोळ्या होत्या त्या खंडेरावानें नाहींशा केल्याच होत्या. येऊन जाऊन घांटाखालीं मखदुमअल्ली बरोबर वीस हजार सैन्य होतें, तें मात्र उत्तम असून त्याच्या भरंवशाचें होतें. त्या सरदारास परत येण्या विषयीं हैदराचे निकडीचे निरोप गेले, तेव्हां तो लागलाच परत फिरला. इकडे हैदर ही स्वस्थ बसला नव्हता. चोंहोंकडून फौज जमविण्याचा त्याचा उद्योग सुरूच

होता. एक महिन्यांत त्याजवळ सहा हजार लोक जमले. त्यावेळीं शिऱ्यांच्या नबाबाचा जांवई मीरफैजुल्लाखान हा नामांकित शूर सरदार त्यास येऊन मिळाला. शिऱ्यांचें राज्य घेतेवेळीं पेशव्यानीं ज्यास कृपाळूपणानें निर्वाहा कारितां थोडी जहागीर तोडून दिली होती तोच हा मनुष्य होय.

हैदरअल्ली हातचा निसटून गेल्यावर त्यास सोडल्याबद्दल खंडेरावास पश्चात्ताप झाला, पण त्याचा काय उपयोग ! पुढें कित्येक महिनेपर्यंत जी लढाई चालावयाची होती तिच्या तयारी साठीं त्यास कंबर बांधावी लागली. हैदर बेंगरुळास होता व त्याच्या कुमकेस मखदुमअल्ली घांटा खालून येत होता. त्या दोघांची गांठ न पडावी ह्मणून गोपाळराव पटवर्धनास त्यानें मखदुमअल्लीच्या मुकाबल्यास पाठविलें. म्हैसूरची थोडीशी निवडक फौज खंडेरावानें गोपाळरावाबरोबर दिली होती, व विसाजीपंतानें ही चार हजार स्वार पाठविले होते. या दोन टोळ्यांची भरती पडल्यामुळें एकंदर चौदा पंधरा हजार सैन्य गोपाळरावाच्या हाताखालीं जमलें. तितक्यानिशीं तो घांटाखालीं उतरून मखदुमअल्लीच्या सैन्यास जाऊन बिलगला, आणि मखदुमअल्लीनें कडपनाथाच्या घांटानें वर येऊं नये ह्मणून स्वतः विसाजीपंत दहा हजार लोकांसह त्या घांटाच्या माथ्यावर तळ देऊन बसला.

मखदुमअल्लीच्या व मराठ्यांच्या दररोज निकरानें लढाया होत असतां ही तो शूर सरदार आपलें सारें लष्कर व बाजारबुनगें सांभाळून बेंगरुळापासून चौवीस कोसांवर येऊन पोंचला. तेथें मात्र त्याचे सर्व उपाय थकले. मराठ्यांनीं चोहोंकडून गराडा घातल्यामुळें त्याच्यानें पाऊल पुढें टाकवेनासें झालें, आणि त्यांच्या वारंवार होणाऱ्या हल्ल्यांनीं त्याचें लष्कर अगदीं हैराण होऊन गेलें. ही त्याची दुर्दशा पाहून हैदरानें बेंगरुळाहून मीरफैजुल्लाबरोबर चार हजार फौज व पांच तोफा त्याच्या कुमकेस पाठविल्या, पण मराठ्यांनीं वाटेंतच ही कुमकेस येणारी फौज बुडवून लुटून फस्त केली. आतां आपली कुमक कोणी करीत नाहीं असें पाहून

# हैदरअल्लीवर पहिली स्वारी

मखदुमअल्ली फारच निराश झाला, साऱ्या लष्करासह त्यानें मराठ्यांच्या स्वाधीन होण्याचा प्रसंग येऊन ठेपला. तसें झालें असतें ह्मणजे त्या बरोबर हैदराचें नष्ट झालेलें वैभव ऊर्जित दशेस येण्याची आशाच मावळली असती! पण या ही वेळीं हैदरास त्याच्या नशिबानें अकल्पित रीतीनें हात दिला. त्यानें मराठ्यांशीं बरेच दिवस तहाचें बोलणें लाविलें होतें, तिकडे आजपर्यंत त्यांनीं लक्ष दिलें नाहीं, आणि मखदुमअल्लीचें सारें लष्कर त्यांच्या हातीं लागल्या सारखेंच झालें होतें, तरी ही ते आतां हैदरा पासून बारा महाल प्रांत व रोख तीन लक्ष रुपये घेऊन स्वदेशीं परत जावयास कबूल झाले! ही वार्ता ऐकतांच हैदराच्या पोटांत हर्ष माईनासा झाला. पण हें असें कां व्हावें हा मात्र त्यास कांहीं केल्या उमज पडेना. तथापि विशेष चिकित्सा न करितां त्यानें तीन लाख रुपये रोख दिले, व बारा महाल ही स्वाधीन करण्याचें कबूल करून त्यांस मार्गस्थ केलें.

विसाजीपंत बिनीवाले कडपनाथाच्या घांटावर जो तळ देऊन बसला होता तो केवळ मखदुमअल्लीचा तिकडून वर घांटीं प्रवेश होऊं नये ह्मणूनच बसला होता असें नाहीं. अर्काटप्रांतीं पाहिजे त्यावेळीं जातां यावें हा एक त्याचा हेतु तेथें राहण्यांत होता. त्या प्रांतीं महमदअल्ली व इंग्रज लोक यांनीं फ्रेंचांस फुलचेरींत कोंडून धरिलें होतें. फ्रेंचानीं विसाजीपंताजवळ कुमक मागितली होती, व सतरा हजार फौज त्यांच्या मदतीस पाठवावयाचें त्यानें कबूल केलें होतें. हें राजकारण महमदअल्लीच्या व इंग्रजांच्या कानीं येतांच त्यांस मोठी चिंता पडली. त्यांनीं विसाजीपंतास सांगितलें कीं, तूं जर आतांच्या आतां सर्व सैन्यासह परत स्वदेशीं जाशील तर हप्त्या हप्त्यानीं आम्हीं वीस लाख रुपये तुझ्या पदरांत घालूं. हें विसाजीपंतानें ज्या अर्थीं कबूल केलें त्या अर्थीं पहिल्या हप्त्याची रक्कम पदरांत पडल्या शिवाय त्यानें तळ हालविला नसेलच. जातां जातां हैदराकडून तीन लाख मिळाले तेवढ्यांतच संतोष मानून तो जलदी जलदीनें परत निघाला.

हीं त्यांचीं राजकारणें वरकरणी लोकांस दाखविण्या पुरतीं मात्र होतीं. परत जाण्याचें खरें कारण अजून बाहेर फुटलें नव्हतें. तें कारण असें कीं, पानपतच्या घोर संग्रामाची हकिगत मराठ्यांस याचवेळीं कळली होती व परत निघून येण्याविषयीं पेशव्यांचें निक्षून पत्र ही आलें होतें. अर्थात् त्यास परत जाणें भागच होतें. हा लेख आम्हीं कर्नल विल्क्स याच्या *है-सूरच्या इतिहासाच्या आधारानें लिहीत आहों. बिनीवाल्याच्या या स्वारी-संबंधें डफ् याच्या इतिहासांत किंवा मराठी बखरी कागदपत्र वगैरे जे उपलब्ध झाले आहेत त्यांत कोठें उल्लेख सांपडत नाहीं. एवढें मात्र खरें कीं, गोपाळराव जर मखदुमअल्लीच्या सैन्यास घेरणाऱ्या मराठी फौजेंत मु-ख्य सरदार असलाच तर तो ही कामगिरी दुसऱ्या कोणा सरदाराच्या हवालीं करून या पूर्वींच परत महाराष्ट्राकडे आला असावा. या पुस्तका-च्या दुसऱ्या अंकांत नं० २७ चें पत्र त्यास पेशव्यानीं लिहिलेलें आहे, तें छ० ११ रबिलाखरचें ( २० नोवेंबर ) चें आहे. त्यावरून तो पेश-व्यांच्या फौजेंत निदान महाराष्ट्रांत कोठें तरी असावा हें उघड होतें. तें पत्र त्या सालचेंच ( इ. स. १७६० मधलें ) असल्याबद्दल आमची खात्री नाहीं, व तेथें तें आम्हीं अजमासानें घातलें आहे, ह्मणून तें बाजूस ठेवलें तरी त्याच अंकांत नं० २६ व २८ चीं पत्रें नीलकंठराव त्रिंबक पटवर्धन यानें लिहिलीं आहेत, तीं इ. स. १७६० मधलींच आहेत या विषयीं ह्यांतील मजकूर वाचून पाहिल्यावर कोणाची ही खात्री होईल. या पत्रावर तारखा अनुक्रमें १ जमादिलाखर ( ९ जानेवारी ) व १७ जमादिलाखर ( २९ जानेवारी ) अशा आहेत. या पत्रांवरून गोपाळराव पेशव्यांच्या लष्करांत होता हें उघड होत आहे, आणि तें लष्कर तर त्यावेळीं बऱ्हाण-पुराकडे कूच करून चाललें होतें. विसाजीपंत बिनीवाल्याची फौज जाने-वारीच्या शेवटीं शेवटीं कर्नाटकांतून परत फिरली असावी.

मराठे आपल्या देशाकडे निघून गेल्यावर हैदराशीं लढण्याचें काम

खंडेरावानें निरुत्साह न होतां नेटानें चालविलें होतें. सरदारीच्या कामीं जें शौर्य व कौशल्य लागतें तें त्याच्या अंगीं हैदरा पेक्षां कमी नव्हतें. दोहींपक्षीं बारीक सारीक झटापटी पुष्कळ झाल्या. शेवटीं खंडेरावानें एके दिवशीं हैदरास सर्व सैन्यासह लढाईस उभें राहणें भाग पाडलें. दोघांचीं सैन्यें समसमानच होतीं. तथापि फुलचेरी इंग्रजांच्या हातीं लागल्यामुळें निराश्रित झालेल्या फ्रेंच लोकांच्या सैन्याची एक टोळी हैदरास याच सुमारास मिळाली होती, तिच्या बळावर तो आपणास खंडेरावा पेक्षां बलिष्ट समजत होता. पण खंडेरावानें या लढाईत त्याचा पूर्ण पराजय केला, व त्याची घमेंड पार नाहींशीं करून टाकिली ! हा प्रतिस्पर्धी आतां आपणास आटपत नाहींसें पाहून हैदरानें एक विलक्षण कावा केला तो पाहून फार आश्चर्य वाटतें. कोणास आपला कांहीं एक बेत कळूं न देतां तो एके रात्रीं शें दोनशें स्वार बरोबर घेऊन नंदराज रहात होता त्या गांवीं गेला. तेथें एकटा व निःशस्त्र होत्साता तो नंदराजाकडे गेला व त्याच्या पायांवर डोकें ठेवून गहिंवरून दीनपणानें प्रार्थिता झाला कीं, महाराज, तुमचे मजवर अनंत उपकार झाले असून मी तुम्हांशीं अत्यंत कृतघ्नपणानें वागलों, यामुळें मी या निकृष्टस्थितीस येऊन पोंचलों आहें. ज्या अधिकाराच्या अनावर आशेनें मी तुम्हांशीं वैर केलें, तुमची अमर्यादा व विटंबना केली, तो अधिकार आतां माझ्याच दिवाणानें हिसकून घेतला आहे, माझीं बायकापोरें व कोटाकिल्ले, सारी संपत्ती त्याच्या हातीं लागली आहे, युद्धांत पराजित झालेली माझी बहुतेक फौज मला सोडून गेली आहे. जिकडे जावें तिकडे क्लेश, हानि व अपेश माझ्या पाठीस लागलीं आहेत. हें सर्व माझ्या निमकहरामीचें फळ आहे अशी माझी खात्री झाली आहे. कृतकर्माचा पश्चात्ताप होऊन मी अनन्यभावानें तुम्हांस शरण आलों आहें. मला तो अधिकार नको, दौलत नको, कांहीं नको, या पायांची पूर्वी प्रमाणें मजवर कृपा झाली ह्मणजे त्यांत सर्व कांहीं मिळालें ! सर्व अन्याय माफ

करून मला आतां पुनः पदरांत घ्या, आणि पूर्वी प्रमाणें राज्याचा सर्व अधिकार हातीं घेऊन खंडेरावाच्या बंडाचा बीमोड करून टाका! ही बतावणी त्या लुच्चानें इतकी उत्तमरीतीनें केली कीं, नंदराजास तें सर्व खरेंच वाटून हैदराच्या म्हणण्या प्रमाणें वागण्यास तो तत्काळ कबूल झाला! त्यानें राज्यांत जिकडे तिकडे जाहिरनामे लावविले कीं, आपण 'सर्वाधिकारी' आहों. 'दळवाई' हैदरनाईक याचें व आपलें एकमत आहे. खंडेराव लबाड मनुष्य असून राज्यांत बंडाचा झेंडा उभारून फिरत आहे. त्याचें उत्तमरीतीनें पारिपत्य करण्याचा आह्मा दोघांचा विचार आहे. या कारितां सर्व इमानी सरदार व शिपाई लोकांनीं आम्हांस तावडतोब येऊन मिळावें!

या युक्तीनें नंदराजाचे पुष्कळ जुने नोकर हैदरास मिळाले. शिवाय नंदराजाजवळ चार हजार फौज होती तिची ही त्याच्या सैन्यांत आयतीच भर पडली. परंतु नंदराजाच्या नांवाचा जो त्यानें उपयोग केला तो पाहून त्याच्या कपटपटुत्वाविषयीं फारच नवल वाटूं लागतें! खंडेरावाच्या सैन्यांत जे मुख्य सरदार होते त्यांस उद्देशून नंदराजाचे नांवचीं पत्रें त्यानें तयार केलीं. त्यांत इतकाच मजकूर होता कीं, "खंडेरावास धरून आमच्या हवालीं करण्या बद्दल तुम्हीं जें बक्षीस मागत आहां तें देण्यास आम्हीं कबूल आहों. सर्व तयारी झालेली आहे. कबूल केल्या प्रमाणें करून दाखविण्याचें काम तुमचें आहे. तें करा आणि बक्षीस घेऊन जा!" सदरहू पत्रांवर 'सर्वाधिकारी' याचा ह्मणजे नंदराजाचा शिक्का होता! हीं खोटीं पत्रें नेमकीं खंडेरावाच्या हातीं पडावीं अशाच युक्तीनें पाठविलेलीं असल्यामुळें तीं त्यानें वाचून पाहिलीं. किती झालें तरी नंदराज हा फार दिवसांचा जुना कारभारी होता व बहुत कालपर्यंत राज्यांत खुद्द राजा प्रमाणें त्याची आज्ञा अव्याहत चालत होती. हा नंदराज व हैदर एक झाले तेव्हां आपले सरदार व फौज त्यांस फितूर होईल, ही

खंडेरावास भीति उत्पन्न झालीच होती. त्यांत हीं पत्रें वाचून तर त्याची खात्रीच झाली कीं, आपणास पकडून शत्रूच्या हवालीं करण्याचा आपल्या सरदारानीं कट केला आहे ! इतकी कल्पना डोक्यांत शिरल्यावर मग काय विचारावें ! तो कोणास कांहीं एक न विचारतां न सांगतां घोड्यावर बसून सारें लष्कर मागें टाकून एकदाच श्रीरंगपट्टणास पळून गेला ! त्याच्या जाण्यानें चकित व भयभीत झालेलें सैन्य नाना प्रकारचे तर्क करीत फिकिरींत पडलें आहे, तों हैदरानें येऊन त्यांवर आपल्या सर्व सैन्यासह हल्ला केला. तेव्हां अर्थात् त्यास जय मिळून शत्रूचे घोडेस्वार होते तेवढे मात्र पळाले. बाकी पायदळ, तोफा, दारूगोळा आणि बुनगें त्याच्या हातीं लागलें. ‘ बस्स. मिळाला जय एवढा पुरे, पळून गेलेल्या शत्रूचा कोण पाठलाग करितो ! ’ अशी हूल दाखवून तो त्याच तळावर कांहीं दिवस विश्रांति घेत राहिला. त्या अवधींत पळून गेलेल्या खंडेरावाच्या सैन्यास धीर येऊन तें एकत्र होऊन श्रीरंगपट्टणाजवळ बेफासपणें जमून राहिलें होतें. ती बातमी राखून निवडक फौजेनिशीं त्यानें मध्यरात्रीस जाऊन अकस्मात् त्यांवर छापा घातला, व त्या अव्यवस्थित सैन्यांत कत्तल व दाणादाण करून सातशें घोडे व बरीच लूट गोळा करून तो पूर्वस्थळास गेला. या नंतर चोंहोंकडे खंडेरावाच्या हातीं असलेलीं ठाणीं काबीज करण्यांत, खंडणी गोळा करण्यांत व आपलें सर्व सैन्य एकत्र जमा करण्यांत त्याचे कांहीं दिवस गेले. ती व्यवस्था झाल्यावर तो श्रीरंगपट्टणासमीप कावेरीच्या अलीकडच्या तीरीं येऊन उतरला आणि खंडेरावाशीं तहाचें बोलणें त्यानें सुरू केलें. मागच्या छाप्या नंतर खंडेरावानें पुनः सैन्य गोळा केलें होतें तें पलीकडे शहरच्या तटबंदीखालीं राहिलेलें होतें. त्यांत मुख्यत्वें पांच सहा हजार मराठे स्वार होते. लढाई बंद होऊन दोहीं पक्षीं तह घाटत असतां हैदर दररोज आपल्या पलटणांची कवाईत नदीतीरीं करवीत असे. अशी कवाईत चालत असतां एके दिवशीं सायंकाळीं त्या

साऱ्या पलटणांसह अकस्मात् नदी ओलांडून तो पलीकडे शत्रूच्या फौजेवर वेगानें चालून आला. त्या वेळीं त्या सैन्याची लढण्याची कांहीं तयारी नसल्यामुळें त्याचा अगदीं मोड झाला, व त्याचा सारा गोट लुटला जाऊन तें वाट फुटली तिकडे पळून गेलें. आतां खंडेरावाच्या ताब्यांत फक्त राजधानी मात्र राहिली. ती घेण्याचा उद्योग सुरू करण्या पूर्वीं हैदरानें राजास सांगून पाठविलें कीं, खंडेराव हा माझा नोकर आहे तो माझ्या हवालीं तुम्हीं केला पाहिजे. फौजेच्या खर्चा बद्दल सरकाराकडे माझी क्रोडों रुपये बाकी राहिली आहे, ती आतांच्या आतां मला॰ मिळाली पाहिजे. या दोन गोष्टी अमलांत आल्यावर सरकारच्या मनांत जर मला नोकरीस ठेवावयाचें असेल तर मी राहीन. नाहींतर वाटेल तिकडे निघून जाईन.

हैदर मागत होता त्या पैकीं दहावा हिस्सा रक्कम देखील देण्याचें राजास सामर्थ्य नव्हतें. शिवाय सर्व रक्कम देण्याची न होणारी गोष्ट घडून आली असें धरिलें, तरी तो दुष्ट हैदर आणखी द्रव्य द्या, नाहीं तर राज्य बुडवितों; अशीच किंवा असल्या तऱ्हेची दुसरी एखादी कुरापत काढून सारें राज्य घेण्याचा आपला हेतु सिद्धीस नेणार नाहीं असें कशावरून ? बरें, त्याच्याशीं लढाई करून त्याचें पारिपत्य करण्याची मसलत योजावी तर तें ही सामर्थ्य राहिलें नाहीं, व कोणाकडून कुमक होण्याची ही आशा नाहीं. तेव्हां राज्य ही जाणार व त्या बरोबर प्राण ही जाणार; त्या पेक्षां प्राण वांचवावे हें बरें," असा विचार करून राजानें खंडेरावास हवालीं करण्याचें कबूल केलें व आणखी असें ही कबूल केलें कीं, आपणास फक्त तीन लक्ष होन उत्पन्नाचा मुलूख खर्चा करितां तोडून द्यावा. तें उत्पन्न खाऊन आपण स्वस्थ बसूं. बाकीचें सर्व राज्य हैदरानें सांभाळावें, व त्याचा बंदोबस्त राखावा ! हा ठराव होतांच खंडेराव हैदराच्या स्वाधीन झाला. त्यानें त्यास मरेपर्यंत लोखंडाच्या पिंजऱ्यांत घालून बाळगिलें होतें ! या दिवसा पासून हैदर बाह्यात्कारें जरी राजाचा मानमरातब

उत्तमरीतीनें ठेवीत असे, व त्याचा आज्ञाधारक सेवक असें आपणास ह्म-णवीत असे, तरी सारें राज्य त्याचेंच झालें होतें. खंडेरावाची फौज लुटून घेतल्यावर नंदराजाच्या ‘ सर्वाधिकारित्वा ’ चा त्यास कांहीं उपयोग रा-हिला नव्हता; ह्मणून त्यानें त्या सर्वाधिकाऱ्याच्या हातीं पुनः जपमाळ दे-ऊन त्यास पूर्वीच्या स्थळास या पूर्वींच लावून दिलें होतें! या प्रमाणें राजा, नंदराज, व खंडेराव यांचा निकाल लावून व राजधानी मध्यें आपला मेहुणा मखदुमअल्ली यास कांहीं निवडक व विश्वासू सैन्यासह बंदोबस्ता-करितां नेमून इ० स० १७६१ च्या सप्तंबर महिन्यांत हैदरअल्ली बेंगरुळा-स आला. या वेळीं त्यास तेथें जाण्याचें कारण पडलें तें असें—

नासिरजंग व मुजफरजंग हे मारिले गेल्यावर फ्रेंच लोकानीं सलाब-तजंगास हैदराबादच्या गादीवर बसविल्याचें पूर्वीं लिहिलेंच आहे. त्या स-लाबतजंगाचे भाऊ निजामअल्ली व बसालतजंग यानीं कारभारांत बखेडे उत्पन्न करूं नये, ह्मणून त्यांस अनुक्रमें वऱ्हाड प्रांत व अदवानी सरकार यांची सुभेदारी देण्यांत आली होती. निजामअल्ली कांहींसा शूर व कार-स्थानी होता, पण बसालतजंगाच्या अंगांत ह्मणण्या सारखें कर्तृत्व नव्हतें. अर्काट प्रांतीं इंग्रजांची सरशी होऊं लागल्यामुळें फ्रेंच लोक फिक्के पडत जाऊन त्यांस निजामाच्या राज्यांतून पाय काढावा लागला; त्यामुळें त्यांच्या बळावर राज्य करणारा सलाबतजंग निर्बल होऊन निजामअल्लीच्याच हातीं राज्याची सर्व सत्ता गेली. बसालतजंग हा निजामअल्लीस फार भीत असे. व त्या कारणानें तो पेशव्यांचा आश्रय व मर्जी संपादून अदवानी सरका-रांत स्वस्थपणें आजपर्यंत राहत असे. परंतु आतां पानपतच्या युद्धामुळें म-राठ्यांची सत्ता लयास गेली असें समजून त्यांचें निरनिराळ्या प्रांतांतील राज्य बळकाविण्यासाठीं त्या त्या प्रांतींचे संस्थानिक वगैरे खटपट करीत होते, त्या संधींत या बसालतजंगास ही धीर येऊन तो आपली फौज घे-ऊन मराठ्यांचा कर्नाटकांतील मुलूख जिंकण्यास निघाला. प्रथम तो शिरें

घेण्याचा बेत करून त्या किल्ल्या नजीक आला. पण तेथें त्याची कांहींच डाळ न शिजल्यामुळें तो होसकोट्यास गेला व त्या किल्ल्यास वेढा घालून बसला. तो किल्ला सामान्य प्रतीचाच होता व आंत मराठ्यांची शिबंदी ही विशेष नव्हती. पण जी होती तिनें अशा हिमतीनें किल्ला झुजविला कीं, बसालतजंगास वेढा उठवून निघून जाण्याचा प्रसंग आला. अदवानी हें स्थळ कर्नाटकच्या ईशान्यभागीं आहे. तेथून तो बसालतजंग जेव्हां आपल्या लष्करासह दक्षिणेस होसकोट्याकडे येऊं लागल्याची बातमी हैदरास कळली तेव्हां त्याच्या मनांत आलें कीं, होसकोटें घेण्याची हूल दाखवून बेंगरुळास उपद्रव देण्याचें बसालतजंगाच्या मनांत कशावरून नसेल? कारण होसकोटें व बेंगरूळ यांमध्यें काय तें अठरा मैल अंतर आहे. ही शंका मनांत आल्यामुळें हैदर बेंगरुळास आला होता. होसकोटेंकर आपणास बधत नाहींतसें पाहून बसालतजंगानें हैदरास आपल्या मदतीस बोलाविलें. हैदराचें जरी आतां वैभव व सामर्थ्य मोठें होतें तरी आपण पूर्वी पायदळामध्यें 'नाईक' होतों या गोष्टीचें स्मरण होऊन त्याच्या मनास खंती वाटे, व पैसे भरून सुद्धां किताब व जहागीर मिळाली तर मिळवावी अशी त्यास इच्छा झाली होती. किताब व जहागीर देण्याचा अधिकार दिल्लीच्या बादशहाचा दक्षिणेंतील सहा सुभ्यांवरचा सुभेदार निजामउल्मुल्ख याचा होता. तो निजाम मरून गेल्यावर हल्लीं त्याच्या गादीवर असलेला निजामअल्ली यानें ही तो अधिकार माझा आहे, म्हटलें असतां साजण्या जोगें नव्हतें असें नाहीं. पण निजामअल्लीच्या दरबारीं वशिले बांधून पाण्या सारखा पैसा खर्चून मिळणारे किताब किंवा जहागिरी हैदरास नको होत्या! त्यानें बसालतजंगास सांगून पाठविलें कीं, मी निजामअल्लीस जाणीत नाहीं. माझ्या कार्या पुरता तूंच हैदराबादचा नबाब झालास तरी चालेल. मी तुला 'हैदराबादेचा नबाब' व 'दक्षिणच्या सहा सुभ्यांवरचा सरसुभेदार' ह्मणतों इतकेंच नाहीं; तर तुला तीन लाख

रुपये नजराणा ही देतों; ही माझी सेवा मान्य करून घेऊन तूं मला 'शिऱ्यांचा नबाब' अशी पदवी दे! हें तूं करीत असशील तर तुझी कुमक करून होसकोटें सुद्धां घेऊन देईन. या राजकारणांत बसालतजंगाचा सर्वच बाजूनीं फायदा होता. अर्थात् या ह्मणण्यास तो कबूल झाला व ठरल्या प्रमाणें नजराणा घेऊन त्यानें शिऱ्यांची नबाबी उर्फ सुभेदारी हैदरास दिली! शिऱ्यांचा सुभा होता मराठ्यांकडे, तो देणार बसालतजंग आणि घेणार हैदर! असो. इतकें झाल्यावर हैदरअल्ली बेंगरुळाहून होसकोट्यास आला, थोड्याच दिवसांत त्यानें तो किल्ला घेऊन बसालतजंगाच्या हवालीं केला. नंतर ते दोघे बाळापुर घेऊन शिऱ्यांस आले. या स्वारींत हैदराजवळ सात हजार स्वार, नऊ दहा हजार गारदी, हजार बाराशें गोरे फ्रेंच शिपाई व सुमारें लहान मोठ्या दीडशें तोफा, इतका सरंजाम होता. शिवाय बसालतजंगाची स्वार व गारदी मिळून सहा हजार फौज होती. एवढ्या समुदाया पुढें शिरेंकरांचें काय चालणार? तो किल्ला व सुभ्याची राजधानी हैदराच्या हातास थोड्याच दिवसांत लागल्यामुळें तो आतां खरोखरच 'शिऱ्यांचा नबाब' बनला. त्यानंतर बसालतजंग अदवानीकडे इ० स० १७६२ च्या प्रारंभीं निघून आला. परंतु या नवीन मिळालेल्या सुभेदारीचा अंमल हैदरास अजून सर्व सुभ्यावर बसवावयाचा होता, तो उद्योग त्यानें आतां झपाट्यानें सुरू केला. बाळापुराजवळच चिकबाळापुर ह्मणजे धाकटें बाळापुर हें शहर आहे. तेथील संस्थानिकानें मुरारराव घोरपड्याचा स्नेह संपादिला होता. घोरपड्याचा मुलूख चिकबाळापुरकरा प्रमाणेंच शिऱ्यांच्या सुभ्यास लगत असल्यामुळें हैदराच्या शेजारा पासून त्या दोघांस उपद्रव होऊं लागला, आणि स्वसंरक्षणासाठीं त्या दोघांस एकत्र होऊन हैदराशीं झुंजण्या कारितां कंबर बांधावी लागली. बरेच दिवस युद्ध होऊन शेवटीं त्या दोघांचा ही हैदरानें पराजय केला, आणि चिकबाळापुर काबीज करून तेथील संस्थानिकास जवळच नंदिदुर्ग

ह्मणून पहाडी किल्ला आहे, त्याच्या आसऱ्यास जाणें भाग पाडिलें. आणि घोरपड्या पासून मडकशिरें, कोडिकोंडा, व पेनकोंडा हीं ठाणीं घेतलीं. या प्रमाणें त्या दोघांस हतप्रभ केल्यावर पूर्वी औरंगजेबाच्या सुभ्यास ( विजापुर कर्नाटक या पोटसुभ्यास ) ज्या संस्थानिकांच्या खंडणीचें उत्पन्न लावून दिलेलें होतें, त्या संस्थानिकां पासून ती खंडणी 'शिऱ्याचा नबाब' या नात्यानें आतां वसूल करण्याचा त्यानें बेत केला. या संस्थानिकांत रायदुर्ग, हरपनहळ्ळी, आणि चित्रदुर्ग येथील संस्थानिक प्रमुख होते. त्यां पैकीं रायदुर्गकरानें आपण होऊन हैदराकडे खंडणी पाठविली, याबद्दल त्यावर त्याची मर्जी सुप्रसन्न झाली. दरडावणीचें पत्र जातांच हरपनहळ्ळीकराकडून ही खंडणी आली. पण हैदरास चित्रदुर्गकरानें जुमानिलें नाहीं, यामुळें त्याच्या मुलखावर स्वारी करून हैदरानें त्यास जर्जर केलें आणि त्या पासून खंडणी घ्यावयाची ती घेऊन शिवाय दोन लक्ष होन दंड घेतला ! नंतर चित्रदुर्गकराची व हैदराची भेट झाली, व तींत एक नवीनच राजकारण निष्पन्न झालें. या राजकारणापासून हैदरास पराकाष्ठेचा फायदा व्हावयाचा होता. तें राजकारण असें—

बिदनूरचा राजा बसवाप्पा नाईक हा इ० स० १७५५ त मरण पावला. त्याच्या गादीवर त्याचा दत्तक पुत्र चनबसवय्या यास बसविण्यांत आलें होतें. त्याचें वय सतरा वर्षांचें असल्यामुळें तो प्रौढ होई तों त्याची आई ह्मणजे नुकताच मेलेला राजा बसवाप्पा नाईक याची बायको व निंबय्या नांवाचा प्रधान राज्याचा कारभार चालवीत होतीं. ती राणी त्या प्रधानाबरोबर व्यभिचार कर्म करीत असे. अगदीं उघडपणानें हा बेशरमपणाचा प्रकार चालत असे, तरी लोक त्यांची छी थू करण्यास भीत असत. कारण त्यांच्या हातीं राज्याचा सर्व अधिकार गेला होता, व राज्या-

१ सदर मजकूर विल्क याच्या इतिहासावरून घेतला आहे. ऐ.ले.सं.नं० ३८५ च्या पत्रांतील मजकूर थोडा निराळा आहे तो पहा.

चा खरा वारस होता तो निर्माल्यवत् झाला होता. एके दिवशीं राजा चनबसवय्या यांनीं या घाणेरड्या कृत्याबद्दल आईची कानउघाडणी करण्याचें साहस केलें. त्यावरून तिला संताप आला व त्याचा जीव घेण्याचा बेत करून तो पार पाडण्याचें काम तिनें एका जेठीस ह्मणजे पहिलवानास सांगितलें. त्या पहिलवानानें स्नानगृहामध्यें त्या दुर्दैवी राजाच्या अंगास 'मालिश' करितां करितां मान मुरगाळून त्याचा जीव घेतला. त्या नंतर सोमशेखर नांवाच्या एका मुलास दत्तक घेऊन गादीवर बसवून ती राणी निंबय्याच्या मदतीनें पूर्वी प्रमाणें कारभार चालवूं लागली. हल्लीं चित्रदुर्गकराची व हैदराची भेट झाली तेव्हां त्या संस्थानिकानें हैदरास कळविलें कीं, "मजकडे एक तरुण मनुष्य नुकताच आला आहे तो ह्मणतो कीं, मी बिदनूरचा राजा चनबसवय्या आहें. जेठीनें मला ठार मारल्याचें माझ्या आईजवळ सांगितलें तें सर्व खोटें आहे. त्याणें मजवर दया करून पांच वर्षें पर्यंत मला आपल्या घरांत कोंडून ठेविलें होतें. तेथून निसटून मी आतां तुमच्या आश्रयास आलों आहें. तुह्मीं बिदनुरावर फौजेसह स्वारी करून मला गादीवर बसवा!" त्या संस्थानिकाचें हें बोलणें ऐकून हैदरानें तत्काळ त्या मनुष्यास बोलावून आणून विचारपूस केली, त्यांत तो लुच्चा मनुष्य असल्याबद्दल त्याची खात्री झाली. परंतु बिदनूरचें राज्य घ्यावयास हें सोंग उपयोगीं पडेल, असा विचार करून त्यानें त्या तोतयास आश्वासन दिलें कीं, तूं खरोखरीच बिदनूरचा राजा आहेस या बद्दल माझी पक्की खात्री झाली आहे. मी लवकरच सर्व सैन्यासह बिदनुरावर स्वारी करून तुला तुझ्या बापाच्या गादीवर बसवितों.

या प्रमाणें मसलत ठरल्यावर इ० स० १७६३ च्या प्रारंभीं हैदर आपलें व चित्रदुर्गकराचें सैन्य बरोबर घेऊन बिदनूरच्या स्वारीस निघाला. त्या प्रांतांत शिरतां क्षणींच आधीं त्यानें त्या तोतयाकडून जाहीरनामे लावविले कीं, "आपण बिदनूरच्या गादीचे खरे वारस आहों. सर्व लोकांनीं

आम्हांस येऊन मिळालें पाहिजे. येतील त्यांस बक्षीस मिळेल, व न येतील त्यांस शिक्षा केली जाईल." वाटेंत शिमोग्याचा किल्ला लागला तो हैदरानें घेतला, तेव्हां तेथें त्यास एक लक्ष होन सांपडले. राणीनें याच ठिकाणीं त्यास सांगून पाठविलें होतें कीं, तुम्हीं परत जाल तर मी तुम्हांस चार लक्ष होन देईन. परंतु तिचें ह्मणणें न ऐकतां तो पुढें चाल करूं लागला. बिदनूर पासून पंधरा कोसांवर कुमसी हें ठाणें आहे तें त्यानें घेतलें, तेव्हां बिदनूरचा माजी कारभारी लिंगण्णा ह्मणून तेथें कैदेंत होता तो त्याच्या हातीं लागला. त्या कारभाऱ्यानें राजधानीस जाण्याच्या चोर वाटा हैदरास माहीत करून दिल्या व कोठें किती द्रव्य मिळेल ही माहिती ही त्यास दिली. तेथून पुढें अडीच कोसांवर अनंतपुरचें ठाणें आहे तें त्यानें जातां जातां घेतलें. तेथें राणीकडून पुनः निरोप आला कीं, चवदा लक्ष होन देत्यें, तुम्हीं परत जा. शेवटीं अठरा लक्षां पर्यंत रकम देण्यास ती कबूल झाली. पण लिंगण्णानें त्यास सांगितलें कीं, सारें राज्य आणि या पेक्षां दशपट द्रव्य तुम्हांस मिळेल. तुम्हीं पुढें चला! वाटेंत शेंपन्नास लोकांची एक चौकी लागली तींतील सर्व लोकांस हैदरानें धरून त्यांचे नाक कान कापून त्यांस सोडून दिलें. ते लोक बिदनुरास पोंचतांच तेथें गडबड उडाली. हजारों लोक भयानें शहर सोडून रानांत पळून गेले. शत्रूचें सैन्य अगदीं समीप ठेपलेंसें पाहून राणी व तिचा जार यांस पराकाष्ठेचें भय वाटलें आणि तीं सर्व मालमत्ता टाकून पळून गेलीं. नंतर निरनिराळ्या वाटानीं हैदराचें सारें सैन्य बिदनुरास येऊन पोंचलें. हैदरानें शहरांत लुटालूट होऊं दिली नाहीं. नाक्या नाक्यावर पहारे ठेऊन शहरांतील प्रत्येक मोठ्या घरास कुलूप घालून व्यवस्थित रीतीनें त्या प्रत्येक घरांतील मालाची मोजदाद करविली. त्यावेळीं त्यास एकंदर एक कोटी वीस लक्षांच्या किमतीचा माल मिळून अजमास सांपडला! बिदनूरच्या राज्याची पूर्व सीमा चित्रदुर्गच्या राज्यास लागली होती. तेथपासून तें

पश्चिमेस समुद्रापर्यंत पसरलें होतें. हें सर्व राज्य कांहीं एक प्रयास न पडतां त्याच्या स्वाधीन झालें. त्यानें ती दुष्ट राणी, तिचा जार, बालराजा सोमशेखर व तो तोतया या सर्वांसच पकडून शिरें प्रांतीं मदगिरी नामक पहाडी किल्ल्यावर कैदेंत टाकिलें. बिदनूरचें राज्य जिंकिल्यामुळें हैदराचा अतिशय उत्कर्ष झाला. हें राज्य व शिऱ्यांचा सुभा व बेंगरूळ माझें खासगत ह्मणजे 'स्वराज्य' असून बाकीचें माझ्या अमलाखालीं आहे तें म्है सूरच्या राजाचें आहे असें तो म्हणत असे. ज्या शहरांत नव्वद हजार घरें आहेत त्यासच 'नगर' ही संज्ञा देण्याची पूर्वी वहिवाट होती. पूर्वीच्या राजांच्या मनांत बिदनूर शहरास 'नगर' संज्ञा देण्याच्या योग्यतेस आणावें असें होतें. घरांची संख्या तितकी ह्मण्या सारखा जरी त्या शहराचा उत्कर्ष हैदराच्या अमलाखालीं कधीं झाला नाहीं, तरी त्यानें बिदनुरास एव्हां पासूनच 'हैदरनगर' असें नांव दिलें. त्यानें तेथें टंकसाळा स्थापन करून 'हैदरी' व 'बहादुरी' होन पाडण्याची सुरुवात केली. या नवीन राज्यांत समुद्रकांठीं होनावर बंदर होतें तेथें त्यानें गोदी बांधविली, व आरमार तयार करण्यास हुकूम दिला. बिदनूर प्रांत घांटमाथ्यावर आहे तेथें वर्षांतून नऊ महिने मनस्वी पाऊस पडतो, व तीन महिने मात्र उघाडी असत्ये. यामुळें तेथें नवीन गेलेल्या मनुष्यास हिंवताप पछाडल्याशिवाय रहात नाहीं. या हिंवतापानें हैदर ही बरेच दिवस आजारी पडला होता. त्या संधींत त्यास ठार मारून त्याच्या जाचांतून आपला देश मुक्त करण्याचा बिदनूरच्या लोकानीं बेत केला. हैदराचे कित्येक कारभारी ही या फंदांत मिळाले होते; त्या बातमीचा कांहीं सुगावा त्यास कळल्या बरोबर त्यानें चौकशी करण्याविषयीं कारभाऱ्यांस ताकीद केली, पण तेच मुळीं त्या फितुरांत प्रमुख असल्यामुळें त्यानीं चौकशीचा फार्स केल्यासारखें करून त्यास येऊन कळविलें कीं, फितुरबितुर कांहीं एक नाहीं; उगीच कोणी लबाड मनुष्यानें ही गप्प उठविली आहे. पण ही त्यांची लुच्चेगिरी

त्या पाताळयंत्री हैदरापुढें कशी चालणार! त्या प्रसंगीं तो बिछान्यावर तापाच्या गुंगींत पडून राहिला होता, व त्यास सपाटून हिंव भरलें होतें, तरी त्यानें त्या कारभाऱ्यांचें तत्काळ कपट ओळखिलें व त्यांस घटकाभर आपणाजवळच बसवून ठेविलें. नंतर त्यानें हिंव उतरल्याबरोबर स्वतः दरबारांत बसून पुनः चौकशी करून त्या कारभाऱ्यांस आपणापुढें आणवून त्या कृष्णकारस्थानाचें माप त्यांच्या पदरांत घातलें, आणि त्याचवेळीं त्यांस आपल्या तंबू समोर फांशीं दिलें! एवढेंच करून तृप्त न होतां त्यानें संध्याकाळ झाली नाहीं तों या कटांतील प्रमुख प्रमुख तीनशें असामीस धरून शहरच्या नाक्या नाक्यावर नेऊन फांसावर चढविलें! त्या दिवसा पासून पुढें बिदनूरच्या राज्यांत फितूर अथवा दंगा ह्मणून कधीं झालाच नाहीं.

बिदनूरच्या वायव्येस कारवार जिल्ह्यांत सोंधें संस्थान होतें तें घेण्या साठीं हैदरानें मीरफैजुल्लाखाना बरोबर कांहीं सैन्य १७६३ च्या दिसेंबरांत रवाना केलें. ती फौज येतांच सोंध्याचा संस्थानिक गोव्याच्या पोर्तुगीज लोकांकडे पळून गेला. त्याचीं ठाणीं व तालुके हैदराच्या सैन्यानें थोडक्याच दिवसांत काबीज करून त्या संस्थानांत त्याचा अंमल बसविला.

गेल्या तीन वर्षांत हैदरअल्लीनें मराठ्यांचें फ़ारच नुकसान केलें असतां ही त्यानीं त्याचा कांहींच प्रतीकार केला नाहीं; याचें कारण या अवधींत त्यांचे आपसा मध्यें तंटे चालू होते त्यामुळें व मोंगलाशीं त्यांस दोन वेळ सारखें कित्येक महिनें युद्ध करावें लागल्यामुळें हैदराचा चांगला समाचार घेण्यास त्यांस फुरसतच सांपडेना! शिऱ्यांचा सुभा नानासाहेब पेशव्यानीं घेतल्यापासून पुरता तीन वर्षें ही त्यांचा अंमल तेथें नांदला नाहीं तोंच तो मराठ्यांचा 'स्वराज्या' पैकीं प्रदेश हैदरानें घेतला. चित्रदुर्ग वगैरे संस्थानांच्या खंडण्या 'शिऱ्यांच्या सुभ्याचे मालक' या नात्यानें त्यांस दर वर्षास मिळावयाच्या त्या ही त्यानें त्यांच्या मांडलिक संस्था-

## हैदरअलीवर पहिली स्वारी

निकांपासून बळजबरीनें घेतल्या. बिदनूर व सोंधें येथील खंडणी शिवाजी महाराजांस मिळत असे. त्यानंतर ऐशीं नव्वद वर्षे ती बंद असतां ही नानासाहेब पेशव्यानीं नुकतीच पुन: घेण्याची वहिवाट पाडिली होती. परंतु तीं दोन्ही राज्यें आतां हैदरानें घेतल्यामुळें तिकडून खंडणी येण्याचा मार्ग खुंटला. नुसती बिदनूरची खंडणीच दरसाल दहा बारा लाख रुपये येत होती[1]. हैदरानें मराठ्यांचें एकंदरींत आजपर्यंत किती नुकसान केलें होतें, हें पुणें दप्तरावरून कळण्या जोगें आहे. परंतु तें साधन आम्हांस उपलब्ध न झाल्यामुळें नक्की आंकडा सांगतां येत नाहीं. तथापि तें दरसाल पन्नास लक्षां पेक्षां कमी नसावें असा आमचा अजमास आहे. तेव्हां एवढी हानि होत असतां मराठे लोकांस त्याची कांहींच फिकीर वाटत नसेल असें कसें होईल ? परंतु हैदराचें पारिपत्य करण्या सारखा निर्वेधपणा व स्वस्थपणा पुणें दरबारास त्या तीन वर्षांत मिळालाच नाहीं. १७६२ च्या मार्च एप्रिल महिन्यांत रावसाहेब पेशवे व त्रिंबकराव मामा पंचवीस तीस हजार फौजेसह कर्नाटकच्या स्वारीस आले होते, ते धारवाड जिल्ह्यांत व हलुचाळ सांवराणीकडे खंडण्या घेत घेत तुंगभद्रा उतरून हरपनहळ्ळी पर्यंत गेले होते. परंतु पावसाळा समीप आल्यामुळें कांहीं विशेष गोष्ट त्यांच्या हातून न घडतां त्यांस परत यावें लागलें. त्या नंतर चार महिन्यानीं रावसाहेब व दादासाहेब यांमध्यें कलह होऊन दादासाहेब सैन्य जमा करून बंड करण्याच्या विचारांत होते, व बापूशत्र फडणीस व त्रिंबकराव मामा पुण्यांत कारभार करीत होते; त्यावेळीं कर्नाटकांत फौज पाठविण्याचा पुण्याच्या दरबारीं विचार चालला होतासें दिसतें.[2] परंतु पन्नास हजार फौज व तोफखाना आणि लाख रुपयांचा खजिना इतकी सामुग्री गोविंद हरीच्या अजमासा प्रमाणें या स्वारी करितां पाहिजे होती; आणि ती तयार करण्याचें

---

१ ऐ. ले. संग्रह पत्र नंबर ५६. २ ऐ. ले. संग्रह पत्रें नं० ६३ पासून ६७ पर्यंत. ३ ऐ. ले. संग्रह पत्र नं० ६८

त्या दरबाराच्यानें होईना, तेव्हां अर्थातच ती मसलत राहिली. ही स्वारी हैदराचें पारिपत्य करण्या करितांच व्हावयाची होती व तीस काय काय साधनें पाहिजेत याचा अजमास त्यावेळीं जो करण्यांत आला होता, त्या वरून एव्हां पासूनच हैदराच्या अकलेचा, आणि सामर्थ्याचा मराठ्यांवर दरारा बसत चालला होता हें उघड होतें. त्यानंतर चुलते पुतण्यांचें युद्ध होऊन दादासाहेब व सखारामबापू यांची सरशी झाली, आणि त्यां बरोबर पेशवे व त्यांचे सरदार व पन्नास हजार फौज पटवर्धनां पासून मिरज घेण्याकरितां निघाली. तो किल्ला घेतल्यावर हें सारें सैन्य किंवा निदान त्याचा कांहीं भाग मुकाबला घेण्या करितां कर्नाटकांत जावयाचें होतें[1], पण त्यावेळीं निजामअल्लीशीं युद्ध सुरू करण्याचा प्रसंग आला. तें युद्ध सहा महिने चालू होतें. त्या युद्धांत मोंगल व मराठे गुंतल्यामुळें त्या दोघांचें ही राज्य बळकाविण्यास हैदरास उत्तम संधी सांपडली! आपल्या मुलखास उपद्रव न देण्या विषयीं त्यास निजामअल्लीनें ताकीद दिली, पण तिला तो कोठें जुमानीत होता! मराठे तर त्यास अलीकडे अगदींच तुच्छ वाटूं लागले होते!

कावेरी पासून तुंगभद्रे पर्यंत सर्व मुलखांत त्याचा अंमल बसलाच होता. आतां त्यास अशी इच्छा उत्पन्न झाली कीं, सारें उत्तर कर्नाटक जिंकून आपल्या राज्याची हद्द कृष्णेपर्यंत आणून भिडवावी! त्याचा हा मनोरथ सिद्धीस जाण्यास या वेळीं पुष्कळ गोष्टी अनुकूल होत्या. उत्तर कर्नाटकांत धारवाड, बेळगांव व विजापूर हे जिल्हे येतात. या मुलखाचे बरेच तालुके पेशव्यानीं निरनिराळ्या सरदारांस जहागीर दिले होते. तोंडावर धारवाड जिल्हा आहे त्यांत कांहीं अंमल पेशव्यांचा, कांहीं पटवर्धनांचा व कांहीं सावनूरच्या नबाबाचा होता. अलीकडे दादासाहेबानीं प-

---

१ ऐ. ले. सं. पत्रें नं० १५२, १६९, १७४, १७६, १७७, १७८, १७९.
२ ऐ. ले. सं. पत्र नं० २२१.

## हैदरअल्लीवर पहिली स्वारी

टवर्धनांची जहागीर गोपाळराव बर्व्यास दिली होती, पण ती सोडण्याचें पटवर्धनांच्या मनांत नव्हतें. त्यामुळें बर्वे व पटवर्धन यांत झोंबाझोंबी बरेच दिवस चालून कांहीं ठाणीं बर्व्यांकडे गेलीं व कांहीं पटवर्धनांकडे राहिलीं. हा सर्व मुलूख मराठ्यांच्या ताब्यांत नुकताच आला असल्यामुळें तेथील जमीदारांवर व इतर लोकांवर त्यांची बसावी तशी कदर बसलेली नव्हती. मुख्य गोष्ट ही कीं, मराठ्यांवर कधीं दक्षिणेकडून परचक्र आलेलें नव्हतें. त्यांवर काय स्वाऱ्या व्हावयाच्या त्या मोंगलांच्या, आणि अर्थात् त्या उत्तरेकडून व्हावयाच्या. या कारणामुळें दक्षिण सरहद्दीवर कायम राहणारी त्यांची ह्मणण्या सारखी फौज नव्हती व ठाण्यांचा बंदोबस्त ही इतर प्रांतांच्या मानानें ढिलाच होता.

सावनूरकर नबाब हा पेशव्यांचा मांडलिक होता. त्यास आपणाकडे वळवून घेण्या साठीं हैदरानें बराच प्रयत्न केला; पण त्या नबाबास हैदराची कीर्ति अलीकडे चांगलीच माहीत झाली असल्यामुळें व तुंगभद्रे पलीकडील संस्थानिकांची त्यानें काय काय दुर्दशा केली, हें ही त्यास प्रत्यक्ष दिसत असल्यामुळें त्यानें सख्य करण्याचें किंवा त्यास खंडणी देण्याचें साफ नाकारिलें. तेव्हां सन १७६३ च्या एप्रिल महिन्यांत हैदरानें पांच हजार गारदी व पांच हजार स्वार अशी फौज मीरफैजुल्ला बरोबर सावनूरच्या राज्यावर स्वारी करण्या करितां पाठविली, आणि मागून बाकीच्या फौजेसह बिदनुराहून निघून तो स्वतः तुंगभद्रेच्या आसपास तळ देऊन राहिला. मीरफैजुल्लानें येतांच रटेहळळी व मासनूर हीं ठाणीं घेतलीं. बाकीच्या हावेरी व देवगिरी वगैरे ठाण्यांस ही त्याचा शिलशिला सुरू झाला, तेव्हां तीं क्रमाक्रमानें त्याच्या हातीं लागलीं. सावनूरचा नबाब अबदुलहकीमखान यानें ही फौज जमविण्याची तजवीज केली आणि भास्करराव नरगुंदकर, दौलतराव घोरपडे गजेंद्रगडकर, व मनोळीकर शिंदे यांस कु-

ऐ. ले. सं. पत्रें नं० २८६, २९१.

मकेस बोलाविलें. नंतर तो नबाब व हे मराठे सरदार मिळून सात आठ हजार फौजेनिशीं मीरफैजुल्लाच्या मुकाबल्यास निघाले; तेव्हां त्यानें भ्याल्या-सारखें दाखवून एका ठाण्यांत आपणास कोंडून घेतलें. हें पाहून ते फारच फुरारले व त्या ठाण्यास वेढा घालून बसले. तो मीर वारंवार आपले बा-रीक सारीक पराजय करून घेई व दिवसें दिवस अधिक अधिक जेर होत चाललों असा भाव दाखवी; परंतु त्याचा आंतला कावा अगदीं निराळा होता. वेढा घालणार पक्के बेफाम झाले आहेत असें पाहून त्यानें गुप्तपणें हें वर्तमान हैदरास कळविलें. त्या बरोबर हैदर निवडक सैन्य व तोफांचा उत्तम सरंजाम बरोबर घेऊन निघाला, तो त्या ठाण्या जवळच एका डों-गरा आड येऊन लपून बसला. दुसरे दिवशीं मीरफैजुल्लानें ठाण्यांतून बा-हेर पडून सावनूरकर व त्याचे सोबती यांवर हल्ला केला. उभयपक्षीं युद्ध होत असतां दुसऱ्या बाजूनें हैदर आला; त्यानें येतांच शत्रूंवर तोफांचा भ-डिमार केला व त्या बरोबर पलटणें होतीं त्यानीं बंदुकांचा मार झपाट्यानें सुरू केला; तेव्हां नबाब व मराठे सरदार यांच्या सैन्याची दाणादाण हो-ऊन फार लोक मारिले गेले, आणि जे जिवंत राहिले त्यानीं आपापल्या ठिकाणाकडे पळ काढिला. अशी दुर्दशा झाल्यावर नबाब मोठ्या कष्टानें जीव बचावून सावनुरास आला, आणि शहरचे दरवाजे लावून घेऊन स्व-स्थ बसला. इतक्यांत मागून सर्व सैन्यासह हैदर ही तेथें आला व थोड-क्याच दिवसांत सावनूर त्यानें काबीज केलें. नंतर नबाब अबदुलहकीम-खान निरुपाय होऊन हैदरास शरण आला व खंडणी देऊन हैदराचा अंकित म्हणवून घेण्यास कबूल झाला. हैदरानें दोन लक्ष होन खंडणी घेण्याचा ठराव केला, त्या पैकीं सत्तर हजार होनांचा नबावानें भरणा के-ला. फक्त नबाबाचा वाडा मात्र त्याकडे ठेऊन बाकी सर्व शहरांत हैदरानें गारद्यांच्या चौक्या ठेविल्या.

---

१ ऐ. ले. सं. पत्र नं० ३१६

## हैदरअल्लीवर पहिली स्वारी

सावनुरापासून तीन कोसांवर बंकापुर आहे. तो किल्ला पटवर्धनांच्या जहागिरींत होता व त्यांच्या तर्फे तेथें गोविंदपंत सखदेव ह्मणून किल्लेदार होता. तो किल्ला घेण्याचें हैदराच्या मनांत येऊन त्यानें त्यास वेढा घातला. देशाहून कुमक येईल या आशेवर गोविंदपंतानें हिंमत धरून सव्वा महिना पर्यंत किल्ला झुजविला. परंतु त्याची कोणीच कुमक केली नाहीं, तेव्हां निराश होऊन बंकापुर शत्रूच्या हवालीं करणें त्यास भाग पडलें. त्या किल्ल्यांत हैदराचा कांहीं दिवस मुक्काम झाला. त्या अवधींत मातबर सरदार मध्यस्थीस घालून इमान प्रमाण करून सावनूरच्या नबाबास त्यानें भेटीस बोलाविलें. नबाबास हैदराचा घातकी स्वभाव माहीत होता. त्यास शंका आली कीं, भेटीच्या निमित्तानें बोलावून नेऊन कैद करावें किंवा जीवें मारावें असा या दुष्टाचा बेत कशावरून नसेल ? तेव्हां जावें तरी कठिण, न जावें तरी कठिण, अशी त्यास पंचाईत येऊन पडली. शेवटीं होईल तें होवो, भेटीस हें जावयाचेंच, पण कसा ही बिकट प्रसंग आला तरी आपली तयारी असावी; अशा बेतानें सर्व सिद्धता करून नबाब बंकापुरास गेला; आणि आपण भेटीस बोलाविल्या प्रमाणें आलों आहों असें त्यानें हैदरास सांगून पाठविलें. पण "आतां संध्याकाळ झाली आहे, तुम्हीं आपल्या गोटास जाऊन उतरा, उद्यां भेट घेऊं," असा त्याचा निरोप आला. दुसरे दिवशीं नबाबाचे दोघे बंधु बरोबर होते त्यांस हैदरानें भेटीस बोलाविलें. तेव्हां ते जिवास जीव देणार पन्नास हत्यारबंद पठाण बरोबर घेऊन भेटावयास गेले. इतक्यांत कोणी हैदरास सांगितलें कीं, मागें या नबाबाच्या बापानें दक्षिणच्या सहा सुभ्यांचा सुभेदार नासीरजंग यास गोळी घालून ठार मारिलें. याच्याच घराण्यांतल्या कडप्याच्या नबाबानें त्याच योग्यतेच्या दुसऱ्या एका सुभेदाराचा ह्मणजे मुजफरजंगाचा खून केला. अशी ही पठाणांची जात खुनशी आहे. ज्या अर्थी हें बायका पोरें

---

१ ऐ. ले. सं. पत्र नं० ३४३, ३५२.

व सारे खटलें बरोबर घेऊन आलेले आहेत त्या अर्थी हे जिवावर उदार झालेले दिसतात. भेटीस आले ह्मणजे हे तुला मारिल्या शिवाय सोडीत नाहींत! हें ऐकतांच त्याचें मन कचकरलें, आणि नबाबाच्या भावांस त्यानें सांगून पाठविलें कीं, फक्त तुम्हीं दोघे असामी भेटीस या, इतरानीं येण्याचें कारण नाहीं. ती गोष्ट त्यांस पसंत पडली नाहीं यामुळें ते माघारे गोटास आले. हैदराच्या मनांत दगा करावयाचा आहे असा नबाबास कांहींसा संशय होताच, पण त्यास आतां सावनुराहून जी बातमी कळली तिजवरून तो संशय पक्काच झाला. ती बातमी अशी होती कीं, नबाब शहरांतून गेल्या नंतर त्याच्या वाड्यावर हैदराच्या गारद्यानीं हल्ला केला. जनानखान्यापर्यंत ते चालून गेले होते. इतक्यांत शिरहट्टिकर देसाई व खानजादे व पठाण लोक वाड्यांत होते त्यानीं मारामार करून शें दीडशें गारदी कापून काढिले व दोनशें पर्यंत जखमी केले. तेव्हां ते गारदी वाडा सोडून गेले. ही बातमी पसरतांच नबाबाच्या गोटांत चळवळ होऊं लागली. चित्रदुर्ग व हरपनहळ्ळी येथील संस्थानिकांनीं नबाबास सांगून पाठविलें कीं, तूं घाबरूं नको. आम्हीं तुझे सोबती आहों! या प्रकरणांत मध्यस्थ होते ते ही हैदरास ह्मणूं लागले कीं, नबाबास आमच्या मध्यस्थीनें भेटीस बोलावून मागें त्याच्या राजधानींत तूं असा दगा केलास, व हल्लीं ही त्याच्या गोटावर हल्ला करण्या साठीं तुझीं पलटणें तयार होत आहेत, तेव्हां आतां आम्हांस तर बेइमानी करितां येत नाहीं. आम्हीं नबाबाची कुमक करूं! आपली मसलत नासत चाललीसें पाहून हैदरानें पलटणाचा हल्ला मना केला, नबाबाचें सामोपचाराच्या चार गोष्टी सांगून सांत्वन करविलें, आणि सावनुरांतून गारदी उठवून आणून 'आमच्या हुकमाखेरीज तुम्हीं हा दंगा केला' असा खोटाच आळ त्या गारद्यांवर आणून त्यां पैकीं चौघांचे हात तोडविले! मग उभयपक्षीं स्वस्थता झाली. एक लक्ष तीस हजार होन खंडणीची बाकी होती तिजबद्दल सावकारी निशा देऊन

नबाब सावनुरास आला. निशे प्रमाणें रक्कम पदरीं पडतांच ठाणीं सोडून देण्याचें हैदरानें कबूल केलें.[1]

बंकापुरचा बंदोबस्त उत्तमरीतीचा असावा असें हैदराच्या मनांत आल्यावरून त्यानें त्या किल्ल्याची चांगली दागदुजी केली, भोंवता खंदक खणविला, धान्य व दारूगोळी वगैरे जकिरा सामानाची तरतूद केली, आणि गारदी वगैरे पांच हजार माणूस किल्ल्याच्या रक्षणार्थ ठेवून त्यांवर परशुराम घोरपडे सांवशीकर हा सरदार नेमिला. हुबळी व मिश्रिकोट हीं दोन ठाणीं या पूर्वींच त्याच्या हातीं आलीं होतीं.[2] बहिरीससाणा आला ह्मणजे जशी चिमण्यांची गाळण होत्ये तद्वत् हैदर आसपास आला ह्मणजे शत्रूच्या मुलखांतील जमीदार व संस्थानिक व किल्लेदार वगैरे लोकांची गाळण होत असे. याचें कारण त्याची दिवसेंदिवस वाढत असलेली सलावत हें होय. आजपर्यंत त्याचा पराजय ह्मणून कोठें झालाच नाहीं. ज्या किल्ल्यास त्यानें वेढा बसविला, तो किल्ला त्याच्या स्वाधीन झाल्याशिवाय राहिला नाहीं. तो समीप आल्यामुळें उत्तरकर्नाटकांतील किल्लेदार व देसाई वगैरे त्याच्या भीतीनेंच लटलटां कांपूं लागले होते. अशा रीतीनें अर्धवट जिंकिले गेलल्या लोकांच्या ठाण्यां पुढें हैदराची फौज जावयाचाच काय तो अवकाश ! तीं ठाणीं त्याच्या ताब्यांत यावयास या पेक्षां अधिक करावयास नको होतें. उत्तरकर्नाटक जिंकण्याचें काम मीरफैजुल्लावर सोंपवून व एकंदर दहा पंधरा हजार गारदी व स्वार व तोफा त्याच्या हवालीं करून हैदर स. १७६३ च्या आगष्ट महिन्यांत परत बिदनुरास गेला.

मीरफैजुल्लानें धारवाडास शह दिला व कांहीं फौज भोंवतालच्या प्रांतांतील ठाणीं घ्यावयास पाठविली. पटवर्धनांची जहागीर संभाळण्या करितां त्या प्रांतीं मेघश्यामराव कृष्ण पटवर्धन मंगळवेढेंकर हा राहिला होता. हा मेघश्यामरावबापू ह्मणजे गोपाळरावाचा चुलत बंधु, हें आतां वाचकांस

१ ऐ. ले. सं. पत्र नं० ३८७. २ ऐ. ले. सं. पत्र नं० ३४३.

सांगावयास नकोच. या बापूची व मीरफैजुल्लाच्या फौजेची लढाई होऊन बापूचा पराजय झाला, व तो शत्रूच्या हातीं पाडाव सांपडला. मीरफैजुल्लानें त्यास बिदनुरास हैदराकडे पाठवून दिलें. या नंतर एक ही ठाण्याचा मीरफैजुल्लाच्या फौजेपुढें टिकाव लागला नाहीं. शिरहट्टीच्या लोकांनीं मात्र एक टोळी मागें हटविली. परंतु तिला कुमक येतांच त्यांस शत्रूच्या हवालीं ठाणें करावें लागलें. या प्रमाणें गदग, नवलगुंद, श्रीमंतगड, हुलीगड, कलघटगी, व आणखी दुसरीं ठाणीं भराभर पडत चाललीं. अक्टोबरच्या दहाव्या तारखेस धारवाड काबीज झालें. कोपळ येथें रामचंद्र नारायण हुपरीकर हा मामलेदार होता. त्यानें व नरगुंदचा भास्करराव यानें मात्र शत्रूच्या सैन्यास दाद दिली नाहीं. तीं दोन स्थळें खेरीज आतां सारा धारवाड जिल्हा शत्रूच्या ताब्यांत गेला. त्यानें कित्तूरच्या देसायापासून खंडणी घेतली. क्रमाक्रमानें त्याच्या स्वाऱ्या वर्धा, मलप्रभा, व घटप्रभा या नद्या ओलांडून जवळ जवळ कृष्णातीरापर्यंत होऊं लागल्या ! घांटाखालीं सारा कारवार जिल्हा त्याच्या हातीं लागल्यामुळें गोवेंकर फिरंगी, वाडीचे सांवत व विजयदुर्गचा पेशव्यांचा सुभेदार यांस आतां हें अरिष्ट आपणावर येतें कीं काय, अशी जबरदस्त धास्ती पडली !

या प्रमाणें सन १७६४ पर्यंतचें हें हैदरअल्लीचें चरित्र आहे. या वरून तो कसा मनष्य होता हें ध्यानांत येण्याजोगें आहे. तो धूर्त, साहसी, कपटी व शूर होता इतकेंचें नाहीं, तर सैन्याच्या रचनेची शिस्त ठरविण्यांत, जमाबंदीची व्यवस्था करण्यांत, लूट जमा करण्याच्या पद्धती ठरविण्यांत, माणसांवर कदर राखण्यांत, व मनुष्यस्वभावाची पारख करण्यांत शिवाजी महाराजांचें त्यानें अनुकरण केलें होतेंसें दिसतें. आणखी बऱ्याच गोष्टींत शिवाजी महाराजांचें व त्याचें साम्य होतें. त्याला लिहितां वाचतां बिलकुल येत नव्हतें. तो पायदळाचा उत्तम सरदार होता. किल्ले

---

१ ऐ. ले. सं. नं० ३७४ पासून ३७७ पर्यंत व नं० ३८८.

कोट झुजविण्याचें व काबीज करण्याचें कौशल्य त्याच्या अंगीं पूर्ण वसत होतें. या गोष्टी शिवाजी महाराजांच्या ठायीं होत्या हें प्रसिद्धच आहे. महाराजां प्रमाणेंच त्यानें सरदारांस जहागिरी देऊन आपलें राज्य दुर्बल करून घेतलें नाहीं. दोघांत फरक येतो तो हा कीं, हैदरास मुसलमानी धर्माचा अभिमान नव्हता. ज्या त्या मनुष्यानें आपल्या धर्मा प्रमाणें आचरण केलें ह्मणजे तो कोणचा ही धर्म असला तरी स्वर्गदायक होतो, असें मानणारां पैकीं तो होता. धर्माच्या बाबतींत त्याचा कोणावर ही जुलूम नसे. पुढें एका प्रसंगीं सत्तर हजार फौजेसह त्यानें मद्रासकर इंग्रजांवर स्वारी केली होती, तेव्हां आपणास यश यावें ह्मणून त्यानें राजधानींतल्या सर्व मशिदींतून व सर्व देवळांतून देवाची प्रार्थना करविली होती ! शिवाजी महाराजांची गोष्ट तशी नव्हती. शत्रूकडून ज्यांची पायमल्ली शेंकडों वर्षें होत आली होती, अशा आपल्या हिंदुधर्माचा उद्धार व्हावा ह्मणून त्यांचे सतत प्रयत्न चालले होते, आणि आपल्या धर्माचा अभिमान बाळपणापासून त्यांच्या अंगांत खिळला होता. दुसरी गोष्ट अशी कीं, स्वदेश असा हैदरास नव्हताच, त्यामुळें देशाभिमानाचें वारें त्याच्या अंगीं खेळत नव्हतें. त्यानें अवाढव्य राज्य संपादिलें खरें, पण तें ज्यांच्या अन्नावर वाढला होता त्यांच्या माना मुरगाळून संपादिलें असल्यामुळें कृतघ्नतेच्या दोषास तो सर्वथा पात्र होतो. त्याच्या उत्कर्षानें कोणाचें ही मन प्रसन्न होत नाहीं. शिवाजी महाराजानीं तर परकीयांच्या दास्यांतून महाराष्ट्रदेश सोडवून स्वराज्याची स्थापना करण्या करितां अचाट पराक्रम केले, नाना प्रकारचे कष्ट आमरण सोशिले, पण आपला मनोदय पूर्ण केला; यामुळें आम्हां मराठ्यांसच काय, पण पृथ्वीच्या पाठीवरील कोणच्या ही देशांतील लोकांस त्यांचें नांव पूज्य झालेंच पाहिजे. असे हे फरक असले तरी पुष्कळ गोष्टींत साम्य असल्यामुळें हैदरास ‘ म्हैसूरचा शिवाजी ’ म्हणण्यास कांहीं हरकत दिसत नाहीं !

## हैदरअलीचें पूर्व चरित्र

हैदरास मुसलमानी, कानडी आणि मराठी या तिन्ही भाषा उत्तम रीतीनें बोलतां येत होत्या. किती बारिक सारीक गोष्ट असली तरी तिकडे लक्ष्य पुरविण्यांत त्यास कधीं आळस नसे. त्याची स्मरणशक्ति आश्चर्य कारक होती. त्यास दया माया ह्मणून बिलकुल नव्हती. आपल्या मसलतीस विघ्न करणारा मनुष्य मारून टाकणें आणि पायांत रुतलेला कांटा काढणें त्यास सारखेंच वाटत होतें ! बातमी ठेवण्याचें खातें त्यानें इतक्या पूर्ण दशेस आणिलें होतें कीं, त्याच्या राज्यांत गुप्त कट किंवा फंद फितूर होणें ही केवळ अशक्य गोष्ट होऊन बसली ! उद्योगास नेहमीं दैवाचें पाठबळ पाहिजे असें ह्मणणारे जे दैववादी आहेत त्यांस आपल्या पक्षाचें समर्थन करण्यास हैदराचें चरित्र हें उत्तम साधन आहे. जशा पुष्कळ गोष्टी त्यानें पराक्रमाच्या जोरावर केल्या, तशाच पुष्कळ गोष्टी केवळ त्याच्या नशिबानें घडवून आणिल्या हें ही विसरतां कामा नये. त्या गोष्टी कोणच्या हें निराळें सांगावयास नको. त्याचें वर जें चरित्र दिलें आहे त्यावरून त्या कळण्या जोग्या आहेत. एवढेंच त्यांत नवल वाटण्या सारखें आहे कीं, आजपर्यंत चार वेळ मराठ्यांच्या तावडींत सांपडलेला असून तो जो नशिबाच्या जोरावर त्यांच्या हातून निसटून गेला तो पुढें त्यांच्याच उरावर बसण्या करितां !

हैदराच्या पदरीं शेंकडों मराठी ब्राह्मण कारकून होते व कित्येक मराठे व ब्राह्मण सुद्धां त्याचे सरदार होते. त्याच्या घोडे-स्वारांत मराठ्यांचा भरणा विशेष असे. या पुस्तकांत त्या विषयीं पुढें वेळोवेळ ज्या हकिगती येतील त्यांवरून असें दिसून येईल कीं, ' गनिमी काव्या ' ची लढाई करण्याची कला तो मराठ्यांपाशीं शिकला, आणि पायदळ व तोफखाना यांच्या साधनानें लढाई करण्याची कला तो इंग्रजांपाशीं शिकला. मराठे व इंग्रज हे दोन त्याचे गुरु होते. त्यांपासून वर सांगिल्या प्रमाणें युद्धाचें दुहेरी कौशल्य व साधनें त्यानें संपादिलीं होतीं. त्यांचा उपयोग

कसा कोणाशीं करावा हें शहाणपण पांच चार ठोकरा लागल्यावर हैदरास आलें ! इंग्रजांशीं लढण्याचा प्रसंग आला ह्मणजे तो त्यांस गनिमी काव्यानें जेर करी, व मराठ्यांशीं लढतांना तोफा व पायदळ यांचाच विशेषतः उपयोग करून घेत असे. मराठ्यां प्रमाणेंच इंग्रजांस ही त्याचें नांव या पूर्वींच चांगलें माहीत झालें होतें. कारण त्यांच्या ही तीन चार टोळ्यांचा त्यानें फन्ना पाडिला होता.

अशा शत्रूशीं सामना करून त्यावर वर्चस्व स्थापावयाचें दुर्घट काम आतां रावसाहेब पेशव्यांस करावयाचें होतें. तें त्यांच्या हातून पार पडेल असें सकृद्दर्शनीं तरी त्या वेळच्या कोणा मनुष्यास ही वाटलें नसेल ! पुढें होणाऱ्या युद्धांत हैदरासच जय येईल व पेशव्यांस हतप्रभ होऊन मागें हटावें लागेल, असें जर त्या दोघांच्या स्थितींतील महदंतर मनांत आणून कोणी भाकित केलें असलें तर त्यांत काय नवल आहे ! पहिला कपटी, दगलबाज, व क्रूरकर्मा मुसलमान, तर दुसरा सत्यभाषणाचा व सचोटीनें वागण्याचा बाणा बाळगणारा आणि स्वभावतः सात्विक वृत्तीचा ब्राह्मण ! अनेक कारस्थानें खेळविल्यामुळें व शेंकडों युद्धप्रसंग पाहिल्यामुळें पहिल्याची मुत्सद्दीपणाची व सरदारीची अक्कल परिपक्वदशेस आली होती, आणि दुसऱ्यास असल्या गोष्टींचा सर्वच अनुभव केवळ नवीन होता. पहिल्याजवळ भरपूर खजिना होता, जिवासजीव देणारे विश्वासू सरदार होते, आणि धन्याच्या कल्याणासाठीं अहर्निश झटणारे मुत्सद्दी होते. दुसऱ्याचा खजिना रिकामा झाला होता, सरदार बेकैदी आणि केवळ स्वार्थावर नजर ठेवणारे होते, आणि मुत्सद्दी तर शत्रूशीं उघडपणें फितूर खेळविण्या इतके बेशरम व बेपर्वा झालेले होते. पहिल्यानें आपलें राज्य इतक्यांतच बऱ्याच अंशीं निष्कंटक केलें होतें. राज्य घेण्यासाठीं टपलेलीं, नेहमीं फंदफितूर करणारीं, कुटुंबांतलीं माणसें दादासाहेब व आनंदीबाई यांस कसें तरी वागवन घ्यावें लागत असल्यामुळें दुसऱ्याची दशा